# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**एम. ए. भाग–१ : सत्र १ (समाजशास्त्र)**

Major Mandatory CS03

# महाराष्ट्रातील संस्कृती आणि समाज

**(Society and Culture in Maharashtra)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89345-34-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■


अध्यक्ष – **प्रा. (डॉ.) अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर)**
न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा

- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर

- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजीनगर

- **डॉ. सुगत शेषराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे आम्ही हार्दिक स्वागत करतो. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे एकूण चार पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र १ साठी 'महाराष्ट्रातील संस्कृती आणि समाज' असा पेपर आहे. या पेपरमध्ये सत्रपद्धतीनुसार एकूण चार अध्ययन घटक आहेत. त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील संस्कृती आणि समाज याचे यथार्थ आकलन होईल याची आम्हाला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक श्री. बबन पाटोळे, श्रीमती पपिता कांबळे, डॉ. सुषमा जाधव, श्री. अमोल महापुरे यांना मनःपूर्वक धन्यवाद. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक आणि केंद्रातील कर्मचारी यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**श्री. अरविंद घोडके,**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| **लेखक** | **घटक क्रमांक** |
|---|---|
| **श्री. बबन पाटोळे**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक,<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **श्रीमती पपिता कांबळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ<br>आर्टस ॲण्ड सायन्स, सांगली, जि. सांगली | २ |
| **डॉ. सुषमा जाधव**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | ३ |
| **श्री. अमोल महापुरे**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**श्री. अरविंद घोडके,**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र : सामाजिक राजकीय इतिहास आणि आर्थिक पार्श्वभूमी | १ |
| २. | महाराष्ट्रातील समाज : ग्रामीण, नागरी आणि आदिवासी | ३१ |
| ३. | महाराष्ट्रातील राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनाचे पैलू | ६३ |
| ४. | महाराष्ट्रातील प्रमुख सामाजिक चळवळी | ९७ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र–१ : घटक –१

# महाराष्ट्र : सामाजिक राजकीय इतिहास आणि आर्थिक पार्श्वभूमी

**(Maharashtra: Socio-Political History and Economic Profile)**

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.१ उद्दिष्टे

१.२ विषय विवेचन

१.३.१ महाराष्ट्र राज्यातील संक्षिप्त सामाजिक आणि राजकीय इतिहास (१८१८–१९६०)

१.३.२ १९६० नंतरच्या महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढ आणि लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये

१.३.३ महाराष्ट्र राज्य : १९६० नंतरच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीची पार्श्वभूमी

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ सरावासाठी प्रश्नांची उत्तरे

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.१ प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करताना अनेक बाबींचा अभ्यास करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रातील तत्कालीन समाजात जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अनिष्ट रूढी, प्रथा परंपरांचे प्राबल्य होते. ब्रिटीश सरकारचे प्रयत्न तसेच थोर समाजसुधारकांच्या प्रयत्नातून समाजात परिवर्तन घडून येण्यास मदत झाली. ब्रिटीशांच्या पाश्चात्य शिक्षण, मुलकी प्रशासन व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था यामुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली. मोठ्या वैचारिक बदलाला सुरुवात झाली. पेशवाईची अस्त होऊन प्रगत आणि सामर्थ्यशाली ब्रिटीश संस्कृतीशी महाराष्ट्रीय जनतेचा संपर्क आला. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील १८१८ ते १९६० या दरम्यानच्या सामाजिक तसेच राजकीय परिस्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. याचबरोबर महाराष्ट्र स्थापनेपासून म्हणजेच १९६० नंतर राज्यात झालेली लोकसंख्यावाढ, त्याची विविध कारणे आणि लोकसंख्येची वैशिष्ट्ये यांचाही अभ्यास केलेला आहे. याचबरोबर राज्यातील १९६० नंतरच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

## १.१ उद्दिष्टे

१. महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्तपणे सामाजिक आणि राजकीय इतिहास (१८१८-१९६०) समजून घेता येईल.

२. १९६० नंतर महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढ आणि लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.

३. महाराष्ट्र राज्य: १९६० नंतरच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीची पार्श्वभूमी अभ्यासता येईल.

## १.२ विषय विवेचन

### १.३.१ महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त सामाजिक आणि राजकीय इतिहास (१८१८–१९६०) :

**प्रस्तावना :**

इसवी सन १९१८ साली पेशवाई संपुष्टात येऊन महाराष्ट्रात इंग्रजी राजवट सुरू झाली. इंग्रजी राजवटीमुळे भारतात तसेच महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रात दूरगामी परिणाम झाले. ब्रिटिश सत्तेचा एकछत्री अंमल, सुव्यवस्थित प्रशासन यंत्रणा, कायद्यांचे संहितीकरण, शिक्षण प्रसार यामुळे महाराष्ट्रीय समाजात परिवर्तन घडून आले. इंग्रजी सत्तेमुळे महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून गेला. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रात ब्रिटिश सत्तेमुळे परिवर्तन घडून आले. ब्रिटिशांच्या पाश्चात्य शिक्षणामुळे तत्कालीन समाजातील लोकांचा पाश्चिमात्य कला, विद्या, पाश्चात्य शिक्षण, साहित्य तसेच प्रशासन यांच्याशी संबंध आला. यातूनच समाजसुधारकांच्या प्रबोधनवादी चळवळी गतिमान झाल्या. तत्कालीन समाजातील जुन्या रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा तसेच जातीव्यवस्था यांच्यावर आघात झाले. पाश्चात्य संस्कृती इथल्या समाजव्यवस्थेला सहजासहजी पचनी पडणारी नव्हती. त्याला काही प्रमाणात विरोधही झाला. महाराष्ट्रातील समाजाची वैचारिक कोंडी फोडण्याचे कार्य १९ व्या शतकाने केले. या शतकात सामाजिक परिवर्तनाला सुरुवात झाली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी तसेच ब्रिटिश सरकारने शिक्षण प्रसारास सुरुवात केली. महाराष्ट्रीय तरुणांचा आधुनिक शिक्षणाशी संपर्क आला. पाश्चात्य शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या महाराष्ट्रीयन तरुणांचा इंग्रजी भाषेतील अभिजात साहित्य, पाश्चिमात्य सामाजिक संस्था, युरोप, इंग्लंडमधील आधुनिक विचारांशी संपर्क आला. त्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल तसेच विज्ञान अशा विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली. या अभ्यासातूनच त्यांना आधुनिक जगाचे दर्शन घडले. ज्ञानाची नवीन क्षेत्रे खुली झाली. पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या तरुणांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. महाराष्ट्रीयन तरुणांच्यात विज्ञानवादी वृत्ती रुजण्यास मदत झाली. पाश्चात्य शिक्षण आणि बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून मानवी व्यवहाराचे परीक्षण करण्याची भौतिक क्षमता त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्यातील अनिष्ट चालीरीती, प्रथा परंपरा तसेच अंधश्रद्धा कमी होऊ लागल्या. मानवी व्यवहार बुद्धीच्या, उपयुक्ततेच्या आणि मानवतेच्या निकषावर तपासून घेण्याची वृत्ती निर्माण झाली. अंधश्रद्धेची जागा तर्कवादाने घेतली. नवीन जीवनमूल्ये शिक्षित तरुणात रुजू लागली. एकूणच महारष्ट्रात १९ व्या २० व्या ब्रिटीश कालखंडात सामाजिक परिवर्तनाला सुरुवात झाली.

**महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती :**

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात भारतीय समाजजीवनात अनेक प्रकारच्या अनिष्ट चालीरीती, रूढी, प्रथा परंपरा यांचे स्तोम माजले होते. महाराष्ट्रातील परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. त्याकाळी शिक्षण ही मूठभर उच्च जातींच्या लोकांची मक्तेदारी होती. त्यामुळे समाजातील बहुसंख्य लोक अज्ञानी होते. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. साहजिकच येथील बहुजन समाजावर अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, देवदेवता, कर्मकांडे अशा अनेक गोष्टींचा मोठाच पगडा होता. तत्कालीन समाजातील अनेक अनिष्ट चालीरीती व रूढीमुळे एकूणच समाजाची अधोगतीकडे वाटचाल होऊ लागली होती.

**जाती व्यवस्था :**

१९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजजीवनावर जातीव्यवस्थेचा मोठा पगडा होता. समाजात वर्णव्यवस्था खोलवर रुजली होती. त्यातूनच जातीसंस्थेचा विषारी वृक्ष फोपावला होता. समाजाची विभागणी अनेक जाती, पोटजातीमध्ये झाली होती. जाती-जातीमध्ये श्रेष्ठ कनिष्ठ, उच्च नीच प्रकारचा सामाजिक भेदभाव निर्माण झाला होता. जातीव्यवस्थेने सामाजिक उतरंड तयार केली होती. प्रत्येक जातीला स्वतःचे विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. त्यानुसार सामाजिक हक्क, विशेषाधिकार व कर्तव्ये लाभली होती. उच्च जातींना अनेक प्रकारचे विशेष अधिकार प्राप्त झाले होते. याउलट कनिष्ठ जातींना सर्वच अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. कनिष्ठ जातीतील लोकांच्यावर अनेक जाचक निर्बंध घालण्यात आले होते. जातीव्यवस्थेचे निर्बंध मोडणाऱ्या व्यक्तींना समाज बहिष्कृत किंवा जाती बहिष्कृत करण्यात येत असे. व्यक्तीची ओळख तिच्या जातीवरून होत असे. प्रत्येक व्यक्तीचा व्यवसाय तसेच जीवनपद्धतीही जातीवरूनच निश्चित होत होती. जाती अंतर्गतच विवाह करण्याचे बंधन घालण्यात आले होते. जातीबाह्यविवाह हा गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा मानला जात असे. सर्व जातीमध्ये ब्राह्मण जातींना सर्वोच्च स्थान प्राप्त झाले होते. समाजातील बहुतेक सर्व सत्ता व अधिकाराची पदे त्यांनीच बळकावली होती. त्यांना अनेक प्रकारचे विशेष अधिकार देण्यात आले होते. शिक्षणाचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच असल्यामुळे शासन व्यवस्थेतील उच्च पदे त्यांच्याकडे असत. तत्कालीन समाजात ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी निर्माण झाली होती. याउलट कनिष्ठ जातीतील लोकांची स्थिती अतिशय दयनीय बनली होती. कनिष्ठ जातींच्या लोकांवर सर्व प्रकारचा अन्याय होत असे. धर्माच्या नावाखाली कनिष्ठ जातींची आर्थिक व सामाजिक शोषणाची व्यवस्थाच निर्माण केली होती.

**अस्पृश्यांची स्थिती :**

अस्पृश्य जातीतील लोकांचे जीवन अतिशय दयनीय आणि कष्टप्रद बनले होते. अत्यंत वाईट अवस्थेत त्यांना जीवन जगावे लागत होते. उच्च वर्गाने त्यांना सर्व प्रकारच्या हक्कांपासून वंचित ठेवले होते. अस्पृश्य जातीतील लोकांचा स्पर्शही विटाळ मानला जात असे. उच्च जातीच्या व्यक्तीला चुकून जरी अस्पृश्यांचा स्पर्श झाला तरी त्या व्यक्तीला अमानुष पद्धतीची शिक्षा दिली जात असे. मध्यम जातीच्या लोकांची स्थितीही वाईटच होती. त्यांना देखील दारिद्र्यात जीवन जगावे लागत होते. मध्यम जातीचे लोकही अस्पृश्य लोकांना

हीन लेखत होते. त्यांच्याशी भेदभावपूर्ण वर्तन करीत होते. अस्पृश्य जातीतील लोकांच्यावर अनेक कठोर निर्बंध लादण्यात आले होते. त्यांना मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार नव्हता. सवर्ण जातींसाठी असलेल्या विहिरी, तळी, सार्वजनिक ठिकाणे, नदी घाट इ. ठिकाणी येण्यास बंदी होती. गावातील अस्पृश्यांची वस्तीदेखील वेगळी व गावकुसाबाहेर होती. भारतीय समाजात गुलामगिरीची प्रथा कधीच रूढ नव्हती असे सांगितले जात असले तरी येथील अस्पृश्यांची एकंदर स्थिती मात्र गुलामांहूनही वाईट होती.

**शैक्षणिक परिस्थिती :**

एकोणिसाव्या शतकात भारतात वेद, विद्या, धर्मशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिष तसेच न्याय यासारख्या विषयांचे शिक्षण दिले जात होते. भारताप्रमाणे महाराष्ट्रातही हीच अवस्था होती. ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण ही शासनाची जबाबदारी नाही अशी राज्यकर्त्यांची समजूत होती. शिक्षणाचा अधिकार ब्राह्मण वर्गापुरता मर्यादित होता. ब्राह्मणांशिवाय अपवाद म्हणून व्यापारी वर्ग व उच्च समजल्या गेलेल्या काही इतर जातीतील मुले शिक्षण घेत असत. शिक्षण अतिशय प्राथमिक, जुजबी स्वरूपाचे तसेच व्यवसाय धंद्याला उपयुक्त ठरावे अशा प्रकारचे असे. शिक्षण हे सार्वत्रिक नव्हते. ब्राह्मण तसेच उच्चवर्णीय श्रीमंत लोकांच्या पुरते मर्यादित होते. अस्पृश्य, शूद्र, स्त्रिया तसेच अठरापगड जातीतील लोकांना शिक्षण घेण्याचा कोणताही अधिकार नव्हता. शिक्षण हे पारंपारिक व धार्मिक स्वरूपाचे होते. तत्कालीन शिक्षणात विज्ञान, तार्किकता तसेच मानवी मूल्ये या गोष्टींचा अंतर्भाव नव्हता.

**स्त्रियांची स्थिती :**

तत्कालीन समाजव्यवस्था पुरुषप्रधान होती. समाजजीवनाच्या सर्वोच्च क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व होते. परिणामी समस्त स्त्री वर्गाची अवस्था अतिशय दयनीय बनली होती. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हति' या मनुच्या वचनानुसार स्त्रियांवर अनेक निर्बंध लादण्यात आले होते. स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर धर्माचा, अनिष्ट रूढी प्रथा परंपरा, कर्मकांडे, अंधश्रद्धा तसेच देवभोळेपणाचा खूप मोठा पगडा होता. या सर्वांमुळे स्त्रियांची दुर्दशा झाली होती. समाजात बालविवाहाची अनिष्ट प्रथा रूढ होती. त्यामुळे ७ किंवा ८ वर्षीच मुलींची लग्न लावून दिले जात. लहान वयातच त्यांच्यावर संसाराची जबाबदारी लादली जात असे. पती निधनानंतर अकाली वैधव्य आलेल्या स्त्रियांना विधवा म्हणून हिणवले जात. विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. अशा स्त्रियांना कोणत्याही धार्मिक विधी अथवा सण समारंभात सहभागी होण्याची मुभा नव्हती. विधवेचे दर्शन अशुभ मानले जात असे. विधवा स्त्रीने वाममार्गाकडे वळू नये, तिला परपुरुषांची आसक्ती वाटू नये म्हणून सक्तीने तिचे केशवपन करून तिला विद्रूप बनवले जात असे. केशवपनाची अघोरी प्रथा विशेषत: ब्राह्मण जातीत मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. तत्कालीन समाजातील उच्च वर्गात काही प्रमाणात सतीची चाल रूढ होती. काही प्रसंगी विधवा स्त्रीवर सती जाण्यासाठी जबरदस्तीही केली जात असे. याच काळात महाराष्ट्रीय समाजात काही प्रमाणात दासी प्रथा आढळून येत होती. अशा दासींना कुणबीन किंवा बटीक म्हटले जात असे. सुखवस्तू लोक आपल्या पदरी कुणबीन बाळगत असत. याचबरोबर बरोबर जोगतीन, मुरळी आणि देवदासी यासारख्या स्त्रियांची विटंबना करणाऱ्या

अनिष्ट प्रथाही अस्तित्वात होत्या. परिणामी १९ व्या शतकात महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती दयनीय असल्याचे दिसून येते.

**आर्थिक परिस्थिती :**

१९ शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान होती. शेती हा समाजातील मुख्य व्यवसाय होता. बहुसंख्य लोक शेतीवरच गुजराण करीत होते. शेतकऱ्यांची अवस्था मात्र हलाखीची होती. शेती व्यवसाय बहुतांशी निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून होता. शेतीला आवर्षणाचा तसेच अतिवृष्टीचा तडाखा बसत असे. महाराष्ट्राच्या बऱ्याचशा भागात सतत दुष्काळ पडत असे. शेतीत काबाडकष्ट करूनही फारसे उत्पादन मिळत नसे. शहरांची संख्या अगदीच कमी होते. लोकसंख्या मर्यादित होती. महाराष्ट्रातील समाजजीवन मुख्यत्वे ग्रामीण जीवनाशी निगडित होते. प्रत्येक खेडे हा स्वयंपूर्ण असा आर्थिक आणि प्रशासकीय घटक होता. गावचा कारभार गावातील उच्च वर्गातील लोकांच्या मार्फत चालवला जात असे. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेतीच होते. शेतीवरील कर, जमीन, महसूल किंवा शेतसारा उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत होते. गावातील सारा वसूल करण्याची जबाबदारी गावातील पाटील व कुलकर्णी या प्रमुख अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती. संपूर्ण अर्थव्यवस्था शेती व्यवसायाभोवतीच केंद्रित झाली होती. जमीन कसण्याचे काम करणाऱ्या शेतकऱ्यांना 'कुणबी' म्हटले जात असे. शेतकरी हाच गावच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ होता. शेती व्यवसायाशी निगडित इतरही जोडधंदे केले जात होते. गावातील लोकांच्या गरजांचे उत्पादन गावातच केले जात असे. गाव हे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण घटक बनले होते. अलुतेदारी व बलुतेदारी पध्दती अस्तित्वात होत्या. अलुतेदार व बलुतेदार शेतकऱ्याला आवश्यक सेवा पुरवत होते. त्याबदल्यात त्यांना शेतकऱ्याकडून वर्षाकाठी धान्य मिळत असे. शेतकऱ्यांना राहिलेल्या धान्यातून सावकाराचे कर्ज भागवणे तसेच स्वतःच्या कुटुंबाची उपजीविका करणे ही कामे करावी लागत.

**राजकीय परिस्थिती :**

२० व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे राजकारण अखिल भारतीय राजकारणाशी जोडले गेले होते. १९ व्या शतकात भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. देशात १८९५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत झाल्याचे चित्र दिसू लागले. देशाच्या इतर प्रांतात झालेल्या घडामोडींचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर पडणे स्वाभाविक होते. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणीमुळे महाराष्ट्रातील राजकारणही ढवळून निघाले होते. सन १८९९ मध्ये लॉर्ड कर्जन हा भारताचा व्हाईसरॉय झाला. त्याने भारतीय जनतेवर जुलूम जबरदस्ती आणि दडपशाही केली. त्याच्या साम्राज्यवादी वृत्तीमुळे भारतीय राष्ट्रवादाला चालना मिळाली. लॉर्ड कर्झनच्या एकाधिकार वृत्तीविरुद्ध भारतीय जनतेत असंतोष निर्माण झाला. कर्झनच्या जुलमी राजवटीमुळे भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध कडवटपणा निर्माण झाला. महाराष्ट्रातील ब्रिटिशाविरुद्धचा लढा तीव्र बनण्यास कर्झनशाही मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरली. १६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगालची फाळणी करण्यात आली. या फाळणीविरुद्ध देशातील जनतेने आंदोलन उभे केले. या आंदोलनाला महाराष्ट्रातील जनतेनेही पाठिंबा दिला. महाराष्ट्रात १८८० पासूनच

इंग्रजी सत्तेच्या विरोधात असंतोष वाढत चालला होता. बंगालच्या फाळणीने त्यात अधिकच भर पडली. त्यामुळे महाराष्ट्रीय जनता बंगालच्या फाळणीला विरोध करण्यास सज्ज झाली. या फाळणीविरुद्धच्या आंदोलनाचे लोन महाराष्ट्रात पोहोचले. महाराष्ट्राच्या राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले. राष्ट्रीय पातळीवरील ज्या घटनांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर विशेष प्रभाव पडला, त्यामध्ये १९०७ च्या सुरत येथील अधिवेशनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीचाही अंतर्भाव करावा लागेल. काँग्रेस संघटनेत राष्ट्रीय पातळीवर झालेल्या फाटाफुटीमुळे काही काळ महाराष्ट्रातील राजकारणही ढवळून निघाले होते. महाराष्ट्राच्या राजकारणाला विशिष्ट वळण देण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक राजकीय विचारवंतांनी प्रयत्न केले. यामध्ये न्यायमूर्ती गोपाळ कृष्ण रानडे तसेच लोकमान्य टिळक यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**महाराष्ट्राचा राजकीय इतिहास :**

१८१८ साली ब्रिटिशांनी पेशव्यांचा पराभव करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर ब्रिटिश सत्तेचा उदय झाला. पेशवाईतील राज्यकारभाराचा वाईट अनुभव घेतलेल्या येथील जनतेला ब्रिटिशांची राजवट दिलासा देणारी ठरली. इंग्रजी राज्यकर्त्यांनी सर्वप्रथम राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केली. राज्यातील दंगेधोपे तसेच अराजकता यांना पायबंद घातला. राज्यातील पुंड, पेंढारी तसेच दरोडेखोर यांचा बंदोबस्त केला. इंग्रजी राज्यकर्त्यांनी न्यायव्यवस्थेतील दोष दूर करून समान न्यायाचे तत्व अंगीकारले. महाराष्ट्रात एलफिस्टन सारख्या धोरणी व मुत्सद्दी अधिकाऱ्याने सुरुवातीपासूनच मराठी लोकांच्या मनात इंग्रजी राज्यकर्त्याविषयी विश्वास व आपुलकी निर्माण केली.

मुंबईचा गव्हर्नर म्हणून एलफिस्टनने आपल्या अखत्यारीतील प्रदेशात चांगले प्रशासन निर्माण करण्याकडे लक्ष दिले. १० फेब्रुवारी १९१८ रोजी त्याने सुप्रसिद्ध साताऱ्याची घोषणा (प्रोक्लेमेशन ऑफ सातारा) करून महाराष्ट्रातील जनतेला आपल्या राज्यात न्याय व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे तसेच धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन दिले. एलफिस्टनने आपल्या कारकिर्दीत सुनियंत्रित आणि शिस्तबद्ध राज्यपद्धती निर्माण करून सर्वत्र कायद्याचा अंमल जारी केला. ब्रिटिशांनी प्रशासनात सुसूत्रता आणि एकवाक्यता निर्माण केली. ब्रिटीशांच्या प्रशासनातील अमुलाग्र सुधारणांच्यामुळे राज्याच्या प्रशासन व्यवस्थेचा चेहराच बदलून टाकला. इंग्लंडच्या सरकारने १८५८ मध्ये भारताचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून स्वतःच्या हाती घेतला. 'व्हिक्टोरिया' राणीने जाहीरनामा प्रसिद्ध करून भारताचे प्रशासन कार्यक्षमतेने व निष्पक्षपातीपणे चालवण्याचे आश्वासन दिले. ब्रिटिश राजवटीत पश्चिम महाराष्ट्राचा अंतर्भाव मुंबई इलाख्यात झाला होता. पेशवाईच्या अस्तानंतर पश्चिम महाराष्ट्राचा फार मोठा प्रदेश मुंबई इलाख्यात समाविष्ट झाला. मुंबई शहर व पश्चिम किनारपट्टीवरील काही प्रदेशावर इंग्रजांनी त्या अगोदरच नियंत्रण प्रस्थापित केले होते.

**मुलकी प्रशासन :**

मुलकी प्रशासनातील मनमानी थांबवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ब्रिटिश राजवटीने केले. कंपनी सरकारने मुंबई इलाख्यात सारा वसुलीसाठी रयतवारी पद्धती स्वीकारली. एलफिस्टनने मुंबई इलाख्यातील मराठी भाषिक प्रदेशाचे ५ जिल्ह्यात विभाजन केले. जिल्ह्यांच्या प्रशासनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक जिल्ह्यासाठी इंग्रज 'कलेक्टरची' नेमणूक करण्यात आली. त्याचबरोबर डेप्युटी कलेक्टर तसेच

मामलेदार पदांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे प्रशासनाच्या कामात शिस्त निर्माण झाली. ब्रिटिश आमदनीत कलेक्टर हा मुलकी प्रशासनातील महत्त्वाचा अधिकारी बनला. त्याच्याकडे जिल्ह्यातील सारावसुलीच्या कामावर देखरेख ठेवणे, जिल्हात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पोलीस दलाची व्यवस्था करणे, मुलकी व फौजदारी स्वरूपाचे तंटे सोडवणे तसेच त्यासंबंधीचे न्यायदान करण्याची कामे सोपवण्यात आली. तालुक्याच्या मुलकी कारभाराची जबाबदारी मामलेदार या अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली होती. इंग्रजी सरकारने सारा वसुलीच्या कामातही अधिक सुव्यवस्थितपणा व नियमितता आणण्याचा प्रयत्न केला. खेडेगावाचा कारभार पाहणे, सारा वसुली करणे तसेच गावात शांतता व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी परंपरेनुसार पाटील कुलकर्णी यांच्याकडे ठेवण्यात आली. खेड्यातील पाटील व कुलकर्णी यांच्या कामावर तालुक्याच्या मामलेदाराचे नियंत्रण असे. जिल्ह्याचा कलेक्टर हा इंग्रजी अधिकारी होता. पाटील, कुलकर्णी आणि मामलेदार यासारख्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या जागा मात्र एतदेशीय लोकांना देण्यात आल्या. ब्रिटिशांच्या या व्यवस्थेमुळे राज्यकर्त्यांना व सरकारी अधिकाऱ्यांना स्थानिक जनतेशी दैनंदिन संपर्क प्रस्थापित करणे शक्य झाले.

**ब्रिटीशांचे शिक्षणविषयक धोरण :**

ब्रिटीशांचे शिक्षणविषयक धोरण सर्वसमावेशक राहिलेले दिसून येते. ब्रिटिशांनी मुंबईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्यावतीने विविध शाळा सुरू करण्यासाठी सन १८१६ मध्ये 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. कंपनीच्या नियंत्रणाखालील प्रदेशात राहणाऱ्या गरीब लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा या संस्थेचा प्रमुख उद्देश होता. एलफिस्टन हे या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांच्या पुढाकाराने १८३३ मध्ये लोकशिक्षण समिती स्थापन करण्यात आली. या समितीने १८३३ पर्यंत आग्रा व दिल्ली येथे महाविद्यालयांची स्थापना केली होती. ब्रिटिश सरकारने महाराष्ट्रातील शिक्षण प्रसारात सुसूत्रता आणण्यासाठी १८४० मध्ये मुंबई येथे 'बोर्ड एज्युकेशन'ची स्थापना केली. या मंडळात तीन सरकार नियुक्त व तीन बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी होते. या मंडळांना शाळा स्थापन करण्याचे, शाळांना मान्यता देण्याचे आणि शाळा तपासणी करण्याचे अधिकार देण्यात आले होते. या मंडळांनी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहाय्य केले. प्रत्येक वर्गासाठी प्रथमच अभ्यासक्रम तयार करण्यात आला. शिक्षणात भारतीय भाषांना उत्तेजन मिळावे या उद्देशाने मराठी व गुजराती भाषेमध्ये ग्रंथ निर्मिती केली. या शिक्षण मंडळाच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडून येण्यास चालना मिळाली.

**चार्ल्स वूडचा शिक्षणविषयक खलिता :**

भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रयत्नामुळे शिक्षणाला गती मिळाली. देशात विविध ठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यात आल्या. शिक्षणावरती खर्च करण्यात येऊ लागला. कंपनी सरकारने शिक्षण क्षेत्रात वेळोवेळी झालेल्या प्रगतीचे सर्वेक्षण केले. शैक्षणिक पुनर्रचना केल्या. शिक्षण क्षेत्रात लॉर्ड मेकॉलेने 'झिरपणीचा सिद्धांत' मांडला होता. या सिद्धांतानुसार प्रथम समाजातील काही लोकांना उच्च शिक्षण द्यावे. शिक्षित लोकांच्या मार्फत शिक्षण समाजाच्या खालच्या थरापर्यंत झिरपत जाईल अशी त्याची भूमिका होती.

पण ती फारशी साध्य झाली नाही. याच दरम्यान ईस्ट इंडिया कंपनीचे अध्यक्ष सर चार्ल्स वूड यांनी १९ जुलै १८५४ रोजी भारतात शिक्षण विषयक धोरणाचा खलिता पाठवला. यामध्ये भारतीय शिक्षण पद्धतीविषयी काही सूचना करण्यात आल्या होत्या. त्या खालील प्रमाणे.

१. शासनाने आपल्या अग्रक्रमाच्या कार्यात शिक्षणाचा समावेश करावा.

२. शिक्षणाचे माध्यम म्हणून देशी भाषांना प्राधान्य देण्यात यावे.

३. कनिष्ठ पातळीपासून उच्च पातळीपर्यंतच्या शिक्षणात सुसंवाद असावा.

४. विविध प्रांतात प्राथमिक व माध्यमिक शाळा असाव्यात.

५. खाजगी शाळांना सरकारने अनुदान द्यावे.

६. पदवीपर्यंत शिक्षण महाविद्यालयात द्यावे. महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न असावीत.

७. उच्च शिक्षणावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतात विद्यापीठांची स्थापना करावी.

८. शिक्षण व्यवस्थेतील कार्यात सुसूत्रता आणण्यासाठी तसेच शाळांची तपासणी करण्यासाठी एक स्वतंत्र खाते असावे.

सर चार्ल्स वूडच्या खलीत्यामध्ये मांडलेल्या सूचनांचा भारतात स्वीकार करण्यात आला. देशातील शिक्षण व्यवस्थेत सुसूत्रता येऊन शैक्षणिक प्रगतीला गती मिळाली. साहजिकच महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेतही परिवर्तन घडून येण्यास मदत झाली.

**हंटर आयोग :**

सर चार्ल्स वूडच्या सूचनांचा स्वीकार केल्यानंतर शिक्षण क्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी तसेच पुढील काळातील आवश्यक त्या सुधारणा सुचवण्यासाठी लॉर्ड रिपन याने इ.स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने अनेक शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. शैक्षणिक कार्याची पाहणी करून शासनाला काही शिफारशी सादर केल्या. त्या खालील प्रमाणे.

१. खाजगी शिक्षण संस्थांना उत्तेजन देण्यात यावे.

२. महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य करण्यात यावे.

३. प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करण्यात यावे.

४. शासकीय शाळा खाजगी शिक्षण संस्थाकडे सोपवण्यात याव्यात.

५. लोकशिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जावे.

६. प्राथमिक शिक्षणावर सरकारने अधिक लक्ष द्यावे.

७. सरकारने आपल्या उत्पन्नातील काही भाग शिक्षणासाठी बाजूला काढून ठेवावा.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासास सर एलफिस्टन, सर चार्ल्स वूड तसेच हंटर आयोग यांच्या धोरणामुळे गती प्राप्त झाली. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शिक्षण संस्थांची स्थापना करून शिक्षणाची सोय करण्यात आली. ब्रिटिशांनी आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने शिक्षणाला चालना दिली असली तरी त्याचे काही सकारात्मक परिणामही घडून आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. महाराष्ट्रातील जनतेला पाश्चात्य तसेच भौतिक शिक्षणाची संधी प्राप्त झाली.

२. तत्कालीन समाजातील उच्च वर्गाची शिक्षणातील मक्तेदारी संपुष्टात येण्यास मदत झाली.

३. विविध जाती धर्मातील लोकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली.

४. ब्रिटिश प्रशासनासाठी आवश्यक कारकून वर्ग तत्कालीन समाजातून उपलब्ध होण्यास मदत झाली.

५. भारत तसेच महाराष्ट्रीय जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. महाराष्ट्रात प्रबोधनाची सुरुवात झाली.

**महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि समाजसुधारणेचे कार्य :**

**१. बाळशास्त्री जांभेकर : (१८१२–१८४६)**

बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या बाबतीत त्यांची वृत्ती पुरोगामी होती. भारतीय समाजातील हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा बंद होऊन त्यांना आळा बसावा अशी त्यांची मनोभूमिका होती. त्यांनी विधवा पुनर्विवाह तसेच स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. विधवा विवाहाला शास्त्रीय आधार शोधून काढण्याची कामगिरी त्यांनी केली. धर्मांतर केलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले जावे असे त्यांचे मत होते. त्यांना प्रसंगी सनातनी ब्राह्मणांच्या रोषास समोरे जावे लागले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र तसेच नीतीशास्त्र या विविध विषयावरील मराठी भाषेतील पहिली पाठ्यपुस्तके त्यांनी लिहिली होती. आपल्या सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यद्वारे तत्कालीन हिंदू समाजास धक्के देऊन जागृत करण्याच्या कार्यात बाळशास्त्री जांभेकर अग्रेसर होते.

**२. गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) (१८२३–१८९२) :**

महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारकांच्या पिढीतील एक अग्रेसर विचारवंत म्हणजे गोपाळ हरी देशमुख होय. लोकहितवादींनी सर्वांगीण सामाजिक सुधारणेसाठी आग्रह धरला होता. समाजातील दोषावर त्यांनी कोरडे ओढले. समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा दूर करून सामाजिक प्रगतीचा विचार करावा, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन स्वतःची उन्नती साधावी, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती आणि संकुचित विचार यांचा त्याग करावा असे त्यांनी सांगितले. भारतातील जातीव्यवस्था येथील लोकांच्या अधोगतीला कारणीभूत आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी जातीव्यवस्था व वर्णभेदास विरोध केला. उच्चवर्णीयांनी आपल्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनांचा त्याग करून देशहितासाठी नव्या आचार विचारांचा अंगीकार करावा असे

सांगितले. लोकहितवादींनी बालविवाह, हुंडा पद्धती तसेच बहुपत्नीत्व यासारख्या अनिष्ट प्रथांवर हल्ला चढवला. स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे अधिकार द्यावेत, शिक्षण व विवाहाबाबत स्वातंत्र असावे, विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार असावा असे पुरोगामी विचार मांडले. त्यांनी धर्मविषयक सनातन कल्पनांवरही प्रखर टीका केली. धर्माचे आचरण करताना सदूसद्‌विवेकबुद्धीला प्राधान्य द्या. ईश्वरावर श्रद्धा असू द्या परंतु परिस्थितीप्रमाणे शास्त्र बदला असे त्यांनी सांगितले. धर्मातील कालबाह्य वचने प्रमाण मानून त्यानुसार आत्ताच्या काळात वर्तन करणे मूर्खपणाचे होय असे त्यांचे मत होते. त्यांचा मूर्ती पूजेला विरोध होता. बहुजन समाजाच्या हिताचा विचार करून त्यांनी राजकर्त्यांच्या अनेक दोषांवर कठोर टीकाही केली.

### ३. महात्मा जोतिबा फुले (१८२७–१८९०)

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणजे महात्मा जोतिबा फुले होय. फुल्यांनी तत्कालीन सामाजिक विषमता, अन्याय व शोषण याविरुद्ध आवाज उठवला. फुल्यांनी सर्वप्रथम स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यांना शाळेचे दरवाजे बंद होते. फुल्यांनी महाराष्ट्रात सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. देशाचे हित साधावाचे असेल तर स्त्रीशिक्षणावाचून पर्याय नाही. या जाणीवेतून फुल्यांनी १८४८ मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. या शाळेत ते स्वतः शिक्षक म्हणून काम करू लागले. जोतिबांनी सावित्रीबाईंना शिक्षित करून भारतातील पहिली शिक्षिका साकारली. सनातनी लोकांचा विरोध झुगारून जोतिबा आणि सावित्रीबाईंनी खंबीरपणे शिक्षण प्रसाराचे बहुमोल कार्य केले. तत्कालीन समाजात बालविवाहाची प्रथा होती. जरठकुमारी विवाह देखील होत असत. समाजात विधवा स्त्रियांची स्थिती वाईट होती. त्यांचे हाल थांबावेत यासाठी महात्मा फुल्यांनी 'विधवा पुनर्विवाहा'च्या चळवळीस सक्रिय पाठिंबा दिला. त्यांनी पुढाकार घेऊन १८६४ मध्ये पुण्याच्या गोखले बागेत एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला. महात्मा फुल्यांनी स्वतःच्या घराजवळ १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली. या गृहात बाळंतपणासाठी येणाऱ्या विधवा स्त्रियांच्या मुलांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्वीकारली. काशीबाई नावाच्या विधवा ब्राह्मण स्त्रीच्या 'यशवंत' नावाच्या मुलास त्यांनी दत्तक घेतले.

तत्कालीन समाजात स्त्रियाप्रमाणेच अस्पृश्यांची सामाजिक स्थितीही अत्यंत वाईट होती. महात्मा फुल्यांनी अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. ३ जुलै १८५२ रोजी वेताळ पेठेत शूद्रातिशुद्र मुलांसाठी शाळा सुरू केली. पुढे १८५३ मध्ये आपल्या मित्रांच्या सहाय्याने 'महार, मांग इत्यादी लोकास विद्या शिकविण्याकरिता मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली. अस्पृश्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. अस्पृश्यांची पाण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी १८६८ मध्ये आपल्या घरातील पाण्याचा हौदही खुला केला. फुल्यांनी २४ सप्टेंबर १८७३ मध्ये पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने मानवता धर्माचा पुरस्कार केला. महात्मा फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाद्वारे भारतीय शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती, त्यांची दुःखे आणि विविध समस्या ब्रिटिश शासनासमोर मांडल्या. शेतकऱ्यांच्या व्यथा पोटतिडक्याने मांडणारा महाराष्ट्रातील पहिला विचारवंत म्हणजे महात्मा फुले होय. १९ ऑक्टोबर १८८२ रोजी हंटर कमिशन समोर मुंबई इलाख्यातील प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न मांडला.

महात्मा फुल्यांनी आपले संपूर्ण आयुष्य पददलित जनतेच्या उद्धारासाठी खर्च केले. महाराष्ट्रातील बहुजन समाजात वैचारिक जागृतीच्या माध्यमातून खऱ्या मानवधर्माचा पुरस्कार केला. त्यांच्या या महान कार्यामुळेच त्यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर किंग' म्हणून ओळखले जाते.

**४. गोपाळ गणेश आगरकर : (१८५६–१८९५)**

आगरकरांनी महाराष्ट्रात सुधारणावादी विचारांचे कार्य केले. त्यांच्या सुधारणांचा आधार व्यक्तीस्वातंत्र्य हाच होता. त्यांना जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य पद्धती मान्य नव्हती. विवाह आणि व्यवसाय याबाबतीत व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे असे त्यांचे मत होते. हिंदू संस्कृतीने व्यक्तीला कर्म, श्रुती व जाती यांच्या बंधनांनी जखडून टाकले आहे. त्यामुळे ही सर्व बंधने नष्ट करून मानवी बुद्धी पूर्ण स्वतंत्र व मुक्त झाली पाहिजे, असे परखड विचार त्यांनी मांडले. त्यांनी व्यक्तिवादाला बुद्धीप्रामाण्य व भौतिकवादाची जोड देऊन सामाजिक सुधारणांचा पाठपुरवठा केला. काळानुसार समाजरचनेची नवी मूल्ये आपण निर्भयपणे स्वीकारली पाहिजेत असे विचार मांडले. आगरकरांनी बालविवाह, केशवपन तसेच जातीभेद या अनिष्ट सामाजिक रूढींना विरोध केला. संमती वयाच्या विधेयकाचे समर्थन केले. समाजातील जातीभेदामुळे व्यक्ती आणि समाज यांच्या विकासात अडथळा निर्माण झाला आहे, असे मत मांडले. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी कायद्याची मदत घेणे त्यांना गरजेचे वाटत होते. हिंदू धर्मातील निरर्थक आचार, विचार, धर्मभोळ्या समजुती, अनिष्ट प्रथा, परंपरावर त्यांनी कडाडून हल्ला केला. ऐहिक जीवनाला गौण मानून परमार्थिक जीवनाला महत्त्व देण्याच्या हिंदू धर्माच्या वृत्तीचा समाचार घेतला. आगरकरांच्या लेखनातून त्यांची समाजहिताची तळमळ व्यक्त होते. त्यांच्या सुधारणावादी व जहालवादी विचारामुळे तत्कालीन समाजातील सनातनी मंडळींनी त्यांच्या हयातीत त्यांची प्रेतयात्रा  काढली. परंतु आगरकर आपल्या विचारांपासून तसूभरही ढळले नाहीत.

**५. महर्षी धोंडो केशव कर्वे : (१८५८–१९६२)**

महर्षी कर्वे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते. या प्रश्नावर जागृती घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा विवाहांना चालना मिळावी म्हणून ३१ डिसेंबर १८९३ रोजी 'विधवा विवाह तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना केली. ११ मार्च १८९३ रोजी शारदा सदनमधील 'गोदूताई' या ब्राह्मण विधवा स्त्रीशी विवाह करून उक्ती आणि कृती यामधील एकवाक्यता सिद्ध केली. विधवा स्त्रियांना समाजात जी दुःखे भोगावी लागत होती ती दूर करण्याच्या उद्देशाने महर्षी कर्वे यांनी १४ जून १८९६ रोजी पुण्यात 'अनाथ बालिकाश्रम मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. विधवा स्त्रियांना स्वावलंबी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हा या संस्थेचा उद्देश होता.

स्त्रियांना विवाह उपयोगी शिक्षण देण्याच्या उद्देशाने महर्षी कर्व्यांनी ४ मार्च १९०७ रोजी पुणे येथे महिला विद्यालयाची स्थापना केली. स्त्रियांनी उच्चशिक्षित व्हावे  यासाठी ३ जून १९९६ रोजी त्यांनी हिंगणे येथे स्वतंत्र 'महिला विद्यापीठाची स्थापना' केली. याच महिला विद्यापीठाचे पुढे 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठकरासी (एसएनडीटी) महिला विद्यापीठा'त रूपांतर झाले. ४ नोव्हेंबर १९९८ रोजी कर्व्यांनी 'निष्काम कर्मठ' नावाची संस्था स्थापन केली. स्त्रियांचा उद्धार करणे आणि त्यासाठी निस्वार्थीपणे कार्य करणारे

समाजसेवक तयार करणे, हा या संस्थेचा उद्देश होता. महर्षी कर्वे यांनी ग्रामीण भागात शिक्षण प्रसारासाठी १९३६ मध्ये महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना केली. स्त्रियांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची व स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीची चळवळ गतिमान होण्यास मदत झाली. अस्पृश्यता व जातीभेद या अनिष्ट प्रथांचे निर्मूलन व्हावे या उदात्त हेतूने त्यांनी १९४४ मध्ये 'समता संघ स्थापन' केला. भारत सरकारने १८ एप्रिल १९५८ रोजी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

### ६. पंडिता रमाबाई : (१८५८–१९२२)

विधवा, परितक्त्या, दुर्लक्षित तसेच पुरुषसत्तेच्या अन्यायाला बळी पडलेल्या स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारा करिता पंडिता रमाबाईंनी समर्पित भावनेने कार्य केले. पंडिता रमाबाईंनी २९ सप्टेंबर १८८३ मध्ये आपल्या मुलीसह ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. बालविवाह, पुनर्विवाह बंदी इ. जाचक चालीरीतीतून समाजास मुक्त करण्यासाठी त्यांनी पुणे, अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. ११ मार्च १८८९ रोजी मुंबईमध्ये विधवांकरिता 'शारदा सदन' नावाची संस्था सुरू केली. अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाकरता स्त्री प्रतिनिधित्वाचा पुरस्कार केला. केशवपनाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. संमती वयाच्या चळवळीस पाठिंबा दिला. शारदा सदनमध्ये प्रत्येक मुलीला धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले. २४ सप्टेंबर १८९८ रोजी केडगावाला 'मुक्तीसदन' नावाची संस्था सुरू केली. आश्रमातील स्त्रियांनी स्वावलंबी व्हावे म्हणून स्त्रियांना शेती, विणकाम, मुद्रण काम इ. कामे शिकवली. दुर्बल व आजारी लोकांकरिता सांय घरकुलाची व्यवस्था केली. पुरुषसत्ताक व्यवस्थेकडून महिलांची होणारी पिळवणूकीविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. त्यांनी कुमारी मातांसाठी केंद्र, स्त्री सहाय्यता केंद्र तसेच गरीब मुलींसाठी शाळा असे अनेक उपक्रम राबवून स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे नेली. अत्यंत बुद्धिमान असलेल्या या महिलेचे अंत:करण अत्यंत उदार आणि दिनदुबळ्या स्त्रियांकरिता तळमळणारे होते. त्या धर्माने ख्रिस्ती झाल्या. तरी हिंदू संस्कृतीचे पालन करत राहिल्या. रमाबाईंनी 'बायबल' या ख्रिस्ती धर्मग्रंथाचे मराठीत भाषांतर केले. याशिवाय त्यांनी स्त्रीधर्मनीती, युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती, प्रवास वृत्त, द हाय कास्ट हिंदू वुमन इ. पुस्तके लिहिली. त्यांच्या समाजकार्याबद्दल त्यांना 'कैसर इ हिंद' किताबाने गौरविण्यात आले होते.

### ७. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : (१८७३–१९४४)

महाराष्ट्रातील उपेक्षित समाजसुधारक म्हणजे महर्षी वि.रा.शिंदे होय. त्यांनी प्रार्थना समाजाच्या कार्याला वाहून घेतले. अंधश्रद्धा, धर्मभोळ्या समजुती व कर्मकांडापासून सुटका करण्यासाठी प्रार्थना समाज व ब्राह्मो समाजाच्या तत्त्वांचा प्रसार केला. महर्षी शिंदे यांनी अस्पृश्य बांधवांच्या यातना पाहून त्यांच्या उद्धारासाठी अत्यंत मोलाचे कार्य केले. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे 'डिप्रेड क्लास मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना केली. अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, अस्पृश्यांना नोकऱ्यांच्या संधी मिळवून देणे, त्यांच्या अडीअडचणींचे निवारण करणे, अस्पृश्यांच्या मुलांसाठी

शाळा सुरू करणे, त्यांच्यासाठी वसतीगृहे उघडणे, अस्पृश्य वस्तीत शिवणकामाचे वर्ग चालवणे, त्यांच्या प्रबोधनासाठी व्याख्याने देणे, कीर्तने आयोजित करणे, आजारी लोकांची सेवा करणे इ. उपक्रम राबविण्यात आले. महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी देशभर दौरे काढून समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारण परिषदा आयोजित केल्या. गोरगरीब लोक व्यसनापासून दूर राहावेत तसेच स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा याकरता त्यांनी प्रयत्न केले.

महर्षी शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. यासाठी शेतकरी परिषदा आयोजित केल्या. आपल्या लेखनातून समाजसुधारण्याचे विचार मांडले. 'बहिष्कृत भारत' या संशोधनात्मक प्रबंधातून 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' समाजासमोर मांडला. त्यांनी 'आठवणी आणि अनुभव' हे चरित्रात्मक पुस्तकही लिहिले. एक सत्याग्रही म्हणून ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. त्यांनी राष्ट्रीय मराठा संघ, समता सैनिक दल, बहुजन समाज पक्ष या संघटनांच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय कार्य केले. मुरळीची प्रथा तसेच अस्पृश्याना मंदिर प्रवेश याबाबत त्यांनी लक्षणीय कार्य केले. हयातभर अस्पृश्य उद्धारासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या वाट्याला उपेक्षितांचे जगणे आले. अस्पृश्य उद्धाराच्या त्यांच्या कार्यात त्यांच्या भगिनी जनाक्का यांनीही खंबीर साथ दिली.

### ८. राजर्षी शाहू महाराज : (१८७४–१९२२)

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणांद्वारे बहुजन समाजाची सर्वांगीण उन्नती करण्याचे महान कार्य शाहू महाराजांनी केले. बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीचे नेतृत्व केले. महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून महाराजांनी ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. बहुजन समाजातील शिक्षण प्रसारासाठी शाहू महाराजांनी मोलाचे कार्य केले. ३० सप्टेंबर १९१७ पासून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना करवीर संस्थानात लागू केली. विविध जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केलीत. बहुजन समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याचे धोरण अवलंबिले. १९२१ मध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगवेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अविरत प्रयत्न केले. समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणास उत्तेजन दिले. त्यांना सरकारी नोकऱ्यात राखीव जागांची तरतूद केली. २६ जुलै १९०२ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करून शासकीय नोकऱ्यात मागासवर्गीयांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याचा आदेश काढला. १९१७ मध्ये जातिभेद दूर करण्यासाठी आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. शाळा, दवाखाने, सार्वजनिक पाणवटे, विहिरी तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना समानतेची वागणूक द्यावी असे आदेश काढले.

महाराजांनी सामाजिक विषमता, जातीभेद व स्पृश्यास्पृश्यता नष्ट करण्यासाठी अविरत प्रयत्न केले. महाराजांनी करवीर संस्थानात पुरोगामी कायदे करून वंचित, दलित तसेच स्त्रियांना सन्मान मिळवून दिला. महाराजांनी १९१७ साली आपल्या राज्यात विधवा पुनर्विवाहचा कायदा केला. २३ फेब्रुवारी १९१८ साली

आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा करून आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. आपल्या संस्थानात जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही अनिष्ट प्रथा बंद केली. स्त्री-उद्धाराचे अनेक कायदे करून स्त्रियांना सन्मानाची वागणूक आणि दर्जा मिळवून दिला. महाराजांना अनुसूचित जमातीतील लोकांविषयी कळवळा होता. त्यांनी या जमातीचे प्रबोधन करून त्यांना गुन्हेगारीपासून प्रवृत्त केले. त्यांना करवीर संस्थानात नोकऱ्या दिल्या. अनुसूचित जमातीच्या उद्धाराचे पुरोगामी कायदे केले. अनुसूचित जमातींना सन्मान मिळवून दिला. महाराजांनी सनातनी भिक्षुकशाहीचा मुकाबला करण्यासाठी क्षात्र जगद्गुरुंचे नवे पीठ स्थापन करून त्यावर मराठा जातीच्या व्यक्तीची नियुक्ती केली.

महाराजांनी आपल्या राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी अनेक गोष्टी केल्या. यामध्ये शाहू मिलची स्थापना, गुळासाठी शाहूपुरी व्यापार पेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, राधानगरी धरणाची उभारणी, राजाराम कॉलेजमध्ये पदवीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था, अनुसूचित जमातींना राज्याच्या सेवेत नोकऱ्या देण्याची तरतूद, वेठबिगाराची प्रथा कायद्याने बंद करणे, राज्याच्या मालकीच्या कुरणात गोरगरिबांच्या जनावरांना चरण्याची मुभा, आजारी जनावरांच्या औषध पाण्याची व्यवस्था अशा अनेक समाज उद्धाराच्या गोष्टी त्यांनी केल्या. संस्थानातील संगीत, नाट्य, कला, क्रीडा, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या लोककल्याणकारी कार्यामुळेच ते प्रजाहितदक्ष लोकराजा म्हणून लोकप्रिय झाले.

### ९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : (१८९१-१९५६)

भारतातील पददलित समाजाचे असामान्य नेते आणि भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. बाबासाहेबांनी १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारणी सभा' या संस्थेची स्थापना केली. अस्पृश्य बांधवांवर शतकानुशतके होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी बाबासाहेबांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. महाड गावातील तळ्याचे पाणी पिण्यास अस्पृश्यांना मज्जाव होता. २० मार्च १९२७ रोजी आंबेडकरांनी महाड येथे सत्याग्रह करून अस्पृश्यांना पाण्याचा हक्क मिळवून दिला. सामाजिक विषमता आणि उच्च नीच भेदभावाचे समर्थन करणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाचा प्रतिकात्मक निषेध करण्यासाठी बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. हिंदू धर्मातील उच्च जातींनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचा हक्कही नाकारला होता. अस्पृश्यांनाही मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी ३ मार्च १९३० रोजी नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. हिंदू धर्माने अस्पृश्याना दिलेल्या अन्यायकारी वागणुकीमुळे त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. यानुसार १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या हजारो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यांनी गोलमेज परिषदांमधून अस्पृश्यांच्या उद्धारासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. १९३६ मध्ये बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९४२ मध्ये त्यांनी 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' हा पक्ष स्थापन करून पक्षाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या हितरक्षणासाठी अखंड प्रयत्न केले. अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्या खेरीज त्यांची उन्नती होऊ शकणार नाही हे बाबासाहेबांनी ओळखले होते. यासाठीच शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. 'बहिष्कृत हितकरणी सभा' या संस्थेमार्फत दलित समाजातील तरुण व प्रौढ

व्यक्तींसाठी रात्रशाळा चालवणे, वाचनालय सुरू करणे हा उपक्रम त्यांनी हाती घेतला. १९४६ मध्ये त्यांनी ‘पीपल्स एज्युकेशन सोसायटी संस्था’ स्थापन केली. या संस्थेने मुंबईला सिद्धार्थ कॉलेज, औरंगाबादला मिलिंद कॉलेज व इतर शैक्षणिक संस्था सुरू केल्या. दलित विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे उभारली. अस्पृश्य बांधवांना संघटित करून त्यांना आपल्या न्याय हक्कांसाठी लढण्याचे बळ दिले. भारताची राज्यघटना तयार करून त्यांनी देशाची फार मोठी सेवा केली. बाबासाहेबांनी केलेल्या महान राष्ट्रसेवेप्रती कृतज्ञता म्हणून १४ एप्रिल १९९० रोजी त्यांना मरणोत्तर ‘भारतरत्न’ हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला.

याचबरोबर महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय सुधारणांसाठी जगन्नाथ शंकर शेठ, भाऊ दाजी लाड, सावित्रीबाई फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड, र.धो. कर्वे, साने गुरुजी, गाडगे महाराज, सेनापती बापट, बाबा पद्मनजी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, बेहरामजी मलबारी तसेच आचार्य विनोबा भावे अशा अनेक समाजसुधारकांनी अविरत कार्य केले. तसेच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक आणि गोपाळ कृष्ण गोखले या विचारवंतांनी महाराष्ट्रातील राजकीय भूमी सशक्त करण्याचे प्रयत्न केले.

२० व्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत ७० ते ८० वर्षांच्या कालावधीत काही प्रमाणात बदल घडून आले. महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर येथे समाज सुधारण्याची चळवळ सुरू झाली. त्याला काही प्रमाणात यशही प्राप्त झाले. १९ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या काही थोर समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे समाजव्यवस्थेत परिवर्तनास सुरुवात झाली. इंग्रजी सरकारच्या काही उपाययोजनामुळेही सामाजिक परिवर्तनाला थोडीफार गती मिळाली. या काळात समाजव्यवस्थेत जे बदल झाले त्यांची गती मंद स्वरूपाची होती. परिणामी समाजव्यवस्थेत फारसा बदल घडू शकला नव्हता.

**महाराष्ट्र राज्याची निर्मिती :**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारतातील जनता १९५० नंतर भाषिक राज्याची मागणी करू लागली. लोकांच्या भाषेत राज्यकारभार, अर्थव्यवहार, समाजव्यवहार झाल्याखेरीज लोकांच्या आशा, आकांक्षांचे प्रतिबिंब पडणे अशक्य होते. यासाठी भाषावर प्रांतरचनेची आवश्यकता होती. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची पुनर्रचना भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर करावयाची हे काँग्रेसने मान्य केले होते. त्याप्रमाणे देशात भाषावार प्रांतरचना करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्राला न्याय मिळाला नव्हता. मराठी भाषेचे राज्य स्वीकारण्यास विरोध झाला. यातूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रसाठी मोठे आंदोलन उभे करावे लागले. मुंबई प्रांत, मध्य प्रांत व हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिक प्रदेश या सर्वांचे मिळून एक राज्य व्हावे यासाठी राजकीय पुढारी, विचारवंत आणि साहित्यिकांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून संयुक्त महाराष्ट्राची मागणी लावून धरली होती. देशातील इतर राज्याच्या भाषावर प्रांतरचनेनंतर विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील नेत्यांनी २८ सप्टेंबर १९५३ रोजी ऐतिहासिक ‘नागपूर करार’ केला. या करारामध्ये सध्याचा मुंबई प्रदेश तसेच हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशाचे मिळून एक राज्य बनेल. या राज्याला महाराष्ट्र मराठी प्रदेश असे नाव असेल. मुंबई त्याची राजधानी तर नागपूर उपराजधानी राहील असा निश्चय करून संयुक्त महाराष्ट्र समितीच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. परंतु राज्य पुनर्रचना आयोगाने

संयुक्त महाराष्ट्राची मागणी फेटाळून लावली. मराठी व गुजराती भाषिकांचे संतुलित असे द्विभाषिक मुंबई राज्य करावे असे सुचवले. १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. या दोन्ही भाषिक राज्याचे यशवंतराव चव्हाण हे पहिले मुख्यमंत्री झाले. द्वैभाषिक राज्याच्या स्थापनेमुळे जनतेत असंतोष निर्माण झाला. राज्यात सर्वत्र विरोध सुरू झाला. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चळवळ गतिमान झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठी जनतेने सत्याग्रह, मोर्चे, हरताळ तसेच संप करून राज्यव्यापी तीव्र आंदोलन उभारले. या आंदोलनात १०५ हुतात्मे प्राणाला मुकले. परिणामी काँग्रेस सरकारने संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य केली. द्वैभाषिक मुंबई राज्य मोडून महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करण्याचा ठराव ९ डिसेंबर १९५९ रोजी मंजूर करण्यात आला. १ मे १९६० रोजी पंडित नेहरूंनी महाराष्ट्र राज्याची घोषणा केली. द्वैभाषिक प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ठरले. करारानुसार 'मुंबई' राज्याची राजधानी तर नागपूर उपराजधानी निश्चित झाली.

## १.३.२ १९६० नंतर महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढ आणि लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये :

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मनुष्यबळ या दोन घटकावर अवलंबून असतो. त्या दृष्टीने देशातील लोकसंख्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक असते. लोकसंख्या ही देशाची साधनसंपत्ती असते. लोकसंख्या हा श्रम पुरवठा करणारा प्रत्यक्ष घटक असतो. परंतु, हीच लोकसंख्या अतिरिक्त झाल्यास देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. त्यासाठी लोकसंख्या नियंत्रित ठेवणेही अत्यंत गरजेचे असते. भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकसंख्या अतिशय वेगाने वाढत गेलेली दिसून येते. जागतिक लोकसंख्येत भारत आणि चीन या दोन देशांच्या लोकसंख्येचा वाटा अधिक आहे. चीनने गेल्या काही वर्षात लोकसंख्या वाढीचा दर नियंत्रणात आणला आहे. भारताला मात्र लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित करता आलेला नाही. त्यामुळेच भारत लोकसंख्येच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाला असून वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

**महाराष्ट्राची लोकसंख्या :**

१९६१ ते २०११ या कालखंडात महाराष्ट्रातील लोकसंख्येचा विचार करता राज्यातील लोकसंख्या उत्तरोतर वाढतच गेली दिसून येते. १९६१ साली ३.९५ कोटी असणारी महाराष्ट्राची लोकसंख्या २०११ मध्ये ११.२३ कोटी होती. २०२२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या १२.५७ कोटी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ९% लोकसंख्या महाराष्ट्रात राहते. गेल्या ५० वर्षात ही लोकसंख्या जवळपास तिप्पट झाली आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. काही अपवाद वगळता प्रत्येक जनगणनेमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्यावाढीचा दर भारतीय लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा अधिक असल्याचा दिसून येतो. उत्तरप्रदेश नंतर भारतातील लोकसंख्येने मोठे असलेले राज्य म्हणजे महाराष्ट्र होय. महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढीस विविध

कारणे जबाबदार असून त्यामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. यांचा सविस्तर अभ्यास करता येईल.

**महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीची कारणे :**

**१. उष्ण हवामान :**

भारत हा उष्ण कटिबंधातील प्रदेश असून महाराष्ट्राचे हवामान ही मुख्यत्वे करून उष्ण आहे. उष्ण हवामानामुळे मुले व मुली लवकर वयात येतात. त्यामुळे या वयात त्यांचे लग्न झाल्यास फार लवकर प्रजननास सुरुवात होते. परिणामी लोकसंख्या वाढीस चालना मिळते.

**२. अल्पवयीन विवाहाची पद्धती :**

आपल्या समाजामध्ये अजूनही मुला-मुलींचे विवाह लवकर करण्यावरती भर दिला जातो. आदिवासी, दुर्गम तसेच ग्रामीण भागात अजूनही गुपचूपपणे बालविवाह केले जातात. कायद्याने लग्नासाठी मुलाचे व मुलीचे वय २१ व १८ ठरवून दिले असले तरी बऱ्याच मुला-मुलींचे विवाह या वयोमर्यादेच्या आधी होतात. त्यामुळे लवकर मुले जन्माला घातली जातात. साहजिकच जन्मदर वाढून लोकसंख्येमध्ये वाढ होते.

**३. एकत्र कुटुंब पद्धती :**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. एकत्र कुटुंब पद्धतीत मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी संपूर्ण कुटुंबाची असते. त्यामुळे कुटुंबात एखाद्या व्यक्तीला कितीही मुले झाली तरी त्याला वैयक्तिक पालनपोषणाचा खर्च करावा लागत नसे. मुलांच्या बालसंगोपनाची जबाबदारी सामूहिकरित्या पार पाडली जात असल्यामुळे मुले जन्माला घालण्याचे प्रमाण अधिक असे. परिणामी कुटुंबाचा आकार वाढून लोकसंख्या वाढत असे.

**४. दारिद्र्य व निरक्षरता :**

महाराष्ट्र हे प्रगत राज्य म्हटले तरी आजही राज्यातील लाखो लोक दारिद्र्य तसेच अज्ञानात जीवन जगत आहेत. शिक्षणाच्या अभावामुळे ते अज्ञानी राहिलेले आहेत. गरीबी व निरक्षरता यामुळे कुटुंबातील व्यक्तींना अधिक मुले जन्माला घालावी वाटतात. ही मुले मोठी होऊन कमवू लागतील. रोजगार करून पैसा मिळवतील. त्यामुळे आपल्या कुटुंबाचे दारिद्र्य दूर होईल या भाबडया आशेपायी अधिक मुले जन्माला घातली जातात. शेतीतील काम करण्यासाठी मुले उपयोगी पडतील म्हणूनही अधिक अपत्यांना जन्म दिला जात होता. परिणामी लोकसंख्या वाढत गेली. म्हातारपणाची काठी, वंशाचा दिवा तसेच वृद्धापकाळाचा आधार म्हणून अधिक मुलांना जन्म दिला जातो. निरक्षर लोकांच्या अज्ञानामुळे अधिक मुलांना जन्म दिला जातो. परिणामी लोकसंख्यावाढ वेगाने होते.

### ५. निकृष्ट राहणीमान :

दारिद्र्य आणि लोकसंख्यावाढ यांचा परस्पर संबंध आहे. कुटुंबाचा आकार वाढल्याने पालनपोषणाचा खर्च वाढून दारिद्र्य वाढते. दारिद्र्य हेच लोकसंख्या वाढीचे कारण आणि परिणाम आहे. डॉ. कॅस्ट्रो यांच्या मते, निकृष्ट आहार असणाऱ्या लोकांची मुले जन्मास घालण्याची क्षमता अधिक असते. निकृष्ट राहणीमाणामुळे जननशक्ती वाढते. लोकसंख्यावाढ व लोकसंख्यावाढीमुळे दारिद्र्य हे दृष्टचक्र सुरू राहते.

### ६. अंधश्रद्धा तसेच धार्मिक रूढी परंपरांचा प्रभाव :

महाराष्ट्रातील अनेक दुर्गम, आदिवासी भागात तसेच खेड्यापाड्यात धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा जोपासल्या जातात. त्यांचे अंधानुकरण केले जाते. मुले म्हणजे देवाची देणगी, मुले होण्याचे थांबवल्यास देवाचा प्रकोप होतो तसेच पुत्रप्राप्तीशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही अशा अतार्किक धारणा लोकांच्या मनावर बिंबवल्या गेल्या आहेत. घराण्याचा वारसदार, वंशाचा दिवा तसेच म्हातारपणाची काठी म्हणून मुलगा होईपर्यंत अनेक अपत्यांना जन्म दिला जातो. भारतीय संस्कृतीत अनेक धार्मिक विधीमध्ये मुलाला मानाचे स्थान दिले जाते. यामुळेही घराण्याचे नाव पुढे चालू ठेवण्यासाठी मुलगाच जन्माला यावा असे बहुतेक कुटुंबांना वाटत असते. परिणामी अधिक मुलांना जन्मास घातले जाते. याचा परिणाम लोकसंख्यावाढीत होतो.

### ७. कुटुंब नियोजनाला अल्प प्रतिसाद :

१९५२ मध्ये भारतात लोकसंख्या नियंत्रित ठेवण्यासाठी कुटुंब नियोजनाचा कायदा करण्यात आला. कुटुंब नियोजन कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. संतती नियमनांच्या साधनांचे वाटप, कुटुंब नियोजन मोहिमेचा प्रसार आणि प्रचार, शिक्षणावर भर, शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांना रोख बक्षीस, कायदेशीर गर्भपाताला मान्यता, निर्बिजीकरण शस्त्रक्रिया इ. उपाययोजना करण्यात आल्या. परंतु निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक रूढी, परंपरांचे प्राबल्य तसेच दूरदृष्टीचा अभाव इ.मुळे कुटुंब नियोजनाच्या मोहिमेला लोकांनी विरोध केला. परिणामी हा एक सरकारी उपक्रम म्हणून राबवला गेला. ही सरकारची मोहीम बनली. त्यामुळे लोकांनी कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. लोकांच्या उदासीनतेमुळे हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला नाही. परिणामी लोकसंख्या वाढतच गेली. याउलट चीनमध्ये 'वन कपल वन बेबी' हा कार्यक्रम यशस्वी झाल्याने त्यांची लोकसंख्या वाढीची समस्या नियंत्रणात आली आहे.

### ८. मनोरंजन साधनांचा अभाव :

आजही आदिवासी, ग्रामीण, दुर्गम खेड्यापाड्यात करमणूक तसेच मनोरंजनाच्या साधनांचा अभाव असल्याचे दिसून येते. आजही ग्रामीण भागात चित्रपटगृहे, नाट्यगृहे इ. ची उपलब्धता नसल्यामुळे ग्रामीण कुटुंबाचे मनोरंजन होत नाही. पुरेशा मनोरंजन व करमणुकीच्या साधनांच्या अभावामुळे लोकांना लैंगिक सुखावर लक्ष केंद्रित करावे लागते. आजही महाराष्ट्रातील अनेक भागात वीज पुरवठा तसेच मनोरंजन साधनांची कमतरता असल्यामुळे विवाहित स्त्री-पुरुष करमणूक म्हणून लैंगिक सुखाचा आधार घेतात. लोक

लैंगिक सुखाकडे करमणुकीचे साधन म्हणून पाहतात. त्यातून अधिक संतती जन्माला येणे आणि लोकसंख्येत वाढ हे चक्र चालूच राहते.

वरील सर्व कारणांबरोबरच उच्च जन्मदर, निरक्षरता, सार्वत्रिक विवाहाची प्रथा, बहुपत्नीत्व पद्धती, विधवा पुनर्विवाहाचा कायदा, बालमृत्यू दरात झालेली घट, सरकारचे आरोग्यविषयक कार्यक्रम तसेच प्रगत वैद्यकीय सोयी सुविधा यांचाही परिणाम लोकसंख्या वाढीवर झालेला दिसून येतो.

**महाराष्ट्राच्या लोकसंख्येची प्रमुख वैशिष्ट्ये :**

**१. लोकसंख्येचा आकार :**

लोकसंख्येचा प्रश्न हा एखाद्या बळावत जाणाऱ्या आजारासारखा बनला आहे. जेवढ्या वेगाने लोकसंख्या वाढते तेवढ्या प्रमाणात साधनांची उपलब्धता होत नाही तेव्हा लोकसंख्येच्या प्रश्नाची तीव्रता निर्माण होते. १९६१ ते २०११ या कालखंडात महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या आकारात वाढ होत गेली आहे. १९६१ साली ३.९५ कोटी असणारी महाराष्ट्राची लोकसंख्या २०११ मध्ये ११.२३ कोटीपर्यंत पोचली आहे. गेल्या ५० वर्षात ही लोकसंख्या जवळपास तिप्पट झाली आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या संख्येचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. काही अपवाद वगळता प्रत्येक जनगणनेमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्यावाढीचा दर भारतीय लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अधिक असल्याचा दिसून येतो. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.२८% लोकसंख्या महाराष्ट्रात असल्याचे दिसते. दिवसेंदिवस महाराष्ट्रातील लोकसंख्येचा आकार वाढत चाललेला आहे.

**२. लोकसंख्येची घनता :**

दर चौरस किलोमीटर क्षेत्रफळात सरासरीने जेवढी लोकसंख्या राहते त्याला लोकसंख्येची घनता असे म्हणतात. राज्याच्या लोकसंख्येत वर्षागणिक वाढ होत असली तरी राज्याचे क्षेत्रफळ मात्र मर्यादित आहे. त्यामुळे लोकसंख्येची घनता सतत वाढत आहे. लोकसंख्येची घनता सर्वच भागात सारखी असत नाही. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील लोकसंख्येची घनता जास्त असते. वाढते औद्योगीकरण, सेवाक्षेत्रचा विकास, शिक्षणाच्या विपुल संधी, व्यापार, उद्योगांचा विस्तार तसेच शहरी जीवनाचे वाढते आकर्षण यामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्येचे नागरी भागाकडे सतत स्थलांतर होत असते. त्यामुळे नगरात लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. यातूनच लोकसंख्येची घनता वाढते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर तसेच औरंगाबाद यासारखी शहरे लोकसंख्येने गजबजून गेली आहेत. महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता १९६१ मध्ये १२९ होती. २०११ मध्ये ३६५ पर्यंत पोहोचलेली आहे. मागील ५० वर्षाच्या कालखंडात महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता जवळपास ३ पटीने वाढल्याचे दिसून येते. तरीही देशाच्या सरासरी घनतेपेक्षा महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता कमी असल्याचे दिसून येते.

**३. ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण :**

लोकसंख्येचे विभाजन ग्रामीण व नागरी भागात कशा पद्धतीने झालेले आहे यावरून आर्थिक विकासाची कल्पना करता येऊ शकते. जास्त प्रमाणात लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असेल तर ते

मागासलेपणाचे लक्षण समजले जाते. परंतु ग्रामीण लोकसंख्येचे नागरीकरण होत असेल तर ते विकासाचे प्रतिक मानण्यात येते. महाराष्ट्रात सर्वात जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. परंतु, ग्रामीण भागातून नागरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. १९६१ मध्ये ग्रामीण लोकसंख्या २.८४ कोटी होती तर नागरी संख्येचे प्रमाण १.१२ कोटी होते. शेकड्यामध्ये ग्रामीण भागातील प्रमाण ७१.७८% तर नागरी भागातील प्रमाण ५८.२२% होते. २०११ मध्ये ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ५४.७७% तर नागरी भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ८५.२३% इतके वाढलेले दिसून येते.

**४. स्त्री पुरुष प्रमाण :**

लोकसंख्येतील स्त्री व पुरुष यांचे प्रमाण किती आहे यावरून सामाजिक व आर्थिक विकासाचा निर्देशांक कळू शकतो. दर हजार पुरुषामागे किती स्त्रिया आहेत यावरून स्त्री-पुरुष प्रमाण ठरवले जाते. स्त्री-पुरुष प्रमाण संतुलित असणे हे सुशिक्षित समाजाचे लक्षण मानले जाते. परंतु आज देशात तसेच राज्यात स्त्रीभ्रूण हत्येमुळे स्त्रियांची संख्या कमी होत आहे. नागरी भागात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ग्रामीण भागाच्या तुलनेत कमी असली तरी त्याच्यामध्ये वाढ होताना दिसत आहे. ग्रामीण भागात मात्र हेच प्रमाण घटत चालल्याचे दिसून येते.२०११ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९२९ इतकी होती. १९६१ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या महाराष्ट्रात ९३६ इतकी होती. स्त्रियांकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोन, मुलगाच हवा ही मानसिकता, मुलींच्या प्रती असलेली उदासीनता, बालविवाह तसेच हुंडाबळी यासारख्या सामाजिक प्रथा स्त्रियांच्या घटत जाणाऱ्या संख्येस जबाबदार आहेत असे दिसून येते. महाराष्ट्राचा आर्थिक विकास झपाट्याने होत असला तरी सामाजिक प्रगतीबाबत अजूनही उदासीनता असल्याचे दिसते. स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस घटत गेल्यास राज्याला अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे.

**५. साक्षरतेचे प्रमाण :**

देशाच्या तसेच राज्याच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये साक्षरतेचे महत्त्व अधिक आहे. लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण जेवढे अधिक तेवढा तो देश वा राज्य प्रगतीकडे वाटचाल करू शकते. साक्षरतेमुळेच देशातील उत्पादकतेला हातभार लागतो. जन्मदर कमी होण्यास मदत होते. स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण अधिक असेल तर कुटुंबनियोजनासारखे उपक्रम यशस्वी होऊ शकतात. हे केरळ राज्याने सिद्ध केले आहे. महाराष्ट्रातील साक्षरतेच्या प्रमाणाचा विचार करता १९६१ ते २०११ या कालखंडात साक्षरतेचे प्रमाण वाढल्याचे दिसते. १९६१ मध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण ३५.१ होते जे २०११ मध्ये ८२.३ इतके झालेले आहे. राज्यातील एकूण साक्षरतेमध्ये पुरुष साक्षरता ही दुपटीने तर स्त्री साक्षरता ५ पटीने वाढल्याचे दिसून येते. देशातील साक्षरतेच्या तुलनेचा विचार करता महाराष्ट्र नेहमीच साक्षरतेच्या प्रमाणात वरचढ राहिल्याचे दिसून येते. शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रगती, शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर झालेला प्रसार, प्राथमिक, माध्यमिक, प्रौढ शिक्षण तसेच लोकशिक्षण इ.मुळे साक्षरतेच्या प्रमाणात भरीव वाढ झाली आहे. असे असले

तरी पुरुष साक्षरतेच्या तुलनेत स्त्री साक्षरता कमी असल्याचे दिसून येते. आजही महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. लोकसंख्यावाढीला नियंत्रित ठेवायचे असेल तर स्त्री शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही असेच म्हणावे लागेल.

**६. जन्मदर व मृत्युदर :**

जन्मदर व मृत्युदर यावर लोकसंख्या वाढीचा दर अवलंबून असतो. जन्मदर म्हणजे दर हजारी दरवर्षी किती मुले जन्मली आणि मृत्युदर हा दर हजारी दरवर्षी किती लोक मृत्यू पावले याचे प्रमाण होय. जन्मदर व मृत्युदरावरून लोकसंख्या वाढीचा अंदाज बांधता येतो. महाराष्ट्रातील जन्मदर व मृत्युदर यामध्ये घट होत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यातील जन्मदर मंद गतीने वाढत आहे तर मृत्यूदराचे प्रमाण वेगाने कमी होत असल्याचे पाहायला मिळते. जन्मदर आणि मृत्यूदर यातील अंतर वाढल्यामुळे लोकसंख्येतील नैसर्गिक वाढ वेगाने होताना दिसत आहे. १९६१ मध्ये महाराष्ट्राचा जन्मदर ६१.२% होता तर मृत्युदर १८.८% होता. २०११ मध्ये जन्मदर १६.७% तर मृत्यूदर ६.३% असल्याचे पाहायला मिळते. यामुळेच महाराष्ट्राची लोकसंख्या वर्षागणिक वाढत असल्याचे पाहायला मिळते.

**लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम :**

राज्यातील वाढत्या लोकसंख्येमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर पुढील दुष्परिणाम होत आहेत.

१. राज्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे राज्यातील अन्नधान्याच्या उपलब्धतेवर अतिरिक्त ताण पडत आहे. शेतीवरील अतिरिक्त भार वाढत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा होत नाही. परिणामी अन्नधान्याची टंचाई निर्माण होत आहे.

२. लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात राज्यात रोजगाराची निर्मिती होत नसल्यामुळे बेरोजगारीची समस्या गंभीर बनत चालली आहे.

३. लोकसंख्या वाढीचा दर अधिक असल्यामुळे दरडोई उत्पन्नात घट होऊन कौटुंबिक बचती कमी होत आहेत. परिणामी गुंतवणुकीची क्षमताही घटलेली दिसून येते.

४. दरडोई उत्पन्नात घट झाल्यामुळे दारिद्र्यात वाढ होते. कमी उत्पन्नामध्ये मूलभूत गरजांची पूर्तताही करता येत नाही. परिणामी निकृष्ट प्रतीचे जीवन जगावे लागते.

५. राज्यातील वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध लोकसंख्येला शैक्षणिक तसेच वैद्यकीय सोयीसुविधा, दळणवळण, सेवा, सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा तसेच राहण्यासाठी योग्य घरांची उपलब्धता इ. मूलभूत गोष्टीवर प्रचंड खर्च करावा लागत असल्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला खिळ बसलेली आहे.

### १.३.३ महाराष्ट्र राज्य : १९६० नंतरच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची पार्श्वभूमी :

**सामाजिक स्थिती :**

१९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या सामाजिक स्थितीचा विचार करता महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर एकूणच सामाजिक जीवनात अनेक सामाजिक बदल आणि घडामोडी घडून आलेल्या आहेत. त्यांचा राज्यातील सामाजिक स्थितीवर प्रभाव पडलेला दिसून येतो. यापैकी काही प्रमुख गोष्टींचा विचार करणार आहोत.

**नागरीकरण :**

महाराष्ट्रात १९६० पासून लक्षणीय नागरीकरण झालेले आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर सारख्या शहरांमध्ये वेगाने वाढ होत आहे. याचबरोबर कोल्हापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद तसेच सोलापूर सारखी छोटी शहरेही वाढताना दिसत आहेत. शहरीकरणामुळे लोकांची जीवनपद्धती, व्यवसाय तसेच सामाजिक स्तरीकरणांमध्येही वेगाने बदल घडून आलेले आहेत.

**आर्थिक वाढ :**

राज्याने विशेषत: उद्योग, सेवा आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केलेली आहे. राज्याच्या आर्थिक विकास दरात वाढ झालेली पाहायला मिळत आहे. राज्याने उद्योगधंद्यांना चालना देऊन सकारात्मक आर्थिक प्रगती साध्य केलेली आहे. आर्थिक स्थैर्यामुळे सामाजिक वर्गामध्ये बदल घडून आलेले आहेत. रोजगारांच्या पद्धती बरोबरच उत्पन्न वितरणावरही परिणाम झालेला आहे.

**शिक्षण :**

महाराष्ट्रात १९६० नंतर अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना झालेली आहे. विविध सरकारी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून राज्यात शिक्षण प्रसार करण्यात आलेला आहे. परिणामी राज्यात साक्षरतेचे प्रमाण वाढून शिक्षणात प्रगती झालेली आहे. शैक्षणिक प्रवेश, गुणवत्तेतील असमानता, अपुरा निधी तसेच ग्रामीण भागातील शिक्षणातील मुलांच्या गळतीचे प्रमाण, आदिवासी मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न अजूनही सुटू शकलेले नाहीत.

**स्थलांतर :**

शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार, शिक्षण तसेच अत्याधुनिक आरोग्य सोयीसुविधा अशा विविध कारणांसाठी शहराकडे स्थलांतर करावे लागत आहे. ग्रामीण भागातून लोकांचे मोठ्या प्रमाणात शहराकडे स्थलांतर होताना दिसून येत आहे. परिणामी शहरात लोकसंख्येची गती वाढत चाललेली आहे.

**जातीची गतिशीलता :**

महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत जातीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. १९६० नंतर सरकारच्या विविध सकारात्मक धोरणांच्या माध्यमातून जाती आधारित असमानता दूर करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. अस्पृश्यता निवारणाचे कायदे करण्यात आलेले आहेत. दुर्बल घटकांना कायद्याच्या माध्यमातून न्याय देण्याचा

प्रयत्न झालेला आहे. अनुसूचित जाती जमातींना शिक्षण आणि नोकऱ्यात आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. दुर्बल घटकांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. परिणामी जातीअंतर्गत गतिशीलतेला चालना मिळालेली आहे.

**महिला सक्षमीकरण :**

राज्याने महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबवलेल्या आहेत. १९९३ साली झालेल्या ७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांना ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांतील विकास प्रक्रियेत सहभाग घेण्याची संधी प्राप्त करून देण्यात आलेली आहे. सरकारने वेळोवेळी विविध कायद्यांच्या माध्यमातून महिलांना सुरक्षितता प्रदान करण्याचे कार्य केलेले आहे. महिला व मुलींच्या साक्षरतेसाठी राज्याने विविध शैक्षणिक योजना राबवलेल्या आहेत. परिणामी महिलांची शैक्षणिक प्रगती होऊन त्या स्वावलंबी बनत आहेत. तथापि लैंगिक असमानता आणि महिलांवरील हिंसाचार यासारख्या समस्या राज्याला भेडसावत आहेत.

**राजकीय स्थिती :**

राज्याच्या स्थापनेपासून ते आजअखेर राज्यामध्ये युती आणि आघाड्यांचे सरकार अस्तित्वात आलेले पाहायला मिळते. विविध राजकीय पक्षांनी त्यांच्या धोरणांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला आकर्षित करून सत्तेमध्ये स्थान मिळवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. सामाजिक हिताची ध्येयधोरणे, जनसामान्यांचे अस्मितेचे प्रश्न, समस्या, जात, धर्म, प्रादेशिकता तसेच स्थानिक प्रश्नांच्या माध्यमातून राजकीय पक्षांनी निवडणुका लढविलेल्या आहेत.

**पायाभूत सुविधांचा विकास :**

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागातील पायाभूत सुविधांमध्ये बऱ्याच प्रमाणात सुधारणा झालेली आहे. शहरे, गावे, खेडी, वाड्या, वस्त्या तसेच आदिम भागात मूलभूत सोयी सुविधा पोहोचवण्यासाठी सरकारकडून वेळोवेळी निधीची उपलब्धता करण्यात आलेली आहे. विविध योजनांच्या माध्यमातून लोकांना मूलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तथापि पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये प्रादेशिक असमानता आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागाला झुकते माप दिल्याचे दिसून येते. आदिम भाग अजूनही मूलभूत सुविधांच्या प्रतिक्षेत आहे.

**सामाजिक चळवळी :**

महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. अनेक सुधारणावादी चळवळींचा जन्म महाराष्ट्रातूनच झालेला आहे. त्यामुळे सामाजिक चळवळीचे केंद्र म्हणून राज्याला विशेष ओळख आहे. समाजातील दलित, वंचित, उपेक्षित, दुर्बल घटक, महिला, अपंग, बालक, कामगार, शेतकरी या सर्वांच्या हक्कांसाठी राज्यात विविध सामाजिक चळवळी उभ्या राहिलेल्या दिसून येतात. आजघडीला शेतकऱ्यांची चळवळ ही प्रामुख्याने दिसून येते. सर्वसामान्य घटकांना न्याय, समता, बंधुता प्राप्त व्हावी या दृष्टिकोनातून

सामाजिक कार्यकर्त्यांनी मोर्चे तसेच आंदोलने यांच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधलेले दिसून येते.

एकूणच महाराष्ट्राने १९६० नंतर समाजिक विकासाच्या विविध पैलू मध्ये लक्षणीय प्रगती केलेली दिसून येते. देशातील प्रगत राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्राचा वरचा क्रमांक लागतो. थोर समाज सुधारक, राजकीय नेते तसेच सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नातून राज्यातल्या सर्वसामान्य जनतेला कायद्याच्या माध्यमातून संरक्षण प्रदान करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. असे असले तरी राज्याच्या उत्पन्नातील असमानता, प्रादेशिक असमानता तसेच सामाजिक न्यायाच्या समस्यांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. या आव्हानांना तोंड देण्यासाठी, न्यायपूर्ण आणि शाश्वत सामाजिक वातावरण निर्माण करण्यासाठी, शिक्षण, आरोग्य आणि सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी राज्याने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्रातील आर्थिक स्थिती :**

भारतातील एक प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात पुढारलेले राज्य म्हणून या राज्याची गणना होते. १९६० नंतर महाराष्ट्र सरकारने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नातून उद्योग व्यवसाय वाढीच्या विविध योजनांच्यामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळालेली दिसून येते. यामुळेच भारतातील औद्योगिक क्षेत्रातील एक प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण झाली आहे. १९६० नंतरच्या महाराष्ट्रातील आर्थिक विकासाचा आढावा खालील मुद्द्यांच्या सहाय्याने घेता येईल.

**महाराष्ट्र राज्यातील १९६० नंतरची आर्थिक पार्श्वभूमी :**

महाराष्ट्रामध्ये १९६० नंतर दळणवळणाच्या साधनात अनेक सुधारणा घडून आल्या. विदेशी व्यापार वाढ, औद्योगीकरण तसेच भांडवली व्यवस्थेचे व्यवस्थापन या तीन घटकावर देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. महाराष्ट्रातून इतर राज्यात व देशात विविध वस्तू व पदार्थांची आयात निर्यात होऊ लागली. यामध्ये प्रामुख्याने कापूस व तेलबिया निर्यात होऊ लागल्या. शेतीचे व्यापारीकरण होऊन ऊस व कापूस या नगदी पिकांच्या उत्पादनाला प्रोत्साहन मिळाले. औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिक प्रगती, अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच उद्योगधंद्यांची सुरुवात झाली. महाराष्ट्रात मुंबई येथे १८५१ मध्ये सुरू झालेल्या कापड गिरणीने या प्रक्रियेची सुरुवात झाली. महाराष्ट्र स्थापनेनंतर महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कृषी आणि औद्योगिक धोरणांचा पुरस्कार केला. सहकारी चळवळीस प्रोत्साहन दिले. भारत सरकारने स्वीकारलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे खाजगी तसेच देशी उद्योगांना प्रोत्साहन मिळाले. देशांने १९९१ साली स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणानुसार मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महाराष्ट्रात भांडवल गुंतवणूक केली. त्यामुळे विविध उद्योगधंदे उभारण्यास चालना मिळाली. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विविध महामंडळे, सहकारी संस्था तसेच बँका यांची स्थापना करण्यात आली.

## १.   कृषीप्रधान अर्थव्यवस्था :

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असून राज्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आणि शेतीशी निगडित जोडधंदे आहे. राज्यातील मोठ्या उद्योगधंद्यांना कच्चामाल पुरवण्याचा मुख्य स्रोत शेती आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ५०% लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहेत. महाराष्ट्राच्या स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नात कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा १९६०-६१ मध्ये ३१ %, १९९०-९१ मध्ये २१% तर २०१४-१५ मध्ये १०.१% इतका होता. राज्यातील सूतगिरण्या, कापड उद्योग, साखर उद्योग, तेल गिरण्या, फळ प्रक्रिया उद्योग, कुटीरउद्योग, हातमाग, तेलबिया तसेच भात गिरण्या इ. साठी कच्चामाल शेतीतून मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो. खत उद्योग आणि कृषी अवजारे बनवणारे कारखानेही शेतीवर अवलंबून आहेत. शेती व्यवसायाच्या प्रगतीवरच पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन यासारख्या जोडधंद्यांची प्रगती अवलंबून आहे. इंग्रजांच्या काळात शेतीत सुधारणा करण्यासाठी फारसे प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. राज्यात पडलेल्या तीव्र दुष्काळांची नोंद घेऊन १८८१ मध्ये फेमिन कमिशनच्या शिफारशींच्या आधारे सन १८८३ मध्ये राज्यात प्रथमच 'कृषी विभागा'ची स्थापना करण्यात आली. शेतीत यांत्रिकीकरणाचा वापर त्या काळात अत्यल्प होता. पारंपारिक अवजारांच्या सहाय्याने शेती केली जात होती. ज्वारी, बाजरी, भुईमूग, मूग, उडीद, भात तसेच कापूस अशा पारंपारिक पिकांकरिता जमिनीचा वापर होत असे. ऊस, कापूस यासारखी बागायती पिके तसेच फळ, भाजीपाला यांच्या उत्पादनाचे क्षेत्र अत्यल्प होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर देशात झालेल्या हरितक्रांतीच्या पार्श्वभूमीवर राज्यांमध्येही संकरित व अधिक उत्पन्न देणाऱ्या बी बियाणांचा वापर झपाट्याने वाढत गेला. शेती करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान व अवजारांचा वापर करण्यात येऊ लागला. जलसिंचनाच्या विविध पद्धती अवलंबण्यात येऊ लागल्या. धरणे, कालवे, नद्यां तसेच अत्याधुनिक पद्धतीने शेतीला पाणीपुरवठा होऊ लागला. रासायनिक बी बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या वापरातून शेतीतून अधिक उत्पन्न काढले जाऊ लागले. शेतकरी शेती करण्यासाठी सावकाराऐवजी बँकां तसेच पतसंस्थांकडून कर्ज घेऊ लागला. शेतीचे पारंपरिक स्वरूप बदलून आधुनिक पद्धतीने शेती करण्यात येऊ लागली. कृषी क्षेत्रामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत झाली आहे.

## २.   सहकार क्षेत्राचा विकास :

संपूर्ण भारतामध्ये सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची ओळख आहे. सहकार चळवळ महाराष्ट्रात जितकी विकसित झाली तितकी अन्य राज्यात झाली नाही. महाराष्ट्रात सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ विसाव्या शतकाच्या सुरुवातीस झाली. १९०४ साली सहकार कायदा अस्तित्वात आला. पतपुरवठा क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करण्याची तरतूद करण्याचा हा कायदा होता. १९९२ साली कर्जाव्यतिरिक्त इतर गोष्टींचाही पुरवठा करण्यासाठी सहकारी सोसायटी काढण्यास परवानगी देण्यात आली. सहकारी बँका, पतसंस्था तसेच भूविकास बँका स्थापन करण्यात आल्या. जीवनाच्या विविध क्षेत्रात सहकाराची कास धरण्यात आली. महाराष्ट्र सरकारने सहकार क्षेत्रात अनेक योजना सुरू केल्या. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा प्रसार झपाट्याने होऊ लागला. शेतीसाठी वित्त पुरवठा, नागरी बँक,

आदिवासी विकास उद्योग, सूतगिरण्या, गुळ उत्पादन, वाहतूक, विपणन प्रक्रिया, साठवण, साखर उद्योग, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वराहपालन तसेच मेंढीपालन इ. अनेक उद्योग सहकारी तत्त्वावर सुरू झाले. यामुळे ग्रामीण भागाचा कायापालट होण्यास मदत झाली. लाखो लोकांना उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त झाले. महाराष्ट्राचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीमध्ये सहकारी चळवळीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

### ३. वित्तपुरवठा

शेतीसाठी लागणारी विविध अवजारे, साधने, बी बियाणे, रासायनिक खते तसेच कीटकनाशके यासाठी वित्त पुरवठ्याची गरज होती. ही गरज सहकारी संस्थांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली. शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीसाठी अर्थपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था, भूविकास बँका तसेच ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. या संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात येऊ लागला. शेतकरी सावकाराकडून भरमसाठ व्याज घेऊन शेती करत होता. सावकार शेतकऱ्यांची पिळवणूक करीत होता. परंतु सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतीसाठी वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था निर्माण झाल्यामुळे सावकाराकडून कर्ज घेण्याची स्थिती संपुष्टात आली. शेतकऱ्यांची पिळवणूक थांबली.

### ४. शेतीमालाची विक्री व्यवस्था :

राज्यात १९९३ पासून कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली. या समित्यामध्ये शेतकरी, शेतीमाल विक्रेते, बाजारातील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी तसेच शासनाचे प्रतिनिधी यांच्या खुल्या पद्धतीने निवडणुका घेऊन नियुक्ती केली गेली. विपणन समितीचे विपणन संघाच्या देखरेखेखाली खुल्या व लिलाव पद्धतीने मालाची विक्री होऊ लागली. शेतकऱ्याच्या मालाला रास्त भाव मिळावा म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागात प्राथमिक सहकारी संस्था, पतसंस्था तसेच खरेदी विक्री संघ यांची सांगड घालण्यात आली. या माध्यमातून शेतीसाठी कर्ज पुरवठा, शेतमालाची विक्री तसेच कर्ज परतफेड इ. गोष्टी करणे शेतकऱ्याला सहज साध्य झाले.

### ५. पशुपालन व दुग्ध व्यवसाय :

राज्यात शेतीसोबतच शेतीशी निगडित उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली. यामध्ये पशुपालन तसेच दुग्ध व्यवसायाला अधिक गती देण्याचे धोरण आखण्यात आले. शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न तसेच कामधंदा मिळवून देणाऱ्या दुग्ध व्यवसायाचा विकास महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात झाला. देशात १९७१ नंतर राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन फ्लड' किंवा 'श्वेतक्रांती' योजनेअंतर्गत विविध राज्यात दुग्ध व्यवसाय प्रकल्प सुरू करण्यात आले. याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र राज्यात 'धवल क्रांती' होऊन १४ लाख शेतकऱ्यांना जोडधंदा प्राप्त झाला. गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, याचबरोबर वराहपालन आणि कुक्कुटपालन हे जोडधंदे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन बनले. आज राज्यात पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर इ. ३६ ठिकाणी दूध योजना कार्यान्वित आहेत. दुधापासून भुकटी, लोणी, चीज,

तूप, पनीर इ. पदार्थ तयार करून त्यांची विक्री केली जाते. त्यातून राज्यातील शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी आर्थिक उत्पन्नाचे साधन प्राप्त करून देण्यात आलेले आहे.

**६. फळभाज्या व फलोत्पादन :**

राज्यात फळभाज्या तसेच फलोत्पादन प्रक्रियेला चालना देण्यात आली. यामुळेच राज्य भाजीपाला व फलोत्पादनामध्ये आघाडीवर असून देशात फलोत्पादनातील राज्याचा वाटा २०% इतका झालेला आहे. काजू, द्राक्षे, डाळिंब तसेच संत्री उत्पादनामध्ये महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक आहे. कोकणचा हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे. फळांच्या निर्यातीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. विविध प्रकारच्या फुलांचे उत्पादनही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात होत आहे. शेतकऱ्यांना फलोत्पादन, फळभाज्या, फळबागा तसेच भाज्यांच्या उत्पादनास उत्तेजन देण्यासाठी शासनाने विविध उपक्रम राबवलेले आहेत. परिणामी राज्याच्या आर्थिक विकासाला हातभार लागलेला आहे. तसेच या क्षेत्रातील हजारो लोकांना रोजगार प्राप्ती झालेली आहे.

**७. औद्योगिक क्षेत्राची प्रगती :**

महाराष्ट्र शासनाने राज्याच्या स्थापनेपासूनच औद्योगिक क्षेत्राला गती देण्याचे धोरण आखले आहे. राज्यात विविध उद्योगधंदे सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'बोर्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट'ची स्थापना केली. १ ऑगस्ट १९६२ रोजी ठाण्यात 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ' ची स्थापना करण्यात आली. सरकारी मालकीच्या नापीक जमिनी ताब्यात घेऊन त्यावर उद्योग उभारणीसाठी सोयीसुविधा पुरवून अशा जमिनी उद्योगांना सवलतीच्या किंमतीत विकण्याचे धोरण आखले. त्यामुळे राज्यात विविध उद्योग स्थापन करणे शक्य झाले. राज्यात सर्वत्र औद्योगिक वसाहतींचे जाळे निर्माण करण्यात आले. या औद्योगिक वसाहतींची जबाबदारी औद्योगिक विकास महामंडळावर सोपवण्यात आली. औद्योगिक वसाहतीतील सोयीसुविधा, रस्ते, सांडपाणी, दूषित वायू यांची सुयोग व्यवस्था तसेच इतर सोयी सुविधांची जबाबदारीही महामंडळावर सोपवण्यात आली. राज्याने राबवलेल्या उद्योगप्रधान धोरणातूनच जगातील तसेच देशातील नावाजलेले उद्योगधंद्यांचे प्रकल्प महाराष्ट्रात स्थापन झाले. ९० च्या दशकात माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीमुळे औद्योगिक विकासाला गती मिळाली. १९९१ नंतरच्या जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणावर आधारित नव्या आर्थिक धोरणांची राज्यात अंमलबजावणी झाली. राज्यातील औद्योगिक क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे रोजगार निर्मितीचे प्रमाणही वाढले. वस्तू निर्माण क्षेत्रात चांगल्या रोजगारची वाढ घडून आली. 'महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ' स्थापन करून विविध प्रकारच्या लघु उद्योगांना प्रोत्साहन दिले गेले. शेती उद्योग, पेट्रोलियम, धातूची उत्पादने, स्पेअर पार्ट उद्योग, प्लास्टिक तसेच रबर उद्योग या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार वृद्धी घडून आली. त्याचप्रमाणे रासायनिक उत्पादने क्षेत्रातील निर्मितीत वाढ झाल्याचे दिसून येते.

राज्यातील औद्योगिक उत्पादनात खाद्य उत्पादने, पेय, वस्त्रोद्योग, लाकूडउद्योग, कागदउद्योग तसेच चर्मोद्योग या ग्राहक प्रदान उद्योगांचा समावेश होतो. रासायनिक उत्पादने, मूलभूत धातू उत्पादने, खनिज उत्पादने या पुनर्निर्माण वस्तू उद्योगाबरोबरच यंत्रे व यंत्रसामग्री उत्पादने, पर्यावरण, परिवहन सामग्री निर्माण

उद्योग या भांडवली वस्तू उद्योगांचा समावेश आहे. औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्र देशात अग्रेसर असून उद्योगास पोषक वातावरण, कच्चामाल, कुशल कामगार, वीज पुरवठा, भांडवल, वाहतुकीच्या सोयी तसेच बाजारपेठ इ. गोष्टी महाराष्ट्रात औद्योगिक विकासासाठी अनुकूल ठरलेल्या आहेत. असे असले तरी महाराष्ट्राचा बराच मोठा भाग औद्योगिकदृष्ट्या मागास राहिलेला असल्याचे दिसून येते. राज्याच्या औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलपणा हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य सांगता येईल.

**८. सेवा क्षेत्राचा विस्तार :**

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला गती देण्याचे कार्य सेवा क्षेत्र करीत आहे. आर्थिक विकासासाठी सेवा क्षेत्राची गरज असते. सेवा क्षेत्र सामाजिक व सांस्कृतिक विकासासही हातभार लावत असते. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सेवाक्षेत्र देखील महाराष्ट्रात झपाट्याने विकसित होत आहे. राज्याचे एकूण स्थूल राज्य उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा १९६०-६१ मध्ये ४६%, १९९०-९२ मध्ये ४७% तर २०१४-१५ मध्ये ६१% इतका झालेला आहे. थोडक्यात महाराष्ट्रात सेवा क्षेत्राचा विस्तार व विकास झपाट्याने होत असलेला दिसून येतो. याचबरोबर १९६०-६१ पासून २०१४-१५ पर्यंत महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होत गेल्याचे दिसून येते. या वाढीचा दर प्रदेशागणिक असमान असल्याचे दिसते. राज्याच्या ग्रामीण व नागरी भागातील दरडोई उत्पन्नामध्ये खूपच असमानता आढळते. ग्रामीण भागातील बहुतांश लोक शेतीमध्ये गुंतले असल्यामुळे त्यांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. याउलट नागरी भागातील लोक उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक या व्यवसायात असल्याने त्यांचे दरडोई उत्पन्न जास्त असल्याचे दिसून येते.

राज्यातील भांडवल निर्मितीचा दर अल्प असल्यामुळे स्थिर साधनसंपत्तीमध्ये म्हणावी तशी वाढ झालेली दिसून येत नाही. अल्पउत्पादकता, अल्प उत्पन्न, अल्पबचत, अल्प गुंतवणूक आणि भांडवल निर्मितीचा कमी दर यामुळे राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचा आणि दारिद्र्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. वाढती बेकारी व दारिद्र्य हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसमोरील मोठेच आव्हान आहे.

एकंदरीत महाराष्ट्राच्या आर्थिक वाटचालीचा मागोवा घेत असताना राज्य निर्मितीपासून ते आजअखेर राज्याने अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध पातळ्यावर प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## १.४ सारांश

'महाराष्ट्र : सामाजिक-राजकीय इतिहास आणि आर्थिक पार्श्वभूमी' या प्रकरणाचे एकूण तीन उपविभागात अध्ययन करण्यात आलेले आहे. पहिल्या विभागात महाराष्ट्र राज्याचा सन १८१८ ते १९६० या कालखंडातील सामाजिक आणि राजकीय इतिहासाचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेण्यात आलेला आहे. यामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती, ब्रिटीशकालीन राजकीय व्यवस्था, शैक्षणिक परिस्थिती, महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे योगदान तसेच महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेची पार्श्वभूमी यांचा संक्षिप्त स्वरूपात अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील दुसऱ्या उपविभागात सन १९६० नंतरच्या महाराष्ट्रातील लोकसंख्यावाढ, लोकसंख्यावाढीची कारणे, लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये तसेच लोकसंख्यावाढीच्या परिणामांचे थोडक्यात अध्ययन करण्यात आलेले आहे. या प्रकरणाच्या तिसऱ्या

उपविभागात महाराष्ट्र राज्याच्या १९६० नंतरच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करून विविध मुद्यांच्या सहाय्याने राज्याच्या आर्थिक स्थितीची पार्श्वभूमी संक्षिप्त स्वरूपात समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## १.५ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :

**सविस्तर उत्तरे लिहा.**

१. १९१८ ते १९६० या काळातील महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक तसेच राजकीय इतिहासाचे संक्षिप्त विश्लेषण करा.

२. महाराष्ट्रातील १९६० नंतरची लोकसंख्यावाढ आणि लोकसंख्यात्मक वैशिष्ट्यांची चर्चा करा.

३. १९६० नंतरच्या महाराष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीचा आढावा घ्या.

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. महाराष्ट्रातील समाजसुधारणा थोडक्यात सांगा.

२. महात्मा जोतिबा फुल्यांचे सामाजिक योगदान

३. शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

४. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य

## १.६ सरावासाठी प्रश्न

१. कोणत्या सत्तेमुळे मराठी माणसाचा पाश्चात्य विद्या, कला व शास्त्र यांच्याशी संबंध आला?

२. समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून 'स्त्रीशिक्षण' कोणी हाती घेतले?

३. 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना कोणी केली?

४. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर कोण होते?

५. 'सत्यशोधक समाजाची' स्थापना कोणी केली?

६. 'अनाथ बालिकाश्रमा'ची स्थापना कोणी केली?

७. 'द हाय कास्ट हिंदू वुमन' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ कोणी लिहिला आहे?

८. कोणत्या राजाने आपल्या संस्थानात 'जोगत्या मुरळी प्रतिबंधक' कायदा केला?

## १.७ सरावासाठी प्रश्नांची उत्तरे

१. इंग्रजी सत्तेमुळे

२. महात्मा जोतिबा फुले

३. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

४. एलफिस्टन

५. जोतिबा फुले

६. महर्षी कर्वे

७. पंडिता रमाबाई

८. राजर्षी शाहू महाराज

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. बिरादार माधव (२०१८) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

२. पाटील बी.बी.(२०२१) महाराष्ट्रातील राजकारण आणि चळवळी, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. पाटील व्ही. बी. (२००८) एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

४. पाटील व्ही. बी. (२०१०) विसाव्या शतकातील महाराष्ट्रमधील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

५. वरखडे रमेश (२०१८) महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, (१८०१-१९००) खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

६. वरखडे रमेश (२०१८) महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास (१९०१-१९५०), खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


❑❑❑

# सत्र–१ : घटक २

# महाराष्ट्रातील समाज : ग्रामीण, नागरी आणि आदिवासी
# (Society in Maharashtra : Rural, Urban and Tribal )

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

२.३.१ ग्रामीण सामाजिक जीवन : वैशिष्ट्ये आणि परिवर्तन

२.३.२ महाराष्ट्रातील नागरी क्षेत्र : नागरीकरण, वैशिष्ट्ये आणि समस्या

२.३.३ महाराष्ट्रामधील आदिवासी : वर्गीकरण, वैशिष्ट्ये,बदलते स्वरूप आणि समस्या

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वाध्याय/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना

या दुसऱ्या अध्ययन घटकात आपण महाराष्ट्रातील ग्रामीण, नागरी आणि आदिवासी समाजाचा अभ्यास करणार आहोत. भारतीय समाजरचनेमध्ये तीन प्रादेशिक समूहांचा समावेश होतो. हे तीन प्रादेशिक समूह म्हणजे आदिवासी समाज, ग्रामीण समाज व नागरी समाज होत. स्थूलमानाने आदिवासी समाज म्हणजे जमात, ग्रामीण समाज म्हणजे खेडे आणि नागरी समाज म्हणजे शहर होय. आपण या घटकात ग्रामीण सामाजिक जीवनाची वैशिष्ट्ये आणि ग्रामीण जीवनाचे बदलते स्वरूप अभ्यासणार आहोत. स्थूलमानाने ग्रामीण लोकसंख्येचे शहर वा नगराकडे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण. नागरिकीकरण ही एक आधुनिक प्रक्रिया आहे. नागरीकरणाची वैशिष्ट्ये आणि समस्या या घटकात पाहणार आहोत. त्याचबरोबर भारतातील जंगले, डोंगर कपारीत वास्तव्य करणारा आदिवासी समाज अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. या

आदिवासींचे वर्गीकरण, वैशिष्ट्ये, त्याचे बदलते स्वरूप आणि त्यांच्यात उद्भवलेल्या समस्या या घटकात अभ्यासणार आहोत.

## २.२ उद्दिष्टे

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

- ग्रामीण जीवनाची वैशिष्ट्ये आणि बदल स्पष्ट करता येईल.
- नागरीकरण, नागरी समाज, वैशिष्ट्ये आणि समस्या सांगता येतील.
- आदिवासींचे वर्गीकरण, वैशिष्ट्ये, बदलते स्वरूप आणि समस्या समजावून घेता येतील.

## २.३ विषय-विवेचन

महाराष्ट्रातील समाज समजावून घेण्याच्या दृष्टीने आपण या घटकाचे तीन विभाग पडलेले आहेत. पहिल्या घटकात ग्रामीण सामाजिक जीवनाची वैशिष्ट्ये आणि बदल यांचे विवेचन केले आहे. दुसऱ्या घटकात नागरीकरण, नागरी समाज त्याची वैशिष्ट्ये आणि समस्या यांचे विवेचन केलेले आहे. तिसऱ्या घटकात महाराष्ट्रामधील आदिवासींचे वर्गीकरण, त्यांची वैशिष्ट्ये, बदलते स्वरूप आणि समस्या यांची चर्चा केलेली आहे.

### २.३.१ ग्रामीण समाजाची व्याख्या आणि स्वरूप

ग्रामीण समाज हा जीवनातील मूलभूत व अतिप्राचीन असा समाज आहे. क्रोयोह-कीन हा विचारवंत म्हणतो, की, ''जगात असा कोणताही देश नाही की ज्याची सुरुवात ग्राम समूहाने झालेली नाही''. भारतीय समाजजीवनातील असा मूलभूत व अतिप्राचीन ग्रामसमुदाय खेडे किंवा गाव म्हणून ओळखला जातो. खेडे भारतीय समाजजीवनाचा गाभा असून त्याची परंपरा अतिप्राचीन आहे. खेड्यांच्या स्वतंत्र अशा वैशिष्ट्यामुळे भारतीय समाजजीवनाला एक वेगळे स्वरूप प्राप्त झालेले आहे. ग्रामीण समाज म्हणजे काय हे पाहण्यासाठी खेड्यांच्या विविध भागांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे. ग्रामीण समाजाचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी त्याच्या विविध व्याख्या पाहू.

**ग्रामीण समाजाची व्याख्या:-**

१) गावगाडा या महत्त्वपूर्ण ग्रंथात खेड्याची व्याख्या करताना प्रा.त्रि.ना.अत्रे म्हणतात, ''खेडणे म्हणजे जमीन कसणे, खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेव्हा खेडूतांची जी वस्ती असते ते खेडे होय.''

२) प्रा. आर. शर्मा:-''ग्रामीण समुदाय म्हणजे असा समुदाय की जो काही निश्चित अशा भौगोलिक क्षेत्रात कायमचा राहत असतो आणि त्याच्या सभासदांच्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक संबंध असे विकसित झालेले असतात की जे इतर समुदायापासून वेगळे असतात''

३) पार्क : ग्रामीण समुदाय परस्परसंबंधित अथवा असंबंधित अशा व्यक्तीचा समूह आहे. तो एका कुटुंबापेक्षा मोठ्या कुटुंबात जवळजवळ किंवा एकाच गल्लीत राहतो. सामान्यतः कृषीयोग्य जमिनीवर शेती करतो. पडीक जमिनीवर गुरे चारतो व एका निश्चित सीमेपर्यंत हे गाव व ही जमीन आमची आहे अशी अधिकाराची भावना त्याला असते.

खेड्यात बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे साधन प्रत्यक्ष व प्रत्यक्षपणे शेती आहे. शेती व्यवसायाच्या अनुषंगाने चालणारे इतर व्यवसाय हे इतर घटकांच्या उपजीविकेचे साधन असते. खेड्याच्या बहुतेक गरजा खेड्यात भागविल्या जातात. ग्रामीण अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने उदरनिर्वाह प्रदान अर्थव्यवस्था आहे.

ग्रामीण समाजात जातीसंस्था प्रभावी असते. जातीय स्तरीकरणामुळे ग्रामीण समाजात मोठ्या प्रमाणात विषमता आढळून येते. खेड्यांचे व्यवस्थापन सामान्यपणे वंशपरंपरेने निश्चितपणे उच्च जातीकडे असते. भारतात जवळपास ७० % लोक खेड्यात राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. ५० % उत्पन्न शेती व्यवसायापासून मिळते. अशा वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण समाजाचा सखोल अभ्यास करण्याससाठी ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये जाणून घेणे आवश्यक आहे.

**ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये:–**

**१) शेतीप्रधानता:–**

शेती हा ग्रामवासीयांचा प्रमुख व्यवसाय असतो. त्यामुळेच त्यांना खेडूत म्हणजे शेतकरी असे संबोधन वापरले जाते. शेती हा ग्रामीण समाजाच्या दृष्टीने जीवन जगण्याचा एक मार्ग आहे. शेती व्यवसाय पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण जनतेचा निसर्गाशी घनिष्ठ संबंध असतो.

**२) लघु आकार:–**

ग्रामीण समाजाचा आकार हा नागरी समाजाच्या तुलनेत खूपच लहान असतो. क्षेत्रफळ मर्यादित असते. पिढ्यानपिढ्या ग्रामीण समाजाच्या आकारात फारसी भर पडत नाही. शेतजमीन अधिक असते तर राहण्याचे क्षेत्रफळ कमी असते. नागरी समाजात मात्र सातत्याने भर पडत असते. त्यामुळे ग्रामीण समाजाचा आकार लहान असतो.

**३) पर्यावरणाचा प्रभाव:–**

पर्यावरणाचा दूरगामी परिणाम मानवी जीवनावर होत असतो. जसे भौतिक व सामाजिक पर्यावरण तसे मानवी जीवन आकाराला येत असते. ग्रामवासियांचा भौतिक पर्यावरणाशी अगदी जवळचा संबंध येत असतो. नागरी लोकांचा भौतिक पर्यावरणाशी इतका जवळचा संबंध येत नाही. भौतिक पर्यावरणाप्रमाणेच सामाजिक पर्यावरणाचाही ग्रामीण समाजावर प्रभाव पडत असतो. म्हणजेच रीतीरिवाज, प्रथा, परंपरा, रूढी, तत्त्वज्ञान, धर्म इत्यादींचा प्रभाव ग्रामवासियांवर अधिक असतो.

**४) लोकसंख्येची कमी घनता:–**

लोकसंख्येच्या बाबतीत ग्रामीण समाजात विरळता आढळून येते. ग्रामीण भागातील जनता ही वाडी–वस्तीवर राहतात. एकमेकांपासून ते विखुरलेले असतात. त्यामुळे लोकसंख्या खूप विरळ असते. ग्रामीण समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने बहुसंख्य ग्रामवासीय हे आपल्या शेतीवरच वस्ती करून राहत असतात. राहत्या जागेची उपलब्धता कमी असते त्यामुळे लोकसंख्येची घनता कमी असते.

**५) प्राथमिक संबंध:–**

ग्रामीण समाजात असणारे सामाजिक संबंध हे प्राथमिक स्वरूपाचे असतात. लोकांच्यात एकमेकांविषयी आत्मियता, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा असतो. धार्मिक कार्यक्रम, सण, समारंभ, उत्सव यामध्ये सर्वजण मनापासून सहभागी होतात. नागरी भागात असे संबंध दिसून येत नाहीत.

**६) लोकसंख्येतील सजातीयता:–**

ग्रामीण समाजातील लोक सामान्यपणे एकाच व्यवसायात असतात. शेती व त्याला अनुषंगिक असणारे जोडव्यवसाय करीत असतात. धर्म, वंश, जाती, आर्थिक दर्जा, श्रद्धा याबाबत ग्रामवासियांमध्ये फार तफावत आढळत नसते. पोशाख, खाणेपिणे, जीवनपद्धती याबाबत सारखेपणा दिसून येतो. म्हणून सजातीयता हे ग्रामीण समाजाचे वैशिष्ट्य आहे.

**७) साधे व प्रामाणिक जीवन:–**

साधे व प्रामाणिक जीवन हे ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. ग्रामीण भागातील माणूस हा प्रामाणिकपणे जगणारा व साधेपणाचा वारसा लाभलेला असतो. स्वार्थी हेतू ग्रामीण समाजातील लोकांच्यात कमी असतो. अज्ञान, निरक्षरता, श्रद्धा, धर्माचा प्रभाव अधिक असतो. ग्रामीण भागातील माणूस हा प्रामाणिक असतो. साधी राहणी, साधा आहार आणि विचारातील साधेपणा अशी ग्रामीण माणसांची वैशिष्ट्ये पाहायला मिळतात.

**८) सामाजिक गतिशीलतेचा अभाव:–**

नागरीसमाजात सामाजिक गतिशीलतेला भरपूर वाव असतो. व्यक्ती आपला व्यवसाय, सामाजिक दर्जा आपल्या कर्तृत्वावर बदलू शकते. पण ग्रामीण समाजात सामाजिक गतिशीलतेला वातावरण इतके अनुकूल नसते. शेती व्यवसाय हा पारंपारिक स्वरूपाचा असतो. व्यवसायाचे ठिकाण आणि स्वरूप निश्चित असल्यामुळे ग्रामीण व्यक्तीला आपले स्थान सोडता येत नाही. त्यामुळे व्यावसायिक, भौगोलिक गतीशीलतेचा अभाव दिसून येतो.

**९) कुटुंबाचा प्रभाव:–**

ग्रामीण समाजात कुटुंबास अतिशय महत्त्वाचे स्थान असते. प्रत्येक खेड्यातील आर्थिकदृष्ट्या संपन्न अशा कुटुंबाचा प्रभाव प्रत्येक खेड्यावर असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीवरही कुटुंबाचा प्रभाव पडलेला असतो. व्यक्तीच्या विविध प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्याचे कार्य कुटुंबसंस्थेस करावे लागते. व्यक्तीच्या

शिक्षणाची, पालनपोषणाची जबाबदारी पार पाडण्याचे कार्य कुटुंबास करावे लागते. व्यक्तीचे समाजातील स्थान कुटुंबावरून ठरवण्यात येते. ग्रामीण समुदायात कुटुंब सामाजिक नियंत्रणाचे कार्य प्रभावीपणे पार पडते.

**१०) सामाजिक स्तरीकरण:–**

ग्रामीण समाजातील स्तरीकरण व्यवस्था जातीव्यवस्थेवर आधारित आहे. जातीव्यवस्थेचा निर्णायक प्रभाव ग्रामीण समाजजीवनावर असल्याचे दिसून येतो. जातीव्यवस्था व्यक्तीचा व्यवसाय, स्थान, सामाजिक संबंध, व्यक्तीच्या जीवनातील उत्कर्षाची संधी इत्यादीचे निर्धारण करते. जातीव्यवस्था सामाजिक अंतर आणि श्रेष्ठ, कनिष्ठ संबंधाचे एक प्रतिमान आहे. जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तीचे स्थान तिच्या जन्मावरून ठरते. व्यक्ती त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू शकत नाही. जातीय स्तरीकरण व्यवस्थेत सामाजिक गतिमानाला वाव नसतो.

**११) धर्माचा प्रभाव:–**

पारंपारिक ग्रामीण समाजात धर्माचा लक्षणीय प्रभाव दिसून येतो. निसर्गाच्या मित्रत्वामुळे त्याच्याबद्दल आदर भावना तर शत्रुत्वामुळे त्याबद्दलची भीती यातून शेतकऱ्याच्या मनात निसर्गाविषयी भक्तीभाव व भयशक्ती दोन्ही उदय पावल्या. परिणामी तो निसर्गवादी व दैववादी बनला. निसर्ग प्रसन्न व्हावा व शेती व्यवसाय फायदेशीर ठरावा म्हणून तो निसर्गाची पूजा प्रार्थना करून त्याच्याकडून सहकार्याची अपेक्षा करतो. त्यातूनच त्याच्या रुढी, प्रथा, परंपरा, धार्मिक कल्पना, श्रद्धा उदय पावतात. या सर्वांचा ग्रामीण समाजावर प्रभाव दिसून येतो. ग्रामीण समाज हा परंपरावादी आहे. परंपरेला अनुसरून लोक जीवन जगतात. या परंपरामुळे संस्कृती सातत्याचा प्रभाव अखंडित राहिलेला आहे. ग्रामीण जीवनाला स्थिरता लाभलेली आहे.

**१२) स्त्रियांचा दर्जा:–**

ग्रामीण समाजात स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. समाजकारण, अर्थकारण, कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत स्त्रीला दुय्यम स्थान मिळते. एक गृहिणी म्हणून जीवन जगण्याची स्त्रीची प्रमुख भूमिका मानली जाते. ग्रामीण समाजात पुरुषसत्ताक व्यवस्था असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा दुय्यम मानला आहे.

**१३) सामाजिक नियंत्रण**

ग्रामीण समाजात धर्म, कुटुंब, परंपरा, रितीरिवाज, नीतिमत्ता, वागणुकीचे प्रतिमान इत्यादीद्वारे अनौपचारिकरित्या सामाजिक नियंत्रण होते. त्यामुळे सामाजिक जीवनात सातत्य आणि स्थैर्य निर्माण होते. विरोधगामी वर्तन घडून येत नाही. व्यक्तीकडून उत्स्फूर्तपणे समाजमान्य वर्तन घडते. ग्रामीण समाज लहान, अलिप्त, सजातीय, एकाकी असतो त्यामुळे सामूहिकतेची जाणीव लहानपणापासून कुटुंबात होते. ग्रामीण समाजाच्या विरोधात जाऊन वर्तन केल्यास लोकांच्या नजरेतून किंमत कमी होईल म्हणून जननिंदेला व्यक्ती घाबरत असते. परिणामी व्यक्ती समाजमान्य वर्तन करण्यास तयार असते.

**१४) विशेषीकरणाचा अभाव:-**

ग्रामीण समाजाचे सर्वसाधारण जीवन साधे सरळ असते. शेती, बलुतेदारी, शेतीशी संबंधित जोडधंदे परंपरागत पद्धतीने केले जातात. एकच व्यक्ती अनेक प्रकारची कामे करते. साधारणपणे घरातील कौटुंबिक कामे स्त्रिया करतात. घराबाहेरची कामे पुरुष वर्ग करतो. प्रसंगी ग्रामीण स्त्री पुरुषाच्या बरोबरीने शेतीच्या कामात गुंतलेली असते. त्यामुळे ग्रामीण भागात विशेषीकरणाचा अभाव दिसून येतो.

**१५) स्थलांतराच्या दिशेतील भिन्नता:-**

कामधंदा, व्यवसाय, नोकरी, मनोरंजनाची साधने, शिक्षण, आधुनिक सुविधा, नागरी जीवनाचे आकर्षण इत्यादीमुळे ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होण्याचे प्रमाण आज वाढले आहे. शहराकडून खेड्याकडे फारसे स्थलांतर होत नाही. शहरी जीवनपद्धतीची सवय लागलेली व्यक्ती सहसा ग्रामीण भागात जाऊन जीवन जगण्यास तयार नसते. एका शहरातून दुसऱ्या शहरात स्थलांतर होऊ शकते पण शहराकडून खेड्याकडे होताना दिसून येत नाही.

वरील विविध वैशिष्ट्यावरून आपणास ग्रामीण समाजाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते.

**ग्रामीण समाजातील परिवर्तन :-**

कोणताही समाज स्थिर असत नाही. त्यामध्ये बदल होत असतात. ग्रामीण समाजात देखील काळाच्या ओघात अनेक बदल झालेले आहेत. या बदलास अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यापैकी ग्रामीण विकासासाठी राबवले जाणारे विविध कार्यक्रम हा एक प्रमुख घटक आहे. आज जगातील सर्वच देशात ग्रामीण विकासाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. ग्रामीण समाजातील सर्व समस्यांचे निराकरण करून ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध योजना, कार्यक्रम तसेच प्रकल्प राबवले जात आहेत. या सर्वांचा प्रभाव पडून ग्रामीण समाजात मोठे बदल घडून येत आहेत. सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, कृषी विषयक, राजकीय, शैक्षणिक, जातीव्यवस्था, अशा अनेक घटकात आज ग्रामीण भागात परिवर्तन झालेले दिसून येत आहे.

**१) आर्थिक परिवर्तन :-**

शेती हा ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेती ही हंगामी व मागासलेली आहे. त्यामुळे शेती व्यवसायात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना शेती व्यवसायातील आधुनिक उत्पादन तंत्र, सुधारित शेती अवजारे, खते, जंतुनाशके, कृत्रिम पाणी पुरवठ्याच्या सुविधा इत्यादी उपलब्ध करून त्याद्वारे शेती उत्पादन वाढवले जात आहे. औद्योगीकरणामुळे त्यांचे हस्तउद्योग व ग्रामोद्योग मोडकळीस आले होते. त्यामुळे बेकारी व दारिद्र्य निर्माण झाले होते. त्यांना रोजगार पुरवून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ग्रामीण हस्तउद्योगांचा व ग्रामउद्योगांचा विकास केला जात आहे. ग्रामीण रोजगारात वाढ करण्यासाठी शेतीशी संलग्न असणाऱ्या पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्य उत्पादन, रेशमी किड्यांची पैदास इत्यादी जोडधंद्यांचा विकास होत आहे. थोडक्यात, शेती, ग्रामोद्योग, पूरक

व्यवसाय इत्यादींचा विकास करून ग्रामीण रोजगारात वाढ होत आहे. लोकांचे उत्पन्न वाढत असून दारिद्र्याचे निर्मूलन केले जात आहे. ग्रामीण समाजात आर्थिक परिवर्तन घडून येत आहे.

**२) शैक्षणिक परिवर्तन :–**

ग्रामीण विकासात लोकांचा सहभाग आवश्यक ठरतो. त्यासाठी लोक हे सुशिक्षित, सुजाण, जागृत, डोळस वृत्तीचे असावे लागतात. ग्रामीण भागात शिक्षण सुविधांची कमतरता असल्याने अनेक ग्रामीण लोक अशिक्षित व अंधश्रद्धाळू आहेत. त्यामुळे ग्रामीण लोकांना साक्षर बनवण्यासाठी ग्रामीण भागात बालवाड्या, इंग्रजी शाळा, अंगणवाड्या, शाळा, हायस्कूल, महाविद्यालये सुरू करून तेथे शिक्षण प्रसार करणे हे ग्रामीण विकासातून शक्य झाले आहे. ग्रामीण प्रौढांना साक्षर करण्यासाठी साक्षरता प्रसार केंद्रे, प्रौढ शिक्षण केंद्रे, रात्रशाळा, समाजशिक्षण केंद्रे, ग्रामीण लोकांसाठी व्यावसायिक शिक्षण– प्रशिक्षणाची केंद्रे सुरू करून त्यांच्यातील कला कौशल्यांचा विकास केला जात आहे. शिक्षण प्रसाराद्वारे लोकांची गुणवत्ता वाढवली जात आहे. ग्रामीण भागातील मुले मुली शिक्षण घेऊ लागली आहेत. उच्चशिक्षित होत आहेत. ग्रामीण भागात शैक्षणिक परिवर्तन मोठ्या प्रमाणात घडून येत आहे.

**३) कौटुंबिक परिवर्तन :–**

ग्रामीण कुटुंबामध्ये बदल घडून आलेले आहेत. ग्रामीण समाजातील आजचे कुटुंब पारंपरिक संयुक्त कुटुंबापेक्षा कितीतरी बदललेले आहे. सध्या कुटुंबाचा आकार दिवसेंदिवस लहान होत चालला आहे. पूर्वी अनेक पिढ्यांचे सदस्य एकत्र राहत असत. आज मात्र पती–पत्नी व त्यांची अविवाहित मुले एवढ्याच सदस्यांचा समावेश कुटुंबामध्ये होत आहे. ग्रामीण भागात पितृसताक कुटुंब पद्धती असली तरी स्त्रियांना कायद्याने बरेच अधिकार प्राप्त झालेले आहेत. अर्थार्जनासाठी आज स्त्रिया घराबाहेर पडलेल्या आहेत. त्यामुळे त्या स्वावलंबी बनत आहेत. व्यक्तिगत स्वातंत्र्यामुळे कुटुंबातील व्यक्ती किरकोळ कारणास्तव कुटुंब सोडून जात आहेत. ग्रामीण स्त्रियांच्या दर्जात व कार्यक्षेत्रात बदल होत आहेत. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात स्त्रियांना अधिकार प्राप्त होत आहेत. केवळ, 'चूल व मूल' एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र मागे पडत आहे. ग्रामीण कुटुंबातही व्यक्तिवादाने शिरकाव केलेला आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पद्धतीला चालना मिळत आहे.

**४) जातीसंस्थेतील परिवर्तन :–**

ग्रामीण समाजात जातीव्यवस्थेची पाळेमुळे खोलवर रुजलेली होती. समाजाचे जातीमुळे खंडात्मक विभाजन झालेले होते. खानपान, सामाजिक संपर्क, अर्जित दर्जा, सामाजिक–धार्मिक निर्बंध, विवाहाचे निर्बंध, व्यवसायावरील निर्बंध इत्यादीवर जातीव्यवस्थेचा प्रभाव होता. बलुतेदारी पद्धतीही ग्रामीण समाजामध्ये अस्तित्वात येत होती. परंतु आज जातीव्यवस्था कमकुवत झालेली दिसून येते. ब्रिटिश कालावधीपासून जातीसंस्थेतील परिवर्तनाला वेग प्राप्त झाला. औद्योगीकरण, नागरीकरण, पाश्चात्य शिक्षण, आधुनिक कायदे, नवीन व्यवसाय, समाजसुधारकांचा प्रभाव आणि विज्ञानाचा प्रसार इत्यादी कारणामुळे जातीव्यवस्थेत वेगाने बदल घडून येत आहेत.

ग्रामीण भागात आज जाती-जातीतील भेदभाव कमी होत आहे. व्यक्तीला समाजात मिळणारा दर्जा जातीवर अवलंबून राहिलेला नाही. कोणतीही व्यक्ती आपल्या कलागुण तसेच कौशल्यावर आपले समाजातील स्थान निश्चित करू शकते. कोणत्याही जातीतील व्यक्ती आपल्या स्वकर्तृत्वावर उच्च दर्जा मिळवू शकते. त्यामुळे अर्जित दर्जाला महत्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील सामाजिक संपर्कच्या निर्बंधातसुद्धा शिथिलता आलेली आहे. सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी जातीपातीचा विचार न करता सर्व लोक एकत्र येत आहेत. पवित्र- अपवित्र, शुभ -अशुभ भावना लोकांच्या मनातून कमी होत आहेत. तसेच काही प्रमाणात आंतरजातीय विवाहास मान्यता मिळू लागली आहे. ग्रामीण समाजातील जातीव्यवस्थेची बंधने शिथील होत आहेत. औद्योगीकरणामुळे व शहरीकरणामुळे अनेक नवीन व्यवसाय उदयास आले आहेत. हे व्यवसाय कोणत्याच जातीचे नसल्यामुळे कोणत्याही जातीतील व्यक्ती हे व्यवसाय करू लागली आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार व आवडीनुसार व्यवसाय निवडण्याची संधी मिळत आहे. परिणामी जातीसंस्थेत वेगाने परिवर्तन घडून येत आहे.

**सारांश** :

बदलत्या काळानुसार ग्रामीण समाजातील पारंपारिक वैशिष्ट्यांमध्ये परिवर्तन घडून येत आहे. ग्रामीण समाजातील बदल संथ गतीने होत असले तरी ते अपरिहार्य आहेत. त्यामुळे मूळ स्वरूपातील ग्रामीण समाज ही फक्त कल्पनाच राहिली आहे.

## २.३.२ महाराष्ट्रातील नागरी क्षेत्र: नागरीकरण, वैशिष्ट्ये आणि समस्या

**नागरीकरण** (Urbanization)

शहर किंवा नगर हे मानवी समुदायाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा असून शहरे ही मानवाच्या प्रगतीचे प्रतिक आहेत. नागरीकरण किंवा शहरीकरण ही समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. प्राचीन काळापासून मानवी समाजात नगरे तसेच शहरे आढळून येतात. मानवाला जेव्हा व्यापाराची कला अवगत झाली आणि व्यापाराच्या उद्देशाने त्याने वस्तूंच्या देवाण-घेवाणीसाठी बाजारपेठेचे केंद्र निर्माण केले तेव्हाच शहराच्या निर्मितीला सुरुवात झाली असे म्हणता येईल. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात अनेक नवनवीन शहरे उदयास आल्याचे दिसून येते. ज्या ठिकाण औद्योगिक वस्तूसाठी कच्चा माला मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो अशा ठिकाणी त्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग व्यवसाय निर्माण झाल्याचे दिसून येते. अशा उद्योग व्यवसायामध्ये काम करण्यासाठी आजूबाजूच्या भागातून लोक स्थलांतरित झाले. यातूनच गावांचा विस्तार होत गेला. शहरांचा उदय झाला. पुढे शहरे विकसित होत गेली.

साधारणतः ज्या भू-भागावर दाट लोकवस्ती आहे. व्यवसाय प्रामुख्याने बिगर शेती स्वरूपाचे आहेत त्यास 'नगर' असे म्हटले जाते. भारताच्या जनगणना अहवालानुसार नगरांची व्याख्या अशी केली आहे की (अ) जेथे नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, कँटोन्मेंट बोर्ड वगैरे आहे असा भाग (ब) याखेरीज किमान लोकसंख्या ५००० व काम करणाऱ्या पुराषांपैकी ७५ टक्के पुरुष बिगर शेती व्यवसायात गुंतलेले

आहेत (क) लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमिटरला किमान ४०० आहे, या अटींची पूर्तता करणारे क्षेत्र हे नगर समजले जाते. याशिवाय औद्योगिक विकासासाठी नव्याने विकसित झालेले क्षेत्र, प्रकल्पाच्या निमित्ताने स्थापन झालेल्या वसाहती, रेल्वे वसाहती, महत्त्वाची पर्यटन केंद्रे यांचाही नगर विभागात समावेश होतो.

**नागरीकरणाची संकल्पना**

नागरीकरण ही एक आधुनिक प्रक्रिया अहे. स्थूल अर्थाने नागरीकरण किंवा शहरीकरण म्हणजे ग्रामीण भागातील लोकांनी शहरात येऊन राहण्याची प्रक्रिया होय. आधुनिक काळात शहरांची संख्या व शहरी लोकसंख्या यात सतत वाढ होत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आर्थिक विकास आणि नागरीकरण यांचा जवळचा संबंध होय.

**नागरीकरणाचा अर्थ आणि स्वरूप**

ग्रामीण भागातील लोकांनी नागरी क्षेत्राकडे स्थलांतर करणे म्हणजे नागरीकरण होय. नगरांची किंवा शहरांची वाढ, विकास तसेच विस्तार होणे या अर्थानेही नागरीकरण या संज्ञेचा वापर केला जातो. नागरिकरणाची संकल्पना तशी खूपच गुंतागुंतीची आहे. नागरीकरणाचा अर्थ अधिक सुस्पष्ट होण्याकरता काही अभ्यासकांनी नागरीकरणाच्या व्याख्या सांगितल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

**१) ई. ई. बर्गेल :**

''ग्रामीण समुदायाचे नागर समुदायात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात'' (Urbanization is a process in which Rural Community is transform into urban community)

**२) विल्यम स्कॉट :**

''नागरीकरण ही ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे लोकसंख्येचे होणारे स्थलांतर आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी व नागरी भागात राहणाऱ्यांची लोकसंख्या वाढत जाते या प्रक्रियेला नागरीकरण असे म्हणतात.''

**३) ओल्स यांच्या मते :**

''खेड्यातील लोक नगराकडे जाणे म्हणजेच नागरीकरण होय.''

**४) नेल्स अँडरसन यांच्या मते :**

''ज्या ठिकाणी उद्योगशीलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपूर्ण जीवनपद्धी नवीन तयार होते, त्यास नागरीकरण असे म्हणतात.''

**५) आशिष बोस यांच्या मते :**

''नागरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतराची प्रक्रिया होय.''

थोडक्यात नागरीकरणाची प्रक्रिया ही दीर्घकालीन असून या प्रक्रियेमुळे मूळ लोकसंख्येतील वाढ आणि बाहेरून आलेल्या व्यक्तींचा (स्थलांतरित) समावेश होतो.

**नागरीकरणाचे स्वरूप**

नागरीकरण ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्याकरिता आपण नागरीकरणाच्या स्वरूपाचे अध्ययन करणार आहोत.

**१) स्थलांतर प्रक्रिया**

नागरीकरण ही लोकसंख्येच्या स्थलांतराची प्रक्रिया आहे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विशेष करून लहान आकाराच्या समुदायातील किंवा खेड्यातील लोक हे मोठ्या आकाराच्या समुदायाकडे स्थलांतर करीत असतात.

**२) आधुनिक प्रक्रिया**

नागरीकरण ही आधुनिक काळातील प्रक्रिया आहे. मानव समाजात शहरे व नगरे अस्तित्वात आहेत. मानवी संस्कृती इतकीच नगरेही प्राचीन आहेत. परंतु, प्राचीन काळात नागरीकरणाची प्रक्रिया ही प्रचलित नव्हती. ही प्रक्रिया आधुनिक काळात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीनंतर प्रथम इंग्लंड, युरोपियन राष्ट्रे व पाश्चात्य राष्ट्रात या प्रक्रियेची सुरुवात झाली. आज सर्वत्र नागरीकरण ही गतीमान प्रक्रिया बनली आहे.

**३) सामाजिक प्रक्रिया**

नागरीकरण प्रक्रिया ही केवळ एका भौगोलिक स्थानाकडून दुसऱ्या भौगोलिक स्थानाकडे स्थलांतर करण्याची भौगोलिक गतिशीलतेची प्रक्रिया नसून ती एक सामाजिक प्रक्रिया सुद्धा आहे. ग्रामीण लोकांनी नगराकडे स्थलांतर करणे व बिगर कृषी व्यवसाय स्वीकारणे एवढेच नागरीकरणासाठी पुरेसे नाही. यामध्ये आचार-विचार, मूल्ये, राहणीमान, जीवनशैली इ. गोष्टीतही नागरी पर्यावरणाच्या अनुषंगाने परिवर्तन घडून आले पाहिजे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत केवळ भौगोलिक गतिशीलता आढळून येत नाही तर सामाजिक गतिशीलता देखील घडून येत असते. म्हणून नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

**४) औद्योगिकरणाशी संबंधित**

नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकरणाच्या प्रक्रियेशी संबंधीत आहे. कारण यामध्ये औद्योगिकरणामुळे नागरीकरण सुरू होते असे मानले जाते. नागरीकरण हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे ज्या भागात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू आहे त्या समाजात नागरीकरणाची प्रक्रिया चालू असते. औद्योगिकरणामुळे नवीन उद्योगकेंद्रे अस्तित्वात येतात. परिणामी अशा उद्योगकेंद्रात नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अशा केंद्राकडे सभोवतालच्या प्रदेशातून लोक नोकरी, धंदा, व्यापार, शिक्षण, प्रशिक्षण इ. च्या निमित्ताने ओढले जातात. त्यातूनच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते.

## ५) सामाजिक परिवर्तनाचा घटक :

सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणाऱ्या अनेक घटकांपैकी नागरीकरण हा महत्त्वाचा घटक असतो. नागरीकरणामुळे पारंपरिक सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, जीवनपद्धती, सामाजिक संरचना इ. मध्ये लक्षणीय परिवर्तन घडून येते. संयुक्त कुटुंबाच्या जागी विभक्त कुटुंब अस्तित्वात येते. धर्मसंस्थेचे महत्त्व कमी होते. अर्थसंस्थेत परिवर्तन होते. लोकांचे राहणीमान, मनोवृत्ती, अभिवृत्ति तसेच सामाजिक संबंध यामध्ये अमुलाग्र बदल घडून येतात. अनौपचारिकतेच्या जागी औपचारिक अशा शास्त्रीय तांत्रिक शिक्षणास महत्त्व येते. नवीन नागरी समस्येत वाढ होते. अशा प्रकारे नागरीकरणामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

## महाराष्ट्रातील नागरीकरण :

महाराष्ट्रातील बहुतांश लोकसंख्या ग्रामीण असली तरी ग्रामीण लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात घट होत असून नागरी लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात वाढ होत आहे. गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रात औद्योगिकीकरणात वेगाने वाढ होत असल्याने मोठ्या शहरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मोठ्या शहरांमध्ये रोजगार, व्यवसाय व नोकरी यांची संधी असल्याने ग्रामीण भागातील लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतर होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असून शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. महाराष्ट्रात औद्योगिकीकरणाच्या गतीमान प्रक्रियेमुळे महाराष्ट्र हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनले. त्याचाच परिपाक म्हणजे नागरीकरणात झालेली प्रचंड वाढ होय.

महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचा आढावा घेतल्यास राज्यातील नागरी लोकसंख्या सातत्याने वाढत असलेली दिसते. सन १९६१ मध्ये राज्यातील नागरी लोकसंख्या १.१२ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २८.२२ टक्के इतकी होती. तर २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील लोकसंख्या ५.०८ कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ४५.२३% पर्यंत वाढलेली आहे. गेल्या पन्नास वर्षाचा विचार करता नागरी लोकसंख्येत पाच पटीने वाढ झाली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्यात उद्योगधंद्यांचा विकास होत गेला. त्यामुळे नागरी लोकसंख्या व तिचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण या दोन्ही बाबी वेगाने वाढत आहेत. महाराष्ट्रातील नगरांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरीकरणाचा वेग राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. भारतात नागरीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो.

## नागरीकरणाची कारणे

नागरीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण भागातून लोकांचे नगराकडे स्थलांतर होणे हा महत्त्वाचा भाग असतो. या स्थलांतराला ज्या घटकांमुळे चालना मिळते त्या घटकांना नागरीकरणाची कारणे असे म्हणतात. नागरीकरणास जबाबदार असलेली कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. लोकसंख्यावाढ

२. वाढते औद्योगिकरण

३. रोजगार, व्यापार, व्यवसायात वाढ

४. शेतीचे हंगामी स्वरूप

५. दळणवळण व वाहतुकीची साधने

६. सेवा क्षेत्रांचा विकास

७. व्यक्ती विकासास पोषक संधी

८. शहरी जीवनाचे वाढते आकर्षण

अशा विविध कारणांमुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आलेला दिसून येतो.

**नागर समाजाचा अर्थ व व्याख्या:–**

नागर समाज हा मानवी समाजाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा आहे. आधुनिक काळात नागर समाजास अनेक दृष्टीने महत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि, प्राचीन काळापासून मानव समाजात नगरे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. नगर हा शब्द city (सिटी) या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. 'सिटी' हा शब्द लॅटिन भाषेतील civitous (सीविटॉस) या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ नागरिकता असा आहे. तथापि, यावरून नगर म्हणजे काय याचा स्पष्ट बोध होत नाही. नगर म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर मोठा आकार, दाट लोकवस्ती, पक्की व उंच घरे, माणसांची गर्दी, वाहतूक साधनांनी गजबजलेले रस्ते,विविध उद्योगधंदे, बाजारपेठा, व्यवसाय, शिक्षण- प्रशिक्षण संस्था, कार्यालये, धर्मस्थळे, करमणुकीची साधने, यासारख्या असंख्य गोष्टी येतात.

नगर समाजाचे स्वरूप ग्रामीण समाजाच्या उलट दिसून येते. ग्रामीण समाज पारंपरिकतेचे प्रतिनिधित्व करतो, तर नागरी समाज आधुनिकतेचे. पारंपारिकतेच्या आधुनिक रूपाचे दर्शन म्हणजे नागरी समाज होय. नागरी जीवन प्राधान्याने आधुनिकतेकडे आणि औद्योगिकीकरणाकडे झुकलेले असते. नागरी समाजातील व्यक्तीचे परस्परसंबंध ऐच्छिक स्वरूपाचे, साधनरूप व कृत्रिम स्वरूपाचे असतात. 'अँडरसन' या विचारवंताच्या मते, 'नागरी जीवन उद्योगप्रधान असते. नव्या बदलाची जाणीव नागरी भागात आढळते. कमालीची आर्थिक विषमता नागरी समाजात उघडपणे दिसते. सामाजिक विविधता तसेच दुय्यम संबंध नागरी समाजात दिसून येतात. सामाजिक गतिशीलता वेगाने आकार घेत असते.'

सुसंस्कृत जीवनाचा लाभ मिळावा या हेतूने व्यक्तीची निर्मिलेली वसाहत म्हणजे नगर किंवा शहर होय. काही अभ्यासकांनी लोकसंख्येचा निकष वापरून नगराचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात देशपरत्वे लोकसंख्येचे आधारभूत प्रमाण वेगवेगळे आहे. उदा. अमेरिकेमध्ये २५००, फ्रान्समध्ये २०००, भारतात ५००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या वसाहतीस किंवा समुदायास नगर असे म्हटले जाते. केवळ लोकसंख्या किंवा लोकसंख्येचे आकारमान हा नगराचा निर्धारक निकष म्हणून स्वीकारला जाऊ शकत नाही. त्यासाठी इतर विविध घटकही लक्षात घ्यावे लागतात.

**नागरी समाज व्याख्या:–**

**१) लुई वर्थच्या मते:–**

''सामाजिक विविधता असणाऱ्या व्यक्तींची सापेक्ष दृष्टीने मोठी, दाट व स्थायी वसाहत म्हणजे नगर होय.''

**२) रॉबर्ट बी मिचोल:–**

''शहर म्हणजे लोक, मंदिरे, बँका, राजकीय संस्था, इमारती, वाहतूक, सांडपाण्याची व्यवस्था होय.''

**३) बर्गल:–**

''ज्या वसाहतीतील अधिकांश लोक कृषी (शेती)शिवाय अन्य व्यवसायात गुंतलेले असतात अशा वसाहतींना नगर म्हणतात.''

**४) प्रा. चंद्रकांत खंडागळे:–**

''मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातीय स्वरूपाची लोकसंख्या, बिगर शेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व करमणूक सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा अधिक प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नगर किंवा नागर समुदाय असे म्हणतात.''

**नागरी समाजाची वैशिष्ट्ये:–**

**१) मानवनिर्मित पर्यावरण:–**

नगर समाजावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. हा समाज निसर्गापासून काहीसा दूर असल्याने त्याच्यावर नैसर्गिक घडामोडींचा प्रत्यक्ष प्रभाव फारसा पडत नाही. शहरी लोक अधिक जिज्ञासू व चिकित्सक वृत्तीचे असतात. निसर्गात व समाज जीवनात घडणाऱ्या घटनांकडे ते वैज्ञानिक दृष्टीने पाहतात. घटना घटनांमधील कार्यकारण संबंध शोधण्याचा प्रयत्न करतात. वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय विचार व दैववादी वृत्ती इ. पासून बऱ्याच प्रमाणात दूर असतात. विज्ञानवाद, बुद्धिवाद, प्रयत्नवाद इत्यादींच्या आधारे कृत्रिम पर्यावरण निर्माण करून आपले जीवन अधिक सुसह्य व समृद्ध बनवण्याचा प्रयत्न करतात.

**२) बिगर शेती व्यवसाय:–**

नगर समाजातील लोकांचे व्यवसाय बिगर शेती स्वरूपाचे असतात. शहरात विविध व्यवसाय उपलब्ध असतात. उद्योगधंदे, कारखाने, बाजारपेठा, शिक्षणसंस्था, करमणुकीची केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था आणि शासकीय-निमशासकीय कार्यालये इत्यादींची शहरात रेलचेल असते. या सर्वांमध्ये काम

करून शहरी लोक आपला उदरनिर्वाह करीत असतात. हे सर्व व्यवसाय बिगर शेती व्यवसाय म्हणून ओळखले जातात. शहरात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंची, अवजारे, खते, जंतुनाशके, कीटकनाशके इत्यादींचे उत्पादन करणारे तसेच शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग असतात. अशा उद्योगातही काही शहरी लोक गुंतलेले असतात.

**३) मोठा आकार:–**

नागर समाज आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या तुलनेत जास्त असते. शिवाय शहरात लोकसंख्येची घनता देखील जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो तर काही शहरात करोडो लोक दाटीवाटीने राहत असतात. शहरी समाज उद्योगधंद्यांचे, व्यापाऱ्यांचे, रोजगारांचे, शिक्षणाचे केंद्र असल्याने सभोवतालच्या भागातून लोक शहरात सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार आणि विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात. त्यातूनच काहींना महानगराचे स्वरूप प्राप्त होते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहराचे आकारमान वाढण्यास मदत होते.

**४) सामाजिक विजातीयता:–**

नागर समाजात सामाजिक विजातीयता मोठ्या प्रमाणावर असते. विविध व्यवसायांची उपलब्धता व दळणवळणाची प्रगत साधने यामुळे देशाच्या विविध भागातून भिन्न वंशाचे, धर्माचे, जातींचे, भिन्न भाषेचे व संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची सामाजिक- सांस्कृतिक तसेच आर्थिक पार्श्वभूमी भिन्न-भिन्न स्वरुपाची असते. अशा लोकांचे लहान लहान समूह शहरात अस्तित्वात येतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आचार, विचार, श्रद्धामूल्य, जीवन विषयक दृष्टिकोन व जीवनपद्धती इत्यादी बाबत विविधता निर्माण होते. त्यांचे खाणेपिणे, भाषा, पेहराव, सण, समारंभ यामध्ये विविधता असते. लोकसंख्येतील या विविधतेलाच सामाजिक विजातीयता असे म्हटले जाते.

**५) सामाजिक सहिष्णुता:–**

नागर समाज सामाजिकदृष्ट्या विजातीय असला तरीदेखील त्यामध्ये सामाजिक सहिष्णुता मोठ्या प्रमाणात असते. अधिक लोकसंख्या व लोकसंख्येतील विविधता यामुळे शहरात व्यक्तींचा विविध वंशाच्या, जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, वर्गाच्या लोकांशी सतत संबंध येत असतो. या सर्वांच्या आशा आकांक्षा, आवडीनिवडी, वृत्ती प्रवृत्ती, आचार-विचार भिन्नभिन्न असतात. आपले हितसंबंध साध्य करताना शहरी व्यक्तीला इतरांची मते, चालीरीती तसेच धर्मश्रद्धा या बद्दल सहिष्णुता दाखविणे आवश्यक असते. इतरांच्या जाती, भाषा, संस्कृती तसेच आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा विचार न करता शहरी लोकांना परस्परांशी सहकार्य करावे लागते. यातूनच शहरी समाजात सामाजिक सहिष्णुता निर्माण झालेली दिसून येते.

**६) दुय्यम संबंध:–**

शहरे आकाराने मोठी असल्याने येथील व्यक्तींचे एकमेकांशी संबंध जवळचे, आत्मीयतेचे किंवा समोरासमोरचे असणे अशक्य असते. त्यामुळे शहरी समाज दुय्यम समूह असतो. लोकसंख्या ही दाट व विजातीय असल्याने लोकांच्या परस्पर संबंधात निकटता किंवा आत्मीयता नसते. व्यक्ती परस्परांना नावाने

परिचित नसतात. त्यांच्यात समोरासमोरचा संपर्क नसतो. त्यांच्यातील संबंध औपचारिक, कामापुरते, व्यक्तिनिरपेक्षक तसेच करारात्मक स्वरूपाचे असतात. परस्पर संपर्कासाठी वृत्तपत्रे, फोन, रेडिओ, टेलिव्हिजन अशा संपर्क साधनांचा वापर केला जातो. थोडक्यात, शहरातील लोकांचे परस्परसंबंध हे दुय्यम स्वरूपाचे असतात. त्यामुळेच शहरी व्यक्ती प्रचंड गर्दीत राहूनही बऱ्याचदा एक प्रकारचा एकाकीपणा अनुभवत असते.

**७) सामाजिक नियंत्रण:-**

नागर समाजातील लोकांचे संबंध दुय्यम स्वरूपाचे असल्याने त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण देखील दुय्यम साधनांकडूनच होत असते. शहरी लोकांच्या परस्पर संबंधात औपचारिकता, करारात्मकता, उपयुक्तता अधिक असल्याने कुटुंब, शेजारी यासारखे प्राथमिक समूह त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्यास अपुरे व असमर्थ ठरतात.तसेच लोकसंख्येतील विविधतेमुळे रुढी, प्रथा, परंपरा, धर्म, मूल्ये यासारखी सामाजिक नियमने देखील कुचकामी ठरतात. त्यामुळेच व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी दुय्यम साधनांवर अवलंबून राहावे लागते. शहरात कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग, प्रशासन यासारख्या दुय्यम साधनांकडून सामाजिक नियंत्रणाचे कार्य औपचारिकपणे पार पाडले जाते.

**८) ऐच्छिक मंडळांची विपुलता:-**

नागर समाजात ऐच्छिक मंडळे मोठ्या प्रमाणावर असतात. आचार-विचार, श्रद्धा, मूल्ये, आवडी-निवडी, वृत्तीप्रवृत्ती याबाबतीत शहरी लोकांमध्ये खूपच विविधता दिसते. ही विविधताच ऐच्छिक मंडळाच्या स्थापनेसाठी पूरक व पोषक ठरते. शहरातील या विविधतेतच समान आवडीनिवडी, इच्छा आकांक्षा, छंद, सवयी, हितसंबंध असणारे लोक मोठ्या संख्येने असतात. असे लोक एकत्र येऊन ऐच्छिक मंडळे स्थापन करतात. राजकीय पक्ष, कामगार संघटना, सांस्कृतिक मंडळ, क्रीडा मंडळ, व्यायाम मंडळ, महिला मंडळ, तरुण मंडळ, रोटरी क्लब, लायन्स क्लब यासारख्या ऐच्छिक मंडळांची शहरात रेलचेल असते. व्यक्ती आपल्या विविध हितसंबंधांची पूर्तता करण्यासाठी एकाच वेळी अनेक मंडळांचे सदस्यत्व स्वीकारते. शहरी कुटुंबाच्या रचनेत व कार्यात अलीकडे खूपच परिवर्तन घडून आल्याने कुटुंब पूर्वीसारखे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, व्यक्तिमत्व विकास याबाबतची कार्ये करण्यास समर्थ नाही. त्यामुळे या गरजांच्या पूर्ततेसाठी शहरी व्यक्तींना ऐच्छिक मंडळावरच अवलंबून राहावे लागते. ही परिस्थिती देखील ऐच्छिक मंडळाच्या स्थापनेस कारणीभूत ठरते.

**९) व्यक्तिवाद:-**

नागरी समाजातील पर्यावरण व्यक्तिवाद व व्यक्तीस्वातंत्र्य यांना पोषक असते. शहरात विविध व्यवसाय, विभिन्न ऐच्छिक मंडळे आणि व्यक्तिमत्व विकासाची विविध साधने उपलब्ध असतात.व्यक्ती आपल्या आवडीनिवडीनुसार त्यांचा उपयोग करून स्वतःचा विकास घडवून आणू शकते.आपल्या गुणांच्या आधारे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवू शकते. व्यक्ती विकासाच्या मार्गात जात, धर्म, रूढी, परंपरा, कुटुंब, कुल इत्यादींचा फारसा अडसर येऊ शकत नाही. व्यक्ती स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास व घेतलेल्या निर्णयानुसार कृती करण्यास स्वतंत्र असते. आपल्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगू शकते. इतरांचा फारसा विचार न करता एक

प्रकारचे स्वतंत्र व स्वयंकेंद्रित जीवन ती जगू शकते. शहरी पर्यावरण व्यक्तिमत्व विकासास अनुकूल असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनावर व्यक्तिवादाचा प्रभाव आढळतो.

**१०) श्रम विभाजन व विशेषीकरण:–**

नागरी समाजात श्रम विभाजन व विशेषीकरणास मोठा वाव असतो. औद्योगिक, तांत्रिक, व्यापार, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्व क्षेत्रात सूक्ष्म श्रम विभाजन दिसून येते. या विविध क्षेत्रात व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार विशिष्ट कार्य करीत असतात. एकाच व्यवसायात अकुशल, अर्धकुशल, कुशल, तज्ञ, विशेषज्ञ असे अनेक लोक काम करीत असतात. प्रत्येकजण एखाद्या विशिष्ट कामातील तज्ञता मिळवण्यासाठी धडपडत असतो. उदा. वैद्यकीय व्यवसायात हृदयरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, दंतरोगतज्ञ, कान, नाक, घसा तज्ञ, छातीच्या रोगांचा तज्ञ, मानसोपचारतज्ञ असे विशेषीकरण दिसून येते. हे श्रम विभाजन वा विशेषीकरण व्यक्तींची बुद्धिमत्ता, पात्रता, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीवर आधारलेले असते.

**११) सामाजिक गतिशीलता:–**

शहरी समाजात सामाजिक गतिशीलतेला मोठाच वाव असतो. व्यक्तिवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, विशेषीकरण इत्यादीमुळे शहरात अर्जित दर्जाला महत्त्व असते. त्यामुळे व्यक्ती स्वकर्तृत्वाने आपला सामाजिक दर्जा बदलू शकते. सामाजिक स्तरात बदल घडवून आणू शकते. कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वप्रयत्नाने वरिष्ठ स्तरात जाऊ शकते. कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेली व्यक्ती सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण, कला, कौशल्य इत्यादीचे संपादन करून श्रेष्ठ दर्जा मिळवू शकते. उदा. क्लार्क असलेली व्यक्ती स्वप्रयत्नाने कलेक्टर होऊ शकते. एकंदरीत शहरात सामाजिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर असते. दळणवळणाची प्रगत साधने आणि विविध व्यवसायांची उपलब्धता यामुळे गतिशीलतेला चालना मिळते.

**१२) स्त्रियांचा दर्जा:–**

नागरी समाजात स्त्रियांचा दर्जा बराच उन्नत झालेला आहे. स्त्री शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, नोकरीची संधी, स्त्री विकासाला अनुकूल वातावरण इत्यादीमुळे नागरी स्त्री पुरुषांबरोबर सन्मानाचे जीवन जगू शकते. पती–पत्नी एकमेकांच्या सल्ल्यानेच कौटुंबिक निर्णय घेतात. पती आणि पत्नीमध्ये कामाचे तसेच अधिकाराचे विभाजन झालेले दिसून येते. कुटुंबातील कामाच्या बाबतीत लिंगभेदावर आधारलेले कार्य विभाजन शहरात कमी दिसून येते. कमावत्या पत्नीला पती स्वयंपाक व घरकामात मदत करतो. नोकरीधंद्यामुळे सतत घराबाहेर राहणाऱ्या पुरुषास कुटुंबाच्या दैनंदिन व्यवहाराकडे लक्ष देणे शक्य नसते. त्यामुळे नोकरी करणारे पती–पत्नी त्यांच्या सोयीनुसार व सवडीनुसार घरातील व घराबाहेरील कामे पार पडतात. नगरात स्त्री शिक्षण, नोकरी, आर्थिक स्वावलंबन यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारलेला दिसून येतो.

**१३) क्षेत्रीय नियोजन:–**

शहरात मर्यादित जागेवर असंख्य लोक दाटी–वाटीने राहतात असतात. त्यातच शहराची लोकसंख्या सतत वाढत असते. त्यामुळे जागेची टंचाई निर्माण होते. यातूनच लोकांमध्ये राहण्यासाठी व व्यवसायासाठी जागा मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू होते. त्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे, सेवा केंद्रे, कार्यालय इत्यादींचे

शहराच्या विभिन्न भागात नियोजन केले जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय कार्यालये, विविध व्यापारी केंद्रे यासारखी अत्यावश्यक सेवा व मूलभूत वस्तू पुरवणारी केंद्रे स्थापन झालेली असतात. डॉक्टर, वकील, ऑडिटर्स, उच्च व्यावसायिक शहराच्या मध्यवर्ती भागात व्यवसाय स्थापन्यावर भर देतात. त्यामुळे मध्यभागातील जागेची मागणी वाढल्यामुळे किंमती वाढतात. परिणामी लोक सभोवतालच्या भागात घरे बांधतात. त्यामुळे एकाच भागात राहणाऱ्या लोकांची जीवनपद्धती बऱ्याच अंशी समान असते. शहरातील वस्तीस्थानांच्या भिन्नतेबरोबरच लोकांच्या जीवनपद्धतीतील भिन्नता चटकन लक्षात येते. शहरातील क्षेत्रीय नियोजनामुळे शहरी समाजाची रचना कशी आहे याची कल्पना येते.

**सारांश**

नागर समाजाच्या वैशिष्ट्यांच्या अभ्यासातून आपणास नागर समाजाचे स्वरुप स्पष्ट होण्यास मदत होते.

**नागर समाजातील समस्या:-**

नागर समाजातील बदलते सामाजिक संबंध, औद्योगिकरण, वाढती लोकसंख्या, ढासळते पर्यावरण यातून नागरी समाजात विविध सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. जगातील सर्वच देशातील नगरामध्ये मर्यादित जागेत लाखो-करोडो लोक दाटी-वाटीने घरे बांधून राहतात. शहरातील बहुतांशी जागा ही कार्यालये, दुकाने, कारखाने, शिक्षणसंस्था, बँका, वाहनतळ, बागा, क्रीडांगणे, रस्ते, लोहमार्ग इत्यादींनी व्यापलेली असते. त्यामुळे घरे बांधण्यासाठी जागेची टंचाई निर्माण होते. त्यातून गलिच्छ वस्तीची निर्मिती होते. लोकसंख्या वाढ, नैसर्गिक आपत्ती, राहत्या जागेची टंचाई, दारिद्र्य, वाहतूक कोंडी, औद्योगीकरण, वेश्याव्यवसाय, मादक द्रव्यसक्ती, प्रदूषण अशा अनेक समस्या नगरात निर्माण झालेल्या दिसून येतात. त्या पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

**१) गलिच्छ वस्तीची समस्या:-**

जगातील सर्वच देशातील नगरामध्ये निवास व गलिच्छ वस्तीच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. अन्न, वस्त्र, निवारा ही मानवाची मूलभूत गरज आहे. निवास किंवा घर असे ठिकाण असते की जेथील वातावरण आरोग्यदायी व आरामदायक असते. आपल्या कुटुंबातील सदस्यासह तेथे राहणे व्यक्तीला आनंददायी व सुखकारक वाटत असते. परंतु दुर्दैवाने आज जगातील विशेषतः नगरातील अनेक लोकांना निवास किंवा घरे उपलब्ध नाहीत. वाढती लोकसंख्या, औद्योगीकरण, नागरीकरण, राहत्या जागेची टंचाई जागेच्या वाढत्या किमती, घरबांधणीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या किंमती, वाढते दारिद्र्य व भिक्षावृत्ती कारणामुळे नगरात निवासाची समस्या उद्भवली आहे. अनेक लोक नाईलाजास्तव न परवडणाऱ्या अधिक भाड्याच्या घरात राहतात. काहीजण तर रस्त्यावर, फुटपाथवर, उघड्यावर किंवा गलिच्छ वस्तीत आश्रय घेतात. ज्यांना स्वतःचे घर आहे अशी असंख्य कुटुंबे देखील एक किंवा दोन खोल्यांच्या घरात दाटीवाटीने राहतात. गलिच्छ वस्तीतील बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिती कमकुवत असते. त्यांना कायमस्वरूपी व चांगले उत्पन्न देणारा रोजगार बहुदा नसतो. बरेच जण हे अकुशल कामगार, अपंग, भिकारी, भुरटे चोर, खिसेकापू, भंगार गोळा करणारे, अवैध धंदा करणारे असे असतात. परिणामी निश्चित

उत्पन्नाची हमी नसल्याने ते दरिद्रीच राहतात. गलिच्छ वस्त्यांमध्ये बंदिस्त गटारी, चांगले रस्ते, सुलभ स्वच्छ शौचालये यांची कमतरता असते. अपुरा पाणीपुरवठा तसेच मूलभूत सुविधांची वाणवा असल्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावरही अनिष्ट परिणाम होतो.

**२) मादक द्रव्याची समस्या:–**

आधुनिक समाजात विशेषतः नागरी समाजात मादक द्रव्य सेवन समस्या अत्यंत गंभीर बनलेली आहे. ती दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. नागरी तसेच ग्रामीण भागातील अनेक श्रीमंत, गरीब, प्रौढ, युवक, सुशिक्षित, अशिक्षित, पुरुष तसेच स्त्रिया अशा सर्वच घटकांना या समस्येने ग्रासलेले आहे. शारीरिक थकवा घालवण्यासाठी मादक द्रव्याचे सेवन केले जाते. या समस्येस काही सामाजिक घटक जबाबदार आहेत. उदा. कौटुंबिक सुखाचा अभाव, कुसंगत, सामाजिक मूल्यांचा ऱ्हास, सामाजिक प्रथा इ. कुटुंबातील पती–पत्नी, पालक, मुले यांच्यातील संबंध हे संघर्षाचे व तणावपूर्ण असतील तर कुटुंब सदस्यांना कौटुंबिक सौख्य, प्रेम, माया, सहानुभूती मिळत नाही. परिणामी काही सदस्य ही पोकळी भरून काढण्यासाठी मादक द्रव्य सेवनाच्या आहारी जातात. तसेच घटस्फोट, माता–पिता यापैकी एकाचा मृत्यू, मातापित्याने विभक्त राहणे, त्यांचे मुलांकडे दुर्लक्ष होणे इ. घटकांमुळेही मादक द्रव्य सेवेनाच्या अधीन होतात.

**३) वेश्या व्यवसायाची समस्या:–**

जगातील बहुतेक समाजात प्राचीन काळापासून वेश्याव्यवसाय आढळतो. तथापि एक सामाजिक समस्या म्हणून वेश्याव्यवसायाची तीव्रता औद्योगीकरण व नागरीकरण या प्रक्रिया गतिमान झाल्यानंतर वाढली आहे. वेश्याव्यवसाय ही प्रामुख्याने नागरी समस्या मानली जाते. नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील अनेक पुरुष नोकरी, व्यवसाय, शिक्षण, व्यापार, बाजारहाट, पर्यटन निमित्ताने शहरात येतात. दीर्घकाळ व अल्पकाळ एकटेच राहतात. यातील काही लोक आपली लैंगिक भूक भागविण्यासाठी वेश्यागमन करतात. काही गरीब व निराधार स्त्रिया पोटासाठी तर काही स्त्रिया चैनीसाठी वेश्याव्यवसायाकडे वळतात. काही स्त्रियांना फसवून या व्यवसायात ढकलले जाते. आज वेश्याव्यवसाय गंभीर अशी नागरी समस्या बनलेली आहे. उदरनिर्वाह चालवण्यासाठी व्यक्तीला कोणतातरी व्यवसाय करावा लागतो. मजुरी, नोकरी, शेती, पशुपालन, उद्योग, व्यापार यासारखे विविध व्यवसाय समाजात उपलब्ध असतात. हे व्यवसाय समाजमान्य असतात. तथापि, काही स्त्रिया उदरनिर्वाहासाठी वेश्या व्यवसाय करतात तर काही फक्त पैसे कमविण्यासाठी करतात.

**४) पर्यावरणाच्या समस्या:–**

आधुनिक काळात सर्व समाजात विशेषतः नागरी समाजात औद्योगिकीकरणाची गती खूपच वाढली आहे. सर्वत्र विविध उद्योगधंदे, कारखाने निघाले आहेत. या कारखान्यातून कार्बन डाय–ऑक्साईड, कार्बन–मोनॉक्साईड, धूर, काजळी, कार्बन इत्यादी प्रदूषके हवेत मिसळून हवा प्रदूषण होते. तसेच कारखान्यातून बाहेर पडणारी रसायने, राख, मळी, धातूंचे कण नदीतील सांडपाण्यात मिसळतात. शहरात जागोजागी कचऱ्याचे प्रचंड ढिग तयार होतात. या ढिगाऱ्यात जंतू, विषारी वायू, अन्य प्रदूषके तयार होतात.

समुद्रकिनारी व नद्यांच्या काठी असलेल्या ठिकाणी पर्यटक प्लास्टिक कागद व अन्य कचरा पाण्यात टाकतात. शहरातील स्वयंपाकगृहे, हॉटेल्स, स्नानगृहे, शौचालये, कारखाने इत्यादीतील सांडपाणी त्यावर प्रक्रिया न करता नद्या, सरोवरे, समुद्र यात सोडल्याने जलप्रदूषण होते. शहरातील उघड्या गटारीतील पाण्यात रोगजंतू तयार होऊन हवेत मिसळल्याने हवा प्रदूषण होते. मानव व इतर प्राण्यांचे मलमूत्र, अन्नधान्य, फळे, भाज्या इ.च्या साली, मानवाने वापरून फेकून दिलेल्या वस्तूंचे जमिनीवर ढीग साचून त्यातून विषारी द्रव्ये तयार होतात. ती मातीत मिसळून भूप्रदूषण होते. कारखान्यातील यंत्रे तसेच वाहने यांच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होते. थोडक्यात औद्योगीकरण हे पर्यावरणीय प्रदूषणाचे एक प्रमुख कारण आहे. याचबरोबर नगरांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या, सांडपाण्याची समस्या, वाहतुकीची समस्या, भिक्षावृत्ती, गुन्हेगारी, बाल गुन्हेगारी तसेच इतर सामाजिक समस्या आणि गंभीर प्रश्न नागरी समाजाला भेडसावत आहेत.

### २.३.३ महाराष्ट्रातील आदिवासी : वर्गीकरण, वैशिष्ट्ये, बदलते स्वरूप आणि समस्या (Tribes in Maharashtra: Classification, features, changing nature and problems)

**आदिवासी समाज:**

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी आदिवासींच्या संदर्भात 'मागासलेले हिंदू' हा शब्द वापरला आहे. भारतीय राज्यघटनेने आदिवासींसाठी 'अनुसूचित जमाती' ही संज्ञा वापरलेली आहे. लोकसंख्येने कमी असणाऱ्या, डोंगर कपाऱ्यात राहून स्वतःच्या वेगळ्या जीवनपद्धतीने जगणाऱ्या आदिवासी समाजाच्या अभ्यासाविना भारतीय समाजाचे सम्यक दर्शन घडणार नाही. विविध मानववंशशास्त्रज्ञांनी आदिवासींचा समाजशास्त्रीय अभ्यास केलेला आहे. त्यांच्या विषयी केलेल्या अभ्यासामुळे आदिवासीबद्दलचे गैरसमज दूर होण्यास मदत झाली आहे. मानवशास्त्रज्ञांनी केलेल्या विविध व्याख्यांवरून आदिवासी समाजाचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

**आदिवासी समाजाच्या व्याख्या:–**

१) **गिलिन व गिलिन:–** ''एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा, समान बोलीभाषा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षर ओळख नसलेला स्थानीय गटांचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय.''

२) **डॉ. रिव्हर्स:–** ''आदिवासी समाज म्हणजे साध्या प्रकारचा असा सामाजिक समूह होय कि ज्याचे सभासद एकसमान बोलीभाषा बोलतात आणि समान उद्दिष्टासाठी एकत्रित कृती करतात.''

३) **डॉ.डी. एन. मजुमदार**:–''समान नाव धारण करणारा, समान भूप्रदेशात राहणारा, समान भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय बाबतीत सारख्याच निषेध नियमांचे पालन करणारा आणि परस्पर उत्तरदायित्वाची एक पद्धतशीर व्यवस्था निर्माण करणारा असा कुटुंबाचा किंवा कुटुंबांच्या समूहांचा समुच्चय म्हणजे आदिवासी समाज होय.''

| भारतात आढळणाऱ्या आदिवासींचे वर्गीकरण | |
|---|---|
| **राज्य** | **आदिवासी जमाती** |
| महाराष्ट्र | भिल्ल, गोंड, कोलाम, कातकरी, वारली, ठाकूर |
| मध्य प्रदेश | गढवा, मूरीया, कोल, कोलाम, परधान |
| गुजरात | कोरकू, गढवा, परधान, वापरी भितल |
| राजस्थान | गरसिया, कोरकू, कातकरी, भिल्ल |
| बंगाल | संथाल, हो, कोरवा, लेपचा, गारो |
| बिहार | गोंड, खोंड, मुंड, उराव, भूमीज, बंजार, कुरुख |
| ओरिसा | बैगा, बोरो, कोया |
| उत्तरांचल | भुतिया |
| आसाम | गारो, खासी, जू |
| छत्तीसगड | कोल, मुरीया,गोंड, बैगा |
| सिक्किम | लेपच्या |
| आंध्र प्रदेश | चेंचू, कोमा, येनाडी, डोंगरी, रेड्डी |
| कर्नाटक | गोदलू , कूर्ग, गोंड, तोडा |
| तामिळनाडू | तोडा, कादर, मलयाली, उरळी, कमार, मारावार, पुलीयज |
| केरळ | इरूली, मंनन, कोरांग, कुरंब, कुरवन |

| महाराष्ट्रात आढळणाऱ्या आदिवासी जमाती | |
|---|---|
| **जिल्हे** | **आदिवासी जमाती** |
| अहमदनगर | महादेव कोळी, कातकरी, वारली, ठाकर |
| पुणे | महादेव कोळी, कातकरी, वारली, ठाकर |
| नाशिक | पारधी, कातकरी, ठाकर |
| धुळे | गोमिन, भिल्ल, पारधी |
| जळगाव | भिल्ल |
| अमरावती | कोरकू, गोंड, ढानका |
| नागपूर | गोंड |
| चंद्रपूर | माडिया, गोंड, कोया, हळबा |

| | |
|---|---|
| गडचिरोली | माडिया, गोंड, कोया, हळबा गोंड |
| ठाणे | मल्हार, महादेव कोळी, भिल्ल, काथोडी, पारधी |
| रायगड | ठाकर, वारली, कातकरी |

**आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये:–**

**१) विशिष्ट भूप्रदेश:–**

आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा समाज आहे. सर्वसामान्यपणे डोंगराळ, दुर्गम भागात व घनदाट जंगलात त्यांचे निवासस्थान असते. निसर्गाने त्यांच्या वस्तीस्थानाभोवती एक प्रकारची तटबंदी निर्माण केलेली असते. त्यामुळे ते बाह्य जगाच्या संपर्कात सहजपणे येत नाहीत. एक प्रकारची प्रादेशिक अलगता त्यांना लाभलेली असते. सतत भटकंती करणाऱ्या आदिम जमातीसुध्दा विशिष्ट भूप्रदेशातच अन्नसंकलनासाठी भटकंती करत असतात.

**२) मर्यादित लोकसंख्या:–**

आदिवासी समाजाची लोकसंख्या इतर कोणत्याही समाजापेक्षा अगदी मर्यादित असते. एका विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करणारे आदिवासी संख्येने कमी असतात. त्यांची लोकसंख्या कमी असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काची व्याप्ती मर्यादित असते.

**३) बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव.:–**

प्रत्येक समाजाची भाषा त्या समाजाचे एक खास वैशिष्ट्य असते. भाषेत त्या समाजाचे प्रतिबिंब उमटलेले असते. आदिवासींना भाषा आहे पण ती बोलीभाषा आहे. बोलीभाषेला लिपी नसल्याने ही भाषा शब्दबद्ध झालेली नाही. त्यामुळे त्यांची लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केवळ मौखिक माध्यमातून हस्तांतरित होत असतात. परिणामी आदिवासी समाजात वांङमय निर्मिती झालेली नाही. कला, साहित्य, विज्ञान व धर्मशास्त्र आदींचा विकास जसा इतर समाजात झाला तसा आदिवासी समाजात झालेला दिसून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव होय.

**४) साधी अर्थव्यवस्था:–**

साधी अर्थव्यवस्था हे आदिवासी समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आदिवासींची अर्थव्यवस्था केवळ निर्वाहप्रधान आहे. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करणे एवढेच या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट असते. अन्नसंकलन, शिकार, मासेमारी, पारंपारिक पद्धतीची 'झूम' शेती करून पोटापुरते धान्य पिकवणे, यासाठी अप्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे असे यांच्या अर्थव्यवस्थेचे साधे स्वरूप पाहायला मिळते.

**५) एकाच रक्तसंबंधावर आधारित:–**

आदिवासी हे एकमेकांना रक्तसंबंधीत मानतात. आपण एकाच पूर्वजापासून जन्माला आलो आहोत अशी त्यांची श्रद्धा आहे. हा समान पूर्वज व्यक्ती, प्राणी किंवा एखादी वस्तू असते. याबद्दल ते चिकित्सा करत नाहीत. समान पूर्वज म्हणून एकाच रक्तसंबंधावर आधारित असे नाते आहे ही भावना असल्याने त्यांच्यामध्ये विलक्षण आपुलकी व सहकार्य असते.

**६) मर्यादित तंत्रविद्या:–**

आदिवासींची तंत्रविद्या ही साधी व मर्यादित आहे. आर्थिक क्रिया पार पडताना वापरली जाणारी साधने, अवजारे व हत्यारे अविकसित स्वरूपाची असतात. कंदमुळे खणून काढण्यासाठी कुदळ, शिकारीसाठी धनुष्यबाण व भाला, पक्षी व प्राणी पकडण्यासाठी जाळ्या वापरल्या जातात. शेतीसाठी वापरली जाणारी अवजारे सुध्दा प्राथमिक स्वरूपाची आहेत. यावरून त्यांचे तंत्रविषयक ज्ञान अपुरे व जुजबी असल्याचे दिसून येते.

**७) समान धर्म:–**

अलौकिक शक्तीच्या अस्तित्वावर आदिवासींचा विश्वास असतो. याबद्दल त्यांच्यामध्ये मतमतांतरे आढळून येत नाहीत. अलौकिक शक्तीच्या इच्छावर साऱ्यांचे सुख–दुःख अवलंबून असते. या श्रद्धेपोटीच त्या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी त्यांचे सातत्याचे प्रयत्न असतात. प्रार्थना, व्रतवैकल्ये पार पाडली जातात. याबरोबरच या शक्तीना आपल्या काबूत ठेवण्यासाठी ते मांत्रिक, जादूटोणा यांचे सहाय्य घेतात. समान धर्मावर त्यांची श्रद्धा असते.

**८) जादूचा प्रभाव:–**

आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीवर जादूचा प्रभाव असल्याचे दिसून येते. आदिवासींची जादूवर श्रद्धा आहे. आदिवासी समाजामध्ये काळी जादू आणि पांढरी जादू अशा दोन प्रकारची जादू आढळून येते. विविध कारणांसाठी आदिवासी या जादूचा वापर करतात.

**९) सामाजिक एकजिनसीपणा:–**

आदिवासी समाजातील हे सहजपणे लक्षात येणारे वैशिष्ट्य आहे. त्यांची जीवनपद्धती इतर कोणत्याही समाजाहून वेगळी आहे. त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, तत्त्वज्ञान, विचार याबाबतीत समानता असते. त्यांच्यामध्ये एकजीनसीपणा असतो. आदिम समाजात व्यक्तीपेक्षा समाजाला महत्त्व असते. भाषा, खानपान, जीवन जगण्याची पद्धती, पोषाख, धार्मिक कर्मकांडे व चालीरिती याबाबत सर्वांच्यात सारखेपणा दिसून येतो.

**१०) जमात प्रमुखाचे महत्व:–**

आदिवासी समाजात त्यांचा नेता जमात प्रमुख असतो. त्याचा शब्द अंतिम मानला जातो. जमातप्रमुख समाजामध्ये घडणाऱ्या घटनांची शहानिशा करून त्याविषयी निर्णय देण्याचे महत्त्वपूर्ण काम करतो. जमात

प्रमुखांना मदत करण्यासाठी समाजातील वृद्ध व अनुभवी लोकांची एक समिती असते. जमात प्रमुखाच्या निर्णयाचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असते.

**११) मंद परिवर्तन:–**

आदिवासींची एक स्वतंत्र वैशिष्ट्यपूर्ण जीवनप्रणाली आहे. बाह्य प्रभावापासून आदिवासींचे जीवन अलिप्त राहिल्यामुळे त्यांची वैशिष्ट्यपूर्ण जीवनप्रणाली अबाधित राहिलेली पहायला मिळते. आदिवासींना आपल्या जीवनप्रणालीबद्दल आदर व प्रेम असल्यामुळे आदिवासी आपल्या जीवन प्रणालीचा त्याग करीत नाहीत. यामुळे आदिवासी जीवनात परिवर्तन होताना दिसत नाही. बदलत्या परिस्थितीचा परिणाम म्हणून आज आदिवासींमध्ये काही परिवर्तन होताना दिसत आहे. त्या परिवर्तनाचा वेग मात्र मंद स्वरूपाचा असल्याचे दिसून येते.

**आदिवासी समाजाचे बदलते स्वरूप:–**

सर्वसाधारणपणे भारतीय समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तनाची गती मंद आहे. जर तो समुदाय वंचित किंवा परिघा बाहेरचा असेल तर परिवर्तनाची गती अधिकच मंद दिसते. आदिवासी समाज हा जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याने त्याच्या परिवर्तनाची गती इतर समाजाच्या तुलनेत मंद आहे. याचा अर्थ असा नव्हे की, आदिवासी समाजात परिवर्तन झाले नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासींसाठी सरकारने राबवलेली विविध धोरणे, विकास कार्यक्रम, कायदे, शैक्षणिक सुविधा, बदलते तंत्रज्ञान या सर्व घटकांमुळे आदिवासी समाजात परिवर्तन घडून येत आहे. हे परिवर्तन खालील मुद्यांच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

**१. शैक्षणिक परिवर्तन:–**

आदिवासी समाज हा मुख्यतः भटके जीवन जगत असल्याने त्यांना कोणत्याही सोयी सुविधा मिळणे शक्य नव्हते. आदिवासी समाज इतर घटकाप्रमाणेच शिक्षणापासून वंचित राहिला होता. मात्र स्वातंत्र्यानंतर समाजाच्या सर्व घटकांना शिक्षण प्रक्रियेत सामावून घेण्याचे प्रयत्न झाले. त्यामुळे काही प्रमाणात आदिवासी समुदायात शैक्षणिक परिवर्तन झालेले दिसून येते. सर्व शिक्षा अभियान, वस्ती तेथे शाळा या धोरणामुळे शिक्षण प्रक्रियेत आदिवासींना सामावून घेण्यास मदत झाली. अनेक आदिवासी तरुण–तरुणी उच्च शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करताना दिसून येत आहेत.

**२. कौटुंबिक व वैवाहिक परिवर्तन:–**

नागरी समाजाच्या संपर्कात आल्यानंतर आदिवासींच्या कुटुंब आणि विवाह विषयक कार्यात बदल झालेला दिसून येतो. आदिवासी समाजात हिंदू धर्म पद्धतीने सध्याची लग्ने होतात. लग्नानंतर पुन्हा धार्मिक विधी होतात. संयुक्त कुटुंब आता विभक्त कुटुंबाच्या दिशेने वाटचाल करताना दिसत आहे. स्त्रीप्रधानता जाऊन पुरुषप्रधानता अधिक प्रभावी ठरत आहे. जातपंचायतीद्वारे दिला जाणारा घटस्फोट म्हणजेच काडीमोड आता बेकायदेशीर मानण्यात आला आहे. त्याऐवजी कायदा आणि न्यायालयाद्वारे दिलेला घटस्फोट कायदेशीर मानण्यात येऊ लागला आहे. मुला–मुलींच्या पसंतीला प्राधान्य मिळत आहे.

**विवाह पद्धतीत परिवर्तन :-**

आदिवासींची परंपरागत विवाह पद्धती आज पूर्णपणे बदलल्याचे दिसते. पूर्वी आदिवासीमध्ये बालविवाह, पलायन विवाह, बहुपत्नी विवाह, बहुपतित्व विवाह, भातृ -अभातृ विवाह अशा विवाह पद्धती रूढ होत्या. वधूमूल्य पद्धत होती. आज काळाच्या ओघात आदिवासींच्या विवाह पद्धतीत कमालीचे बदल झालेले दिसत आहेत. एक विवाह पद्धतीचे महत्त्व समजू लागले आहे. सुशिक्षित पिढी विवाहाचे वय, योग्य जोडीदार विचारात घेऊन विवाह करताना दिसत आहे. शिवाय ही पिढी विवाहापेक्षा रोजगार, अर्थार्जनास प्राधान्य देताना दिसत आहे.

**३. वेशभूषा व आहारातील परिवर्तन:-**

अनेक आदिवासी जमातीची पारंपरिक वेशभूषा आणि आहार त्यांच्या पारंपारिक व्यवसायाशी निगडित होता. परंतु, आदिम समाज आता मुख्य प्रवाहातील समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या व्यवसायात बदल होत आहे. शिक्षण प्रक्रियेतील सहभाग सुद्धा वाढत आहे. याचा परिणाम त्यांच्या खानपान, राहणीमान, वेशभूषा, केशभूषा यावर होत आहे. आदिवासी पुरुषांबरोबरच महिलांच्या राहणीमानातही बदल दिसत आहे. आधुनिक पोषाख, दागदागिने, सौंदर्यप्रसाधने यांचा वापर होऊ लागला आहे. शहरी संस्कृतीतींल खाद्यपदार्थ आदिवासींच्या आहारात दिसू लागले आहेत.

**४. बोलीभाषेमध्ये परिवर्तन:-**

आदिवासींची स्वतःची मूळची बोलीभाषा आहे. उदा. गोंड, वारली, कोरकू, कातकरी इ. परंतु, आधुनिक जगाचा संपर्क, औद्योगीकरण, नागरीकरण आणि प्रामुख्याने शिक्षणाने आदिवासींच्या मूळच्या बोलीभाषा लोप पावत चालल्या आहेत. त्यांच्या बोलीभाषांना लिपी नाही. त्यामुळे साहित्य निर्मितीही होत नाही. जुन्या पिढीबरोबर त्यांची भाषाही अस्त पावत आहे. नवीन पिढी शहरी भाषा बोलण्यास प्राधान्य देत आहे. त्यामुळे आदिमांच्या बोलीभाषेत परिवर्तन घडून येत आहे.

**५. धार्मिक परिवर्तन:-**

प्रत्येक आदिवासींचा स्वतःचा असा मूळचा उपजत धर्म आणि धार्मिक श्रद्धा होत्या. या धार्मिक श्रद्धांना ते जिवापाड जपत असत. परंतु, काळाच्या ओघात आदिवासींचा इतर धर्माशी संपर्क प्रस्थापित झाला. इतर धर्माच्या प्रभावातून त्यांनी हिंदू, ख्रिश्चन व इतर धर्म स्वीकारले आहेत. त्यामुळे त्यांच्या मूळच्या धार्मिक श्रद्धा, कल्पना, चालीरीती हळूहळू कमकुवत बनल्या. आधुनिक सण, समारंभ, उत्सव ते साजरे करू लागले आहेत. त्यांच्यातील जादूटोणा, अंधश्रद्धा, मंत्र-तंत्र यांचा प्रभाव कमी होताना दिसत आहे. शिवाय शिक्षण, वृत्तपत्रे, रेडिओ, टीव्ही इत्यादी जनसंपर्क माध्यमामुळेही त्यांचा पारंपारिक दृष्टिकोन तसेच श्रद्धा कमी होऊन आधुनिक दृष्टिकोन विकसित होऊ लागला आहे.

**६. आरोग्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल:-**

आदिवासी समाज प्रगत समाजापासून अलिप्त असल्याने आरोग्यविषयक जाणीवजागृती त्यांच्यामध्ये नव्हती. वैद्यकीय सोयींचा अभाव होता. दूषित पाणी, अस्वच्छता, निकृष्ट राहणीमान इत्यादीमुळे जंतुसंसर्ग

होत होता. त्यामुळे सततचे आजार शिवाय बालमृत्यूचे प्रमाण अधिक होते. परंतु, अलीकडे स्थिती बदलली असल्याचे दिसून येते. आधुनिक शहराशी संपर्क, वैद्यकीय सुविधा, आरोग्य सेवांची उपलब्धता, आदिवासी पाड्यांमध्ये आरोग्यविषयक जाणीवजागृती होताना दिसत आहे. वैयक्तिक स्वच्छता आणि रोगमुक्त जीवनाचे महत्व आदिम समाजात वाढू लागले आहे. आदिवासींच्या आरोग्याबाबत सरकारकडून आरोग्यविषयक विविध योजना राबवल्या जात आहेत.

**७. आर्थिक परिवर्तन:-**

आदिवासी लोक कष्टमय जीवन जगत होते. आर्थिक उत्पन्नाची निसर्गाशिवाय इतर कोणतीच साधने त्यांच्याकडे नव्हती. आज त्यांच्या आर्थिक जीवनात परिवर्तन झालेले दिसून येते. त्यांच्या शेतीत झालेले परिवर्तन सरकारच्या सुधारणात्मक दृष्टिकोनामुळे झालेले आहे. उद्योगधंद्यांचा झालेला विकास, नोकरी व्यवसायात आदिवासींना स्थान तसेच विविध प्रकारच्या शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचवण्यात येत आहेत. आदिवासीतील काही लोक छोटे मोठे रोजगार, नोकऱ्या तसेच व्यवसाय करत आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्यात आर्थिक परिवर्तन घडून येत आहे.

**८. जमात किंवा जात पंचायतमध्ये शिथिलता:-**

जमात किंवा जात-पंचायत हे आदिवासी समाजाचे लक्षण होते. आजही ते काही प्रमाणात टिकून आहे. आधुनिक संविधानिक न्यायप्रक्रियेत जातपंचायतीचे महत्त्व शिथील होत आहे. जातपंचायतीमधील अनेक बाबी कायद्याने गुन्हा ठरवल्या आहेत. अनेक शिक्षित नोकरदार गावात किंवा शहरात राहणारी आदिम कुटुंबे आता जातपंचायतीच्या चौकटीबाहेर राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. परिणामी जमात पंचायतीची बंधने शिथिल होताना दिसत आहेत.

**९. वसाहतीमध्ये बदल:-**

भटके जीवन जगणारे आदिवासी काही प्रमाणात गाव आणि शहरात स्थिरावत आहेत. गावाच्या बाहेर असणारी त्यांची वसाहत मुख्य वसाहतीचा भाग बनली नसली तरी काही आदिवासी लोकांची घरे आता शहरी वस्तीमध्ये दिसत आहेत. काही गावात त्यांच्या स्वतंत्र वसाहती बनत आहेत. त्यांची घरे पक्या किंवा विटांची बांधली जात आहेत. सरकारच्या घरकुल योजनांचा लाभ आदिम बाधवांना मिळत आहे.

**१०. राजकीय परिवर्तन:-**

भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीनंतर आदिवासींच्या राजकीय जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडून आलेले आहेत. सर्वसामान्य भारतीय व्यक्ती ही राजकीय प्रक्रियेचा भाग बनली आहे. आदिवासी समाजाचा सुद्धा काही प्रमाणात राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे. त्यांच्यात राजकीय नेतृत्वाची निर्मिती होऊ लागली. नवीन राजकीय सहभागामुळे आदिवासी गाव आणि शहराच्या राजकीय प्रक्रियेचा भाग बनला आहे. ग्रामपंचायती, पंचायतसमिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा यामध्ये आदिवासींनी निवडून दिलेले प्रतिनिधी आदिवासींच्या विविध प्रश्नावर आवाज उठवत आहेत. आपल्या देशाच्या सध्याच्या

राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू या आदिवासी समाजातूनच आहेत. आदिम समाजात राजकीय परिवर्तन घडून येत आहे.

**११. मुख्य प्रवाहाच्या दिशेने:-**

आदिवासी समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यांच्या चाकोरी बद्ध जीवनाचा प्रवास आता बदलू लागला आहे. अनेक शासकीय-अशासकीय योजना, शिक्षण, नोकऱ्यामधील सहभाग आणि राजकीय सहभाग यामुळे आदिवासी समाजातील लोक समाजाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. प्रगती करीत आहे.

**आदिवासींच्या समस्या:-**

भारतीय समाजातील उपेक्षित आणि दरिद्री घटक म्हणून आदिवासी किंवा अनुसूचित जमातींचा उल्लेख करता येईल. अनुसूचित जमातींच्या समस्या प्रामुख्याने आदिवासींचे अज्ञान, निरक्षरता, सरकारी उदासीनता, आरोग्य सोयी सुविधांचा अभाव, फसवणूक, सरकारी विस्थापनकारी प्रकल्प यातून निर्माण झाल्या आहेत. आजच्या एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या जगात अनुसूचित जमाती मात्र अगदी प्राथमिक अवस्थेतील जीवन जगत आहेत. हा समाज भौतिक प्रगती, विकास, उदरनिर्वाहाची पर्याप्त साधने तसेच रोजगार यापासून खूपच दूर आहे. यावरून आपणास त्यांच्यापुढील समस्यांची कल्पना येऊ शकेल. आदिवासींच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) आर्थिक समस्या:-**

अनुसूचित जमातींच्या समस्यापैकी सर्वात महत्त्वाची आणि गंभीर स्वरूपाची समस्या आर्थिक स्वरूपाची आहे. भारतातील बहुतेक सर्व अनुसूचित जमाती अतिशय दरिद्री अवस्थेत जीवन जगत आहेत. या जमातीतील बहुसंख्य लोकांना आपल्या उदरनिर्वाहविषयक गरजांचीही पूर्तता करता येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. आजही अनेक आदिवासी अर्धपोटीच राहून कसेबसे जीवन कंठीत असतात. ही समस्या निर्माण होण्यासाठी पुढील घटक जबाबदार आहेत.

**१) अप्रगत शेती:-** आदिवासी जमातीतील लोक अप्रगत शेती व्यवसाय करतात. डोंगराळ भागातील, जंगलातील अन्नसंकलन यावर आपला उदरनिर्वाह करतात. शेतीसाठी सावकारांकडून कर्ज घेतले जाते. परंतु, शेती अप्रगत असल्यामुळे कर्जफेड होत नाही, परिणामी आदिवासी शेतकरी कर्जबाजारी होतात.

**२) आर्थिक शोषण:-** जंगलातून मिळालेल्या विविध वस्तू, शेती उत्पादन दलाल किंवा व्यापाऱ्यांना विकले जाते. परंतु, व्यापारी अत्यंत कमी दरात माल विकत घेतात. त्यातून आदिवासींचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणावर होते.

**३) स्थलांतरित शेती:-** आदिवासी जमात स्थलांरित शेती करतात. शेती करताना परंपरागत साधनांचा वापर करतात. एखाद्या ठिकाणी जंगलतोड करून शेती केली जाते. तेथील जमिनीचा कस संपल्यानंतर

दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. स्थलांतरीत शेतीमुळे शेतीमध्ये उत्पादन कमी मिळते त्यातून कर्जबाजारीपणा वाढत जातो.

**४) औद्योगिकीकरणातून शोषण:–** आदिवासी क्षेत्रात लोखंड, कोळसा, मँगनीज यासारख्या खाणींचे उत्खनन केले जाते. आदिवासी तेथे अकुशल कामगार व खाण कामगार म्हणून काम करतात. ठेकेदार त्यांचे आर्थिक शोषण करतात. त्यांना अत्यंत अल्पमजुरी देणे तसेच सक्तीने काम करून घेऊन त्यांची आर्थिक पिळवणूक केली जाते.

**५) विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या समस्या:–** आदिवासी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विविध प्रकल्प राबवले जात आहेत. धरणे बांधली जात आहेत. यामुळे त्यांचे विस्थापन होत आहे. त्यांचे पुनर्वसन योग्यरितीने केले जात नाही. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाच्या समस्येत वाढ होत आहे. उदा: गुजरातमधील सरदार सरोवराच्या परिसरातील विस्थापितांचा प्रश्न आजही प्रलंबित आहे.

**६) दारिद्र्य:–** आदिवासी समाजाचा आर्थिक दृष्ट्या सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी पर्याप्त संसाधने पुरविली जात नाहीत. रोजगार नसल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन नाही. पोटाला पुरेसे अन्नधान्य मिळत नाही. यातून त्यांचे कुपोषण होते. आर्थिक उत्पन्नाची पर्याप्त संसाधने नसल्यामुळे आदिवासींना दारिद्र्यरेषेखाली जीवन जगावे लागत आहे.

**ब) सामाजिक समस्या:–**

एकेकाळी आदिवासींचे सामाजिक जीवन अतिशय साध्या सोप्या पद्धतीचे होते. परंतु, अलीकडील काळात आदिवासींचा प्रगत समाजाशी संपर्क वाढू लागल्यावर त्यांच्या सामाजिक जीवनातही अनेक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**२) पारंपारिक रुढी, परंपरा व मूल्यांचा ऱ्हास**:– शहरी संस्कृतीच्या वाढत्या प्रसाराने आदिवासी जमातीतील पारंपरिक रुढी, प्रथा, परंपरा तसेच मूल्ये ऱ्हास पावू लागली. त्यांचे राहणीमान तसेच भाषा यामध्ये बदल झाले. प्रगत समाजाच्या संपर्कातून आदिवासींनी आपल्या अनेक सामाजिक प्रथा, रुढी, रितीरिवाज यांचा त्याग केला आहे. त्यांना मूळ संस्कृती सोडता येत नाही आणि आधुनिक जीवनपद्धती पूर्णपणे आत्मसात करता येत नाही. त्यामुळे त्यांची अवस्था त्रिशंकू सारखी बनली आहे.

**३) वधूमूल्य पद्धती:–** आदिवासींमध्ये प्रचलित असलेली वधूमूल्याची पद्धत व त्यांची वाढती व्यसनाधीनता या समस्यांचा उल्लेख यासंदर्भात करावा लागतो. वधूमूल्यांच्या पद्धतीमुळे मुलाचा विवाह करण्यासाठी सावकाराचा आधार घेतल्या खेरीज गत्यंतर नसते. यातूनच आदिवासींचा कर्जबाजारीपणा व दारिद्र्य वाढत आहे.

**४) युवागृहांचे पतन:–** युवागृहांना आदिवासी जमातीत अतिशय महत्त्वाचे स्थान होते. परंतु अलीकडील काळात या महत्त्वपूर्ण संस्थेचा ऱ्हास होऊ लागला आहे. त्यामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात मोठीच पोकळी निर्माण झाली आहे.

**५) व्यसनाधीनता:–** दारिद्र्यामुळे त्यांच्यातील व्यसनाधीनता वाढत आहे. जीवनात सतत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत राहिलेले आदिवासी क्षणिक सुखासाठी व मनाच्या विरंगुळ्यासाठी दारू तसेच इतर व्यसनाकडे वळत आहेत. त्यातून दारिद्र्यामुळे व्यसनाधीनता आणि व्यसनाधीनतेमुळे दारिद्र्य हे दुष्टचक्र आदिम समाजात चालूच राहते.

**क) आरोग्यविषयक समस्या:–**

**१) आहारविषयक समस्या:–** आदिवासींच्या जन्मजात दारिद्र्यामुळे त्यांची उपासमार होते. अपुरा व निकृष्ट आहार यांचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. निरनिराळ्या प्रकारच्या रोगराईचा फैलाव आदिवासींच्यामध्ये होत असतो. दारिद्र्य, रोजगाराचा प्रश्न, दुर्गम भागातील डोंगराळ व ओसाड पडलेल्या शेतीतील तुटपुंजे उत्पन्न, सकस अन्नाचा अभाव, जीवनसत्वाचा अभाव व यातून कुपोषण व बालमृत्यूच्या प्रमाणात वाढ होते. त्यांच्या अज्ञानामुळे अस्वच्छता तसेच निरोगीपणा या गोष्टीकडे होणारे दुर्लक्ष त्यांच्या अनारोग्याचे एक कारण आहे.

**२) आरोग्य सुविधांचा अभाव:–**आदिवासी प्रदेशात आरोग्यविषयक सुविधांचा अभाव आहे. अंधश्रद्धा व धर्मभोळ्या समजुती यामुळे आजारीपणात औषध उपचार करण्याविषयी त्यांच्याकडून दाखवली जाणारी उदासीनता आणि दारिद्र्य इ. कारणामुळे आदिवासींच्या आरोग्याला नेहमीच धोका निर्माण झालेला असतो. याशिवाय प्रगत समाजाच्या संपर्कातून वेश्याव्यवसायासारख्या गोष्टींनी आदिवासी समाजात शिरकाव केला आहे. त्यातून गुप्तरोगांचा प्रसार आदिवासींच्यामध्ये होऊ लागला आहे.

**३) दूषित पाणी:–** शुद्ध व मुबलक पाणी यांचा अभाव आदिवासी क्षेत्रात दिसून येतो. पावसाळ्याचे चार महिने व त्यानंतर दोन–तीन महिने त्यांना मुबलक पाणी मिळते. पण त्यानंतर मात्र आदिवासी क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष सुरू होते. दोन हंडे पाणी मिळवण्यासाठी त्यांना मैलोन्मैल पायपीट करावी लागते. काही ठिकाणी जुन्या व पडक्या विहिरीचे दूषित पाणी पितात. त्यामुळे त्यांना कावीळ, नारू, कॉलरा यासारख्या आजारांना सामोरे जावे लागते.

**४) अस्वच्छ राहणीमान:–** आदिवासींना पाण्याच्या कमतरतेमुळे दररोज आंघोळ करणे शक्य होत नाही. अंगावरील कपडे धुणे अवघड होते. पुरेशा कपड्यांचा अभाव असतो. कपडे धुतल्यावर फाटतात म्हणून कमी कपडे वापरण्याची पद्धत त्यांच्यात दिसून येते. परिणामी त्वचेच्या रोगांचा प्रादुर्भाव आदिवासी लोकांत मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. पावसाळ्यात ओले झालेले कपडे अंगावरच वाळवल्यामुळे निमोनिया होतो. खाणीतील कोळशाचे बारीक कण श्वसनलिकेत जाऊन फुफ्फुसाचे आजार होतात. दमा, खोकला, क्षय इत्यादी आजाराने ते ग्रस्त होतात. थोडक्यात आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत.

**ड) शैक्षणिक समस्या:–**

भारतातील बहुसंख्य आदिवासी लोक निरक्षर आहेत. ही निरक्षरता त्यांच्या मागासलेपणाचे एक प्रमुख कारण आहे. आदिवासींच्या निरक्षरतेचा गैरफायदा प्रगत समाजातील अनेक समाज घटकांकडून घेतला जातो. काही शासकीय अधिकारी आणि पोलीस त्यांच्या निरक्षरतेचा गैरफायदा उठवतात. आदिवासींना सरकारी कायदे यांची विशेष माहिती नसते. त्यामुळे त्यांच्या जमिनी बळकावून आर्थिक व्यवहारात त्यांची फसवणूक करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडताना दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाद्वारे आदिवासी जमातीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक योजना व कार्यक्रम राबवले गेले. शाळा, वसतीगृहांची स्थापना केली. परंतु आदिवासी भागातील शाळांमध्ये असलेल्या सुविधा पुरेशा प्रमाणात नाहीत. आदिवासी कुटुंबांना उपजीविकेसाठी विविध कामे करावी लागतात. भटकंती करावी लागते. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. सरकारच्या शिक्षण प्रसाराच्या प्रयत्नांना फारसे मिळालेले नाही. आदिवासींच्या शिक्षणातील एक मोठा अडथळा म्हणजे भाषेचा प्रश्न होय. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र बोलीभाषा असते. त्यांचे सर्व व्यवहार या बोलीभाषेतूनच चालतात. परंतु, शिक्षणाचे माध्यम प्रगत समाजाची भाषा असते. आदिवासी मुलांना ती भाषा आत्मसात करणे साहजिकच कठीण जाते. परिणामी त्यांचा शिक्षणातील उत्साहच नाहीसा होतो.

आदिवासींच्या वास्तव्याचा प्रदेश हा देखील शिक्षण प्रसारातील आणखी एक अडथळा ठरतो. आदिवासी जमाती दुर्गम प्रदेशात वास्तव्य करतात. प्रगत समाजातील शिक्षक त्या ठिकाणी जाण्यास सहसा तयार होत नाहीत. जे थोडेफार शिक्षक तेथे जातात ते देखील तेथील प्रतिकूल परिस्थिती पाहून आपले काम मनापासून करीत नाहीत. याशिवाय आदिवासींचे दारिद्र्यही त्यांच्या शिक्षणाच्या आड येते. आदिवासी मुले वयाच्या सातव्या–आठव्या वर्षापासूनच कामात आपल्या आई–वडिलांना मदत करू लागतात. शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सेवाभावी, ध्येयवादी संस्था व कार्यकर्ते पुढे येणे आवश्यक आहे.

**इ) सांस्कृतिक समस्या:–**

आदिवासी समाजाचा प्रगत समाजाशी वाढत्या संपर्कामुळे त्यांच्यात काही संस्कृती विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. आदिवासी समाजाची एक स्वतंत्र संस्कृती असते. जीवनपद्धती, रीतीरीवाज, रुढी, प्रथा, परंपरा, धर्म इ. बाबतीत आदिवासी समाज इतर समाजापासून वेगळा असतो. आधुनिक काळात मात्र आदिवासी आपले सांस्कृतिक वेगळेपण हरवू लागले आहेत. प्रगत समाजाकडून आदिवासी समाजावर एक प्रकारचे सांस्कृतिक आक्रमणच होत आहे. आदिवासींच्या मनात प्रगत समाजाच्या संदर्भात निर्माण झालेल्या न्यूनगंडांच्या भावनेमुळे त्यांच्या संस्कृतीविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आदिवासी समाजातील उपयुक्त सामाजिक संस्था आणि त्यांच्या प्रथा व परंपरा यांचा लोप होत आहे. प्रगत समाजातील काही अनिष्ट प्रथांचा आदिवासी संस्कृतीमध्ये शिरकाव होऊ लागला आहे.

**फ) धार्मिक समस्या:–**

बाह्य समाजाच्या संपर्काने आदिवासींच्या धार्मिक जीवनात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. आदिवासी समाजात धर्मसंस्था ही एक अति प्रभावी अशी सामाजिक संस्था आहे. जीवनातील वेगवेगळे तणाव दूर करण्याच्या दृष्टीने ही संस्था त्यांना सहाय्य करत होती. परंतु ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी या क्षेत्रात समाजकार्याच्या माध्यमातून धर्माचा प्रचार केला. याचा परिणाम अनेक आदिवासींनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे ''ना घर का ना घाट का'' अशी त्यांची स्थिती झाली. हिंदू धर्माच्या संपर्कात आल्यामुळे तीच परिस्थिती निर्माण झाली. राजस्थानातील भिल्ल व मध्यप्रदेशातील गोंड जनजातीने हिंदू धर्म स्वीकारलेला आहे. याचा परिणाम आदिवासी जीवनात पारंपारिक धर्मावर विश्वास ठेवणारा व नवीन धर्म स्वीकारणारा असे दोन गट पडले आहेत. ख्रिश्चन धर्म स्वीकारणारे आदिवासी स्वतःला श्रेष्ठ मानू लागले आहेत. यामुळे त्यांच्यातील एकसंघ भावना नष्ट होत आहे. भारतातील अरुणाचल, आसाम, मेघालय, नागालँड, मध्यप्रदेश आणि बिहारमध्ये ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या आदिवासींची संख्या अधिक आहे. अशाप्रकारे विविध धर्मप्रसारकांनी आदिवासींच्या जीवनात अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. हिंदू समाज सुद्धा आदिवासी समाजाला आजही योग्यप्रकारे सामावून घेऊ शकलेला नाही, ही सुद्धा शोकांतिकाच म्हणावी लागेल.

## **२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) महाराष्ट्रातील समाजाचे कोणते तीन प्रकार आहेत?

२) आदिवासी समाजाची व्याख्या द्या.

३) ग्रामीण समाजाची व्याख्या द्या.

४) शहरी समाजाची कोणतीही एक व्याख्या द्या.

## **२.५ सारांश** (Let us Sum up)

या अध्ययन घटकात आपण महाराष्ट्रातील आदिवासी, ग्रामीण, नागरी समाजाची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप आणि समस्या इ. बाबी अभ्यासलेल्या आहेत. ग्रामीण समाज म्हणजे आकाराने लहान व शेतीप्रधान असतो. ग्रामीण समाजाची पर्यावरणाचा प्रभाव, लोकसंख्येची कमी घनता, प्राथमिक संबंध, लोकसंख्येतील सजातीयता, साधे राहणीमान, गतिशीलतेचा अभाव, जातीसंस्थेचे प्राबल्य ही प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. तसेच ग्रामीण जीवनातील सामाजिक, आर्थिक कौटुंबिक, शैक्षणिक, कृषी विषयक परिवर्तन सांगितलेले आहे. शहर किंवा नगर म्हणजे नागर समाज होय. कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव, बिगर शेती व्यवसाय, मोठा आकार, सामाजिक विजातीयता, सामाजिक सहिष्णुता, दुय्यम संबंध, दुय्यम साधनाद्वारे नियंत्रण, ऐच्छिक मंडळांची विपुलता, व्यक्तिवादाचा प्रभाव, सामाजिक गतिशीलतेस वाव व क्षेत्रीय नियोजन

ही नागरी समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. याचबरोबर नागरीकरण, नागरी समाजात निर्माण झालेल्या समस्यांची चर्चाही केलेली आहे. दुर्गम डोंगराळ प्रदेशात राहणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय. या समाजाचे वर्गीकरण राज्य व जिल्ह्यानुसार सांगितलेले आहे. तसेच विशिष्ट भूप्रदेश, साधी अर्थव्यवस्था, एकाच रक्तसंबंधातून निर्मिती, जादूटोणाचा प्रभाव, जमात प्रमुख ही आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये स्पष्ट केलेली आहेत.

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to Check Your Progress)

१. आदिवासी, ग्रामीण, नागरी असे महाराष्ट्रातील तीन समाज आहेत.

२. विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांचा समुदाय म्हणजे आदिवासी समाज होय.

३. ग्रामीण समुदाय म्हणजे असा समुदाय की, जो काही निश्चित भौगोलिक क्षेत्रात कायमचा राहत असतो आणि त्याच्या सभासदांच्यामध्ये सामाजिक, आर्थिक संबंध असे विकसित झालेले असतात की जे इतर समुदायापासून वेगळे असतात.

४. सामाजिक विविधता असणाऱ्या व्यक्तींची सापेक्ष दृष्टीने मोठी, दाट व स्थायी वसाहत म्हणजे नागर किंवा शहरी समाज होय.

## २.७ स्वाध्याय /गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण समाजाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. नागर समाजाची व्याख्या देऊन वैशिष्ट्ये विशद करा.

३. आदिवासी समाजाची व्याख्या देऊन त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

४. ग्रामीण व नागर समाजातील फरक स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या

२. नागरी समाजातील समस्या

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

✻ नगराच्या जवळ असलेल्या एका खेड्यास भेट द्या आणि त्या खेड्यात नागरी जीवनाच्या कोणकोणत्या पैलूंचा शिरकाव झालेला आहे याची नोंद करा.

* एका नगराचे निरीक्षण करा आणि त्यामध्ये ग्रामीण जीवनाचे कोणकोणते पैलू आढळतात याची नोंद करा.

## **२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके** (Suggested Reading)


१. जैन शशी (१९९५) नगरीय समाजशास्त्र, रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर.

२. खंडागळे चंद्रकांत (१९९८) भारतीय समाज, मायादेवी खंडागळे प्रकाशन, सांगली.

३. खंडागळे चंद्रकांत (२००५) ग्रामीण समाजशास्त्र, मायादेवी खंडागळे प्रकाशन, सांगली.

४. नाडगोंडे गुरुनाथ (२०१२) भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

५. कोंडेकर वाय. ए., पाटील मंगला, आदिवासींचे समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. बिरादर माधव (२०१८) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद


❑❑❑

## सत्र–१ : घटक ३

# महाराष्ट्रातील राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनाचे पैलू

**(Polity, Education and Aspects of Cultural Life in Maharashtra)**

**घटक संरचना**


३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

३.३.१ महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया आणि महाराष्ट्रातील युतीचे राजकारण

३.३.२ महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती आणि समस्या

३.३.३ महाराष्ट्राच्या संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययनाच्या प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.१ उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास–

१. महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया आणि महाराष्ट्रातील युतीचे राजकारण यांचे ज्ञान अवगत होईल.

२. महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती आणि शैक्षणिक समस्या याबाबतची माहिती प्राप्त होईल.

३. महाराष्ट्रातील संस्कृतीच्या ठळक वैशिष्ट्याबाबत अधिकचे ज्ञान प्राप्त होईल.

## ३.२ प्रस्तावना :

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० मध्ये मराठी भाषिक राज्य निर्माण करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. त्याचाच परिणाम म्हणून दिनांक १ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. १ मे हा महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संघराज्यातील २८ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य आहे. भारतातील एक प्रगत आणि पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्राला प्राचीन आणि समृद्ध अशा संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्राला सामाजिक

आणि सांस्कृतिक इतिहास लाभलेला आहे. महाराष्ट्राला सुधारणावादी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात धार्मिक विविधता दिसून येते. महाराष्ट्रात हिंदू, मुस्लिम, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन तसेच पारशी इ. धर्मातील लोक एकमेकांच्या संस्कृतीचा सन्मान करीत परस्पर सहकार्याने राहत आहेत. त्यांची संस्कृती, देवदेवता, पूजाअर्चा, रीतीरिवाज, चालीरीती, सण आणि उत्सव यात विविधता दिसून येते.

प्रस्तुत घटकात आपण महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया किंवा महाराष्ट्रातील राजकारणाचे प्रमुख आधार काय आहेत याची चर्चा करणार आहोत. याचबरोबर महाराष्ट्रात युतीचे वा आघाड्यांचे राजकारण कशा स्वरूपाने कार्यान्वित आहे, याचेही अध्ययन आपण पहिल्या उपविभागात करणार आहोत. दुसऱ्या उपविभागामध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती तसेच शैक्षणिक प्रगतीतील समस्या किंवा अडथळे कोणते आहेत हेही जाणून घेणार आहोत. तिसऱ्या उपविभागामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये कोणकोणती आहेत यांचा अभ्यास करणार आहोत.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ महाराष्ट्रातील राजकारणाचे आधार आणि महाराष्ट्रातील युतीचे राजकारण

महाराष्ट्र हे भारताच्या पश्चिम भागातील एक प्रमुख राज्य आहे. क्षेत्रफळानुसार महाराष्ट्र राज्य भारतातील तिसरे सर्वात मोठे राज्य आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. भारतातील संघराज्यातील २८ राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून ओळखली जाते. मुंबई हे भारतातील प्रमुख आर्थिक शहर म्हणून ओळखले जाते. राज्यातील सरकारकडून संसदीय शासन पद्धतीवर आधारित राज्यकारभार केला जातो. महाराष्ट्रात विधानसभा आणि विधानपरिषद अस्तित्वात आहेत. याचबरोबर जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांचा अप्रत्यक्ष राज्याच्या राजकारणामध्ये तसेच निर्णय प्रक्रियेत समावेश करून घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात मराठा कुणबी समाजाची लोकसंख्या अधिक असल्याचे दिसून येते. मराठा कुणबी समाज बहुसंख्यांक म्हणून ओळखला जातो. साहजिकच महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा कुणबी समाजाचे वर्चस्व असल्याचे पाहायला मिळते. महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया हा एका गुंतागुंतीच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात अभ्यासता येईल. महाराष्ट्रातील राजकारणाचे आधार अभ्यासताना हे लक्षात येते की आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर एकूणच राज्यातील विविध सुधारणावादी चळवळी, जातीनिष्ठ आणि धर्मनिष्ठ राजकारण, धर्माचा निवडणुकांच्यावर झालेला परिणाम, प्रादेशिकता, भाषावाद, सांस्कृतिक घटक तसेच तत्कालीन नेतृत्व, वेळोवेळी झालेली युती किंवा आघाड्या या सर्वांचे प्राबल्य दिसून येते.

**अ) महाराष्ट्रातील राजकारणाचे आधार किंवा पाया :**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ते आजअखेर झालेल्या सर्वच निवडणुकांच्यामध्ये राजकारणाची दिशा ठरविण्यामध्ये विविध घटकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. जात, धर्म, भाषा, संस्कृती, पक्षाचे नेतृत्व, विचारधारा या सर्वच घटकांनी राज्यातल्या निवडणुका तसेच राजकारणामध्ये वेळोवेळी निर्णयात्मक भूमिका

बजावलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात ज्या विविध घटकांनी निर्णयात्मक भूमिका बजावलेली आहे असे घटक म्हणजेच महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया किंवा आधार म्हणता येईल. त्याचा विस्तृत अभ्यास आपण करणार आहोत. ते घटक खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) ऐतिहासिक पार्श्वभूमी :

महाराष्ट्राला समृद्ध असा प्राचीन आणि विशाल इतिहास लाभलेला आहे. भारत देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राला मौर्य, सातवाहन, चालुक्य आणि राष्ट्रकूट यासारख्या शक्तिशाली राजवटींचा वारसा लाभलेला आहे. सातवाहन राजवटीमध्ये महाराष्ट्रातील कला, विद्या, शेती, व्यापार इत्यादी क्षेत्रांचे संरक्षण व संवर्धन केले. महाराष्ट्रावर अनेक परकीय राजवटींची आक्रमणे झालेली आहेत. महाराष्ट्रात मुस्लिम सत्ता सतराव्या शतकापर्यंत होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने मुस्लिम सत्तांना आव्हान मिळाले. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. मुस्लिम सत्तेखाली पिचलेल्या मराठी जनतेमध्ये स्वराज्याची अस्मिता जागृत केली. एकाच वेळी आदिलशाही आणि मुगल सम्राट यांच्याशी सर्वच आघाड्यावर संघर्ष करत १६७४ साली आपल्या राज्याभिषेकाव्दारे स्वराज्य पूर्णत्वास नेले. पेशवाईच्या काळात महाराष्ट्राला उतरती कळा लागली. ब्रिटिशांनी १८१८ ला पेशवाईचा पराभव करून मराठी मुलखात ब्रिटिश सत्तेचा अंमल सुरू केला. तो देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत टिकला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व महाराष्ट्रातील काही नेत्यांनी केले. यामध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा ठरवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे. महाराष्ट्राला सामाजिक सुधारणेचा खूप मोठा वारसा लाभलेला आहे. अनेक सुधारणावादी विचारांचे समाजसुधारक महाराष्ट्रात होऊन गेले. यामध्ये महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, बाळशास्त्री जांभेकर, गो. ग. आगरकर, वि.रा.शिंदे, सावित्रीबाई फुले तसेच अनेक क्रांतिकारक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान दिलेले आहे.

### २) महाराष्ट्र राज्याची निर्मिती :

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यासाठी खूप मोठा लढा द्यावा लागला. तत्कालीन सरकारने स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला विरोध केला होता. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र संघर्ष समितीने आंदोलन, मोर्चे, सभा यांच्या माध्यमातून मोठा लढा उभा केला. या लढ्यात १०५ लोकांनी आपले बलिदान दिले. शेवटी तत्कालीन सरकारला माघार घ्यावी लागली. सरकारने स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची घोषणा केली. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत संयुक्त महाराष्ट्र संघर्ष समितीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

### ३) राजकीय आदर्श आणि चळवळी :

महाराष्ट्राला सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक सुधारणावादी चळवळींची मजबूत परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्रात झालेल्या विविध सामाजिक सुधारणावादी चळवळी आणि समाजसुधारकांच्या कार्यामुळेच हे राज्य सुधारणावादी आणि पुरोगामी राज्य ओळखले जाते. महात्मा जोतिबा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ कृष्ण गोखले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, पंडिता रमाबाई, सावित्रीमाई फुले यासारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक न्याय, समता, बंधुता, मानवता, जातीय सुधारणा तसेच उपेक्षित, दलित, स्त्रिया आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी चळवळी उभ्या केल्या. उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

### ४) राजकीय पक्ष :

महाराष्ट्रात विविध विचारसरणी आणि हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध राजकीय पक्षांचे प्राबल्य आहे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत राजकीय विचारवंत, नेते आणि समाजसुधारकांनी भारतीय राजकारणावर प्रभाव टाकलेला आहे. यामध्ये न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने नावे घेता येतील. महाराष्ट्रातील राजकारण भारतीय राजकारणाच्या दृष्टिकोनातून नेहमीच महत्त्वाचे ठरले आहे. राज्यात प्रामुख्याने २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर प्रामुख्याने भाजप, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन राष्ट्रीय पक्ष आणि शिवसेना हा एक प्रादेशिक पक्ष असे चार प्रमुख भूमिकेतील पक्ष आहेत. २०१८ मध्ये वंचित बहुजन आघाडी या पक्षाची स्थापना करण्यात आली. १५ मार्च २०१९ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार महाराष्ट्रात एकूण १७५ नोंदणीकृत पक्ष आणि दोन प्रादेशिक तसेच इतर राज्यस्तरीय पक्ष आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेना हे राज्यातील दोन प्रादेशिक पक्ष आहेत. याचबरोबर शेतकरी कामगार पक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि जनसुराज्य पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात आपले पाय रोवताना दिसत आहेत. अशा पद्धतीने विविध पक्षांच्या माध्यमातून महाराष्ट्रात सत्तेचे राजकारण सुरू असलेले दिसून येते.

### ५) जातीनिष्ठ राजकारणाचा प्रभाव :

भारतीय तसेच महाराष्ट्राच्या राजकारणावर जातीचा विशेष प्रभाव आहे. महाराष्ट्रात वेळोवेळी जातीय मुद्द्याचा आधार घेऊन निवडणुका जिंकण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष विविध जातींच्या समर्थनासाठी लढत आहेत. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि मराठा हे जातीचे महत्त्वाचे समीकरण महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येते. काँग्रेस पक्षात विविध जातीधर्माचे लोक आढळतात. या उलट हिंदू महासभा, मुस्लिम लीग, रामराज्य परिषद आणि मराठा महासंघ अशा काही संघटना विशिष्ट जाती धर्माच्या लोकांचे हितसंबंध साधताना दिसतात. निवडणुकीच्या वेळी उमेदवार जातीयतेचा आधार घेतात. सभा संमेलनात जातीनिर्मूलनाची भाषा करणारे नेते निवडणुकीच्या वेळी मात्र विशिष्ट जातीची मते मिळवण्यासाठी जातीय मुद्दे उपस्थित करून निवडून येतात. लोकनेते म्हणून जनतेकडून निवडून दिलेले प्रतिनिधी निवडणूकीनंतर मात्र आपापल्या जातीच्या हिताचाच विचार करताना दिसतात.

महाराष्ट्रात मराठा जातीचे प्राबल्य आहे. मराठा जातीचे प्रमाण १५% असून इतर जाती अल्पसंख्यांक आहेत. त्यामुळे मराठा जातीचा प्रभाव महाराष्ट्रात सर्वाधिक असल्याचे दिसून येतो. यासंदर्भात समाजशास्त्रीय परिपेक्ष्यातून सैद्धांतिक मांडणी करताना प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या 'प्रभावी जात' या संदर्भातले विवेचन महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या मते, ज्या जातीची लोकसंख्या अधिक आणि जे राजकीयदृष्ट्या प्रभावशाली आहेत त्यांना समाजात सत्ता हस्तगत करण्याची संधी मिळत असते. या अर्थाने महाराष्ट्राच्या राजकारणाच्या संदर्भात मराठा जात प्रभावीशाली जात म्हणून सांगता येईल. १९६२ ते २००४ या कालावधीत २४३० आमदारांपैकी १३६६ आमदार हे मराठा जातीचे होते. हे प्रमाण ५५% इतके आहे. राज्यातील ५४% शिक्षणसंस्था मराठा समाजाच्या आहेत. १०५ साखर कारखान्यांपैकी बहुसंख्य कारखान्यांचे अध्यक्ष मराठा समाजाचे आहेत. २३ जिल्हा मध्यवर्ती बँकांचे अध्यक्षही मराठा समाजातूनच आहेत. राज्यातील बहुतांश सहकारी दुग्ध संस्था, सूतगिरण्या, पतसंस्था मराठा समाजाच्या ताब्यात आहेत. मराठ्यांप्रमाणेच इतर मागासवर्ग, अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीतील लोकसंख्या तसेच त्यांचे उमेदवार यांची भूमिका महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक ठरत आहे. एकूणच महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया हा जातीवर आधारलेला दिसून येतो.

**६) धार्मिक राजकारण :**

महाराष्ट्रात बहुधार्मिक लोक राहतात. यामध्ये हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन तसेच पारसी धर्मीय लोक अनेक वर्ष वास्तव्य करीत आहेत. यांच्यामध्ये धार्मिक सलोखाही वेळोवेळी अनुभवायला मिळतो. सर्वच धार्मिक समुदायांना राजकीय सत्ता आपल्याकडे असावी अशी सुप्त इच्छा असते. भारतीय तसेच महाराष्ट्रातील राजकारणावर हिंदू धर्मीय समुदायाचा प्रभाव अधिक असलेला दिसून येतो. साहजिकच राजकीय सत्ता हिंदू धर्मीय समुदायातील व्यक्तींच्याकडे एकवटलेली दिसून येते. हिंदू धर्मातील लोकांचे हितसंबंध जोपासण्याकडे कल असणाऱ्या राजकीय पक्षाला किंवा गटाला राजकीय सत्ता प्राप्त करण्याची संधी अधिक असते. राजकीय पक्षाचे नेते सर्वधर्मसमभाव तसेच धर्मनिरपेक्षता इ. तत्त्वांचे सार्वजनिक व्यासपीठावरून खुलेआम समर्थन करीत असले तरी निवडणुकीच्या काळात निवडून येण्यासाठी धर्माचा आधार जाणीवपूर्वक घेताना पाहायला मिळतो. महाराष्ट्रातील राजकारणावरही वेळोवेळी धर्माचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

**७) प्रादेशिक राजकारण :**

प्रादेशिकतावादाचे राजकारण महाराष्ट्राच्या राजकारणाचा एक महत्त्वपूर्ण आधार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात प्रादेशिक अस्मितेने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. राष्ट्रबांधणीच्या आणि राष्ट्र उभारणीच्या मार्गातील महत्त्वपूर्ण अडथळा म्हणून प्रादेशिकतावादाचा विचार करता येईल. राज्यातील विविध प्रदेशात, विविध भागात राहणाऱ्या लोकात धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या भावनिक ऐक्य असणे महत्त्वाचे असते. एकाच प्रदेशातील लोकांना परस्पराविषयी प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, सहकार्याची भावना असणे आवश्यक असते. एकाच प्रदेशात राहणाऱ्या लोकांना आपला प्रदेश, भाषा, धर्म,

संस्कृती, प्रथा, परंपरा याविषयी अभिमान आणि आपुलकी असते. त्यांचा गर्वही बाळगला जातो. यातूनच एकाच भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांच्यामध्ये आपली भाषा, संस्कृती, धर्म आणि प्रांत यांच्या अस्मितेसाठी, त्यांच्या आरक्षणासाठी वेगळी होण्याची इच्छा निर्माण होते तेव्हा प्रादेशिकतावादाला खतपाणी घातले जाते. यातूनच वेगळे होण्याची मागणी उचल खाते. महाराष्ट्र राज्यात देखील वेगळ्या विदर्भ राज्याची वेळोवेळी मागणी याच प्रादेशिकतावादातून होताना दिसते. वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी महाविदर्भ संघर्ष समिती आवाज उठवताना दिसते. यातूनच प्रादेशिकतावादाचे राजकारण केले जाते. निवडणुकांच्या वेळी प्रादेशिक राजकारणाचा मुद्दा उचलून धरला जातो. अशी वेगळी मागणी करणाऱ्या लोकांच्या भावनांचा उपयोग करून त्यांच्या मताच्या साह्याने निवडणुका लढविल्या जातात. प्रादेशिकतेच्या मुद्द्यांवर निवडणुका जिंकल्या जातात. सत्ता हस्तगत केली जाते. महाराष्ट्रात वेगळ्या विदर्भाच्या मागणीप्रमाणेच मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र असे वेगळे प्रदेश असून त्यांच्या प्रदेशाबद्दलच्या अस्मिता वेळोवेळी जागृत होताना दिसतात. या प्रादेशिक अस्मितांचा फायदा घेऊन राजकीय पक्षांनी राजकारणात आपली सत्तास्थाने बळकट केलेली आहेत.

### ८) भाषा आणि सांस्कृतिक ओळख

महाराष्ट्राच्या राजकारणात महाराष्ट्रीयन संस्कृती आणि भाषा यांना महत्त्वाचे स्थान आहे. राज्याची अस्मिता आणि राजकारण यावर मराठी भाषा आणि संस्कृतीचा खूप मोठा प्रभाव दिसून येतो. मराठी भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन हा प्रमुख राजकीय विषय महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून ओळखले जाते. मराठी भाषेला राज्याची अधिकृत भाषा म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातल्या सरकारी शाळांमधून मराठी भाषा शिकणे अनिवार्य करण्यात आले आहे. मराठी भाषेच्या माध्यमातून महाराष्ट्राने आपली सांस्कृतिक ओळख आबाधित ठेवलेली आहे. महाराष्ट्रातील सर्व शासकीय परिपत्रके ही मराठी भाषेतूनच लिहिली जावीत असा नियम करण्यात आलेला आहे. विविध राजकीय पक्षांनी मराठी भाषिकांच्या अस्मितेला वेळोवेळी खतपाणी घातलेले पाहायला मिळते. निवडणुकीच्या काळामध्ये भाषिक अस्मितेचा प्रश्न टोकदार करून राजकीय पक्षांनी बहुसंख्याकांची मते संपादित करून सत्ता प्राप्त केलेली आहे. एकूणच महाराष्ट्रातल्या राजकारणावर मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

### ९) नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व

महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया घालण्यामध्ये वरील विविध मुद्द्याबरोबरच खंबीर, कर्तृत्ववान, प्रभावी नेतृत्वाची निर्मिती महाराष्ट्रात घडून आलेली दिसून येते. महाराष्ट्राच्या राजकारणाने देशपातळीवर प्रभाव टाकणारे तसेच देशाच्या राजकारणाला दिशा देणारे अनेक नामवंत राजकीय नेते दिलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात महाराष्ट्रातून न्यायमूर्ती रानडे तसेच गोपाळ कृष्ण गोखले यांचे देशपातळीवर नेतृत्व स्वीकारलेले होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रातून अनेक मुत्सद्दी नेते उदयास आले. त्यांनी आपल्या नेतृत्वाने, कर्तृत्वाने आणि व्यक्तिमत्त्वाने राज्यात तसेच देशात आपल्या कामाचा ठसा उमटवकेला

आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील (आबा), सुशीलकुमार शिंदे तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्याच्या तसेच देशाच्या राजकारणात प्रभावी भूमिका बजावलेल्या आहेत. वरील सर्व घटकांच्या बरोबरच महाराष्ट्रातील सामाजिक तसेच आर्थिक समस्यामुळे देखील राज्याचे राजकारण आकारास आलेले दिसून येते. यामध्ये महाराष्ट्रातील शेती, दुष्काळ, शहरी विकास तसेच औद्योगिक वाढ या घटकांनीही महाराष्ट्राचे राजकारण प्रभावित झालेले पाहायला मिळते. महाराष्ट्रात अनेक समान हितसंबंधी गटांनी आपापल्या मागण्यांसाठी विविध चळवळी उभारल्या आहेत. यामध्ये शेतकरी चळवळ तसेच औद्योगिक कामगारांच्या चळवळींनी वेळोवेळी शासनावर दबाव टाकून महाराष्ट्रातील राजकारणाला निर्णायक वळण दिलेले आहे.

**१०) युतीचे राजकारण आणि निवडणुकीचे महत्त्व :**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ते आजअखेर राजकीय हितसंबंध अबाधित ठेवण्यासाठी विविध पक्षांना युतीचे आणि आघाड्यांचे राजकारण करावे लागलेले आहे. सत्ता प्राप्तीच्या अभिलाषेपोटी दोन किंवा तीन राजकीय पक्ष निवडणूकपूर्व किंवा मतदानोत्तर युती करून निवडणुका लढवताना दिसून येतात. महाराष्ट्र हे राजकीयदृष्ट्या भारतातील महत्त्वपूर्ण राज्यापैकी एक आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या जागा अधिक आहेत. राज्यात विधानसभेतील जागाही अधिक आहेत. महाराष्ट्रात निवडणुकांना महत्त्वाचे स्थान असल्यामुळे राजकारणही मोठ्या प्रमाणावर घडून येते. महाराष्ट्रात शहरीकरण तसेच औद्योगीकरणचे प्रमाण सतत वाढतच राहिले आहे. महाराष्ट्रातील शहरी केंद्र विशेषतः मुंबई तसेच पुणे यांनी राज्याच्या अर्थव्यवस्थेत आणि राजकारणात महत्त्वाचे योगदान दिले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे गृहनिर्माण, वाहतूक तसेच रोजगार या समस्याही राजकीय चिंतेचा प्रश्न बनला आहे.

अशाप्रकारे महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया हा राज्याच्या ऐतिहासिक वारसा, धार्मिक विविधता, जातीयता, प्रादेशिक अस्मिता, भाषावाद, प्रांतवाद, सामाजिक सुधारणा तसेच समकालीन समस्यांनी घातलेला दिसून येतो. वरील सर्व घटक हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे आधार म्हणून पाहिले जाऊ शकतात. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये या सर्व घटकांनी निर्णायक आणि महत्वपूर्ण भूमिका बजावलेली पाहायला मिळते.

**ब) महाराष्ट्रातील युतीचे व आघाडीचे राजकारण :**

महाराष्ट्रात १९५२ पासून आतापर्यंत झालेल्या सर्व विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमधील आघाड्यांचा विचार करता महाराष्ट्राचे राजकारण हे युती आघाडीचेच राजकारण राहिलेले आहे असे दिसून येते. १९९९ मध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना-भाजप या तुल्यबळ युती आघाड्यामुळे त्याचे स्वरूप ठळकपणे दिसून आले आहे. यापूर्वीच्या निवडणुकांमध्येही अनेक पक्षांनी एकत्र येऊन एकपक्षीय वर्चस्व असलेल्या काँग्रेसच्या विरोधात आघाड्या केल्या आहेत. १९९० मध्ये शिवसेना भाजपच्या युतीमुळे तुल्यबळ अशा पक्षांच्या युतीचे पर्व सुरू झाले असे म्हणता येईल. २००४ च्या निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी निवडणूकपूर्व आघाडी केली होती. तसेच २००९ मध्ये देखील हीच परिस्थिती

कायम राहिल्याचे दिसते. राज्याच्या राजकारणात काँग्रेस व राष्ट्रवादी तसेच शिवसेना व भाजप युतीच्या सरकारात एकत्र आले. आज मात्र शिवसेना भाजपची राजकीय गरजेतून निर्माण झालेली युती बदलत्या राजकीय समीकरणांनुसार संपुष्टात आल्याने आता आघाडीपुढे आव्हान निर्माण झालेले दिसून येते. पक्षातील अंतर्गत हेवेदावे, व्यक्तिगत इच्छा आकांक्षा, नाराज नेते मंडळी तसेच सत्तेची बदलती समीकरणे यातून शिवसेना व भाजप दोन्ही पक्ष एकमेकापासून अलग झालेले दिसून येतात. भारतातील इतर अनेक राज्याप्रमाणे महाराष्ट्रात युती आघाड्यांचे राजकारण हे ठळकपणे दिसून येते. महाराष्ट्र हे विविध राजकीय पक्षांसाठी आणि सतत बदलणाऱ्या युतींसाठी म्हणूनही ओळखले गेले आहे. सदर प्रकरणांमध्ये आपण महाराष्ट्राच्या राजकारणातील विविध पक्षांच्या युती आघाड्यांचे सरकार, भाजप-शिवसेना युतीचे राजकारण तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांचे आघाडीचे राजकारण याविषयी सविस्तर विश्लेषण अभ्यासणार आहोत.

**१) वसंतदादा पाटील यांचे आघाडी सरकार (७ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८) :**

आघाडी सरकारची खरी सुरुवात १९७८ साली झाली होती. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुका १९७८ साली झाल्या. विधानसभेची ही चौथी सार्वत्रिक निवडणूक रंगतदार झाली. काँग्रेसमध्ये फूट पडून इंदिरा गांधींच्या नेतृत्वाला आव्हान देत ब्रह्मानंद रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली रेड्डी काँग्रेसची स्थापना झाली. दिल्लीत इंदिरा काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. केंद्रात सत्तेवर असलेला जनता पक्षही तेव्हा राज्यात सत्ता काबीज करण्याच्या तयारीने विधानसभेच्या निवडणुकीत उतरला होता. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शरद पवार असे अनेक मातब्बर नेते रेड्डी काँग्रेसमध्ये होते. त्यामुळे महाराष्ट्रात रेड्डी काँग्रेस आणि जनता पक्ष यांच्यात खरी लढत होईल असा अंदाज होता. इंदिरा काँग्रेसला कोणी गृहितच धरले नव्हते. अपेक्षेप्रमाणेच जनता पक्षाने महाराष्ट्रात ९९ जागा जिंकल्या. रेड्डी काँग्रेसने ६९ जागा आणि इंदिरा काँग्रेसने चमत्कार घडवत ६२ जागावर विजय मिळवला. १९७८ च्या निवडणुकीमुळे काँग्रेसचा एक छत्री अंमल संपुष्टात आला. आघाडी व युतीच्या राजकारणाची खरी सुरुवात झाली. कोणत्याच पक्षाला निर्णायक बहुमत न मिळाल्यामुळे आघाडी सरकार अपरिहार्य होते. जनता पक्ष आणि रेड्डी काँग्रेसचे आघाडी सरकार राज्यात सत्तेवर येता येणार अशी चर्चा असताना वसंतदादा पाटील यांनी इंदिरा काँग्रेसशी समझोता करून दोन्ही काँग्रेसच्या आघाडीचे सरकार स्थापन केले. वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पहिले आघाडी सरकार राज्यात सत्तेवर आले. इंदिरा काँग्रेसचे नासिकराव तिरपुडे हे उपमुख्यमंत्री झाले.

**२) शरद पवार यांचे पुलोद सरकार (१८ जुलै १९७८ ते १६ फेब्रुवारी १९८०) :**

समाजवादी काँग्रेसची स्थापना करून शरद पवार यांनी जनता पक्षाबरोबर वाटाघाटी करून 'पुरोगामी लोकशाही दल' या नावाने आघाडी सरकार स्थापन केले. शरद पवारांनी जनता पक्षातील नेत्यांबरोबर अगोदरच सरकार स्थापनेबाबत वाटाघाटी करून ठेवल्या होत्या. यशवंतराव चव्हाण यांची ताकदही त्यांच्या पाठीमागे होती. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांना मानणारे ३५ ते ४० आमदार शरद पवार यांच्या पाठीशी

उभे राहिले आणि 'पुलोदचे' सरकार १८ जुलै १९७८ रोजी स्थापन झाले. सरकारमधील महत्त्वाची खाती जनता पक्षाकडे देण्यात आली होती. शरद पवारांचे आघाडी सरकार १९८० पर्यंत सत्तेत राहिले.

**३) मनोहर जोशी यांचे युती सरकार (१४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९):**

१९९५ सालाची विधानसभा निवडणूक काँग्रेस पक्षाने शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली लढवली होती. महाराष्ट्रात झालेल्या भीषण दंगली आणि मुंबईत घडलेली बॉम्बस्फोट मालिका अशा प्रतिकूल परिस्थितीत काँग्रेसला निवडणूक लढविणे भाग पडले. तत्कालीन परिस्थितीतील ढवळलेले वातावरण भाजप शिवसेनेच्या युतीला अनुकूल ठरले. यावेळी झालेल्या निवडणुकीत १९९५ च्या विधानसभेत काँग्रेसला केवळ ८९ जागा मिळविता आल्या. शिवसेना भाजप युतीला १३८ जागा मिळाल्या. शिवसेना भाजप युतीने अपक्षांचा पाठिंबा घेऊन मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली बिगर काँग्रेस युती सरकार स्थापन केले.

**४) नारायण राणे यांचे युती सरकार (१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९) :**

शिवसेना भाजप युतीने अपक्षांचा पाठिंबा घेऊन मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेले बिगर काँग्रेस युती सरकार चार वर्षे टिकले. मनोहर जोशी यांनी युती सरकारचे मुख्यमंत्री म्हणून ४ वर्ष राज्याचा कारभार सांभाळला. ३१ जानेवारी १९९९ रोजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार त्यांनी राजीनामा दिला. १ फेब्रुवारी १९९९ रोजी नारायण राणे यांची मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. नारायण राणे हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून ८ महिने १७ दिवस सत्तेवर राहिले.

**५) विलासराव देशमुख यांचे लोकशाही आघाडी सरकार (१८ ऑक्टोबर १९९९ ते १७ जानेवारी २००३):**

१९९९ सालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन घडून आले. त्यावेळी राज्यात भाजपा शिवसेना युतीचे नारायण राणे मुख्यमंत्री होते. यादरम्यान शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षामध्ये वैचारिक मतभेदातून फूट पडल्यामुळे ती कमकुवत झाली होती. त्यामुळे आपले सरकार पुन्हा सत्तेवर येईल या विश्वासात भाजप शिवसेना युती राहिली. परंतु १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला वा युतीला स्पष्ट बहुमत प्राप्त झाले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री नारायण राणे यांनी पुन्हा एकदा युतीचे सरकार बनवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ ठरला. याच दरम्यान काँग्रेस आणि अपक्षांनी परस्पर वाटाघाटी आणि सहकार्याच्या माध्यमातून आघाडी स्थापन केली. विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली या आघाडीची स्थापना झाली. या आघाडी सरकारमध्ये राष्ट्रीय काँग्रेस, जनता पक्ष, शेकाप, रिपब्लिकन पक्ष, माकप आणि इतर अपक्ष प्रतिनिधी यांचा समावेश होता.

**६) सुशीलकुमार शिंदे यांचे लोकशाही आघाडी सरकार (१८ जानेवारी २००३ ते १९ नोव्हेंबर २००४)**

महाराष्ट्रातील तत्कालीन सरकारने मागासवर्गीय समाजातील नेते श्री सुशीलकुमार शिंदे यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर निवड केली. २००४ साली होणाऱ्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत लोकमत आपल्या विरोधात जाईल अशी भीती काँग्रेस श्रेष्ठींना वाटल्यामुळे मुख्यमंत्री पदाची

माळ सुशीलकुमार शिंदे यांच्या गळ्यात घालण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच मुख्यमंत्री पदावर मराठा लॉबीचे वर्चस्व असल्याची टीका होत होती. यातून घटक पक्ष तसेच पक्षातील काही नेतेच नाराज होण्याची शक्यता होती. याचा परिणाम मतदानावर होण्याची भीती काँग्रेस श्रेष्ठींना वाटत होती. परंतु ही भीती निरर्थक ठरवली गेली. वसंतराव नाईक, ए. आर. अंतुले, सुधाकरराव नाईक आणि सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री मागासवर्गीय इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांक जातीचे असलेले दिसून येतात.

**७) विलासराव देशमुख यांचे लोकशाही आघाडी सरकार (२९ ऑक्टोबर २००४ ते ८ डिसेंबर २००८):**

२००४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि अन्य पक्षांचे मिळून लोकशाही आघाडी सरकार स्थापन झाले. तत्कालीन परिस्थितीत सुरुवातीला सुशीलकुमार शिंदे यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी निश्चित झाले होते. परंतु काँग्रेस पक्षातील जवळपास ६५ ते ७० टक्के आमदारांनी विलासराव देशमुख यांची नेतेपदी निवड करण्याची मागणी केली. यामुळेच विलासराव देशमुख यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी तर आर. आर. पाटील (आबा) यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. या दोघांचाही सत्तेतील कार्यकाल ४ वर्षे इतका राहिला.

**८) अशोकराव चव्हाण यांचे लोकशाही आघाडी सरकार (८ डिसेंबर २००८ ते २६ ऑक्टोबर २००९):**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी काही अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केला. मुंबईतील तसेच राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला. सत्तेतील सरकार तसेच नेतृत्वावर टीका करण्यात आल्या. याची परिणीती म्हणून राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि आर. आर. पाटील यांना मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी अशोकराव चव्हाण यांची मुख्यमंत्रीपदी तर छगन भुजबळ यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली.

**९) पृथ्वीराज चव्हाण यांचे लोकशाही आघाडी सरकार (११ नोव्हेंबर २०१० ते २० ऑक्टोबर २०१४):**

११ नोव्हेंबर २०१० रोजी काँग्रेस सरकारने पृथ्वीराज चव्हाण यांची मुख्यमंत्रीपदी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड केली. तत्कालीन सरकारपुढे महाराष्ट्र राज्यातील अनेक गंभीर प्रश्न सोडवण्याचे आव्हान होते. राज्यातील जनतेसमोर असलेली वीज टंचाई, जलसिंचनाची समस्या, दारिद्र्य, बेरोजगारी तसेच महागाई अशा ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्याचं आव्हान लोकशाही आघाडी सरकार समोर होते.

**१०) देवेंद्र फडणवीस यांचे युतीचे सरकार (२०१४ ते २०१९) :**

२०१४ साली भारतात भारतीय जनता पक्षाचे (भाजप) नेते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. देशातील मोदी लाटेचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावरही पडला. २०१४ साली झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकात भारतीय जनता पक्षाला ११२ जागावर विजय मिळाला तर शिवसेनेला ६३ जागा मिळाल्या. भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून देवेंद्र फडवणीस यांच्या नेतृत्वाखाली युतीचे सरकार सत्तेवर आले.

**११) उद्धव ठाकरे यांचे महाविकास लोकशाही आघाडीचे सरकार (२०१९ ते २९२१)**

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी काँग्रेस पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या सहकार्याने महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. महाविकास आघाडीच्या वतीने उद्धव ठाकरे यांची राज्याच्या मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदाची तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांना उपमुख्यमंत्री पदाची शपथ दिली. परंतु महाविकास आघाडीचे सरकार फार काही टिकले नाही. अंतर्गत मतभेदातून महाविकास आघाडी सरकार मध्ये अंतर्गत नाराजी निर्माण झाली. शिवसेनेमध्ये अंतर्गत बंडाळी होऊन नाराज आमदार पक्षातून बाहेर पडल्यामुळे आघाडी सरकार बरखास्त झाले.

**१२) एकनाथ शिंदे-फडणवीस यांचे युतीचे सरकार (३० जून २०२२ ते ................)**

शिवसेनेतून नाराज होऊन बाहेर पडलेले ४० आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. राज्यातील नाट्यमय घडामोडीनंतर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडवणीस यांचे युतीचे सरकार सत्तेवर आले. ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. देवेंद्र फडवणीस हे राज्याचे नवे उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेस मधून फारकत घेऊन अजित पवार हे देखील राष्ट्रवादी युती सरकारमध्ये सामील झाले. अजित पवार हे सध्या महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. राज्यात सध्या दोन उपमुख्यमंत्री कार्यरत असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात युती आघाडीचेच राजकारण सुरू असल्याचे दिसून येते. राज्यात युतीचे आणि आघाडीचे शासन पूर्ण काळ सत्तेवर होते. अनेकदा एकाच पक्षाला पूर्ण बहुमत न मिळाल्याने विधानसभा निवडणुकीत युती आघाडी सरकार अनेकदा तयार होत असते. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष अनेकदा निवडणुका लढवण्यासाठी निवडणूकपूर्व युती करतात. काही वेळा मताधिक्य नसल्यामुळे सत्ता स्थापनेसाठी निवडणुकीनंतर एकमेकांसोबत आघाडी करावी लागत असते. वैचारिक मतभेद, हेवेदावे, रुसवे फुगवे, व्यक्तिगत इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून युतीमध्ये सर्वच पक्षांना मिळतेजुळते घ्यावे लागते. सत्ता स्थापनेसाठी मित्रपक्ष असणारा पक्ष निवडणुकीनंतर प्रतिस्पर्धीही बनू शकतो. त्यामुळे सातत्याने युती आघाड्यांमध्ये महाराष्ट्रामध्ये बदल घडून येताना दिसत आहेत. एकंदरीत महाराष्ट्रामध्ये राजकारण हे बहुपक्षीय झालेले पाहायला मिळते. राज्यातील प्रमुख पक्ष तसेच इतर पक्ष कमी जास्त प्रमाणात शक्तिशाली आणि निर्णायक बनलेले आहेत. सध्याच्या काळातील एकूणच राजकीय परिस्थिती आणि लोकमतांचा अंदाज येत नसल्यामुळे कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळणे किंवा स्वबळावर सत्तेवर येणे अशक्य बनलेले आहे. परिणामी परस्पर हितसंबंध साध्य करण्यासाठी एकमेकांशी जुळवून घेण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. म्हणूनच महाराष्ट्राचे राजकारण हे युती आघाड्यांचे राजकारण झालेले दिसून येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

रिकाम्या जागा भरा

१) महाराष्ट्र राज्याची स्थापना ............... रोजी झाली.

२) महाराष्ट्राच्या राजकारणावर ...............विशेष प्रभाव आहे.

३) महाराष्ट्रातील राजकारणावर ...............धार्मिक समुदायाचा प्रभाव दिसून येतो.

४) ...............भाषा आणि संस्कृती संवर्धन ही प्रमुख वैशिष्ट्ये महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येतात.

५) शरद पवार यांनी जनता पक्षाबरोबर युती करून...............या नावाने सरकारने स्थापन केले.

## ३.३.२ महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती आणि समस्या :

**महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती :**

प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत महाराष्ट्राचा एकूण शैक्षणिक प्रवास पाहताना समाजव्यवस्थेच्या विविध टप्प्यावर शिक्षण प्रक्रियेमध्ये अनेक स्थित्यंतरे झालेली पाहायला मिळतात. भारतातील तसेच महाराष्ट्रातील जातीव्यवस्था आणि जातीव्यवस्थेने मर्यादित केलेले शैक्षणिक हक्क यामुळे महाराष्ट्रातील खूप मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला होता. विशिष्ट जातीकडेच शिक्षणाची मक्तेदारी होती. काळानुरूप शिक्षण घेणे आणि देण्यामध्ये बदल होत गेले. पारंपारिक शिक्षणापासून ते आधुनिक व्यावसायिक शिक्षणापर्यंत महाराष्ट्राच्या शिक्षणाने मजल मारलेली आहे. शिक्षणातील उच्चवर्गीयांची मक्तेदारी संपुष्टात येऊन शिक्षण बहुजन समाजातील तळागाळापर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीत महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारक, सामाजिक, शैक्षणिक, सुधारणावादी चळवळी, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात सरकारी पातळीवर झालेले विविध प्रयत्न, शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठी आखण्यात आलेल्या विविध योजना यांचे बहुमोल योगदान आहे. या सर्वांचा आपल्याला अभ्यास करता येईल. महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचालीचे आकलन होण्यास मदत होईल.

**१. प्राचीन व मध्ययुगीन कालखंड :**

प्राचीन काळापासून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आलेले आहे. प्राचीन कालखंडात शिक्षण देण्यासाठी गुरुकुल पद्धतीचा अवलंब केला जात होता. गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्याला गुरूंच्या आश्रमात जावे लागत असे. गुरुगृही जाऊन वेदविद्यांचा अभ्यास करावा लागत असे. भारतीय समाजव्यवस्थेत आश्रम व्यवस्था प्रचलित होती. यामध्ये ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास आश्रम असे चार आश्रम अस्तित्वात होते. ब्रह्मचर्य आश्रमात मुलांनी विद्या संपादन करणे हे आद्य कर्तव्य मानले जात असे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना शारीरिक कष्टाची कामे करावी लागत. त्याचबरोबर गुरुजनांची सेवा करणे हे आद्य कर्तव्य असे. शिक्षणाचे स्वरूप हे धार्मिक होते. यामध्ये वेद, उपनिषदे,

आरण्यके तसेच इतर धर्मग्रंथांचा अभ्यास केला जात असे. आश्रम व्यवस्थेतील शिक्षणातून विद्यार्थ्यांना साधे व स्वयंपूर्ण जीवन जगण्याचे धडे दिले जात. शिक्षण मात्र सर्वांसाठीच खुले नव्हते. महाराष्ट्रात उच्च जातींनाच शिक्षणाचा अधिकार होता. जातीव्यवस्थेने घालून दिलेल्या निर्बंधानुसार दलित, अस्पृश्य, अनुसूचित जमाती तसेच कनिष्ट जातीतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षणाचा अधिकार उच्च जातीपुरताच मर्यादित होता. कनिष्ठ जातींना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. मध्ययुगीन काळात जातीव्यवस्थेचे निर्बंध अधिक कठोर करण्यात आले होते. धार्मिक शिक्षण हेच शिक्षण अशी कल्पना समाजात दृढ झाली होती. धर्मग्रंथांचा अभ्यास म्हणजेच शिक्षण अशी धारणा तयार करण्यात आली होती. पेशवाईच्या काळात तर शिक्षणाची बरीच अधोगती झालेली होती. तत्कालीन समाजात काही शहरातून आणि खेड्यातून मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या खाजगी शाळा असत. त्यांना तात्या पंतोजींच्या शाळा म्हणत होते. या शाळामधून उच्च जातीतील लोकांच्या, श्रीमंतांच्या व व्यापारांच्या मुलांना शिक्षण दिले जात असे. शाळेकरिता मंदिर, चावडी किंवा एखाद्या सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी शाळा भरत असे. शाळेत शिकवणाऱ्या पंतोजींना दक्षिणा किंवा शिधा दिला जात असे.

या काळातील शिक्षणाचा उद्देश कारकूनकी करता यावी, कुलकर्णी किंवा सावकारी चालवता यावी इतकाच मर्यादित होता. व्यावसायिक शिक्षणाचे स्वरूप जातीनिष्ठ व पारंपारिक स्वरूपाचे होते. घरातच वडीलधाऱ्यांकडून घरगुती पद्धतीने शिक्षण दिले जात असे. जाती-जातीनुसार कराव्या लागणाऱ्या व्यवसायाचे शिक्षण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला दिले जात असे. तत्कालीन समाजातील उच्चवर्गीय, शास्त्री, पंडित आणि विद्वानांना सामान्य जनतेच्या शिक्षणाशी फारसे देणे घेणे नव्हते. स्त्री शिक्षण अमान्य होते. स्त्रियांनी शिक्षित होणे हे पाप मानले जात असे. त्यामुळे स्त्रियांना पारंपारिक भूमिका पार पाडता यावी यासाठी घरगुती शिक्षण दिले जात असे. अपवादात्मक परिस्थितीत क्षत्रिय कुळातील स्त्रियांना घोडेस्वारी, तलवारबाजी तसेच स्वसंरक्षणाचे धडे दिले जात असत. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात उच्चवर्गीयांच्या शिक्षणातील मक्तेदारीमुळे बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला. या वर्गाला शिक्षणापासून अलिप्त ठेवल्यामुळे बहुजन समाजाची अधोगती झालेली दिसून येते.

### २. संधीकालीन शिक्षण :

मराठी सत्तेचा अस्त आणि इंग्रजी राजवटीतील सुव्यवस्थित शिक्षण पद्धतीचा उदय या मधल्या कालखंडातील शिक्षणाला संधीकालीन शिक्षण म्हणून ओळखले जाते. या काळात विद्यार्थ्यांना मोडी लिपी, बालबोध लेखन, वाचन तसेच पुरेशी आकडेमोड या गोष्टी एकशिक्षकी शाळेत दिल्या जात होत्या. मंदिरे, छोटी देवळे तसेच चावडी अशा ठिकाणी ह्या शाळा भरत होत्या. विद्यार्थी शाळेत येताना बसण्यासाठी घरून छोटी स्वतःपुरती चटई किंवा गोणपाटाचा तुकडा घेऊन येत असे. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडाप्रमाणेच संधीकालीन शिक्षणात मुलींच्या शिक्षणाची कोणतीही औपचारिक यंत्रणा अस्तित्वात नव्हती. मुलींना याही काळात शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. विद्याग्रहण करताना शारीरिक शिक्षा दिली जात असे. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवून शाळेतील पंतोजींचे कार्य चालत असे.

शिक्षण घेताना पाठांतर, घोकंपट्टी तसेच तोंडी अभ्यास यावरच भर दिला जात असे. समाजातील प्रौढ व्यक्तींना लोककथा, किर्तन, प्रवचने तसेच धर्मग्रंथांचे श्रवण यातून धार्मिक स्वरूपाचे शिक्षण दिले जात असे.

## ३. इंग्रजी राजवटीच्या काळातील शिक्षण :

इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल झाले. इंग्रजी राज्यकर्त्यांनी शिक्षण प्रसार आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर दिला. यामुळे शिक्षण क्षेत्रातील विशिष्ट जातीची मक्तेदारी संपुष्टात येण्यास मदत झाली. शिक्षण समाजातील सर्व जातीतील लोकांना खुले करण्यात आले. शिक्षण प्रसाराची गती मात्र मंदच होती. तरीही समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण घेण्याचा हक्क आहे हे राज्यकर्त्यांना मान्य करावे लागले. ब्रिटिशपूर्व कालखंडात एतद्देशीय राजकर्त्यांनी बहुजनांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले होते. समाजाला शिक्षण देण्याची जबाबदारी त्यांनी झटकली होती. मात्र ब्रिटिशांनी आपल्या मुलखातील प्रदेशात शिक्षण प्रसाराचे धोरण आखले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नातून शिक्षण प्रसार होऊ लागला. त्यांनी समाजातील कनिष्ठ वर्गातील तसेच दुर्बल घटकातील लोकांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. इंग्लंडच्या पार्लमेंटने सन १८१३च्या सनदी कायद्याद्वारे ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय जनतेला उपयुक्त शिक्षण देण्यासाठी प्रतिवर्षी एक लक्ष रुपये खर्च करावेत असे बंधन घातले. शिक्षणाची सोय करणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी आहे हे मान्य करण्यात आले.

१८२३ मध्ये बंगाल प्रांतात ‘कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन’ ही संस्था स्थापन करण्यात आली. या समितीने सुरुवातीला पौर्वात्य शिक्षण पद्धतीवर भर दिला. पुढे अलेक्झांडर डफ, लॉर्ड मेकॉले, लॉर्ड बेंटिक, लॉर्ड हार्डिग तसेच माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन या इंग्रजी अधिकाऱ्यांनी इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यामुळे देशात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व प्रचार वाढू लागला. १८१५ ते १८३९ हा कालखंड ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शिक्षण प्रसाराचा प्रारंभिक कालखंड होय. ईस्ट इंडिया कंपनीने स्वखर्चाने प्राथमिक शाळेत गरिबांना मोफत शिक्षण देण्याकरता शाळा स्थापन करण्यास सुरुवात केली. कंपनीने मुंबई इलाख्यात १८१५ साली "Society for Promoting Education of the Poor within the Government of Bombay' (मुंबई सरकारच्या ताब्यातील प्रदेशात राहणाऱ्या गरीब लोकात शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता संस्था) सुरू करण्यात आली. हीच संस्था ‘बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी’ या नावाने ओळखली गेली. या सोसायटीने ठाणे व पनवेल येथे इंग्रजी शाळा, इंजिनियरिंग व वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी सुविधा निर्माण केल्या. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. सर एलफिस्टन यांचा विशेष पाठिंबा या संस्थेला मिळाला. एलफिस्टन यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या शाळेला एलफिस्टन यांचे नाव देण्यात आले. पुढे याचे रूपांतर एलफिस्टन कॉलेजमध्ये झाले. १८४० साली मुंबईत ‘बोर्ड ऑफ एज्युकेशन’ ची स्थापना करण्यात आली. या बोर्डाने शिक्षण प्रसाराचे प्रभावी कार्य केले. विविध शाळांची स्थापना करणे, मान्यता देणे, अभ्यासक्रम ठरवणे, फी माफी व सवलत देणे, शाळा तपासणी, देशी भाषांना उत्तेजन देणे, क्रमिक पुस्तके मराठी व गुजरातीतून तयार करणे या गोष्टी बोर्डाने केल्या. या बोर्डच्या माध्यमातून पुणे, मुंबई, रत्नागिरी, पनवेल, ठाणे अहमदाबाद या ठिकाणी इंग्रजी शाळा सुरू करण्यात आल्या. मराठी शाळांनादेखील मान्यता देण्यात आली. अशा रीतीने ब्रिटिश राजवटीमध्ये शिक्षण क्षेत्र गतिमान

झाल्याचे दिसून येते. ब्रिटिशांनी वेळोवेळी विविध आयोगांची स्थापना करून शिक्षण क्षेत्रातल्या प्रगतीचा आढावाही घेतलेला दिसून येतो. हे आयोग पुढीलप्रमाणे.

**अ) १८५४ चा चार्ल्स वूडचा शिक्षणविषयक खलिता :**

भारताच्या शैक्षणिक विकासात सर चार्ल्स वूड यांच्या शिक्षणविषयक खालित्याला विशेष महत्त्व लाभले आहे. भारतीय शिक्षण पद्धतीला सुव्यवस्थित पाया प्राप्त करून देण्याचे कार्य चार्ल्स वूड यांच्या शिक्षणविषयक खालित्याने केले. वूडच्या शिक्षणविषयक योजनेने भारताच्या शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल घडवून आणले. शिक्षण व्यवस्थेसंदर्भात निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या अहवालाप्रमाणे 'बोर्ड ऑफ कंट्रोल'चे अध्यक्ष चार्ल्स वूड यांनी योजना तयार केली होती. यामध्ये पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार करणे, प्रशासकीय कामासाठी प्रशिक्षित वर्ग तयार करणे आणि सर्व भारतीयांना शिक्षण देणे हा उद्देश होता. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे विसर्जन करून १८५५ मध्ये मुंबईत स्वतंत्र शिक्षण खात्याची स्थापना करण्यात आली. १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास व मुंबई विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठ आणि शिक्षण खात्याच्या रचनेमुळे प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च शिक्षण यांची एक व्यवस्था अस्तित्वात आली. याचबरोबर अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके, शिक्षण पद्धती तसेच शाळांना सरकारी मदत देण्याची व्यवस्था अस्तित्वात आली.

चार्ल्स वूडच्या शिक्षणविषयक खलित्यामध्ये शिक्षणासंबंधी महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या होत्या. यामध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे, सरकारी शिक्षण संस्थांची संख्या वाढविणे, प्राथमिक व माध्यमिक शाळांचा विस्तार करणे, व्यावसायिक शिक्षणाच्या शाळा वाढविणे, स्त्री शिक्षणास चालना देणे, शिष्यवृत्ती धोरणाद्वारे हुशार विद्यार्थ्यांना मदत करणे, इंग्रजी माध्यमाला उच्च शिक्षणामध्ये प्राधान्य देणे, माध्यमिक शिक्षणात देशी भाषा तसेच इंग्रजी भाषेचा वापर करणे, सर्व प्रांतात शिक्षण संचालक तसेच शाळा तपासणी अधिकारी नेमण्यात येणे अशा अमुलाग्र सूचना करण्यात आल्या होत्या. चार्ल्स वुडच्या शिक्षणविषयक केलेल्या शिफारशीमुळे महाराष्ट्रातील शिक्षणाचा चेहरा मोहरा बदलण्यास सुरुवात झाली.

**ब) हंटर आयोग :**

भारतातील तसेच महाराष्ट्रातील शिक्षणाच्या प्रगतीचा विचार करताना हंटर आयोगाची दखल घेणे महत्त्वाचे आहे. सन १८८२ मध्ये भारताचा व्हायसरॉय लॉर्ड रिपन याने भारतात आत्तापर्यंत झालेल्या शैक्षणिक प्रगतीची पाहणी करून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचवण्यासाठी सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नियुक्ती केली. हा आयोग 'हंटर आयोग' या नावाने ओळखला जातो. हंटर आयोगाने सर्व देशभर दौरा करून प्रत्येक प्रांतातील शिक्षणाच्या स्थितीची पाहणी केली. अनेक शिक्षण तज्ञांच्या साक्षी घेतल्या. त्या आधारे तत्कालीन सरकारला आपला अहवाल सादर केला. या अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१) खाजगी शिक्षण संस्थांना सरकारने उत्तेजन देऊन त्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदान द्यावे.

२) लोकशिक्षणाकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्यावे.

३) शिक्षणावरील सरकारी नियंत्रण कमी करावे.

४) प्रांतिक सरकारांनी आपल्या उत्पन्नातील काही ठराविक हिस्सा प्रतिवर्षी शिक्षणासाठी राखून ठेवावा.

तत्कालीन सरकारने १८८४ मध्ये हंटर आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्याचे जाहीर केले. त्यामुळे पुढील काळात शिक्षणाच्या प्रसाराला थोडीफार गती प्राप्त झाली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात शिक्षण प्रसार प्रचारात खालील समाजसुधारकांनी बहुमोल योगदान दिलेले पहायला मिळते.

**१) जगन्नाथ शंकर शेठ :**

जगन्नाथ शंकर शेठ यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य खरोखर अद्वितीय आहे. मुंबई इलाख्यात नव्या शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य मुंबईचा गव्हर्नर माउंट स्टूअर्ट एलफिस्टन याने केले. एलफिस्टनला या कामी नानांची मोठीच मदत झाली. येथील लोकांना आधुनिक शिक्षण मिळाल्याखेरीज त्यांच्या प्रगतीचा मार्ग खुला होणार नाही. ही गोष्ट नानांनी एलफिस्टनला पटवून दिली. त्यानुसार सरकारने शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्यास सुरुवात केली. नाना शंकर शेठ यांनी १८२३ मध्ये आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने मुंबईत 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' या शिक्षण संस्थेची स्थापना करून मुंबईसह महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडवून आणला.

**२) बाळशास्त्री जांभेकर :**

महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर मुंबई इलाख्यात विद्येचा व शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेय ज्या मोजक्या व्यक्तींना दिले जाते त्यापैकी बाळशास्त्री जांभेकर एक होत. महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराच्या सुरुवातीच्या अवस्थेत निरनिराळ्या विषयावरील अभ्यासासाठी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे अतिशय कठीण असे कार्य त्यांनी केले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र तसेच नीतिशास्त्र इ. विविध विषयावरील मराठी भाषेतील पहिली पाठ्यपुस्तके जांभेकरांनी तयार केलीत.

**३) लोकहितवादींचे शिक्षणविषयक विचार :**

लोकहितवादींचे शिक्षणविषयक विचार आधुनिक होते. त्यांनी विद्या हा समाज परिवर्तनाचा मुलाधार आहे. ज्ञानवृद्धी व ग्रंथ निर्मिती यांच्यात अतूट नाते आहे. म्हणून उत्तम शिक्षण आणि दर्जेदार ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत असे विचार मांडले. त्यांनी शिक्षण प्रसारात महत्त्वाचे योगदान दिले.

**४) महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षणविषयक कार्य :**

महात्मा फुल्यांनी बहुजन समाजातील लोकांना शिक्षण मिळावे म्हणून चळवळ उभी केली. स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. ज्ञान ही एक शक्ती आहे. शिक्षण हे सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार आहे, म्हणून सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे या विचाराने फुल्यांनी शैक्षणिक क्रांतीची सुरुवात केली. तत्कालीन समाजातील शिक्षणाची संधी नाकारलेल्या बहुसंख्य समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. मानसिक

व आर्थिक गुलामगिरीतून मनुष्याची मुक्तता करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा क्रांतिकारी संदेश दिला. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून लेखन, वाचन आणि शिक्षण प्रसाराला महत्त्वाचे स्थान दिले. प्रस्थापित वर्गाच्या शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारीला आव्हान दिले. वरिष्ठ वर्गाला शिक्षण दिल्यानंतर ते आपोआप खालच्या वर्गापर्यंत पाझरत जाईल या 'झिरपणीच्या सिद्धांता'ला कडाडून विरोध केला. पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या स्त्रियांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी १९४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. महात्मा फुलेंच्या सोबतच महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी बहुजनांच्या शिक्षण प्रसारासाठी स्वतःला वाहून घेतले. यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले तसेच डॉ. पंजाबराव देशमुख यासारख्या थोर समाजसुधारकांनी बहुजनांच्या शिक्षण प्रसारासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नामुळेच विसाव्या शतकात बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराला चालना मिळाली.

### ४) स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक प्रगती :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताची राज्यघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिली. राज्यघटनेने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारतीय राज्यघटनेने जनतेला महत्त्वाचे अधिकार बहाल केले. यामध्ये देशातील जनतेच्या शिक्षणाच्या अधिकाराचाही समावेश होता. देशाने स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या प्रसार आणि प्रचारासाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न केलेले दिसून येतात. भारत सरकारने शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी, शिक्षण व्यवस्थेमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी, शिक्षणातील सरकारचे आणि जनतेचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी तसेच प्रचलित शिक्षण व्यवस्थेतील दोषांचे निराकरण करण्यासाठी सरकारने वेगवेगळे आयोग स्थापन केलेले आहेत. या आयोगाने सुचवलेल्या शिफारशींची कमी जास्त प्रमाणात अंमलबजावणी करून भारताने आशादायक अशी शैक्षणिक प्रगती साध्य केलेली दिसून येते. शिक्षणासंबंधीत स्थापन करण्यात आलेल्या वेगवेगळ्या आयोगांचा आढावा घेता येईल.

### अ) डॉ. राधाकृष्ण आयोग किंवा विद्यापीठ शिक्षण आयोग :

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी केंद्र सरकारने उचललेले पहिले म्हणजे विद्यापीठ शिक्षण आयोगाचा (University Education Commission) उल्लेख करता येईल. भारत स्वतंत्र झाल्यानंतर उच्च शिक्षणात सर्वंकष बदल घडवून आणणे अपेक्षित होते. यासाठी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ मध्ये 'विद्यापीठ शिक्षण आयोगा'ची स्थापना करण्यात आली. या आयोगाने भारतात औद्योगिक क्षेत्राच्या विकासात समर्थपणे योगदान देणारे तरुण निर्माण व्हावेत या हेतूने व्यावसायिक शिक्षणाचा आग्रह धरला. भारतातील विद्यापीठांच्या संख्येचा विचार करता १९५१ मध्ये भारतात २८ विद्यापीठे होती. महाराष्ट्रात १९६० पर्यंत ५ विद्यापीठे होती. महाराष्ट्रातील आजच्या विद्यापीठांच्या संख्येचा विचार करता ती १६ इतकी झालेली आहेत. कृषी विद्यापीठांची संख्या ४ तर कायद्याचे शिक्षण देणारी ३ विद्यापीठे सध्या महाराष्ट्रामध्ये शिक्षण प्रसाराचे काम करीत आहेत.

## ब) माध्यमिक शिक्षण आयोग :

स्वातंत्र्योत्तर काळात उच्चशिक्षणाप्रमाणेच माध्यमिक शिक्षणातील प्रश्नांचाही विचार करणे सरकारला आवश्यक वाटू लागले होते. पहिल्या आयोगाच्या समितीने उच्च शिक्षणाच्या विकासासाठी प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे अशा प्रकारची शिफारस करण्यात आली होती. त्यामुळे सरकारने सन १९५२ मध्ये डॉ. ए. एल. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची (All Indian Secondary Education Commission) नियुक्ती केली. या आयोगाने १९५३ मध्ये सरकारला आपला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये माध्यमिक शिक्षणाच्या विकासाच्या अनुषंगाने विविध शिफारशी करण्यात आल्या होत्या. यामध्ये शिक्षणाचा आकृतीबंध ११+४ म्हणजे ११ वर्षाचा शालेय अभ्यासक्रम आणि ४ वर्षाचा उच्च शिक्षणाचा पदवी अभ्यासक्रम असावा अशी शिफारस केली होती. परीक्षा पद्धतीत अनेक सुधारणा सुचवण्यात आल्या होत्या. त्रिभाषा सूत्र स्वीकारून विद्यार्थ्यांना मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवल्या जाव्यात अशा सूचना तसेच शिफारसी आयोगाकडून करण्यात आल्या होत्या.

## क) भारतीय शिक्षण आयोग :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात देशाच्या शिक्षण व्यवस्थेला गती देण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी सरकारने अगोदरच दोन आयोगांची नियुक्ती केलेली होती. त्यांनी सुचवलेल्या शिफारसी तसेच त्यांची अंमलबजावणी करून बदलत्या काळानुसार शैक्षणिक क्षेत्रातील नवीन प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी सन १९६४ मध्ये 'भारतीय शिक्षण आयोगा'ची (All India Education Commission) स्थापना करण्यात आली. डॉ. डी. एस. कोठारी हे या आयोगाचे अध्यक्ष होते. हा आयोग 'कोठारी आयोग' या नावानेही ओळखला जातो. कोठारी आयोगाने पूर्वीच्या शिक्षणातील आकृतीबंध बदलण्याची शिफारस केली. शिक्षणाचा आकृतीबंध ११+४ ऐवजी तो १०+२+३ असा असावा अशी शिफारस करण्यात आली. या आयोगाने उच्च माध्यमिक शिक्षणाचेही दोन भाग सुचवले होते. उच्च माध्यमिक शिक्षणात २ वर्ष कालावधीचे सर्वसाधारण शिक्षण किंवा १ ते ३ वर्ष कालावधीचे व्यावसायिक शिक्षण असावे अशी शिफारस केली होती. या आयोगाने शिक्षणाचा व्यापक आणि उदात्त दृष्टिकोनातून विचार केलेला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून देशातील लोकशाही व्यवस्था व लोकशाही तत्वे यांना बळकटी प्राप्त करून देणे, लोकशाही व्यवस्थेला अपेक्षित असलेली स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्ये रुजवण्यात शिक्षणाची भूमिका असली पाहिजे असे कोठारी आयोगाचे प्रतिपादन होते.

कोठारी आयोगांच्या शिफारसी केंद्र सरकारने स्वीकारल्या. या शिफारसींना मूर्त स्वरूप देण्याच्या उद्देशाने सन १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची घोषणा केली. यामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यात आले. भारताच्या राज्य मार्गदर्शक तत्त्वात १४ वर्षाखालील मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याच्या तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात आला. शैक्षणिक आकृतीबंध १०+२+३ करण्याचे उद्दिष्ट राबविण्यात आले. साक्षरतेचा प्रसार, प्रौढ शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर भर देण्यात आला. पुढे भारत सरकारच्या

सन १९८६ च्या शैक्षणिक धोरणात १०+२+३ या आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली. सध्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा शैक्षणिक आकृतीबंध ५+३+३+४असा ठरविण्यात आलेला आहे.

**५) महाराष्ट्रातील साक्षरतेची स्थिती :**

महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी शिक्षणाविषयी केलेले समाजप्रबोधन, खेडोपाड्यात स्वप्रयत्नातून पोहोचवलेली ज्ञानगंगा तसेच सरकारने वेळोवेळी राबवलेल्या विविध शैक्षणिक योजना यामुळे महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती झालेली दिसून येते. साहजिकच महाराष्ट्रातील साक्षरतेचा दर हा काळानुरूप वाढलेला पाहायला मिळतो. स्त्री-पुरुष साक्षरतेचे प्रमाणे अधिक असलेले दिसून येते. सन १९६१ मध्ये एकूण राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ३५.१%होते. यामध्ये पुरुष साक्षरता ४२% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण फक्त १६% होते. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील साक्षरतेची टक्केवारी ७६.८८% इतकी होती. यामध्ये पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ८६% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६७% इतके होते. २०११ च्या जनगणनेचा विचार करता महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी ८२.३४% लोक साक्षर होते. पुरुष साक्षरतेचे प्रमाण हे ८८.३८% तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण  ७५.८७% होते. सध्या २०२३ च्या चालू आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी साक्षरता दर ८८.६९% इतका असलेला दिसून येतो. यामध्ये पुरुष साक्षरतेचा दर ९२.१२% तर महिला साक्षरता दर ७५.७५% असलेला पाहायला मिळतो.

१९६१ ते २०११ या कालखंडात राज्यातील साक्षरतेच्या प्रमाणात उत्तरोत्तर वाढ होत गेली आहे. गेल्या पन्नास वर्षाच्या काळात राज्याच्या एकूण साक्षरतेमध्ये अडीच पटीने, पुरुष साक्षरतेत दुपटीपेक्षा जास्त तर स्त्री साक्षरतेत पाचपटीच्या जवळपास वाढ झालेली दिसून येते. देशातील साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण नेहमीच अधिक असल्याचे दिसून येते. शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर झालेला प्रसार, प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण तसेच लोकशिक्षण इ.मुळे साक्षरतेच्या प्रमाणात भरीव वाढ झाली आहे. असे असले तरी महाराष्ट्रात पुरुष साक्षरतेच्या तुलनेत स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. अजूनही महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्र राज्याने अनुसूचित जाती जमाती मधील शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठीही विविध उपाययोजना केलेल्या आहेत. अनुसूचित जमाती मधील शैक्षणिक मागासलेपणाचा विचार करून उपाययोजनांच्या अंतर्गत रायगड, नाशिक, चंद्रपूर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया व गडचिरोली या १६ जिल्ह्यात मिळून स्वयंसेवी संस्थामार्फत शासकीय अनुदानावर ६८४ आश्रम शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत. तसेच ८७६४ वस्तीशाळांच्या माध्यमातून खेड्यापाड्यातील वाड्या वस्त्यांवरील मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे कार्य केले जात आहे.

**अ) शैक्षणिक विकासास जागतिक बँकेचे सहाय्य :**

शैक्षणिक विकासासाठी महाराष्ट्र राज्याला जागतिक बँकेचे अर्थसहाय्य लाभले आहे. राष्ट्रीय सरासरी साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी साक्षरता असलेले औरंगाबाद, नांदेड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, बीड,

जालना, धुळे, गडचिरोली या नऊ जिल्ह्याना शैक्षणिकदृष्ट्या मागास जिल्हे ठरविण्यात आले असून त्यासाठी सामाजिक सुरक्षा कवच योजनेद्वारा जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम धडाडीने राबवण्यात आले आहेत.

**ब) प्रियदर्शनी वसतीगृह**

महाराष्ट्रात मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने अनेक योजना तसेच उपक्रम राबवण्यात आले आहेत. मुलींच्या राहण्याची सोय व्हावी यासाठी प्रियदर्शनी वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेखाली प्रत्येक तालुक्यात ५० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. मुलींना बारावी पर्यंतचे शिक्षण मोफत, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विशेषत: आदिवासी कुटुंबातील विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता देण्यात येत आहे.

**क) सर्व शिक्षा अभियान**

सर्व शिक्षा अभियान ही एक केंद्र सरकार पुरस्कृत योजना आहे. सामाजिक सहभागाद्वारे शिक्षणाचे सार्वत्रिकरण साध्य करण्यासाठीचा एक स्तुत्य उपक्रम म्हणून या अभियानाकडे पाहिले जाते. महाराष्ट्रात या मोहिमेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या स्वायत्त संस्थेकडे सोपवण्यात आली आहे. या अभियानास सध्या 'राष्ट्रीय शिक्षण अभियान' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील शिक्षणापासून वंचित असलेल्या सर्व मुला-मुलींना शिक्षण प्रक्रियेत आणण्यासाठी या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती आणि शैक्षणिक संस्थांचा विचार करता महाराष्ट्रात एकूण १६ विद्यापीठांचा समावेश असून ४ कृषी विद्यापीठे आहेत. अभिमित विद्यापीठांची संख्या १० इतकी आहे. महाराष्ट्रातील शासकीय महाविद्यालयांची संख्या २४ असून ३१ खाजगी महाविद्यालये आहेत. तांत्रिकी व अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचा विचार करता संपूर्ण महाराष्ट्रभर ७७८ अभियांत्रिकी महाविद्यालये असून त्यापैकी ४७२ महाविद्यालयात विविध अभ्यासक्रम शिकवले जात आहेत.

महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासासाठी काही महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना फी माफी

२. महात्मा फुले शिक्षण हमी योजना

३. मुलींना उपस्थिती भत्ता

४. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

५. अहिल्याबाई होळकर योजना

६. एकलव्य शिष्यवृत्ती योजना

७. सैनिकी शाळा, महाराष्ट्र छात्र सेना

८. संगणक विषयक ज्ञानाचा प्रसार

९. पहिलीपासून इंग्रजी

१०. क्रीडा प्रबोधिनी

११. अटल नवीनता योजना

१२. अध्यापक विद्यालय महिलांना ३०टक्के आरक्षण

१३. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती तसेच परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.

१४. अपंग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सक्षम योजना

१५. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मौलाना आझाद मोफत शिकवणी संबंधित योजना

१६. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना व मुलींसाठी वसतिगृहाची योजना

१७. आदर्श शाळा, आदिवासी विद्यार्थी विद्यावेतन

१८. बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षणाची सोय

१९. उच्च प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

२०. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय

२१. औद्योगिक प्रशिक्षणाच्या विविध व्यापक योजना

अशाप्रकारे महाराष्ट्र राज्याने एकूणच राज्यातील शैक्षणिक प्रगतीकरिता आजपर्यंत विविध योजना, उपक्रम, समित्या, धोरणे तसेच आयोगांची स्थापना केलेली आहे. या माध्यमातून महाराष्ट्रात सर्वत्र शैक्षणिक प्रसार आणि प्रचार करून सर्वच घटकांना शिक्षण प्रवाहामध्ये आणण्याचे प्रयत्न केले आहेत. तरीही महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण म्हणावे तितके समाधानकारक नसून त्यामध्ये अनेक समस्या आणि अडथळे आहेत. महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये कोणकोणत्या समस्या आहेत यांचे अध्ययन आपण पुढील मुद्द्यांच्या सहाय्याने करणार आहोत.

**ब) महाराष्ट्रातील शैक्षणिक समस्या :**

**१) गरिबी व दारिद्र्य :**

शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे दारिद्र्य होय. महाराष्ट्रातील लाखो कुटुंबे दारिद्र्यामुळे मुलांच्या शिक्षणावर खर्च करू शकत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागातील काही पालक गरिबीमुळे मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी त्यांना शेतावर किंवा कोणत्याही छोट्या मोठ्या कामावर पाठवतात. गरिबीमुळे त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाहाच्या अन्न, वस्त्र, निवारा या महत्त्वाच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होत नाही.

प्राथमिक गरजांची पूर्तता झाल्याशिवाय ते शिक्षणाचा विचारच करू शकत नाहीत. त्यामुळे या गरजांची पूर्तता न करू शकणारे पालक मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवतात. त्यामुळे अशा कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण देणे सरकारचे कर्तव्य आहे.

**२) शिक्षणावरील अपुरा खर्च :**

भारतातील लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यात अडचणी येत आहेत. भारतासह महाराष्ट्रातील शिक्षणाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी योग्य पायाभूत सुविधा नाहीत. अनेक शाळांना इमारती नाहीत. वर्ग खोल्या नाहीत. पुरेसे शिक्षक, अधिकारी किंवा कर्मचारी नाहीत. शाळांमध्ये लागणारी उपकरणे नाहीत. खुर्ची, टेबल, बेंच, ब्लॅक बोर्ड यांचा अभाव आहे. मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नाहीत. या शैक्षणिक साधनांच्या अभावामुळे विद्यार्थी गळतीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात शिक्षणासाठी पुरेशा निधीची तरतूद करणे गरजेचे आहे.

**३) ग्रामीण भागातील सामाजिक मागासलेपणा :**

भारतीय समाजातील जातीव्यवस्था, पूर्वीपासून चालत आलेल्या सामाजिक प्रथा व परंपरा तसेच जुनी सांस्कृतिक व्यवस्थाही शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा अडथळा आहे. जातीव्यवस्थेने कनिष्ठ जातीच्या लोकांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता. ही परिस्थिती शेकडो वर्षे राहिल्याने आजही कनिष्ठ जातीच्या काही लोकांना शिक्षण घेणे हे आमचे काम नाही असेच वाटते. मुलींना तर शिक्षणाची गरज काय? भविष्यात त्यांना घरकामच करावे लागणार आहे असा संकुचित विचार केला जातो. भारत हा कृषिप्रधान देश आहे. यामधील अनेक लोक अल्पभूधारक किंवा भूमिहीन आहेत. त्यामुळे गरीब कुटुंबातील मुलांना शाळेत पाठवण्यापेक्षा शेतीच्या कामाला लावणे जास्त फायदेशीर वाटते. तसेच समाजातील इतर वंचित समूह यामधील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती अशा घटकातील अनेक लोक आजदेखील अशा सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत आहेत की शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे मुलांना शाळेत पाठवण्यास ते फारसे उत्सुक असत नाहीत.

**४) शैक्षणिक वातावरणाचा अभाव :**

शैक्षणिक वातावरणाचा अभाव ही देखील एक शैक्षणिक समस्या आहे. कारण ज्या सामाजिक वातावरणात व्यक्तीचे समाजीकरण होते त्या वातावरणाचा प्रभाव व्यक्तीवर पडत असतो. मुलांना शिक्षणाची तसेच शाळेची गोडी उत्पन्न व्हावी अशा वातावरणाचा अभाव आहे. गरीब परिस्थितीमुळे मुलांना शाळेत जाण्यापेक्षा शेतीतील कामे करणे, हॉटेलात काम करणे तसेच गुरे राखणे अशी कामे त्यांना करावी लागतात. पोषक शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहतात.

**५) पालकांचे अज्ञान :**

पालकांचे शिक्षणाबद्दलचे अज्ञानही शैक्षणिक मागासलेपणास जबाबदार आहे. अज्ञानामुळे पालक मुलांना शाळेत पाठवण्यास तयार होत नाहीत. मुले शिकली तर त्यांना आपल्या कुटुंबाच्या परंपरागत

व्यवसायात रस वाटणार नाही अशी त्यांची धारणा बनलेली असते. त्यामुळे मुलांना शाळेत पाठवण्यापेक्षा पारंपारिक व्यावसायिक शिक्षण देणे पालकांना सोयीस्कर वाटते

**६) पालकांची व्यसनाधीनता :**

पालकाची व्यसनाधीनता ही मुलांच्या शैक्षणिक विकासातील मोठीच समस्या बनली आहे. विविध प्रकारच्या व्यसनांच्या आहारी गेलेल्या पालकांना स्वतःच्या पाल्याच्या भवितव्याची फारशी काळजी नसते. व्यसनांच्या अतिरेकामुळे घरची आर्थिक परिस्थिती कमालीची खालावलेली असते. त्यामुळे मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी कामाला पाठवले जाते. व्यसनाधीन पालक मुलांना शाळा सोडण्यास भाग पाडतात. परिणामी त्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागते.

**७) महागडे उच्च शिक्षण :**

आजची शिक्षण प्रणाली खूपच महागडी झालेली आहे. त्यामुळे या शैक्षणिक बाजारपेठांमध्ये ज्यांच्याकडे आर्थिक सुबत्ता आहे तोच या बाजारपेठेत टिकतो. तसेच सध्याच्या स्पर्धेच्या जगात मार्कांची चढाओढ निर्माण झालेली आहे. प्रचंड मोठ्या प्रमाणात झालेले शिक्षणाचे खाजगीकरण हेही शैक्षणिक विकासातील अडचण आहे. खाजगी शिक्षण संस्था त्यांना हवी तेवढी शैक्षणिक फी आकारत आहेत. त्यामुळे गरीब कुटुंबांतील मुलामुलींना उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण घेणे परवडत नाही. त्यामुळे लाखो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विविध कारणांमुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगतीला खीळ बसलेली दिसून येते.

**स्वयं अध्ययनाचे प्रश्न–२**

रिकाम्या जागा भरा

१) शिस्त, क्षमता आणि कौशल्य विकसित करणे म्हणजे ............... होय.

२) आजची उच्च शिक्षण प्रणाली खूपच ............... झालेली आहे.

३) स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या अनुषंगाने जे विविध प्रयोग झाले त्यातून ............... पोहचण्यास मदत झाली.

४) भारतीय आश्रमव्यवस्थेतील पहिला आश्रम म्हणजे ............... होय.

५) भारत सरकारने सन ............... मध्ये 'भारतीय शिक्षण आयोगाची' नियुक्ती केली.

## ३.३.३ महाराष्ट्रातील संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये :

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र राज्याला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महान वारसा लाभला आहे. या राज्यावर सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य घराणे, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य, देवगिरीचे यादव, मुस्लिम आणि मराठा राज्यकर्त्यांनी राज्य केले आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक तसेच सांस्कृतिक स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. महाराष्ट्रात विविध धर्म, जाती, परंपरा, वर्ग तसेच विविध प्रांतातील लोक एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहत आहेत. महाराष्ट्राला समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रीय संस्कृती विविध लोककला, लोककथा, लोकनृत्य, सण, समारंभ, ऐतिहासिक स्थळे, स्मारके, शिल्पकलेचे उत्तम नमुने असलेली अजंठा वेरूळची लेणी, बौद्ध परंपरा सांगणारी बौद्ध लेणी, तसेच वाघ्या मुरळी, पोतराज, वासुदेव, गोंधळी अशा नानाविध गोष्टींनी महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा समृद्ध आहे. या विविध गोष्टीतून महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक जीवनातील विविधता पाहायला मिळते. अशा समृद्धतेने नटलेल्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक तसेच सांस्कृतिक घटकांचे मोठेच योगदान आहे. त्यामुळे यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य हे जमिनीच्या क्षेत्रफळाच्या बाबतीत भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे आणि लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. महाराष्ट्रात विविध सांप्रदायांचा मोठाच प्रभाव दिसून येतो. यामध्ये नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय यांचा मोठाच प्रभाव दिसून येतो. महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले. यामध्ये संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, चोखामेळा या संतांचा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक धर्मांच्या संस्कृतीचा अंतर्भाव झालेला आहे. यामध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन, ख्रिश्चन, पारशी अशा विविध धर्मीय लोकांच्या संस्कृतींचा समावेश झालेला पाहायला मिळतो. महाराष्ट्रात अनेक धर्मीयांच्या विविध देवदेवता, श्रद्धास्थाने, कर्मकांडे, चालीरीती, सण, समारंभ, श्रद्धा, अंधश्रद्धा, सांप्रदाय, भाषा, पेहराव या सर्वांचा एकत्रित संगम झालेला पाहायला मिळतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात बहुसंख्येने मराठी बोलणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्र संस्कृती म्हणजे मराठी भाषिकांची संस्कृती असेही म्हटले जाते. महाराष्ट्रात अनेक आराध्य देवतांच्या पूजाअर्चा श्रद्धेने केल्या जातात. महाराष्ट्रात श्री गणेश, मारुती, महादेव, अष्टविनायक, शिर्डीचे साईबाबा, कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी ही आराध्य दैवते मानली जातात. अशा बहुअंगी, बहुरंगी विविधतेने नटलेल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचे अध्ययन आपण या विभागांमध्ये करणार आहोत. महाराष्ट्राची संस्कृती अतिशय व्यापक आणि विस्तृत आहे. ती विविध परंपरांनी नटलेली आहे. महाराष्ट्राला समाजकारण, राजकारण, सामाजिक सुधारक, सुधारणावादी चळवळी तसेच गौरवशाली इतिहास लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये वरील सर्व घटकांचा समावेश होतो. अशी समग्र आणि व्यापक संस्कृती अभ्यासणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यापूर्वी संस्कृती म्हणजे काय हेही पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संस्कृतीचे अध्ययन थोडक्यात करता येईल.

**संस्कृती :**

संस्कृती हे मानव समाजाचे प्रभेदक वैशिष्ट्य आहे. मानवाच्या परस्पर संबंधाचे किंवा मानव समाजाच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होण्यासाठी मानव संस्कृतीचा अभ्यास करावा लागतो. संस्कृती या शब्दाला इंग्रजीत 'Culture' असा शब्दप्रयोग वापरला जातो. हा शब्द लॅटिन भाषेतील Colora या शब्दापासून बनला असून 'Colora' म्हणजे 'Cultivate, to till the soil' असे म्हटले जाते. संस्कृती ही

समाजशास्त्रातील एक मूलभूत संकल्पना आहे. संस्कृतीचे वर्णन करीत असताना मनुष्य समाजाला डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तू निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय असे म्हणता येते. संस्कृती ही मानवनिर्मित असते. संस्कृती ही कोणा एका व्यक्तीची मालकी नसून ती संपूर्ण समाजाची असते. प्रत्येक समाजाला संस्कृती लाभलेली असते. फक्त तिचे स्वरूप समाजानुरूप बदलत असते. म्हणजेच संस्कृती ही समाजसापेक्ष असते. सामान्य माणूस संस्कृती हा शब्द भिन्न भिन्न अर्थाने वापरत असतो. परंतु संस्कृतीचा अर्थ व्यापक असलेला पाहायला मिळतो. विविध समाजशास्त्रज्ञांनी संस्कृतीच्या केलेल्या व्याख्यावरून संस्कृतीचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.

**संस्कृतीची व्याख्या :**

मानवशास्त्रज्ञांनी तसेच समाजशास्त्रज्ञांनी संस्कृतीच्या विविध प्रकारे व्याख्या केलेल्या आहेत. त्यापैकी काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**सर एडवर्ड बी टायलर :**

'संस्कृती ही एक अशी संकीर्ण समग्रता आहे की जात ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिमत्ता, कायदा, रुढी आणि समाजाचा एक सदस्य म्हणून मानवाने संपादन केलेल्या इतर कोणत्याही क्षमता व सवयी यांचा यात समावेश होतो.'

**इरावती कर्वे :**

'संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देश, काल, विशिष्ट रीत (जीवन पद्धती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती होय.'

**हरस्कोव्हिट्स :**

'संस्कृती हा पर्यावरणाचा मानवनिर्मित भाग होय.'

वरील व्याख्यावरून असे सांगता येईल की, संस्कृती हा लोकांच्या जीवन जगण्याचा मार्ग असतो. ती एक जीवनपद्धती असते. यामध्ये मानवाने निर्माण केलेल्या कला, ज्ञान, भाषा, खानपानविषयक पद्धती, पेहराव, वेशभूषा, साहित्य, संगीत इत्यादींचा समावेश होतो. संस्कृती ही भौतिक तसेच अभौतिक म्हणजेच ज्ञान, विश्वास, श्रद्धा, कल्पना, धारणा, मानसिकता या गोष्टींपासून बनलेली असते. वरील विविध व्याख्यांवरून संस्कृतीची सर्वसाधारण काही वैशिष्ट्ये सांगता येतील ती खालील प्रमाणे.

मानवी समाजाच्या संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये:

१. संस्कृती शिकून आत्मसात करावी लागते.

२. संस्कृतीचे संक्रमण होते.

३. संस्कृतीचे स्वरूप सामाजिक असते.

४. संस्कृती हा समाजाचा आदर्श असते.

५. संस्कृतीच्या माध्यमातून समाज सदस्यांच्या गरजा भागवण्याची व्यवस्था केली जाते.

६. संस्कृती अभियोजनक्षम किंवा अनुकूलनक्षम असते.

७. संस्कृती ही एकात्मता निर्माण करणारी यंत्रणा होय.

८. संस्कृती परिवर्तनशील असते.

९. भाषा हे संस्कृतीचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे. संस्कृतीमध्ये भौतिक व अभौतिक घटकांचा समावेश होतो.

१०. केवळ मनुष्य प्राण्यालाच संस्कृती लाभलेली असते.

११. प्रत्येक समाजाची संस्कृती वेगवेगळी असते.

अशाप्रकारे संस्कृतीची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. या प्रकरणातील उपविभागांमध्ये आपण महाराष्ट्रातील संस्कृतीच्या ठळक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणार आहोत. ही वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आपणास महाराष्ट्रीय संस्कृतीचे व्यापक आणि समग्र स्वरूप समजण्यासाठी मदत होईल.महाराष्ट्रीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास आपण खालील मुद्द्यांच्या सहाय्याने करणार आहोत.

**१. भाषिक वैविध्य :**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही मराठी भाषेच्या मुद्द्यावरच झालेली दिसून येते. मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा असल्यामुळे तिला राज्याच्या अधिकृत भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. १९६६ मध्ये मराठी ही महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा बनली. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणून मराठी भाषेकडे पाहिले जाते. मराठी भाषा ही पश्चिम आणि मध्य भारतातील इंडो आर्यन भाषा आहे. ही भाषा मुंबईच्या उत्तरेपासून, पश्चिमेकडील किनारपट्टीपासून ते गोव्यापर्यंत आणि पूर्वेकडे दखखनपर्यंत पसरलेली आहे. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असली तरीही महाराष्ट्र हे बहुभाषिक लोकांचे राज्य म्हणूनही ओळखले जाते. मराठीसह अनेक जाती, उपजाती, धर्म, वंश, प्रांत यांच्या संस्कृती तसेच भाषा बोलणारे लोक पाहायला मिळतात. मराठीसह आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या जवळपास एकूण ७० भाषा महाराष्ट्रात बोलल्या जातात. तसेच मराठी ही भाषा वेगवेगळ्या पद्धतीने बोलली जाते. प्रदेशागणिक मराठी भाषेचे उच्चार वेगवेगळे पाहायला मिळतात. मराठी या मुख्य भाषेशी नाते कायम ठेवून तिची बोलीभाषा दर बारा कोसागणिक उच्चारात, शब्दसंग्रहात तसेच वाक्यप्रचारात बदलत असताना पाहायला मिळते. राज्यात विदर्भ मराठवाड्यात वऱ्हाडी मराठी बोलली जाते. तसेच राज्यात सातारी, कोल्हापुरी, पुणेरी, अहिराणी स्वरूपाची मराठी आपणाला ऐकायला मिळते. भाषा हे संस्कृतीच्या संक्रमणातील एक प्रमुख साधन असल्यामुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि हस्तांतरण यामध्ये मराठी भाषेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## २. वेशभूषा आणि दागदागिने :

कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या समाजातील लोकांच्या पेहरावातून प्रतिबिंबित होत असते. त्या समाजातील लोकांचे पोशाख, केशभूषा, वेशभूषा, दागदागिने यातून त्या समाजाचे दर्शन होत असते. महाराष्ट्रालाही पोशाख, दागदागिने यांचे वेगळेपण लाभलेले आहे. महाराष्ट्रीय पोशाख हा महाराष्ट्रीयन संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रात पारंपारिक पुरुषांच्या पोशाखात धोतर, फेटा, सदरा, पायजमा, विजार, शर्ट यांचा समावेश होतो. स्त्रियांच्या पोशाखात लुगडं, चोळी, नऊ गजाची साडी तसेच नऊवारी साडी यांचा समावेश होतो. अलीकडे नऊवारी साडीच्या ठिकाणी सहावारी साडी, जरीकाठ असलेल्या साड्यांना प्राधान्य दिले जाते. पोशाखाबरोबर स्त्रियांच्यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण केशरचना केली जात होती. केशभूषामध्ये अंबाडा किंवा बुचडा घालून स्त्रिया त्यावर फुलांनी बनविलेला गजरा किंवा वेणी घालतात. तन्मणी, बोरमाळ, राणीहार, कोल्हापुरी साज, ठुशी असे पारंपारिक महाराष्ट्रीयन दागिने स्त्रिया सण समारंभाला परिधान करतात. पायात पैंजण तसेच हाताच्या कोपराच्या वरच्या भागावर बाजूबंध, पायात जोडवी, कानात कुडी, बुगडी, कुडका, वेल, कानावर बाली तसेच नाकात नथ असे वैशिष्ट्यपूर्ण दागदागिने स्त्रिया परिधान करीत असतात. वैशिष्ट्यपूर्ण पोशाख आणि दागदागिन्यातील वेगळेपण यातून महाराष्ट्र संस्कृतीचे जतन केलेले पाहायला मिळते.

## ३. सणसमारंभ आणि उत्सव :

महाराष्ट्रामध्ये सणसमारंभ, उत्सव, यात्रा, जत्रा, विविध प्रथा, परंपरा यांची विविधता पाहायला मिळते. महाराष्ट्रात प्रामुख्याने गणेश चतुर्थी, दिवाळी, दसरा, होळी, गुढीपाडवा हे सण प्रामुख्याने साजरे केले जातात. गुढीपाडवा हा हिंदू वर्षाचा पहिला दिवस म्हणून उत्साहात साजरा केला जातो. गुढी ही बांबूची काठी असते. ही गुढी रंगीत रेशमी कापडाने आणि फुलांचे हार तसेच गोड पदार्थांची माळ बांधून उभी केली जाते. या सणातून प्रत्येक संकटाला निर्भीडपणे सामोरे जाण्याचा संदेश दिला जातो. लोकमान्य टिळकांनी गणेश चतुर्थी हा सण सामाजिक बांधिलकीची जोपासना व्हावी या हेतूने सुरू केला. महाराष्ट्रात सर्वात उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणारा सण म्हणजे गणेश चतुर्थी होय. गणेशाची दहा दिवस मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पूजाअर्चा केली जाते. तसेच होळी पौर्णिमा, भाऊबीज, बैलपोळा, शिवजयंती, वटपौर्णिमा, दिवाळी, दसरा, नागपंचमी असे विविध सण आणि उत्सव महाराष्ट्रात मनोभावे साजरे केले जातात. या उत्सवांच्या निमित्ताने महाराष्ट्रीय जनतेमध्ये सामाजिक बांधिलकीची जोपासना व्हावी, आपलेपणा तसेच एकात्मतेची भावना रुजावी यासाठी प्रयत्न केले जातात. महाराष्ट्रातील विविध सण, उत्सव, प्रथा, परंपरा, रीतीरीवाज, चालीरीती यांचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होताना पाहायला मिळते.

## ४. पारंपारिक लोककला :

महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध करण्यामध्ये महाराष्ट्रातील लोककला, लोकनृत्य, लोकगीते, लोककथा तसेच पोवाडा, लावणी, तमाशा, संगीत, भजन, कीर्तन, भारुड, गोंधळ, चित्रकला, शिल्पकला इत्यादींचा

समावेश होतो. तमाशा, लावणी, शाहिरी पोवाडा या महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय लोककला आहेत. कृषी संस्कृतीशी जोडलेला शेतकरी शेतीची मशागत करत असताना भलरी हे गीत गात असतो. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात जात्यावर धान्य दळत असताना पहाटेच्या वेळी गायल्या जाणाऱ्या ओव्याही प्रसिद्ध आहेत. लग्न समारंभाच्या वेळीही हळद दळताना ओव्या गायल्या जातात. महाराष्ट्रात बाळाच्या नामकरण विधीच्या वेळी पाळणा म्हटला जातो. लहान मुलांना झोपवताना आई तसेच आजी अंगाई गीत गाते. हे गीतही लोकगीत म्हणून ओळखले जाते. त्याच पद्धतीने नववधू नवऱ्याचे नाव घेताना उखाणा घेत असते. महाराष्ट्रातील नृत्याद्वारे लोकांचे मनोरंजन केले जाते. महाराष्ट्राला संगीत तसेच नृत्याचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. यामध्ये कोळीगीत, पोवाडा, बंजारा होळी, लावणी ही महाराष्ट्राची लोकसंगीत नृत्ये म्हणून ओळखली जातात. तमाशातील लावणीच्या माध्यमातून खेड्यापाड्यातील लोकांचे मनोरंजन केले जाते. शाहिरी पोवाड्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि पराक्रमाची गाथा गायली जाते. महाराष्ट्रातील मच्छीमार कोळी नृत्याच्या माध्यमातून जीवनाचा आनंद घेतात. याचबरोबर धनगरी नृत्य, लेझीम, कटका नृत्य, गोफ, काठ नृत्य यासारख्या नृत्य प्रकारातून महाराष्ट्र संस्कृतीतील महत्त्वपूर्ण कलाविष्कार पाहायला मिळतात.

महाराष्ट्रीय संस्कृतीचा नाटक हाही एक अविभाज्य घटक आहे. महाराष्ट्रात अनेक नाटक मंडळी स्थापन झाली. महाराष्ट्राच्या नाट्यपरंपरेमध्ये अनेक नामवंत नाटककार होऊन गेले. यामध्ये विजय तेंडुलकर, पु.ल. देशपांडे, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर यासारख्या नामवंत नाटककार आणि त्यांच्या विनोदी, सामाजिक, ऐतिहासिक, संगीतमय प्रायोगिक नाटकांनी महाराष्ट्राची सांस्कृतिक शान वाढवलेली आहे. महाराष्ट्रातील चित्रकला ही प्रसिद्ध आहे. पूर्वीपासून महाराष्ट्रात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणसमारंभांच्या वेळी घराघरातून चित्रे काढली जात. महाराष्ट्रातील आदिवासींच्या वारली चित्रकलेला जगप्रसिद्धी मिळालेली आहे. यामध्ये विविध देवदेवतांची चित्रे तसेच चिन्हे काढली जातात. महाराष्ट्रातील गृहिणी घरासमोर काढणारी रांगोळी ही सुद्धा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक घटक बनलेली आहे. सण समारंभाच्या वेळी वेगवेगळ्या आकारात काढली जाणारी रांगोळी हे मांगल्याचे प्रतिक म्हणून ओळखले जाते. अशाप्रकारे विविध पारंपारिक कलाविष्कारातून महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना आणि संवर्धन होताना दिसून येते. आधुनिक काळात जुन्या कलाविष्करांना आधुनिकतेची जोड देऊन महाराष्ट्राची संस्कृती जगभरातील कानाकोपऱ्यात कशी पोहोचेल यासाठी महाराष्ट्रीयन लोक प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

**५. मनोरंजनातून प्रबोधनाची परंपरा :**

महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राला समाजसुधारणेचा आणि समाज सुधारकांचा खूप मोठा वारसा लाभलेला आहे. समाजसुधारक तसेच कीर्तनकार यांनी विविध माध्यमातून समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा, सामाजिक समस्या, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा तसेच तत्कालीन सामाजिक समस्यांवर विविध माध्यमातून समाज प्रबोधन केलेले दिसून येते. समाजप्रबोधनासाठी विविध जनसंपर्क माध्यमे वापरली. किर्तन, प्रवचने, भजन, गारुड, भारुड, गोंधळ, ललिता, अभंग, तुंबडी गायन, तमाशा, पोवाडे, लोककला, लोकगीते, गोष्टी, गाणी, ओव्या अशा विविध माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेचे

मनोरंजनाबरोबर समाज प्रबोधनही केले गेले. संत एकनाथांनी भारुडे गायली. संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. साहित्यिकांनी लोकसाहित्यातून समाज प्रबोधनाचा वसा उचलला. शाहीरांनी पोवाड्यातून शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या कथा पुढच्या पिढ्यांना सांगितल्या. शाहीर अमरशेख, आण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राचा लढा तळागाळापर्यंत पोहोचवला. गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातल्या अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांच्यावरती ओरखडे ओढले. त्यातील फोलपणा दाखवून दिला. महाराष्ट्रातील विविध कीर्तनकारांनी समाजजागृतीचे काम केले. वासुदेव तसेच बहुरूपी या लोककलातून तत्कालीन परिस्थितीवरती मनोरंजनात्मक पद्धतीने भाष्य केले. पूर्वीच्या काळी वासुदेव महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील घरोघरी फिरून अभंग म्हणत असे. मराठी संस्कृतीमध्ये वासुदेवाची परंपरा सुमारे एक हजार वर्षे जुनी असल्याचे सांगितले जाते. पिंगळे जोशी, नंदीवाले तसेच कडकलक्ष्मी अशा विविध लोकपरंपरेतून समाजातील विविध घटकांचे प्रश्न मांडण्यात आले.

### ६. विविध संप्रदायिक परंपरा :

महाराष्ट्रात विविध धर्माचे लोक एकत्रित राहतात. त्यांच्या विविध धार्मिक श्रद्धा, विश्वास, देवदेवता, कर्मकांड, संप्रदाय तसेच धर्माने दिलेल्या शिकवणींचे पालन करत असतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने वारकरी संप्रदाय आणि नाथ संप्रदाय दिसून येतात. वारकरी संप्रदायाची खूप मोठी परंपरा महाराष्ट्र संस्कृतीला लाभलेली आहे. वारकरी संप्रदाय हा पंढरपूरच्या विठ्ठलाला मानणारा संप्रदाय आहे. लाखो लोक दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी वारीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटर पायी चालत जातात. वारकरी संप्रदायातील लोकांच्या विठ्ठलाप्रति असलेल्या भावना, श्रद्धा आणि विश्वास यांचे अतूट नाते आहे. प्रत्येक वारकऱ्याला पांडुरंग हा देव न वाटता तो सखा मायबाप अशा विविध रूपात आपलासा वाटतो.वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्ती सांप्रदाय असून वारी करणारा या अर्थाने वारकरी हा शब्दप्रयोग वापरला जातो. वारकरी संप्रदायाची तात्विक पायाभरणी संत ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाने झाली. संत एकनाथांनी भागवत धर्माला भक्कम आधार दिला. संत तुकाराम महाराज हे भागवत धर्माच्या मंदिराचे कळस ठरले. वारकरी पंथाची विचारप्रणाली म्हणजे संत ज्ञानेश्वरांचा उपदेश होय. त्यांची देव, धर्म, विश्व याविषयीची भूमिका ही या संप्रदायाची बैठक आहे. वारकरी संप्रदायात संत ज्ञानेश्वरांना 'माऊली' हे संबोधन वापरले जाते. पंढरपूरच्या वारीमध्ये वारकरी एकमेकांना 'माऊली या नावाने हाक मारतात. या संप्रदायांनी महाराष्ट्रातील जनतेला सामाजिक तत्त्वांना सांभाळून भक्तिमार्गाने आत्मोद्धार साधण्यासाठी विठ्ठलाच्या नामस्मरणाचा मंत्र दिला आहे. वारकरी संप्रदायाने संस्कृती संवर्धनात मोलाची कामगिरी बजावली आहे.

### ७. धार्मिक विविधता :

महाराष्ट्र धार्मिक विविधतेने नटलेले राज्य आहे. महाराष्ट्रातील विविध धर्मीयांमध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, पारसी अशा विविध धर्माचे लोक आपापल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपत वर्षानुवर्ष गुण्यागोविंदाने एकत्र राहताना दिसतात. महाराष्ट्रात हिंदु धर्मिय लोक बहुसंख्येने राहतात. जे

बहुतांशी मराठी भाषिक म्हणून ओळखले जातात. त्यांची मातृभाषा ही मराठी आहे. मुस्लिम, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारसी हे अल्पसंख्यांक धर्मीय आहेत. प्रत्येक धर्माच्या धर्माचरण करण्याच्या पद्धती, देवदेवता, कर्मकांडे, व्रतवैकल्ये, श्रद्धा, विश्वास, सण, समारंभ, पोशाख, भाषा ह्या वेगवेगळ्या असल्या तरी सर्व लोक परस्पर धर्माच्या संस्कृतीचा आदर व सन्मान करताना दिसून येतात. देशातील इतर राज्यांचा विचार करता महाराष्ट्रामध्ये हिंदू-मुस्लिम बांधव परस्पर सहकार्याने आणि एकमेकांच्या धर्माचा सन्मान करत राहताना दिसतात. विविध धर्मांच्या लोकांच्या सोबत राहत असताना परस्परांच्या धर्मातील, संस्कृतीतील सण-समारंभ तसेच काही गुणवैशिष्ट्ये परस्परांनी स्वीकारलेली दिसून येतात. सर्वच धर्माचे लोक एकमेकांच्या सण-समारंभ, उत्सवात मनोभावे, आनंदाने सामील होतात. मराठी भाषिकांची श्रद्धास्थाने म्हणून महाराष्ट्रातील लोकांनी पुजलेले देवी-देवता यामध्ये श्रीगणेश, मारुती, महादेव, खंडोबा, कोल्हापूरची अंबाबाई, शिर्डी साईबाबा, तुळजापूरची तुळजाभवानी इ. तीर्थक्षेत्रे प्रसिद्ध आहेत.

### ८. महाराष्ट्रातील विविध क्रीडा प्रकार :

महाराष्ट्रात खेळले जाणारे विविध प्रकारचे खेळ देखील महाराष्ट्राच्या संस्कृतीचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. महाराष्ट्राच्या काही क्रीडा प्रकारांनी जागतिक पातळीवरती नावलौकिक प्राप्त केलेला आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने कुस्ती, कबड्डी, खो-खो तसेच शिवकालीन मर्दानी खेळ हे राज्यातील लोकप्रिय खेळ म्हणून ओळखले जातात, कुस्ती म्हटलं की महाराष्ट्र आणि त्यातही कुस्ती म्हणजे कोल्हापूर हे समीकरण चटकन डोळ्यासमोर येतं. महाराष्ट्र केसरी यासारख्या कुस्ती स्पर्धा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यात लोकप्रिय झालेल्या आहेत. कोल्हापूरला तालमी आणि कुस्त्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्या पाठोपाठ क्रिकेट हाही महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक खेळला जाणारा लोकप्रिय खेळ आहे. महाराष्ट्राने क्रिकेट जगताला सचिन तेंडुलकर आणि सुनील गावस्कर यासारखे महान क्रिकेटपटू दिले आहेत. खाशाबा जाधव यांनी ऑलम्पिक मधील कुस्तीमध्ये देशाला पहिले पदक मिळवून दिलेले होते. नेमबाजीमध्ये अंजली वेदपाठक, तेजस्विनी सावंत, राही सरनोबत या खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. कुस्ती बरोबरच तलवारबाजी, तिरंदाजी, बुद्धिबळ, खो-खो हे खेळही महाराष्ट्रात लोकप्रिय होते. त्याचबरोबर विटी-दांडू, मार्बल (गोट्या खेळणे), सुरपाट्या, लंगडी, लगोरी, लपंडाव, लपाछपी हे महाराष्ट्रातील मुला -मुलींचे पारंपारिक खेळ होते. हे सर्व खेळ महाराष्ट्राच्या संस्कृतीचा समृद्ध वारसा आहेत.

### ९. महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ले स्मारके आणि लेणी:

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा अविभाज्य घटक म्हणजे महाराष्ट्रात असणाऱ्या प्राचीन ऐतिहासिक वास्तू, शिल्पे, गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे गडकोट, किल्ले तसेच शिल्पकलांचा अप्रतिम नमुना असलेली लेणी होय. महाराष्ट्र ही ऐतिहासिक आणि भव्यदिव्य वास्तूंची भूमी आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक ऐतिहासिक वास्तूचा गौरवशाली इतिहास आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईतील ऐतिहासिक 'गेट वे ऑफ इंडिया' हे भारतातील तसेच जगभरातील लोकांच्या आकर्षणाचे केंद्रस्थान आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळांच्यामध्ये अजंठा वेरूळ येथील लेण्यांचा आवर्जून

उल्लेख करावा लागतो. औरंगाबाद जिल्ह्यातील टेकड्यांमध्ये कोरलेल्या या प्राचीन लेण्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. अतिशय प्राचीन असलेली कलाकुसरीचा अप्रतिम नमुना असलेली ही लेणी महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत आहेत. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य याची साक्ष देणारे अनेक गडकोट किल्ले महाराष्ट्रात मराठी मावळ्यांच्या शूरवीर पराक्रमाची गाथा आहेत. यामध्ये रायगड, प्रतापगड, पन्हाळगड, सिंधुदुर्ग, देवगिरी, दौलताबाद, भुदरगड असे अनेक ३५० हून अधिक गडकोट किल्ले महाराष्ट्रात आहेत. बौद्ध संस्कृतीचा इतिहास सांगणारी अनेक बौद्ध लेणी महाराष्ट्राच्या संस्कृतीतील अनमोल ठेवा आहे. याचबरोबर विविध ऐतिहासिक स्मारके, उद्याने, पर्यटन केंद्रे यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीत अधिकच भर घातलेली दिसून येते. हा सर्व सांस्कृतिक ऐवज महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे एक अनोखे दर्शन घडवितो.

**१०. खानपान व आहार पद्धती :**

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राची खानपान व आहार पद्धती होय. महाराष्ट्रामध्ये विविध धर्माचे आणि प्रांताचे लोक येऊन स्थिरावलेले आहेत. या प्रत्येकाच्या संस्कृती, खानपान, आहारपद्धती वेगवेगळ्या पहावयास मिळतात. महाराष्ट्रातील आहार पद्धती ही खास आहे. महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांमध्ये सौम्य तसेच अतिशय मसालेदार पदार्थांचा समावेश होतो. सामान्य महाराष्ट्रीयन लोकांच्या जेवणात भात, भाकरी, चपाती, वरण, आमटी तसेच भाजी यांचा समावेश असतो. भाकरी हा पदार्थ महाराष्ट्रीयन आहाराचा अविभाज्य घटक आहे. शेतकरी माणसाचे जेवण भाकरी, खरडा, चटणी, कांदा यांच्या शिवाय पूर्ण होत नाही. भाकरी ही बाजरी, ज्वारी, तांदूळ, राजगिरा, मक्का तसेच इतर धान्य पिठापासून बनवली जाते. पिठलं भाकरी, भरलेली वांगी, वांग्याचे भरीत, थालीपीठ असे वैविध्यपूर्ण स्वादिष्ट पदार्थ महाराष्ट्रीयन जेवणाची लज्जत वाढवतात. वडापाव आणि मिसळ हे पदार्थही महाराष्ट्राची खास ओळख आहेत. हिरव्या मिरच्यांचा खर्डाही आवडीने खाल्ला जातो. याचबरोबर सणासुदीला पुरणपोळी, उकडीचे मोदक, उपवासाला साबुदाण्याची खिचडी, मसालेभात, पुरी, बासुंदी असे शाकाहारी पदार्थ आवर्जून बनवले जातात. शाकाहारी आहारासोबतच मांसाहारी आहार महाराष्ट्रामध्ये अधिक प्रमाणात घेतला जातो. यामध्ये मटन, मासे, चिकन, खेकड्यांचा रस्सा यांचा समावेश होतो. कोल्हापुरी तांबडा-पांढरा रस्सा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. कोकणी, मालवणी, वऱ्हाडी तसेच खानदेशी प्रदेशातील विविध पदार्थांची वैविध्यता पहायला मिळते. वर्षानुवर्षे महाराष्ट्रातील जनतेने त्या त्या प्रदेशातील खाद्य संस्कृतीची जपणूक करत खाद्यपदार्थ अधिकाधिक रुचकर, स्वादिष्ट आणि पौष्टिक बनवण्याकडे वाटचाल केलेली आहे. आपली विशिष्ट खाद्य संस्कृती जपलेली आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील खानपान आणि आहार पद्धती हे महाराष्ट्रीयन संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

थोडक्यात सर्वसमावेशकता हे महाराष्ट्रीयन संस्कृतीचे खास वैशिष्ट्य दिसून येते. विविध धर्म, जाती, प्रांत, वंश, वर्गातील लोक एकाच भूप्रदेशावर गुण्यागोविंदाने अनेक वर्ष वास्तव्य करीत आहेत. सर्व धर्मातील, संस्कृतीतील लोक आपापल्या परंपरांचे, देवदैवतांचे तसेच पूजा पद्धतीचे पालन करणारे विविध स्वभावाचे लोक आपण महाराष्ट्रीयन असल्याचा अभिमान बाळगताना दिसून येतात. विविध सण, समारंभ,

सांस्कृतिक श्रद्धा, लोककला यांच्या माध्यमातून महाराष्ट्र संस्कृतीचे वेगळेपण देशपातळीवर आणि जगभरातही दिसून येते. एकंदरीतच महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थ, ऐतिहासिक वास्तू, खेळ, विविध संप्रदाय, धार्मिक एकता, भाषिक वेगळेपण, केशभूषा, वेशभूषा, पारंपारिक पेहराव, सण, समारंभ या सर्व गोष्टीतून महाराष्ट्रीय संस्कृतीची ओळख होते. या संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे महाराष्ट्रीयन नागरिकांचे कर्तव्य आहे.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न–३**

१. महाराष्ट्र राज्याला प्राचीन इतिहास आणि .............. महान वारसा लाभलेला आहे.

२. संस्कार पूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देश काल रीत म्हणजे संस्कृती होय असे .............. यांनी म्हटले आहे.

३. .............. वैविध्य हे महाराष्ट्र संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

४. .............. द्वारे महाराष्ट्रातील संगीत आणि नृत्य अधिकाधिक समृद्ध झालेले दिसून येते.

५. .............. सांप्रदायाची तात्विक पायाभरणी ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाने केली.

## ३.४ सारांश

'महाराष्ट्रातील राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनाचे पैलू' या प्रकरणाचे एकूण तीन उपविभागात अध्ययन करण्यात आलेले आहे. पहिल्या विभागात महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया आणि महाराष्ट्रातील युतीचे राजकारण यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. उपविभागात महाराष्ट्राच्या राजकारणाचा पाया भक्कम करण्यामध्ये कोणकोणत्या घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे याचे अध्ययन करण्यात आलेले आहे. बदलत्या काळानुसार महाराष्ट्राच्या राजकारणात युती आणि आघाडी सरकारमध्ये कसे बदल होत गेले याचाही अभ्यास केला गेला आहे.

या प्रकरणातील दुसऱ्या उपविभागात महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती आणि समस्या यांचे अध्ययन करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचालीतील स्थित्यंतरे आणि शैक्षणिक प्रगतीमधील समस्या यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रकरणाच्या तिसऱ्या उपविभागात महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या ठळक वैशिष्ट्यांचे अध्ययन केले गेले आहे. विविध वैशिष्ट्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रीय संस्कृतीचे वेगळेपण विशद करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील लोककला, लोकसंगीत, वेशभूषा, संप्रदाय, सण, समारंभ, उत्सव, धार्मिक रीतीरिवाज, पेहराव, आहार, कला, क्रिडा तसेच भाषिक विविधता आणि विविध मुद्यांच्या सहाय्याने महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे**

१. १ मे १९६० रोजी

२. जातीनिष्ठ राजकारणाचा

३. हिंदू

४. मराठी

५. पुरोगामी लोकशाही दल

**स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे**

१. शिक्षण

२. महागडी

३. ज्ञानगंगा घरोघरी

४. ब्रह्मचर्याश्रम

५. १९६४

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे**

१. संस्कृतीचा

२. इरावती कर्वे

३. भाषिक

४. लोकनृत्यद्वारे

५. वारकरी

## ३.६ सरावासाठी प्रश्न

१) महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया विशद करा.

२) महाराष्ट्रातील युतीच्या राजकारणावर सविस्तर चर्चा करा.

३) महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती आणि शैक्षणिक समस्यां स्पष्ट करा.

४) महाराष्ट्र संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये विशद करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) कर्वे इरावती (१९६२) मराठी लोकांची संस्कृती, देशमुख आणि कंपनी मुंबई.

२) पळशीकर सुहास आणि विरमाले नितीन, महाराष्ट्र राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

३) वरखेडे रमेश (२०१८) महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

४) राऊत गणेश आणि राऊत ज्योती (२००६) महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५) कठारे अनिल (२०१५) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

६) के. सागर (१९९४) असा हा महाराष्ट्र, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

७) के. सागर (२००५) मानव संसाधन विकास, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

८) विश्वेकर सुहास (२००८) महाराष्ट्र शासन आणि राजकारण, विद्या सुरभी प्रकाशन, कोल्हापूर.

९) पाटील बी.बी. (२०२१) महाराष्ट्रातील राजकारण आणि चळवळी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०) साळुंखे सर्जेराव (१९९६) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.


❑❑❑

## सत्र–१ : घटक ४

# महाराष्ट्रातील प्रमुख सामाजिक चळवळी

## (Major Social Movements in Maharashtra)

**घटक संरचना**


४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

 ४.३.१ महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ

 ४.३.२ महाराष्ट्रातील महिलांची चळवळ

 ४.३.३ महाराष्ट्रातील सहकार चळवळ

 ४.३.४ महाराष्ट्रातील दलित चळवळ

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


### ४.१ प्रस्तावना

कोणत्याही चळवळीचा हेतू उत्थान हा असतो. सामाजिक चळवळ हा सुधारणावादाला प्रोत्साहन देण्यासाठी केलेला जाणीवपूर्वक सामूहिक प्रयत्न असतो. सामाजिक चळवळी हे समाजशास्त्रातील महत्त्वाचे अभ्यासक्षेत्र मानले गेले आहे. समाजातील काही महत्त्वपूर्ण घटक व व्यवस्था यामध्ये समाजहिताच्या बाजूने बदल घडवून आणण्यासाठी अथवा त्यामध्ये होणाऱ्या समाजघातक बदलांना संघटितपणे विरोध करण्यासाठी समाजातील असंख्य व्यक्तींनी एकत्र येऊन हेतुपूर्वक केलेला प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. सामाजिक चळवळी समाजव्यवस्थेत अनुकूल स्वरूपातून सामाजिक बदल घडवून आणतात. समाजातील काही महत्त्वपूर्ण प्रश्नांना समोर ठेवून चळवळी आकारास येतात. त्यामध्ये मिरवणूका, मोर्चे, घोषणा, आंदोलने इत्यादी कृतींचा अवलंब केला जातो. महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात.

## ४.२ उद्दिष्टे

१. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ समजून घेता येईल.

२. महाराष्ट्रातील महिलांची चळवळ समजून घेता येईल.

३. महाराष्ट्रातील सहकार चळवळ समजून घेता येईल.

४. महाराष्ट्रातील दलित चळवळ अभ्यासता येईल.

## ४.३ विषय विवेचन

गेल्या काही दशकांमध्ये सामाजिक चळवळींचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची महत्त्वाची शाखा म्हणून उदयाला येत आहे. सामाजिक चळवळी या विशेषत: ऐतिहासिक, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय या तीन दृष्टीकोनातून अभ्यासता येतात. नागरिकांचे नागरी आणि लोकशाही अधिकार हे कोणत्याही शासन व्यवस्थेमध्ये असुरक्षित होतात तेंव्हा नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या सुरक्षिततेसाठीच्या चळवळींमध्ये वाढ झाली आहे. सामाजिक चळवळींचे वर्गीकरण प्रामुख्याने भाषिक, धार्मिक, जातीय, वांशिक, सांप्रदायिक, शेतकरी, कामगार, आदिवासी, दलित, विद्यार्थी आणि स्त्रिया यासोबतच सामाजिक चळवळींच्या सुधारणावादी, परिवर्तनवादी आणि क्रांतीकारी स्वरूपावरून देखील करता येते. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच अनेक समाजसुधारकांनी केलेल्या सामाजिक चळवळींमुळे महाराष्ट्र ही सामाजिक अथवा परिवर्तन चळवळीचे केंद्र मानले जाते. त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या घटकांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने, महिला आंदोलने, सहकार आंदोलने तसेच दलित आंदोलने यांचा सविस्तर पद्धतीने आपण अभ्यास करणार आहोत.

### ४.३.१ महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हणून ओळखले जाते. परंतु, आज शेतकरी अनेक अडचणींचा सामना करत शेती व्यवसाय करत आहे. संत तुकाराम यांनी शेतकऱ्यांच्या समस्या आपल्या अभंगातून मांडल्या आहेत. महात्मा जोतीराव फुले यांनी तर शेतकरी, त्यांच्या अडचणी आणि त्यांची होणारी पिळवणूक याबाबत मांडणी केलेली आहे. त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला आहे. आजच्या आधुनिक काळातही शेतकऱ्यांच्या अडचणी संपलेल्या नाहीत. दिवसेंदिवस नवी आव्हाने शेतकऱ्यांसमोर येत आहेत. या अडचणींची सोडवणूक शेतकरी संघटित होऊन आंदोलनाच्या सहाय्याने शासनाकडे मागणी करून करीत आहेत.

**शेतकरी चळवळ : अर्थ व व्याख्या**:-

शेतकरी चळवळ ही एक सामाजिक चळवळ आहे जी कृषी धोरणाशी निगडित आहे, जी शेतकऱ्यांच्या हक्कांवर दावा करते. शेतकरी चळवळींचा मोठा इतिहास आहे, ज्याचा शोध संपूर्ण मानवी इतिहासात जगाच्या विविध प्रदेशात झालेल्या असंख्य शेतकरी उठावांमध्ये सापडतो.

शेतकरी ही जमीन धारण करणारी व्यक्ती असते. शेती कसणारा तो शेतकरी. शेतकरी हा ग्रामव्यवस्था आणि कृषी समाजरचनेचा कणा आहे. गावगाडाकार त्रि.ना.आत्रे गाव वसविण्याचे आणि जमीन विहीतीला आणण्याचे श्रेय शेतकऱ्यांना देतात. त्यांच्या मते, खेडणे म्हणजे जमिनीची मशागत करणे आणि खेडुत म्हणजे जमीन कसणारा. असा प्रत्यक्ष जमीन कसणारा मालक असो वा कुळ, मिरासदार असो वा बटाईदार, म्हणजे शेतकरी होय. शेतात येणाऱ्या पिकांच्या उत्पन्नावरून शेतकऱ्याची उपजीविका चालते.

शेतकरी आंदोलनाची परंपरा जुनी असली तरी देशातील पहिल्या शेतकरी आंदोलनाचा मान पुणे जिल्ह्याकडे जातो. शिरूर तालुक्यातील 'करडे' गावी सावकारी विरोधात झालेला मदख्खनचा उठाव पहिला ठरतो. शहिद भगतसिंग यांचे चुलते सरदार अजितसिंग संधू यांनी पंजाबमध्ये शेतकऱ्यांची पहिली संघटना सुरू केली. मात्र, शिरूरमधील करडे गावी झालेले आंदोलन हे पहिले शेतकरी आंदोलन मानले जाते. ब्रिटीशांनी त्याचा 'मदख्खनचा उठाव' किंवा 'डेक्कन रायट्स' असा उल्लेख केलेला आहे. करडे गावातले बाबासाहेब देशमुख प्रतिष्ठित शेतकरी होते. दीडशे रुपयांच्या कर्जासाठी काळूराम नावाच्या सावकाराने त्यांची शेती, स्थावर आणि जंगम मालमत्ता जप्त केली. सततच्या दुष्काळानंतरही तत्त्कालीन ब्रिटीश सरकारने शेतसारा कमी केला नव्हता. त्यातच हप्त्यांसाठी सावकारांचा तगादा आणि मालमत्ता जप्ती सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी हा संघर्ष केल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे या आंदोलनाला नेतृत्व नव्हते. शेतकऱ्यांनी सावकारांच्या घरांवर हल्ले करून आपली शेतीवाडी, जमीनजुमल्याची गहाणखते, कागदपत्रे काढून कोणालीही इजा न करता ती सार्वजनिक ठिकाणी जाळायची असे या उठावाचे स्वरूप होते. याच सुमारास महाराष्ट्रात महात्मा जोतिराव फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा निबंध लिहिला. शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणातून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले. सावकारी फसवणूक व शेतकऱ्यांचे दारिद्र्य यावर फुले यांचे म्हणणे मान्य करून, तत्कालीन ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज मिळवून देणारा कायदा केला.

आजपर्यंत झालेल्या शेतकरी चळवळींचे संदर्भ मानवी इतिहासात जगाच्या विविध प्रदेशात झालेल्या असंख्य शेतकरी उठावांमध्ये सापडतात. सुरुवातीच्या शेतकरी चळवळी सामान्यतः सरंजामशाही आणि अर्धसरंजामी समाजात घडून आल्या. हिंसक उठाव झाले. अलीकडील चळवळी सामाजिक चळवळींच्या व्याख्येनुसार सहसा खूपच कमी हिंसक असतात. त्यांच्या मागण्या कृषी उत्पादनास चांगल्या किमती, शेतमजुरांना चांगले वेतन, कामाची परिस्थिती आणि कृषी उत्पादन वाढवण्यावर केंद्रित असतात.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या:–**

**१) अल्पभूधारकता:**

भारतातील एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी ४४ टक्के क्षेत्रावर अल्पभूधारक शेतकरी शेती करतात. देशातील अन्नधान्याच्या जवळपास सर्व गरजा पूर्ण करतात. अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नावर मिळणारा नफा मात्र नाममात्र आहे. महाराष्ट्रात देखील हीच परिस्थिती असल्याचे दिसते. शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडवायचा असेल तर सर्वप्रथम, अल्पभूधारक शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे. महाराष्ट्रातील

९६% अल्पभूधारक शेतकरी हा ग्रामीण भागातील आहे. जमिनीची कमी होत जाणारी धारण क्षमता ही शेती आणि शेतकरी यांच्या समोरील महत्त्वाची समस्या आहे.

**२) ग्रामीण भागात तंत्रज्ञानाचा अभावः**

महाराष्ट्रातील शेतकरी हा प्रामुख्याने ग्रामीण भागात राहतो. जागतिक पातळीचा विचार करता अलीकडच्या काळात शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली जात आहे. परंतु, ग्रामीण भागात मात्र पुरेशा प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. त्यामुळे त्याचा परिणाम उत्पादनावरती होताना दिसून येत आहे. शेतजमिनी नांगरणीसाठी ट्रॅक्टर, कापणीची मोठी यंत्रे, मळणी यंत्रे यांचा वापर न करता पारंपारिक पद्धतीने शेती केली जाते. बैलांच्याद्वारे शेतजमीन नांगरली जाते. परिणामी अधिक श्रम आणि वेळ वाया जातो. पिकांसाठी आवश्यक असणारे बियाणे हे आधुनिक पद्धतीचे न वापरता पारंपारिक पद्धतीने घरचे बियाणे वापरले जाते. त्यामुळे आवश्यक ते उत्पन्न होत नसल्याचे दिसते.

**३) भांडवलाची कमतरताः**

शेतीमध्ये अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणामध्ये बदल होताना दिसून येत आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी मात्र याबद्दल मोठा संघर्ष करताना दिसत आहे. याचे कारण म्हणजे भांडवलाची कमतरता होय. शेती करत असताना शेतकऱ्यांसाठी कर्जाची उपलब्धता हव्या त्या प्रमाणामध्ये होताना दिसत नाही. खाजगी सावकारीमुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत आहे. त्यामुळे शेतकऱ्याला ज्या पद्धतीने शेती करायची आहे त्याला मुरड घालून जवळ असलेल्या भांडवलातच शेती करणे भाग पडते.

**४) प्रादेशिक असमतोल :**

महाराष्ट्रामध्ये वेगवेगळे प्रादेशिक विभाग आहेत. या प्रादेशिक विभागांची भौगोलिक परिस्थिती देखील वेगवेगळी असल्याचे दिसते. त्यामुळे याचा फटका शेतीला बसतो. कोकण, मध्य महाराष्ट्र, घाटमाथा, मराठवाडा, विदर्भ, खानदेश असे वेगवेगळे प्रदेश महाराष्ट्रात आहेत. या प्रदेशात पडणारा पाऊस, जमीन, हवामान, शेती करण्याच्या पद्धती या वेगवेगळ्या आहेत. त्याचा परिणाम देखील शेतीव्यवसायावरती होत आहे.

**५) लहरी हवामानः**

महाराष्ट्रातील शेती ही प्रामुख्याने पावसावर आधारित आहे. पर्यावरणातील बदलांमुळे शेतीमध्ये मोठे बदल होत असताना दिसून येतात. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा अशा ऋतूंमध्ये घेतली जाणारी पिके लहरी हवामानामुळे घेताना शेतकऱ्यांना अलीकडच्या काळामध्ये खूप विचार करून घ्यावी लागत आहेत. कारण उन्हाळ्यात पाऊस, पावसाळ्यात उन्हाळा, हिवाळ्यात पाऊस अशा पद्धतीचे लहरी हवामान होत आहे. त्याचा फटका पिकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. शेतीचे आणि शेतकरयांचे अतोनात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना अस्मानी आणि सुलतानी संकटांना तोंड द्याचे लागत आहे.

**६) बेभरवशाचा मान्सूनः**

अलीकडच्या काही वर्षांमध्ये पर्यावरणामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये बदल होत असल्याचे आपण पाहात आहोत. त्याचा परिणाम मान्सूनवर देखील होताना दिसून येत आहे. महाराष्ट्रामध्ये कोकण, सह्याद्री घाट प्रदेशांमध्ये आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मान्सूनचा प्रभाव चांगल्या प्रमाणात असतो. परंतु, अलीकडे मान्सून हा बेभरवशाचा झालेला आहे. त्यामुळे पिके घेताना देखील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मान्सूनचा विचार करूनच पिके घ्यावी लागत आहेत. एकाच महिन्यात सर्वाधिक पाऊस आणि बाकीचे इतर महिने कोरडे असा बेभरवशाचा मान्सून पडताना दिसून येत आहे. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होत आहे.

**७) सुसज्ज बाजारपेठेचा अभावः**

शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये पिकवलेल्या शेतीमालाला बाजारपेठ मिळणे अत्यावश्यक असते. महाराष्ट्रामध्ये बाजारपेठा प्रामुख्याने शहरांच्या ठिकाणीच असल्याचे दिसतात. त्या बाजारपेठांमध्ये सोयी सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव दिसतो. जर शेतकऱ्यांना त्यांच्या गावाशेजारीच सुसज्ज अशा स्वरूपाच्या बाजारपेठा मिळाल्या तर शेतकऱ्यांचा होणारा फायदा वाढू शकतो. शेतमाल बाजारपेठांच्या अभावामुळे कमी भावात शेतमाल विकावा लागतो.

**८) शेतीला योग्य बाजारभाव न मिळणे:**

शेती व्यवसाय हा बेभरवशाचा व्यवसाय झालेला आहे. कारण शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळणे कठीण झालेले आहे. शेतकऱ्याला शासन दरबारी शेतीमालाच्या किमान हमीभाव कायदा करताना संघर्ष करावा लागत आहे. शेतकरी शेतीमाल बाजारपेठात घेऊन गेल्यानंतर व्यापारी कमी भावात त्याची खरेदी करून हव्या त्या किमतीमध्ये त्याची विक्री करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. व्यापाऱ्यांचा मात्र फायदा होतो. हाच फायदा जर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना झाला तर काही अंशी शेतकरी शेती व्यवसायाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहू लागतील.

**९) शेतीवर आधारित लोकसंख्यावाढ–**

महाराष्ट्राची लोकसंख्या ही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शेतीवर अतिरिक्त ताण पडत आहे. वाढत्या लोकसंख्येला हव्या असणाऱ्या अन्नधान्याचा पुरवठा करताना अडचणी निर्माण होत आहेत. शेतीचे तुकडेकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. एकूणच अनेक समस्यांचा सामना करीत शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करावा लागत आहे.

**सारांश –**

महाराष्ट्रातील शेतकरी वरील विविध समस्यांचा सामना करीत शेती करीत आहेत. त्यांच्या समस्यांची सोडवणूक होणे यातच समाजाचे हित सामावलेले आहे.

**महाराष्ट्रातील प्रमुख शेतकरी चळवळी–**

देशातील प्रमुख मोठ्या राज्यांपैकी महाराष्ट्र  एक राज्य आहे. महाराष्ट्राला अनेक परंपरा लाभलेल्या आहेत. सामाजिक चळवळ अथवा आंदोलन करणे याला महाराष्ट्रात मोठी परंपरा आहे. मध्ययुगीन काळात देखील येथील शेतकऱ्यांनी सावकार, शासन व्यवस्था यांच्या विरोधात बंड केल्याची अनेक उदाहरणे आहेत. ब्रिटिशांच्या काळातदेखील शेतकऱ्यांच्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाल्याचे दिसते. या अन्यायाच्या विरोधामध्ये शेतकऱ्यांनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात संघर्ष केल्याची अनेक उदाहरणे आपण इतिहासामध्ये वाचलेली आहेत. त्यांचा सविस्तर अभ्यास करू.

**१) १८७४–७५ मधील पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ –**

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, पुणे, रत्नागिरी या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सन १८७४–७५ मध्ये एक महत्त्वपूर्ण चळवळ केलेली होती. एलफिस्टनने लागू केलेल्या रयतवारी पद्धतीनुसार रयत ही जमिनीची मालक बनली. शेतसारा थेट सरकारच्या तिजोरीत भरण्याची जबाबदारी शेतकऱ्यांच्यावरती आली. शेतसारा गोळा करण्याची जबाबदारी काही अधिकाऱ्यांच्यावरती होती. हे अधिकारी शेतसारा जमा करत असताना शेतकऱ्यावर अत्याचार करत होते. दुष्काळामध्ये पिके बुडाली तरी देखील ते सक्तीने शेतसारा जमा करत होते. शेतसारा भागवण्यासाठी काही शेतकरी आपल्या जमिनी खाजगी सावकारांच्याकडे गहाण ठेवून कर्ज घेऊ लागले. शेतसारा आणि सावकारी कर्जाचे व्याज देणे शेतकऱ्यांना कठीण झाले होते. यावरून शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला होता. याचा परिणाम म्हणून शेतकरी संघटित होऊन पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आंदोलने करू लागले. याचा परिणाम म्हणून सरकारने १८७९ मध्ये 'दि डेक्कन ॲग्रिकल्चर रिलीफ ॲक्ट' संमत केला. यानुसार शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबविण्यात येऊन शेतकऱ्यांचा असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला गेला.

**२) मुळशी पेट्याचा सत्याग्रह–**

मुंबई शहराची विजेची गरज भागवण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा या गावी मुळामुठा नदीवर वीज निर्मितीच्या अनुषंगाने धरण बांधण्याचा प्रकल्प सरकारने हाती घेतला होता. या धरणामुळे सुमारे पन्नासहून अधिक गावातील शेतकरी भूमिहीन होणार होते. हजारो लोक विस्थापित होणार होते. यामुळे शेतकऱ्यांच्यामध्ये प्रचंड असंतोष होता. कोणत्याही सूचनेशिवाय अथवा पूर्वपरवानगीशिवाय सरकारने हा प्रकल्प हाती घेतलेला होता. याच्या विरोधामध्ये शंकरराव देव, डॉ. फाटक, भोपटकर, न. चि. केळकर, शिवरामपंत परांजपे यांनी सदर प्रकरणात लक्ष घालून महात्मा गांधींना या सत्याग्रहाच्या संदर्भाने कळवले. त्यांनी सत्याग्रहाच्या संदर्भाने मार्गदर्शन केले. शंकरराव देव यांनी १६ एप्रिल १९३१ रोजी सत्याग्रहाची सुरुवात केली. याचा परिणाम म्हणून सरकारने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. यानुसार शेतकऱ्यांना भरपाई मिळाल्या परंतु अनेक शेतकरी मात्र या प्रकल्पामुळे भूमिहीन बनले.

### ३) साराबंदी व तुकडेबंदी संदर्भातील चळवळ–

१९२७ मध्ये मुंबई प्रांतातील इंग्रज शासनाने कमी आकाराच्या जमिनीविषयीचे एक विधेयक तयार केले होते. या विधेयकांमध्ये तुकडेबंदीविरुद्ध तरतुदी होत्या. या तरतुदीनुसार सुमारे ८० टक्के शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी या विधेयकास जोरदारपणे विरोध केला. शेतकऱ्यांमधील जनजागृतीसाठी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या सभा आयोजित केलेल्या होत्या. या सभांमधून या विधेयकाबाबत जाणीवजागृती केली. त्यानुसार सर्व शेतकरी एकत्र येऊन शेतसाराबंदी आणि तुकडेबंदी विधेयकास मोठा विरोध केला. याचा परिणाम म्हणून ब्रिटिश सरकारने शेतसारा कमी केला.

### ४) शेतकरी कामगार पक्ष चळवळः

शेतकरी, शेतमजूर आणि कामगार यांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी सन १९४८ काँग्रेसशी फारकत घेवून केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांनी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. शेतकरी, शेतमजूर व कामगार यांच्या प्रश्नावर विविध ठिकाणी आंदोलने केली. शेतमालास योग्य भाव मिळवून देणे, शेतकरी आणि शेतमजूर यांची कर्जे माफ करणे, शेतसारा कमी करणे, शेतीसाठी लागणाऱ्या कर्जावर व्याजदर कमी करणे, मालासाठी गोदामे आणि विक्री व्यवस्था करणे आदी प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाने आवाज उठवलेला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्षाचा मोठा दबदबा होता. या पक्षाचे अनेक आमदार महाराष्ट्राच्या विधानसभेत होते. सर्वप्रथम १९५० मध्ये दाभाडी येथे भरलेल्या अधिवेशनात १७ कलमी कार्यक्रम ठरवण्यात आला. यामध्ये जमीन सुधारणा कार्यक्रम राबवणे, उत्पादन खर्च व नफा विचारात घेऊन शेतीमालाच्या किमती ठरवणे, सावकारी नष्ट करणे, शेतकऱ्यांना वाजवी दराने कर्जपुरवठा करणे, शेतमजुरांना पुरेसे वेतन देणे या बाबी अग्रभागी होत्या. प्रा. एन. डी पाटील, भाई संपतराव पवार–पाटील, प्रा.जयंत पाटील हे शेकापचे बिनीचे शिलेदार म्हणून ओळखले जातात. आज शेतकरी कामगार पक्षाची अवस्था महाराष्ट्रामध्ये बिकट असली तरी शेतकऱ्यांच्यासाठी लढणारा तत्ववादी पक्ष म्हणून शेकापकडे पाहिले जाते.

### ५) लाल बावटा पक्षः

शेतकरी कामगार पक्षातील तात्विक मतभेदातून कॉ. दत्ता देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत किसान पक्षाची १९५१मध्ये स्थापना केली. १९६५ मध्ये या पक्षास लालबावटा (निशाण) पक्ष असे नाव देण्यात आले. या पक्षाच्या माध्यमातून सरकारी कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी काम केले जात होते. सन १९७० मध्ये या पक्षाने शेतकऱ्यांसाठी संघटना बांधण्याचे ठरवले. त्यानुसार श्रीरामपूर येथे शेतकरी व भूमिहीन मजुरांची एक परिषद आयोजित केली होती. या परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा केली गेली. यामध्ये ऊसतोड कामगारांच्या संघटना, दुष्काळ निवारण, शेतमजुरांचे मजुरीचे दर, त्यांना साप्ताहिक सुट्टी, कामाचे तास तसेच शेतसारा आदी प्रश्न या परिषदेत मांडले गेले. पुढे या पक्षांने शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर अनेक वेळा आंदोलने केलेली आहेत.

### ६) जमीन बळकाव चळवळ:

किसान सभा व शेतमजूर संघ या भारतीय साम्यवादी पक्षाशी संलग्न असणाऱ्या संघटना होत्या. त्यांनी १९७० मध्ये रिकाम्या असणाऱ्या शेतजमिनी बळकावण्याची चळवळ हाती घेतली होती. या चळवळीमध्ये पन्नास हजारहून अधिक शेतकरी, शेतमजूर सहभागी झाले होते. १९७२ साली मोठा दुष्काळ महाराष्ट्रामध्ये पडलेला होता. शेतकरी, शेतमजूर, सामान्य जनता यांचे मोठ्या प्रमाणात हाल सुरू होते. याच्या विरोधामध्ये समविचारी संघटनानी एकत्र येऊन अनेक ठिकाणी आंदोलने सुरू केली होती. याचा एक भाग म्हणून सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर आणि सोलापूर जिल्ह्यातील वैराग या गावी आंदोलन केले. या आंदोलनावरती पोलिसांनी गोळीबार आणि लाठीचार्ज केला. परिणामी अनेक शेतकरी मरण पावले. हे आंदोलन त्यावेळी स्थगित करण्यात आले.

### ७) वारल्यांचा लढा–

१९४५ साली किसान सभेने महाराष्ट्रात लढवलेला हा सर्वात मोठा लढा होता. वारली आदिवासींना एकत्र करून गोदावरी परुळेकर यांनी अत्यंत सक्षमपणे व धैर्याने या लढ्याचे नेतृत्व केले.१९४७ मध्ये या लढ्याचे उठावामध्ये रूपांतर झाले. वेठबिगारी नष्ट करणे, शेतमजुरी वाढवून घेणे आणि वारल्यांच्यावर होणारे अत्याचार थांबवणे या तीन प्रमुख मागण्यांसाठी हा लढा होता. वारल्यांच्या सशस्त्र लढ्यांमुळे पोलीसही या लढ्याची भीती बाळगून होते.

### ८) पालघरमधील भूमिसेना आंदोलन–

ठाणे जिल्ह्यातील पालघर या ठिकाणी वारली या आदिवासी समूहाने आदिल या नेत्याच्या नेतृत्वाखाली भूमिसेना ही संघटना स्थापन केली. सावकार आणि मोठ्या जमीनदारांच्या विरोधामध्ये लढा देणे, सावकारांनी जबरदस्तीने ताब्यात घेतलेल्या वारली समुदायातील शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून घेणे, खाजगी सावकारांच्या विरोधात बंड करणे तसेच शासकीय पातळीवर शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून घेणे या प्रमुख मागण्यांसाठी ही संघटना काम करत होती.

### ९) शेतकरी संघटना व स्वाभिमानी शेतकरी संघटना–

१९७८ साली पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेची चळवळ सुरू झाली. १९८० मध्ये या शेतकरी संघटनेने शरद जोशींच्या नेतृत्वाखाली कांद्याला योग्य भाव मिळावा यासाठी पहिले आंदोलन केले. नंतरच्या काळामध्ये उसाचा प्रश्न, दुधदराचा प्रश्न, कापसाचा प्रश्न यासह शेतकऱ्यांच्या एकूण सर्वच मागण्यांच्या अनुषंगाने ही संघटना अत्यंत आक्रमकपणे आणि जोशाने शासनाविरोधात आंदोलन करत होती. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची संघटना मिळाली होती. या संघटनेच्या प्रयत्नामुळे शेतकरी वर्गाच्या अस्तित्वाची जाणीव संपूर्ण समाजामध्ये निर्माण झाली. या संघटनेचे प्रणेते म्हणून 'शरद जोशी' यांना ओळखले जाते. आज या संघटनेचे नेतृत्व रघुनाथदादा पाटील करीत आहेत. या संघटनेमध्ये काम करणारे अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे राजू शेट्टी होय. राजू शेट्टी यांनी २००४ साली

'स्वाभिमानी शेतकरी संघटने'ची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रभर संघटनेचे जाळे विणले. आपल्या अनोख्या व आक्रमक आंदोलन शैलीमुळे राजू शेट्टी हे देशभर शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जातात. शेतकऱ्यांसाठी लढणारा नेता म्हणून लोकांनी त्यांना आमदार तसेच खासदार म्हणून निवडून दिले आहे. त्यांचे सर्वात जवळचे सहकारी सदाभाऊ खोत यांनी रयत क्रांती आघाडी ही संघटना स्थापन करून शेतकऱ्यांसाठी काम चालू ठेवले आहे.

**१०) कांदा आंदोलन–**

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यामध्ये कांद्याचे सर्वाधिक उत्पन्न घेतले जाते. १९८० मध्ये शेतकरी संघटनेच्यावतीने कांद्यास योग्य भाव मिळावा यासाठी आंदोलन उभे केले होते. पुणे ते नाशिक महामार्ग रोखला होता. याचाच परिणाम म्हणून सरकारने सहकारी खरेदी विक्री संस्थेमार्फत कांदा खरेदीची योजना सुरू केली. प्रत्येक वर्षी महाराष्ट्रात कांदा आंदोलने होताना दिसतात. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कांद्याला योग्य भाव मिळावा यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यात ही आंदोलने केली जातात.

**११) ऊस आंदोलन–**

ऊसाला प्रतिटन ३०० रुपये इतका भाव मिळावा, म्हणून शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने १० नोव्हेंबर १९८० साली नाशिक, धुळे, अहमदनगर जिल्ह्यात रस्ता रोको तसेच खेरवाडी येथे रेल रोको आंदोलन केले. २७ नोव्हेंबर १९८० ला शासनाने ऊसाला प्रति टन ३०० रुपये भाव देण्याचे मान्य केल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात स्वाभिमानी शेतकरी संघटना ऊसदर आंदोलनामध्ये अत्यंत आक्रमक भूमिका घेऊन ऊसाला दर मिळवून देत आहे. ऊसदर आंदोलने दरवर्षी वेगवेगळ्या शेतकरी संघटनांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध भागात केली जातात. यामध्ये रघुनाथ दादा पाटील यांची शेतकरी संघटना देखील अग्रभागी असते.

**१२) तंबाखू आंदोलन निपाणीः**

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवर निपाणी परिसरामध्ये तंबाखूचे मोठे उत्पन्न घेतले जाते. या परिसरातील व्यापारी हे तंबाखू उत्पादकांचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी १४ मार्च १९८१ रोजी पुणे-बेंगळूर महामार्गावर रस्ता रोको केला गेला. सुमारे २३ दिवस हे आंदोलन सुरू होते. पोलीस आंदोलकांवर लाठीमार, अश्रुधूर, गोळीबार करीत होते. अनेक आंदोलकांना पोलिसांनी अटक केली होती. या आंदोलनांमध्ये जवळपास १२ शेतकरी मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर कर्नाटक शासनाने तंबाखू खरेदी विक्री सहकारी संघ स्थापन केला. त्यामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले होते.

**१३) दूध आंदोलन**

शेतकरी संघटनेने अनेक आंदोलने केली आहेत. त्यामध्ये दूध दर आंदोलन हे देखील महत्त्वाचे आंदोलन आहे. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली १९८२ मध्ये दुधास दर वाढवून

मिळावा म्हणून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आंदोलन केले होते.या आंदोलनाला चांगला प्रतिसाद मिळालेला होता. आजदेखील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर मिळावा म्हणून राज्याच्या विविध भागात आंदोलने होतात. प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अलीकडच्या काही वर्षांमध्ये आंदोलने झालेली आहेत. दुधाचे टँकर अडवणे, दूध डेअरीना दूध न घालणे, रस्त्यावर दूध ओतणे इत्यादी मार्गाने ही संघटना आंदोलने करताना दिसते. याचा परिणाम म्हणून दूध दरामध्ये वाढ झालेली दिसून येते.

**१४) कापूस आंदोलनः**

शेतकरी संघटनेच्या माध्यमातून १९८६ साली कृत्रिम धाग्याच्या विरोधात विदर्भामध्ये रस्ता रोको आंदोलन सुरू करण्यात आले. कृत्रिम धाग्याची वस्त्रे परिधान करणाऱ्या प्रवाशांना अडवून त्यांच्या कपड्यावर संघटनेचा शिक्का मारण्याचा कार्यक्रम संघटनेने हाती घेतला होता. कृत्रिम धाग्यांच्या वस्त्रांची होळी करणे, विविध ठिकाणी लोकांच्यात जाणीवजागृती करणे, रेलरोको करणे आदी कार्यक्रम संघटनेच्या वतीने सुरू होते. परंतु शासनाने आंदोलनाकांना अटक करून हे आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अनेक आंदोलने करण्यात आलेली आहेत. यामध्ये घेराव, रस्तारोको, निवेदने, निदर्शने आदी माध्यमातून शासनाचे लक्ष वेधून कापसाच्या हमीभावाचा प्रश्न निकाली काढण्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेला काही अंशी यश मिळालेले आहे.

**१५) कर्जमुक्ती आंदोलन**

सन १९८८-८९ मध्ये शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांचे कर्ज माफ व्हावे यासाठी आंदोलन हाती घेतले.यावेळी कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांच्याकडून फॉर्म भरून घेतले गेले. या मोहिमेला मोठा प्रतिसाद महाराष्ट्रातील विविध भागात मिळालेला होता. त्यामुळे शासनाला धोरणात्मक पाऊल उचलावे लागले होते. शासनाने यावेळी कर्जमाफीची योजना सुरू केली. त्यामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले. अलीकडच्या काळामध्ये शरद पवार केंद्रीय कृषिमंत्री असताना मोठी कर्जमाफी देशातील शेतकऱ्यांना झालेली होती. ही कर्जमाफी शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा सकारात्मक परिणामच होता.

**१६) किमान हमीभाव प्राप्तीसाठी आंदोलनः**

राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात शेतीमालाला किमान हमीभाव मिळावा यासाठी गेली अनेक वर्ष आंदोलन सुरू आहे. महामार्ग रोखणे, मोर्चे, आंदोलने आदी माध्यमातून शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न होत आहे.परंतु, शासन या प्रश्नाकडे म्हणावे तितके गांभीर्यपूर्वक पाहताना दिसत नाही. शेतमालाच्या किमान हमीभावाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला आहे.

**सारांश**

वरील विवेचनातून आपणास महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ, तिची कार्ये, समस्या, चळवळीील समोरील आव्हाने आणि महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीची दिशा सविस्तरपणे समजण्यास मदत होते.

### ४.३.२ महाराष्ट्रातील महिला चळवळ

पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना मुख्य प्रवाहातून दोन टोकाच्या भूमिकांकडे लोटले जाते. एक म्हणजे जिच्याबद्दल समाजाला आदर वाटावा ती देवता, पतिव्रता, सौभाग्यवती व माता या भूमिका, तर दुसऱ्या टोकाला समाजामध्ये ज्यांना हीन समजले जाते अशा परित्यक्ता, वेश्या, कुमारी माता, विधवा, प्रौढ कुमारिका अशा भूमिका. स्त्री देखील एक माणूस आहे. व्यक्ती म्हणून तिचा विचार होताना दिसत नाही. धर्मग्रंथांनी स्त्रीला पुरुषांइतके बरोबरीचे स्थान दिलेले दिसत नाही. 'द हेड ऑफ एव्हरी विमेन इज मॅन' (बायबल), 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति।' (मनुस्मृती) अशी वचने स्त्रीचा अबला, दुय्यमपणा व परावलंबित्व दाखवतात. स्त्री ही उपभोगाची वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये तर स्त्रियांना अत्यंत दुय्यम गणले गेलेले आहे.

स्त्रियांचे प्रश्न विश्वव्यापी आहेत. हे लक्षात आल्यावर संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे 'महिला वर्ष' आणि ८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' म्हणून घोषित केला. १९७० च्या दशकापासून भारतात ''स्त्री मुक्ती'' ही कल्पना सन्माननीय विषय बनली. तेंव्हापासून खऱ्या अर्थाने महिला चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली. ९० च्या दशकात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. महिलांच्या समस्यांचे स्वरूप बदलले. बदलत्या काळातील महिला चळवळीचे स्वरूप व वाटचाल यातही स्थित्यंतर घडून आले. वैयक्तिक समस्या घेऊन स्त्रिया जेव्हा महिला चळवळीकडे येऊ लागल्या, तेव्हा कौटुंबिक सल्ला केंद्रे सुरू झाली. महिलांना न्याय देण्यासाठी सामाजिक, शासकीय, कौटुंबिक पातळीवर प्रयत्न, पोलिस व कायद्याची मदत, सामाजिक हस्तक्षेप या तंत्राचाही वापर होऊ लागला. या सर्वाचे फलित म्हणून २५ नोव्हेंबर २००५ रोजी 'कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा' करण्यात आला.असे असले तरी या कायद्याचा गैरवापरही होताना दिसून येतो.

**महिला चळवळ : अर्थ व व्याख्या**

'सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रांत स्त्री पुरुष समतावादासाठी व स्त्रियांना स्वातंत्र्य देण्यासाठी आधुनिक काळात छेडले गेलेले आंदोलन म्हणजे महिला चळवळ होय.' स्त्रिया व काही समाजसुधारकांनी हे आंदोलन शांततेच्या मार्गाने व वैचारिक पातळीवर हाताळलेले असल्यामुळे त्यास चळवळ म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. भारतामध्ये स्त्रीमुक्तीसाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले आहेत. स्त्रियांनाही पुरुषाइतकेच समाजात स्थान मिळावे. ही समतावादी भूमिका घेऊन अनेक समाजसुधारक काम करत आलेले आहेत. असे असले तरी अपेक्षित बदलांची गती मात्र अत्यंत मंद स्वरूपाची आहे. महात्मा जोतिराव फुले, सावित्रीमाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांनी आपल्या सामाजिक जीवनात स्त्रियांच्या उन्नतीसाठी भरीव स्वरूपाचे कार्य केलेले आहे.यालाच महिलांची चळवळ संबोधले आहे. अनेक

समाजसुधारक स्त्रीवादी संघटना, स्त्री प्रश्नावर काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांनी महिला चळवळीला गती दिलेली आहे.

**महिलांच्या विविधांगी समस्या :**

महिला ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडते. कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. पुरुषप्रधान कुटुंबपद्धतीमध्ये महिला पुरुषांवर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचा निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नसतो. लहानपणी वडील, तरुणपणी नवरा आणि म्हातारपणी मुलगा यांच्यावरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आजही त्यांचे स्थान दुय्यमच असल्याने त्यांच्यावर अन्याय अत्याचार होताना दिसतो. आधुनिक काळात त्यांना सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे तरच त्यांचा आर्थिक, तसेच सामाजिक दर्जा सुधारेल. राष्ट्राच्या प्रगतीत त्यांचे योगदान वाढेल. आज महिलांना संधी मिळत असली तरी त्याचे प्रमाण अल्पच आहे. प्रत्येक स्तरातील महिलांच्या समस्याही वेगवेगळ्या स्वरुपाच्या दिसून येतात. त्यांचा सविस्तर अभ्यास करू. या समस्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) आरोग्याच्या समस्या**

भारतातल्या दर दोन महिलांमागे एक महिला अशक्तपणाच्या तक्रारीने ग्रस्त आहे. ३५ टक्के महिला गंभीर स्वरूपाच्या तर १५ टक्के महिलांना कमी गंभीर स्वरूपाच्या अशक्ततेचा त्रास आहे. महिलांसाठी पुरेशा वैद्यकीय सोयी उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्यामध्ये ही समस्या निर्माण झाली आहे. महिलांच्या जीवनात आरोग्य हा कमी प्राधान्याचा विषय असतो. लहान-मोठ्या आजारासाठी महिलांनी डॉक्टरकडे जाण्याची गरज नसते असे मानले जाते. कितीही त्रास होत असला तरी तो सहन केला पाहिजे ही महिलांची मानसिकता असल्यामुळे भारतात आणि महाराष्ट्रात देखील महिलांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. त्यामागे त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष हेच कारण आहे. महाराष्ट्रात सध्या कुपोषित बालक आणि कुपोषित बालकांचे अवेळी होणारे मृत्यू ही गंभीर समस्या बनली आहे. महिलांमधील कुपोषण आणि त्यांच्या आरोग्याच्या समस्येकडे दुर्लक्ष केले जात आहे. मुलींच्या आरोग्याकडेसुद्धा दुर्लक्ष केले जाते. अगदी कुटुंबातील स्त्री आणि पुरुष यांच्या आहारात सुद्धा भेदभाव केला जातो. कुटुंब नियोजनाच्या वेळी बऱ्याचवेळेस हे नियोजन स्त्रीलाच करावे लागते. उदा. तांबी बसविणे, निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया. अनेक वेळा गर्भपात अथवा गर्भनिरोधक गोळ्या घेतल्याने स्त्रीला आरोग्यावरील दुष्परिणामांना सामोरे जावे लागते.

**२) शिक्षणाच्या समस्या**

दहावी बारावीच्या निकालात मुलींच्या निकालाची टककेवारी जास्त असते. पहिल्या नंबरातदेखील मुलीच असतात. असे असले तरी नंतर मात्र मुली शिक्षणाच्या क्षेत्रात मागे पडत जातात. आजही ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी पाठवले जात नाही. मुलींनी जास्त शिकून काय करायचं? असा नकारात्मक विचार समाजात रुजला आहे. काही ठिकाणी मुलींना प्राथमिक शिक्षणदेखील दिले जात नाही. ही शोकांतिका आहे. महिलांना शिक्षण दिले तर त्या आपल्या कुटुंबाबरोबरच देशाचा विकास करू शकतील. एक महिला शिकली तर एक कुटुंब शिकते. महिलांसाठी सरकारने विविध शैक्षणिक योजना राबवल्या

आहेत. मात्र जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत त्या योजनांचा फायदा महिलांना मिळणार नाही. स्त्री शिक्षणाची समस्या संपूर्ण भारतात आहे. २०११ सालच्या जनगणनेनुसार पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण ८२% असून स्त्रीचे प्रमाण ६५% इतके आहे. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे पालक पुरेशा प्रमाणात लक्ष देत नाहीत. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची हेळसांड होते. महिला फक्त 'चूल आणि मूल' यासाठीच असतात या पारंपारिक मानसिकतेतून समाजाने बाहेर पडले पाहिजे.

**३) पितृसत्ताक कुटुंब पद्धती**

कुटुंब एकत्रित असो किंवा विभक्त, कुटुंबप्रमुख म्हणून पुरुषच असतो. भारतीय समाज पुरुषप्रधान आहे. कुटुंबामध्ये महत्वाचे निर्णय पुरुषच घेत असतो. कुटुंबातील मुलीचा विवाह झाल्यानंतर तिला पतीच्या घरी जावे लागते. भारतीय कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान आहे. कोणत्याही प्रकारच्या निर्णयात महिलांना सामील करून घेतले जात नाही. महिलेला स्वतः संबंधी निर्णय घेण्याचा अधिकार दिला जात नाही. स्त्रियांसंबंधी निर्णय पुरुषांकडूनच घेतले जातात. स्त्रियांना पुरुषांचे निर्णय मान्य करावे लागतात. कौटुंबिक तसेच आर्थिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते.

**४) स्त्री भ्रूणहत्या**

पितृसत्ताक व्यवस्थेमुळे मुलगाच हवा या मानसिकतेतून स्त्रीच्या गर्भातच मुलींची हत्या केली जात आहे. बेकायदेशीररित्या स्त्री भ्रूणहत्या केल्या जातात. यामुळेच स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण चिंता वाटावे इतके अधिक आहे. भारतातील आकडेवारीनुसार १९०१ साली दर हजारी पुरुषामागे ९७२ स्त्रिया होत्या. तेच प्रमाण १९११ साली ९२७ पर्यंत घसरले होते. २०११ साली स्त्रियांचे प्रमाण प्रत्येक हजार पुरुषामागे ९४० इतके पोहोचले होते. आज स्त्रियांचे घटते प्रमाण ही देशापुढील एक गंभीर समस्या बनली आहे.

**५) अपत्य न होणे –**

एखाद्या दाम्पत्याला अपत्य न होणे यामध्ये पती–पत्नीपैकी कोणामध्येही दोष असू शकतो. मात्र यासाठी आजही स्त्रीलाच जबाबदार धरले जाते. वैद्यकीयदृष्ट्या याला स्त्री जबाबदार नसली तरीही कुटुंबात तसेच समाजात तिच्याकडे वांझ म्हणून पाहिले जाते. स्त्री याची कुठेही वाच्यता करू शकत नाही. तसेच एखाद्या दाम्पत्यास फक्त मुलीच झाल्या तरीही त्या स्त्रीस जबाबदार ठरविले जाते. काही वेळेस पुरुष वैद्यकीयदृष्ट्या मुलांना जन्म देण्यास असमर्थ असतो. त्याचे खापर मात्र संबंधित स्त्रीवरच फोडले जाते. स्त्रीला जबाबदार धरून तिला भेदभावपूर्ण आणि अन्यायी वागणूक दिली जाते.

**६) विवाहाचे वय**

कायदेशीरदृष्टीने मुलीच्या विवाहाचे वय १८ इतके असेल तरीही आजसुद्धा बऱ्याच कुटुंबांमधून मुलीचा विवाह लवकर केला जातो. पूर्वीच्या काळी भारतात बालविवाह केले जात असत. त्याचा परिणाम या लहान मुलींचा बाळंतपणात मृत्यू होत असे. काहीवेळेस दुर्दैवाने नवऱ्याचा मृत्यू झाल्यास स्त्रीला बालविधवा म्हणून त्या कुटुंबात आयुष्य काढावे लागते. अशा मुलींना कुटुंबामध्ये अनेक प्रकारे त्रास भोगावे

लागत असे. भारतामध्ये पूर्वी सतीप्रथा होती. त्यामुळे पतीच्या निधानंतर स्त्रीस एक तर सती जावे लागत असे किंवा कुटुंबातीलच पुरुषांच्या भोगाची वस्तू म्हणून राहावे लागत असे. आधुनिक भारतात राजस्थानमध्ये एका विधवेस सती जाण्यासाठी सक्ती केल्याचे उदाहरण आपण वाचलेच असेल.

**७) जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नाही**

आजही भारतीय समाजात प्रेमविवाह सहज मान्य केला जात नाही. त्यातही आंतरधर्मीय, आंतरजातीय तसेच परप्रांतीय विवाह करताना कुटुंबातून प्रखर विरोध होतो. मुलींना घरामध्ये कोंडून ठेवले जाते. ती शाळा-महाविद्यालयात शिकत असेल तर तिचे शिक्षणदेखील थांबवले जाते. तिचा विरोध डावलून आपल्या जाती-धर्मातील मुलाशी विवाह लावून दिला जातो. एखाद्या मुलीने असा विरोध झुगारून स्वतःच्या इच्छेने विवाह केला तर त्या मुलीस बऱ्याचदा आपल्या घरास कायमचे मुकावे लागते. प्रसंगी तिची हत्याही केली जाते. आज मात्र काही प्रमाणात यामध्ये शिथीलता आलेली असली तरी याचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे. मुलींना जोडीदार निवडताना अजूनही कुटुंबातील सदस्यांचा विचार करावा लागतो.

**८) श्रम विभाजन –**

हल्ली सर्वच समाजातील स्त्रिया घरातून बाहेर पडून अर्थार्जन करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. स्त्री अर्थार्जन करीत असताना कौटुंबिक जबाबदारी देखील पार पाडत असते. घरकामातून तिची सुटका नसते. यामुळे कुटुंबातील पुरुषापेक्षा तिला मानसिक आणि शारीरिक त्रास अधिक होतो. शारीरिक आणि मानसिक थकवा जाणवणे, शरीरातील रक्त कमी होणे, रक्तस्त्राव वाढणे, पाठ व कंबर दुखणे तसेच इतर अनेक आजारांना तिला सामोरे जावे लागते. स्त्री-पुरुषात आजही योग्य प्रकारे श्रमविभाजन झालेले नाही ही शोकांतिका आहे.

**९) आर्थिक स्वातंत्र्य नाही**

आज स्त्रिया कमवू लागल्या आहेत. मात्र त्यांच्या स्वतःच्या कमाईवर त्यांची मालकी असतेच असे नाही. अनेकवेळा त्यांची कमाई ही पतीच्या किंवा वडिलांच्या हवाली करावी लागते. तिच्या उत्पनातून घेतलेले घर वा इतर वस्तूवर तिचा अधिकार अथवा मालकी असतेच असे नाही. कमवती असूनही आर्थिकदृष्ट्या परावलंबित्व तिच्या वाट्याला आलेले असते. तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचा संकोच झालेला आहे.

**१०) कौटुंबिक हिंसाचार –**

अनेक कुटुंबाबतील पुरुष व्यसने करत असतात. कुटुंबप्रमुख म्हणून त्यांनी व्यसन करणे ग्राह्य धरले जाते. परंतु व्यसनामुळे कुटुंब उध्वस्त होत असते. दारू, मावा, सिगारेट, तंबाखू, जुगार ही व्यसने तर बहुतांश पुरुषांना असल्याचे आपण पाहत आहे. यातूनच कुटुंबातील स्त्रीला मानसिक, शारीरिक, लैंगिक तसेच आर्थिक त्रास दिला जातो. मारहाण केली जाते. आजदेखील मोठ्या प्रमाणावर महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडत आहेत. चार भिंतीच्या आत त्यांच्यावर अन्याय अत्याचार केला जात आहे. यात

त्यांनी स्वतःचा जीवही गमावला आहे. स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचाराला पायबंद घालण्यासाठी काही कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्याखालील प्रमाणे सांगता येतील.

१) कौटुंबिक हिंसाचारातून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू करण्यात आला आहे. या कायदान्वये एक वर्षाची कैद आणि २०,००० रुपये दंड होऊ शकतो.

२) भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ (अ) नुसार हुंडा किंवा अन्य हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली जाते.

३) महिला संघटनाची स्थापना करून स्त्री शक्तीद्वारे पीडित महिलांना मदत करता येते.

४) सरकार, अशासकीय संघटना, समाजसेवक, कार्यकर्ते यांच्या सहाय्याने महिला हिंसाचाराच्या विरोधात लोकांमध्ये प्रसारमाध्यमद्वारे जाणीवजागृती निर्माण केली जाऊ शकते. यासंदर्भात (बेल बजाओ) अशा प्रकारची योजना किंवा हेल्पलाईन नंबरवर फोन करणे असे उपक्रम राबवले आहेत.

५) सरकारने हुंडा प्रतिबंधक कायदा संमत केलेला आहे. हुंडा देण्या व घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींना ५ वर्ष कैद तसेच १५,००० रु. दंडाची शिक्षा होऊ शकते.

६) कलम ३०६ नुसार पतीने किंवा नातेवाईकांनी छळ करणे गुन्हा ठरतो.

७) कलम ४९८ (अ) नुसार पतीने किंवा त्याच्या नातेवाईकांनी विवाहित स्त्रीचा शारीरिक किंवा मानसिक छळ केल्यास २ वर्ष कैद व दंडात्मक शिक्षा होऊ शकते.

८) मुलींना उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून त्यांचा विवाह करणे.

९) १९५६ च्या कायद्यानुसार स्त्रीला कुटुंबाच्या मालमत्तेत वाटा देण्यात आला आहे.

१०) १९९१ च्या कायद्यानुसार गर्भवती स्त्रीला मुल नको असल्यास १२ आठवड्याच्या आत गर्भपात करवून घेता येतो.

११) १९५५-५६ च्या कायद्यानुसार बालविवाहास बंदी व पुनर्विवाह करता येतो.

१२) कलम १९ नुसार पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही व्यवसाय स्वातंत्र्य दिले आहे.

१३) कलम ४५ नुसार १४ वर्षापर्यतच्या सर्व मुलामुलींना मोफत शिक्षण दिले जाते. पालकांनी मुलींना शिकण्यास प्रोत्साहन द्यावे.

१४) कलम १४ ते १८ नुसार सर्वांना समतेचा हक्क आहे.

वरीलप्रमाणे कायद्याच्या माध्यमातून विविध उपाययोजनांच्या सहाय्याने महिला समस्यांची सोडवणूक करण्याचे तसेच महिलांवरील हिंसाचाराला प्रतिबंध घालण्याचे प्रयत्न केले गेलेले पहायला मिळतात.

**महाराष्ट्रातील महिला संघटनेचा इतिहास**

महाराष्ट्राला अनेक थोर महिला समाजसुधारकांची परंपरा लाभलेली आहे. सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, फातिमा शेख, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर यांनी महिला समाज सुधारणा घडवून आणण्यात मोलाचे योगदान दिले. यांच्यामुळेच महाराष्ट्रातील स्त्री चळवळ अधिक गतीमान होऊ शकली. मालिनी तुळपुळे, छाया दातार, लीला भोसले, कुमुद पोरे, सुलभा ब्रह्मे, सौदामिनी राव, निर्मला साठे यांच्या पुढाकाराने १९७९ मध्ये स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती (स्त्रीवादी महिला संघटनांची समन्वय समिती) ची स्थापना झाली. खालील मुद्यांच्या सहाय्याने महाराष्ट्रातील महिला संघटनेचा इतिहास समजून घेता येईल.

१) समाजवादी महिला सभेची (SMS) स्थापना १९५९ मध्ये लोकशाही समाजवादावर विश्वास असलेल्या महिलांनी केली होती. ही संस्था महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून बलात्कार, हुंडाबळी, निराधार महिलांच्या समस्यांवर काम करते.

२) पुरोगामी स्त्री संघटनेची स्थापना १९७७ मध्ये झाली. 'बायजा'- या द्विमासिकाचा जन्म झाला.

३) हमीद दलवाई यांनी १९७० मध्ये स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाची महिला शाखा मुस्लिम महिलांच्या प्रश्नांवर सक्रिय होती. १९८५ मध्ये 'तलाक मुक्ती मोर्चा' या आंदोलनाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. या आंदोलनाच्या तीन प्रमुख मागण्या होत्या. जुबानी चर्चा (शाब्दिक तलाक) बंद करा, मुस्लिम पुरुषांना दोन बायका ठेवण्यास मनाई करणारा कायदा लागू करा आणि मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार मिळालाच पाहिजे.

४) स्त्री मुक्ती संघटनेने १९७८ मध्ये आपला जाहीरनामा तयार केला. समाजातील अशिक्षित, मागासलेल्या वर्गात स्त्री मुक्तीचा विचार पोहोचवण्यासाठी सुरूवात केली. १९८९ पासून महिला कचरावेचकांच्या प्रश्नासाठी संघटना लढत आहे.

५) भारतीय समाजसेवकांनी जानेवारी १९७२ पासून फलटण तसेच महाराष्ट्र येथे प्रौढ साक्षरता वर्ग सुरू केले. स्वर्गीय संगीता क्षीरसागर यांनी तेथे जातविरोधी समितीची स्थापना केली. महिलांसोबत बैठका आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. रोजगार व समान मोबदला इत्यादी प्रश्नांवर महिलांनी एकत्र येण्याचा निर्णय घेण्यात आला.

६) विदर्भ मोलकरीण संघटनेची (विदर्भ घरेलू कामगार संघटना) स्थापना १९८० मध्ये डॉ. रूपा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने झाली.

७) पुण्यात डॉ. रूपा कुलकर्णी यांनी 'पुणे मोलकारीण संघटना' स्थापन केली. घरातील काम आणि कामगार यांना योग्य सन्मान देण्यात या संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

८) क्रांतिकारी महिला संघटनेची स्थापना १९८१ मध्ये डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या नेतृत्वाखाली सर्व क्षेत्रात महिलांच्या दुय्यम दर्जाविरुद्ध लढा देण्यासाठी आणि समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने करण्यात आली.

९) मार्च १९८० मध्ये डॉ. सीमा साखरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नागपुरात बलात्कारविरोधी मंच स्थापन केला. बलात्कार पीडितांनी त्यांचे मत मांडणे तसेच बलात्कार करणाऱ्यांना समाजात बहिष्कृत करणे यासारखे उपक्रम हाती घेण्यात आले.

१०) घटस्फोटित मुस्लिम महिलांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आणि महिला चळवळीच्या उद्दिष्टांवर चिंतन करण्यासाठी २८ ते ३० मार्च १९८१ या कालावधीत नागपुरात स्त्री अत्याचार विरोधी परिषद आयोजित करण्यात आली होती.

११) १९८२ मध्ये नारी समता मंचची स्थापना समविचारी महिला आणि पुरुषांनी (कै. सत्यरंजन साठे, विद्या बाळ) यांनी स्त्रियांच्या समान स्थितीसाठी केली. महिलांना निर्णय घेण्याची शक्ती देणे, स्त्रीवादी दृष्टिकोनातून प्रश्नांची मांडणी ही या स्वायत्त महिला संघटनेची काही मूलभूत मूल्ये आहेत. कौटुंबिक अत्याचाराची व्याप्ती आणि गुंतागुंतीचे स्वरूप लक्षात घेऊन मंच लैंगिक संवेदनशील समुपदेशन केंद्र चालवते.

१२) 'गर्भलिंग विरोध मंच' ऑक्टोबर १९८५ मध्ये समानतेवर विश्वास ठेवणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या गटाने स्थापन केला होता. यासाठी १९८६ मध्ये राज्यव्यापी मोहीम सुरू करण्यात आली, ज्याला मोठ्या प्रमाणात जनसमर्थन मिळाले.

१३) इंदुमती पाटणकर यांनी सप्टेंबर १९८६ मध्ये 'स्त्री मुक्ती संघर्षा'ची स्थापना केली. याद्वारे निर्धन महिलांना रेशनकार्ड मिळावे, कुटुंबप्रमुख व्हावे, निवारा मिळावा, तसेच सरकारी कार्यालयात आईची स्वाक्षरी ग्राह्य धरण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या.

१४) १९८४ मध्ये कोल्हापुरात 'महिला दक्षता समिती'ची स्थापना करण्यात आली. या समितीने हिंसाचाराच्या विरोधात तसेच महिलांची स्थिती सुधारण्यासाठी विधायक उपाययोजना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

१५) 'परित्यक्ता मुक्ती आंदोलन'ची स्थापना अधिवक्ता निशा शिरूरकर यांनी १९८७ मध्ये संगमनेर येथे केली. या आंदोलनात विविध जाती-वर्गातील स्त्री-पुरुष सहभागी झाले होते.

१६) १९८४ मध्ये स्थापन झालेले, 'स्त्री आधार केंद्र' (SAK) महिलांवरील हिंसाचाराच्या मुद्द्यांवर वकिलीद्वारे तळागाळातील महिलांच्या समस्या कमी करण्यासाठी काम करत आहे. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग, राजकीय सशक्तीकरण, शासन प्रक्रियेत सहभाग आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण ही प्रमुख उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१७) 'साद युवती' मंचची स्थापना १९८६ मध्ये पुण्यात विविध जाती आणि वर्गातील महाविद्यालयीन मुलींना लैंगिकता, कायदेशीर तरतुदी, आर्थिक स्वातंत्र्य याबद्दल जागरूक करण्यासाठी आणि सामूहिक कृतीसाठी करण्यात आली.

१८) 'पुरुष उवाच'ची स्थापना १९८७ मध्ये तरुण स्त्रीवादी पुरुषांनी केली होती. याचा उद्देश स्त्रियांवरील हिंसा पितृसत्ताक मूल्यांमध्ये अंतर्भूत असून त्याकडे केवळ स्त्रियांची समस्या म्हणून पाहिले जाऊ नये हा होता. पुरुष उवाच या अंकाद्वारे स्त्रियांच्या समस्यांवर लेखन केले जाते.

१९) डॉ. मनीषा गुप्ते आणि रमेश अवस्थी यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली 'मासुम' (महिला सर्वांगीण उत्कर्ष समिती) महिलांचे आरोग्य आणि घरगुती हिंसाचार या विषयांवर काम करत आहे.

२०) १९९३ मध्ये कोल्हापुरात प्रो. रूपा शहा यांनी 'दिलासा' संस्थेची स्थापना केली. कोल्हापुरातच मुस्लिम समाज प्रबोधन संस्थेची स्थापना झाली. तलाक पीडीत महिला उद्योगाची स्थापना १९८९ मध्ये झाली.

२१) १९८० च्या दशकात मुंबईतील दलित स्त्रीवाद्यांनी 'महिला संसद' स्थापन केली. १९९० च्या सुमारास संवादिनी दलित स्त्री साहित्य मंच (स्त्रीवादी दलित महिला लेखिकांचा मंच) उदयास आला.

२२) १९९५ मध्ये महाराष्ट्र दलित महिला संघटनेची स्थापना करण्यात आली. डिसेंबर १९९६ मध्ये चंद्रपूरमध्ये विविध दलित महिला संघटनांनी 'भारतीय विकास वंचित दलित महिला परिषद' आयोजित केली होती.

२३) 'नॅशनल फेडरेशन ऑफ दलित वुमन ची स्थापना १९९३ मध्ये करण्यात आली. जी धोरणात्मक पातळीवर दलित महिलांची परिस्थिती समजून घेण्यासाठी सामाजिक संशोधनात ही संस्था कार्य करते.

२४) महिला राजसत्ता आंदोलन महिलांसाठी एक अभियान आहे. मार्च २००० मध्ये पंचायतीराज संस्था (पीआरआय) मार्फत महिलांचे सक्षमीकरण आणि राजकीय प्रक्रियेत त्यांचा सहभाग बळकट करण्याच्या दृष्टिकोनातून ही संस्था स्थापना करण्यात आली.

२५) सर्वांसाठी समानता, लैंगिक न्याय्य आणि लोकशाही समाजाच्या निर्मितीच्या दिशेने कार्य करण्याच्या दृष्टीकोनातून 'अलोचना'ची स्थापना २००० मध्ये करण्यात आली. महाराष्ट्राच्या संदर्भात दस्तऐवजीकरण, संशोधन आणि प्रसार प्रक्रियेत पद्धतशीरपणे योगदान देणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

२६) महाराष्ट्रातील विविध महिला संघटनामार्फत स्त्रियांचा सामुदायिक आरोग्य, नाविन्यपूर्ण आरोग्य प्रशिक्षण, महिलांना सक्षम बनवणे, त्यांच्या आरोग्य परंपरांचे जतन करणे, विकास उपक्रमांद्वारे त्यांचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे.

२७) १९८० च्या दशकात मुंबईत कलाकार, मानवाधिकार कार्यकर्ते, सामाजिक शास्त्रज्ञ यांच्या गटाने 'मजलिस'ची स्थापना केली होती. 'मजलिस' महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी कायदेशीर मदत केंद्र चालवते.

वरील विविध मुद्यांच्या सहाय्याने महाराष्ट्रातील महिला चळवळ, संघटना, त्यांचा इतिहास तसेच त्यांचे विविध उद्देश याविषयी माहिती होण्यास मदत होते.

### ४.३.३ महाराष्ट्रातील सहकार चळवळ

महाराष्ट्र ही सहकार चळवळीची मातृभूमी म्हणून ओळखली जाते. प्राचीन काळापासून एकमेकांना मदत करणे म्हणजे सहकार मानले. हे मानवी संस्कृतीचे एक महत्त्वाचे अंग मानले जाते. ही मानवाची सहज व नैसर्गिक प्रवृत्ती आहे. यामध्ये व्यक्ती समाजाची आर्थिक तसेच सामाजिक उन्नती करण्यासाठी एकत्र येत असतात. हीच सहकाराची सुरवात असते. सहकार चळवळ महाराष्ट्रात रुजली आहे. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रातील प्रवरानगर येथे १९५० मध्ये उभारला गेला. सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम लागू करण्यात आले. ९७ व्या घटना दुरुस्तीला अनुसरून महाराष्ट्र सहकारी कायद्यात बदल करून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था दुरुस्ती कायदा २०१३ करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने २०१२ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय सहकारी' वर्ष म्हणून साजरे केले. यावेळी 'सहकारातून समृद्धीकडे' हा नारा देण्यात आला. महाराष्ट्राची सर्वाधिक प्रगती ही सहकारातून झालेली दिसते. 'विना सहकार नही उद्धार', 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' असे म्हणत सहकाराची चळवळ सुरू झाली. महाराष्ट्राचा तसेच देशाचा जास्तीत जास्त विकास सहकार चळवळीतून झालेला दिसून येतो.

**व्याख्या**

१) परस्परांच्या विश्वासाने, सहकार्याने व एकविचाराने काम करणे व त्यातून मिळणारा फायदा सर्वांना समान वाटून घेणे म्हणजेच सहकार होय. सहकारी चळवळ म्हणजे पूर्णपणे पारदर्शक व्यवहार होय.

२) समान आर्थिक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी, समान आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक व्यक्ती स्वच्छेने ज्या चळवळीत सामील होतात त्यास 'सहकार चळवळ' असे म्हणतात.

**सहकाराचा अर्थ**

तांत्रिकदृष्ट्या सहकार म्हणजे विशेष पद्धतीने व्यवसाय करण्याचा प्रकार. सहकार हा 'Co-Operation' या इंग्रजी शब्दाचा मराठी पारिभाषिक शब्द असून तो co-operari या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. Co याचा अर्थ 'सह' आणि Opereri याचा अर्थ 'काम करणे'. सहकाराची कल्पना मानवाच्या इतिहासाइतकी जुनी आहे. शिकारी अवस्थेपासून ते आधुनिक काळापर्यंतचा विचार केल्यास नैसर्गिक भावनेने व्यक्ती एकत्र येतात. अडीअडचणींच्या वेळी मदत करतात. एकमेकांच्या शेतीत सावड घालण्याची म्हणजेच मोबदला न घेता काम करण्याची पद्धती प्राचीन काळापासून भारतात प्रसिद्ध आहे. भारतातील खेड्यांमध्ये धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचा सहकार हाच आधार असल्याचे दिसून येते. सहकारामध्ये समान उद्दिष्ट, समान गरजा, सामूहिक प्रयत्न तसेच ऐच्छिक सहभाग हे वैशिष्ट्यपूर्ण घटक दिसून येतात. सहकार भांडवलशाही व समाजवाद यांना जोडणारा दुवा आहे. सहकारात

एक व्यक्ती एक मत असते. सहकारामध्ये नफा महत्वाचा नसून दुर्बल घटकांचे कल्याण महत्त्वाचे असते. लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देत नवे नेतृत्व विकसित करणारी चळवळ म्हणून सहकारी चळवळीकडे पाहिले जाते. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे पाटील, तात्यासाहेब कोरे इ. सहकार महर्षींच्या प्रयत्नातून महाराष्ट्रात सहकार चळवळ वाढीस लागली.

**सहकार चळवळीचे महत्त्व**

सहकार चळवळ ही समाजाच्या विकासासाठीची अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. सहकार ही मानवी समाजाची सहज प्रवृत्ती आहे. पुढील मुद्द्यांच्या आधारे सहकार चळवळीचे महत्त्व आपणास स्पष्ट करता येईल.

**१) एकसंघ समाजाची निर्मिती**

सहकार चळवळीमध्ये धर्माला, जातीला, पंथाला, वर्णाला, लिंगाला महत्व न देता सर्वांना समान मानले जाते. सहकारामध्ये स्वहितापेक्षा समूहाचे हित महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे समाजामध्ये एक सकारात्मक बदल होऊन त्यांच्यामध्ये समता, एकता, बंधुता, सलोखा आणि सामंजस्य वाढीस लागते. त्यातूनच एकसंघ समाजाची निर्मिती होण्यास मदत होते.

**२) शेती क्षेत्राचा विकास**

सहकाराची सुरुवात प्रामुख्याने शेतीला कर्ज पुरवठा करण्याच्या संदर्भाने सुरू झाली होती. सहकारी पतसंस्था, जिल्हा बँक, राज्य बँक आदी बँकांच्यामधून शेतीला कर्ज पुरवठा करण्यात येतो. हा कर्ज पुरवठा शेतीच्या नांगरणीसाठी, बी-बियाणांसाठी, खते, कीटकनाशके, पाईपलाईन, विद्युत पंप, शेतीला लागणारी इतर अवजारे या सारख्या भांडवलांच्या खरेदीसाठी केला जातो. कर्जावर अल्पसा व्याजदर आकारला जातो. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढीस लागून शेती क्षेत्राचा विकास होण्यास मदत होत असते.

**३) औद्योगिक क्षेत्राचा विकास**

लघुउद्योग, कुटिरउद्योग, लहान मोठे कारागीर एकत्र येऊन औद्योगिक सहकारी विकास संस्था स्थापन करून संस्थेच्या सभासदांसाठी लागणारा कर्जपुरवठा केला जातो. हा कर्जपुरवठा कच्च्या मालाची खरेदी, पक्क्या मालाच्या विक्रीची सुविधा, मशिनरी खरेदी, नवीन उद्योगांसाठी कर्ज आदी कारणांसाठी केला जातो. यातूनच लघु, कुटीर उद्योगांना चालना मिळून औद्योगिक क्षेत्राचा विकास होण्यास चालना मिळते. सहकारी सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी तेल गिरण्या आदी प्रक्रिया उद्योग देखील औद्योगिक सहकारी संस्थांच्या माध्यमातून कर्ज प्राप्त करून घेऊ शकतात. या संस्थांमुळेच औद्योगिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळत असते.

**४) मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती**

सहकारी साखर कारखाने, तेल गिरण्या, सूतगिरण्या लघुउद्योग, कुटिरउद्योग यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती या सहकार चळवळीच्या माध्यमातून होत असते. त्याचबरोबर शेतमजूर, ऊसतोड कामगार, वाहतूकदार, सेवा पुरवणारे व्यावसायिक, इतर छोटे मोठे अवलंबित व्यवसाय यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या यातून रोजगार मिळत असतो. कोणत्याही प्रकारच्या सहकारी संस्थेमध्ये दैनंदिन कामकाज चालवण्यासाठी मनुष्यबळाची गरज असते. येथेही रोजगार निर्मिती होत असते. अशा प्रकारे सहकार चळवळीच्या माध्यमातून रोजगाराची मोठ्या प्रमाणामध्ये निर्मिती होताना दिसते.

**५) मक्तेदारीवर नियंत्रण**

सहकार चळवळीमुळे सर्व प्रकारच्या मक्तेदारांचे नियंत्रण काही प्रमाणामध्ये कमी झाले. ग्रामीण भागामध्ये शेतकरी हे खाजगी सावकारांच्याकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घेत होते. सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेमुळे या खाजगी सावकारकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले. सहकारी ग्राहक संस्थांमुळे वस्तू वितरणातील मध्यस्थ आणि व्यापाऱ्यांची मक्तेदारी कमी झाली. मक्तेदारांच्या दुष्परिणांपासून ग्राहकांचे संरक्षण होण्यास मदत झाली. सर्व प्रकारचे मक्तेदार हे उत्पादक आणि ग्राहक यांचे शोषणच करीत होते. सहकारी चळवळीमुळे मात्र मक्तेदारांवर तसेच त्यांच्याकडून होणाऱ्या शोषणाला काही अंशी लगाम बसण्यास मदत झाली आहे.

**६) नफ्याचे समान व न्याय वाटप**

सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून जो नफा राहत असतो, त्या नफ्याचे सर्व सभासदांच्यामध्ये समान आणि न्याय पद्धतीने वाटप केले जाते. सर्व सभासदांची त्या संस्थेवर असणारी मालकीही समान पद्धतीची असते. त्यामुळे होणारा नफा देखील समान पद्धतीचाच असतो. हे सहकार चळवळीचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. नफ्याचे वाटप समान आणि न्याय पद्धतीने झाल्याने सभासदांची आर्थिक उन्नती होण्यास हातभार लागतो.

**७) स्वसामर्थ्याची जाणीव**

सहकार चळवळीमुळे व्यक्ती हा कोणतेही काम अगदी सहजरित्या करू शकतो. याचे कारण म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या मदतीसाठी त्या संबंधित संस्थेतील सर्व सभासद तयार असतात. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती परस्पर सहकार्याने एकत्र येऊन स्वतःचे संरक्षण करू शकतात. त्यांच्यामध्ये स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होऊन ते अन्याय, अत्याचार व शोषण करणाऱ्या विरुद्ध लढा देऊ शकतात. या चळवळीमुळे आत्मविश्वास वाढून संघटन, सहकार्य, तसेच व्यवस्थापन कौशल्य इ. गुणांचा विकास होतो. व्यक्तीमध्ये स्वसामर्थ्याची जाणीव होते.

**८) खरेदी शक्तीत वाढ**

एका व्यक्तीपेक्षा संस्था मोठी असते. सहकारी संस्था त्यांच्या सभासदांना चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा योग्य किमतीत करू शकतात. योग्य किमतीत वस्तू मिळाल्याने सभासदांच्या पैशाची बचत होते. त्यामुळे सभासदांची क्रयशक्ती वाढण्यास मदत होते.

### ९) मध्यस्थांचे उच्चाटन

सहकारी संस्था थेट उत्पादकांच्याकडून माल अथवा वस्तू खरेदी करून आपल्या ग्राहकांना देत असतात. त्यामुळे मध्यस्थ, व्यापारी, एजंट यांचा हस्तक्षेप संपुष्टात येतो. यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होऊन वस्तूच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये फरक पडत असतो. व्यापाऱ्यांच्या नफेखोरी, भेसळ, वस्तूची कृत्रिम टंचाई, आर्थिक शोषण या अनिष्ट प्रवृत्तींना सहकारी संस्थांच्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये आळा बसला आहे.

### १०) लोकशाही शिक्षण

सहकारी संस्थांचे कामकाज हे लोकशाही पद्धतीने चालते. सभासदांच्या सर्वसाधारण सभेला सर्वोच्च अधिकार असतात. सहकारी संस्थेचे सर्व नियम सभासदांच्या सभेत लोकशाही पद्धतीने सर्वानुमते घेतले जातात. 'एक व्यक्ती एक मत' या नियमाद्वारे सहकारी चळवळीचे कामकाज चालते. यामधूनच सभासदांना लोकशाहीचे शिक्षण मिळते. त्यामुळे लोकशाही बळकट होण्यास मदत होते.

वरील विविध मुद्यांच्या सहाय्याने सहकार चळवळीचे महत्त्व लक्षात येण्यास मदत होते.

### सहकार चळवळीची वैशिष्ट्ये

**१) व्यक्तींचे संघटन :** समाजामध्ये एका व्यक्तीचे उत्पन्न हे मर्यादित स्वरूपाचे असते. व्यक्ती आर्थिकदृष्ट्या देखील मर्यादितच असते. सहकारी संस्थांच्या माध्यमातून ज्यावेळी अनेक व्यक्ती एकत्र येतात त्यावेळी त्यांचे उत्पन्न हे नैसर्गिकरित्या वाढत असते. 'प्रत्येक जण सर्वांसाठी व सर्वजण प्रत्येकांसाठी' या पद्धतीने सहकारी संस्थांच्यामध्ये काम होताना दिसते. सहकारी संस्थांचे मालक हे त्या संस्थेतील सर्व सभासद असतात. सहकारी संस्थांना भांडवलापेक्षा सभासद महत्त्वाचा घटक असतो. सहकार चळवळ ही अनेक व्यक्तींचे संघटन असते.

**२) ऐच्छिक संघटन :** सहकार चळवळीमध्ये सभासदत्व हे ऐच्छिक स्वरूपाचे असते. धर्म, जात, लिंग, पंथ किंवा आर्थिक परिस्थिती याचा विचार संस्थेचे सभासद होताना केला जात नाही. सहकारी संस्थेचे सभासद होणे अथवा सभासदत्व रद्द करणे याबद्दल संस्थेच्या सभासदावर अथवा व्यक्तींवर कोणत्याही प्रकारचा दबाव असत नाही. सहकारी संस्थेचे संघटन हे पूर्णतः ऐच्छिक स्वरूपाचे असते.

**३) समान उद्दिष्टः** समान गरजा असणारे अनेक सभासद एकत्र येऊन एका समान उद्दिष्टासाठी सहकारी संस्थेची स्थापना करीत असतात. ऊस उत्पादन घेणारे सर्व उत्पादक शेतकरी एकत्र येऊन सहकारी साखर कारखाना स्थापन करीत असतात. घरांची गरज असणारे सर्व लोक एकत्र येऊन गृहनिर्माण संस्थेची स्थापना करत असतात. अशा प्रकारचे समान उद्दिष्ट असणारे सभासद एकत्र येऊन सहकारी संस्था अथवा चळवळ चालवत असतात.

**४) लोकशाही संघटन :** सहकारी चळवळीमध्ये लोकशाहीचे महत्त्व हे अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. किंबहुना ही चळवळ लोकशाहीवरतीच आधारित असते. सहकारी संस्थांमध्ये एक व्यक्ती एक मत या तत्त्वानुसार कामकाज चालत असते. सहकारामध्ये भांडवलापेक्षा व्यक्तीला महत्त्व दिले जाते. सहकारी संस्थेचा कारभार हा सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाकडून लोकशाही पद्धतीने केला जातो.

**५) समानता :** सहकारी संस्थेमध्ये सभासद करत असताना त्या सभासदाची जात, लिंग, पंथ, धर्म आदी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. सर्व सभासद हे सामाजिक दृष्टिकोनातून समान पातळीवरील आहेत असे समजून त्यांना सभासद केले जाते. सहकारी संस्थेमध्ये कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसतो. सर्व सभासदांना समान दर्जा, समान हक्क, तसेच समान अधिकार बहाल केलेले असतात.

**६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे एकत्रीकरण :** आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणारी व्यक्ती स्वबळावरती स्वतःची आर्थिक प्रगती करू शकेलच असे नाही. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती सहकारी संस्थेच्या माध्यमातून एकत्र येऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करीत असतात. सहकारी संस्थेच्या माध्यमातून भांडवलदार, व्यापारी, दलाल व अन्य लोकांच्याकडून होणारे आर्थिक शोषण तसेच पिळवणूक यांचा सामना सामूहिक पद्धतीने केला जातो. आपल्या आर्थिक हितसंबंधाचे एकत्रितरित्या संरक्षण केले जाते.

**७) सेवा उद्देश :** सहकारी संस्थेचा प्रमुख उद्देश हा आपल्या सभासदांना सेवा पुरवणे हा असतो. नफा मिळवणे हा सहकारी संस्थांचा गौण उद्देश असतो. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वानुसार अनेक सहकारी संस्था कार्यरत असतात. किमान खर्चात चांगली सेवा सभासदांना मिळवून देणे हे संस्थेचे उद्दिष्ट असते. संस्थेला आर्थिक नफा झाल्यास चांगली सेवा देण्यासाठी त्याचा वापर केला जातो.

**८) परस्पर सहाय्यातून स्वसहाय्यः** सहकारी संस्थांच्यामधून परस्परांना सहाय्य करणे ही नैसर्गिक भावना सभासदांच्यामध्ये असते. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' यानुसार सभासद एकमेकांना मदत करीत असतात. ही मदत करीत असतानाच स्वतःचे देखील आर्थिक हित जोपासण्याचे काम होते. सुलभ हप्त्याने वा कमी व्याजदराने सभासदांना दिलेले कर्ज हे एक प्रकारचे आर्थिक सहाय्यच असते.

**९) मध्यस्थांचे उच्चाटन :** अनेक ठिकाणी मध्यस्थामार्फतच वस्तूंची अथवा सेवांची खरेदी विक्री होताना आपण पाहतो. सहकारी संस्थांच्यामध्ये मात्र मध्यस्थांना अजिबात स्थान दिले जात नाही. व्यापारी तसेच दलाल यांचे समूळ उच्चाटन सहकारी संस्थांच्या माध्यमातून केले जाते. सहकारी संस्था उत्पादकांकडून माल अथवा वस्तू खरेदी करून थेट ग्राहक अथवा सभासदांना वितरित करत असल्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत होते.

**१०) आर्थिक व सामाजिक चळवळ :** सहकारी संस्थेतील आर्थिक दुर्बल घटक स्वतःचा व परस्परांचा विकास साधण्यासाठी सहकारी संस्थेची स्थापना करत असतात. सहकारी संस्थांची जितकी वाढ व प्रगती होईल तितक्या प्रमाणात सभासदांची होणारी पिळवणूक व आर्थिक शोषण थांबेल. श्रीमंत आणि गरीब

यांच्यामधील आर्थिक विषमता नष्ट होऊन समानता निर्माण होण्यास सहकारी चळवळीची मदत होईल. समता आधारित समाजरचना तयार होईल. आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट होईल. सहकारी चळवळ समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे तसेच भविष्यातही ठरेल.

सर्व व्यावसायिक संघटना नफा मिळवण्याच्या मुख्य उद्देशानेच कार्यरत असतात. भांडवलाला अधिक महत्त्व देतात. सहकारी चळवळी भांडवलाला महत्त्व न देता सभासदांच्या हिताला महत्त्व देतात. सहकार चळवळीमध्येदेखील व्यावसायिक संघटना आहेत. तिचा हेतू केवळ नफा मिळवणे नसून सेवा देणे व सभासदांचे हित जोपासणे असतो.

वरील विवेचनावरून महाराष्ट्रातील सहकार चळवळीची वैशिष्ट्ये समजण्यास मदत होते.

### ४.३.४ महाराष्ट्रातील दलित चळवळ :

महाराष्ट्राला फुले, शाहू, आंबेडकर यांची कर्मभूमी मानली जाते. यांच्या समतावादी विचारामुळेच महाराष्ट्र राज्य पुरोगामी म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील किंबहुना भारतातील समाज व्यवस्था ही जाती आधारित समाज व्यवस्था होती. शूद्र समजल्या जाणाऱ्या जातींना अनेक संकटांचा सामना करत आपले जीवन जगावे लागत होते. अनेक समाजसुधारकांनी दलित उद्धारकाची भूमिका पार पाडत येथील दलित समाजाला सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे दलित उद्धारासाठी अर्पण केलेले आहे. त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच आज दलित समाजाला सन्मानाची वागणूक मिळत आहे. परंतु काही ठिकाणी आजदेखील जातीयवाद मोठ्या प्रमाणामध्ये आपले डोके वर काढताना दिसतो. विविध सामाजिक संघटना या जातीयवादाचा, दलित अन्याय व अत्याचाराचा सामना करताना दिसतात. मोर्चे, आंदोलने, निदर्शने आदिच्या माध्यमातून दलित चळवळ महाराष्ट्रात कार्यरत असलेली पहायला मिळते.

**दलित चळवळीची व्याख्या व अर्थ:**

दलित चळवळ ही प्रामुख्याने पददलित आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांची चळवळ आहे. या वर्गावर झालेल्या अन्यायातून ही चळवळ उभी राहिलेली दिसते. दलित हा शब्द चातुर्वर्णाशी निगडित आहे. चातुर्वर्णरुपी जात्यात भरडले किंवा जात असलेले पददलित म्हणजे दलित. हा शब्दप्रयोग सर्वप्रथम महात्मा फुले यांनी उपयोगात आणला होता. दलित चळवळीचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी त्याच्या व्याख्या पाहू.

**व्याख्याः**

१) **डॉ. म. ना. वानखेडे-** यांच्या मते, ''दलित म्हणजे केवळ नवबौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले गेलेले सर्व श्रमजिवी आहेत ते पददलित आहेत.''

२) **मार्क्सवादी विचारवंतांच्या मते-** 'दलित चळवळ म्हणजे भारतातील जातीविरहित समाजाची रचना प्रस्थापित करणारी चळवळ होय.'

३) **एन. त्रिपाठी**– 'समाजातील दबाव व नियंत्रण यापासून मुक्त व्हावे म्हणून जो सतत मार्ग शोधतो त्या विषयाची चळवळ म्हणजे दलित चळवळ होय'.

४) **न्यू कास**– यांच्या मते, जातीच्या ऐतिहासिक प्रभुत्वाच्या विरोधात उभी राहणारी, सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी, नवीन साहित्य, संस्कृती आणि बांधिलकी निर्माण करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

भारतीय समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेत सर्वात शेवटचा वर्ग हा शुद्र होता. या वर्गावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध जी चळवळ उभी राहिली तिलाच 'दलित चळवळ' असे म्हटले जाते. १९ व्या शतकातील व्यक्तिस्वातंत्र्य व समानता मूल्य प्रमाण मानून समाजातील सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात समाज परिवर्तनासाठी सुरू केलेली चळवळ म्हणून या चळवळीचा विचार करता येईल. या चळवळीच्या माध्यमातून दलित वर्गाच्या हिताचा विचार करणे हीच प्रमुख भूमिका होती. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाप्रमाणेच दलित चळवळ महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्थित्यंतर घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण मानली जाते.

**दलित चळवळीच्या उदयाची कारणे:**

**१) तत्कालीन सामाजिक स्थिती:** तत्कालीन समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्गात विभाजन झाले होते. या व्यवस्थेतून सामाजिक विषमता निर्माण करणारी व्यवस्था निर्माण केली. वर्णव्यवस्थेने कनिष्ठ वर्गावर अनेक बंधने लादली होती. दुसऱ्या वर्णाचा व्यवसाय करण्यास बंदी होती. व्यवसाय व विवाह कोणी कोणाशी करावा याविषयी बंधने होती. शेवटचा वर्ण हा शूद्र वा अस्पृश्य मानला गेला होता. त्याला कोणत्याही प्रकारचे सामाजिक वा धार्मिक अधिकार नव्हते.अस्पृश्यांना गावात फिरणे, सार्वजनिक विहिरी व तलावाचा वापर न करणे तसेच मंदिरात प्रवेश करण्यावर बंदी लादली होती. संपत्ती, ज्ञान, चांगले व्यवसाय आणि शिक्षणापासून या समाजाला दूर ठेवले होते. अशा अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात दलित समाजाची चळवळ उभी राहिली.

**२) पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार:** ब्रिटीशानी शासन चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कारकून वर्गाच्या निर्मितीसाठी भारतात शिक्षणाची सोय केली. इंग्रजी शिक्षण हे आधुनिक जगात प्रवेश करण्यासाठी आवश्यक मार्ग होता. भारतातील तरुण वर्ग या शिक्षणाकडे आकर्षित झाला होता. या शिक्षणातून भारतीयांना आपल्या हक्काची व कर्तव्याची जाणीव होऊ लागली. ब्रिटिशांनी सर्वांसाठी शिक्षण या धोरणामुळे समाजव्यवस्थेने नाकारलेल्या दलितांनाही शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणातून आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव दलित समाजाला झाली. परिणामी दलित समाज एकत्र येऊन अन्याय-अत्याचारला विरोध करू लागला. पाश्चिमात्य शिक्षणामुळे दलित चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

**३) ब्रिटिश राजवटीचा परिणाम:** महाराष्ट्रातील महार समाज सैन्यात मोठ्या प्रमाणात होता. त्यांच्या अंगात असलेल्या लढाऊपणाची कल्पना कंपनी सरकारला असल्याने पेशवाईचा पराभव करण्यासाठी त्यांनी

या समाजाचा उपयोग केला. ब्रिटिश सैन्यात महार समाजाची भरती मोठ्या प्रमाणात झाली. सैन्यातील नोकरीमुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत थोडीफार सुधारणा झाली. हा समाज ग्रामीण व्यवस्थेशी जोडलेला होता. परंतु ब्रिटिश सैन्यात भरती, सैन्यातील शिस्त तसेच लढाऊ वृत्ती याचा सकारात्मक परिणाम या समाजावर झाला. महायुद्ध काळातील ब्रिटिश सरकारला मोठे सैन्य उभारणे आवश्यक होते. अशा वेळी भारतातील दलित समाजाचा यात मोठा भरणा करण्यात आला. महायुद्धाच्या निमित्ताने दलित लोकांना परदेशात जावे लागले. तेथील संस्कृती, ज्ञान, आचार-विचार, राहणीमान याची प्रचिती आली. भारतात येऊन आपल्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांनी संघर्ष सुरू केला. ब्रिटिश राजवटीच्या प्रभावामुळे दलित चळवळीच्या उदयाला चालना मिळाली.

**४) सुशिक्षित मध्यमवर्गाचा उदय:** शिक्षण हे आधुनिक युगामध्ये प्रवेश करण्याचे द्वार आहे. सुरुवातीला ब्राम्हण वर्गाने शिक्षणाचा फायदा उचलून ब्रिटिश सरकारच्या पदरी नोकऱ्या मिळवल्या. या वर्गाचे अनुकरण करून ब्रिटिश सरकारने चालविलेल्या शिक्षण संस्थेतून बहुजन समाज सुशिक्षित होऊ लागला. या बहुजन समाजाने ब्राह्मणेतर चळवळ सुरू केली. बहुजन समाजातील नेत्यांनी दलित समाजातील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. दलित समाजातील तरुणांनी शिक्षणाचा फायदा घेऊन नोकऱ्या मिळवल्या. शिक्षण प्रसारामुळे नवीन मध्यमवर्गाचा उदय झाला. स्वातंत्र्योत्तर काळात मध्यमवर्गीय लोकांची संख्या वाढत गेली परिणामी जातीपातीच्या भिंती कोसळू लागल्या. दलितांच्या प्रश्नांना वाचा फुटली.

**५) समाजसुधारकांचे कार्य:** इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांना आपल्या समाजातील दोष, वाईट रूढी, परंपरा याचा तिरस्कार वाटू लागला. समाजातील वाईट चालीरीती दूर करण्यासाठी महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक पुढे आले. यामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी समाजसुधारकांची नावे सांगता येतात. या सर्व समाजसुधारकांनी जे कार्य केले त्यातून दलित चळवळीच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली.

**६) ब्राह्मणी वर्चस्व:** समाजातील निरनिराळ्या जातीमध्ये ब्राह्मणांना सर्वोच्च स्थान प्राप्त झाले होते. त्यांना अनेक प्रकारचे विशेषाधिकार बहाल केले गेले होते. शिक्षण व ज्ञानाचा अधिकार ब्राह्मणांना होता. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात तसेच शासन व्यवस्थेत उच्चपदे फक्त ब्राह्मण लोकांना दिली जात असत. समाजातील सर्व सन्मानाच्या पदावर ब्राह्मणवर्गाची मक्तेदारी निर्माण झाली होती. या मक्तेदारीच्या जोरावर हा वर्ग इतर वर्गांची विशेषतः शूद्र वर्गांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक करत होता. ब्राह्मण वर्गाकडून होणारी पिळवणूक आणि अन्याय अत्याचाराला विरोध करण्यासाठी दलित चळवळ सुरू झाली.

**डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ:** दलित चळवळीच्या कार्याचा विचार करताना तिचा प्रारंभ १८५० पासून लक्षात घेतला तर जवळजवळ १४० वर्षापासून चालत आलेल्या दलित चळवळीचे चार टप्पे दिसतात. त्यातील आंबेडकरपूर्व दलित चळवळीचे दोन टप्पे सांगता येतात. पहिल्या टप्प्यात १८५०-१९०० पर्यंतचा पहिला कालखंड, यामध्ये महात्मा फुले आणि इतर समकालीन दलितेत्तर समाजसुधारकांनी दलित मुक्तीसाठी

केलेले प्रयत्न होय. १९०० ते १९२४ पर्यंतच्या द्वितीय कालखंडात दलित समाजातील लोकांनी केलेले प्रयत्न सांगता येतात. आंबेडकरपूर्व दलित चळवळीचे कार्य व स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) डॉ. आंबेडकरपूर्व दलितेत्तर समाजसुधारकांचे कार्य:**

१८५० सालापासून ते आंबेडकरांच्या उदयापर्यंत दलितेत्तर समाजातील लोकांनी दलितांसाठी केलेल्या कार्याचा विचार करता येईल. यामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, न्या.रानडे, आगरकर, गोपाल कृष्ण गोखले, वि.रा.शिंदे इ. समाजसुधारकांची नावे सांगता येतात. या सर्वांनी दलितांना शिक्षणाचा हक्क आणि सोयी उपलब्ध करून देण्यासाठी अविरत प्रयत्न केले. दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वसतीगृहाची सोय केली. दलित समाजाला शिक्षण देऊन या समाजाला अंधश्रद्धा व अज्ञानातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दलित समाजाला जागृत करण्याचे काम समाजसुधारकांनी केले. त्यातील प्रमुख समाजसुधारकांचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) महात्मा जोतीराव फुले:** अस्पृश्यतेच्या प्रश्नाला निव्वळ प्रश्न न मानता तो सोडवण्यासाठी संपूर्ण समाजाची पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे, हा विचार सर्वप्रथम महात्मा फुल्यांनी मांडला. समग्र परिवर्तनाशी स्त्री आणि शुद्रातिशूद्रांची गुलामगिरीपासून मुक्ततेची कल्पना मांडली. त्यांनी ब्राह्मणी व्यवस्थेने निर्माण केलेल्या देव, धर्म, अनिष्ट रूढी आणि शोषणाचे मार्ग नाकारले. स्त्रिया आणि शूद्र यांनी विद्येची कास धरून आर्थिक आणि मानसिक पिळवणूकीपासून सुटका करून घ्यावी यासाठी प्रयत्न केले. १८५१ साली पुण्यातील नाना पेठेत पहिली अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. १८५३ मध्ये 'महार मांग इत्यादी लोकांस विद्या शिकवण्यासाठी मंडळी' नावाची संस्था सुरू केली. मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेत अस्पृश्य मुलींना प्रवेश दिला. १८६८ मध्ये आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी १८७७ साली कृष्णराव भालेराव यांच्या मदतीने 'दीनबंधू' हे साप्ताहिक काढले. ब्राह्मणी कर्मकांड व धर्माचे प्रस्थ कमी करण्यासाठी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. अस्पृश्य हे येथील मूळ रहिवासी असून परकीय आर्यभटाने त्याना पराभूत करून अस्पृश्यता लादली ही उत्पत्ती त्यांनी मांडली. अस्पृश्य मुलांसाठी शाळा तसेच वसतिगृह काढून त्यांना विद्येची कास धरण्याचे आवाहन केले. फुल्यांच्या कार्यामुळे अस्पृश्यांना प्रेरणा मिळाली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरु मानले आहे.

**२) सयाजीराव गायकवाड:** बडोदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड हे परिवर्तनवादी राजे होते. त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यतेविरुद्ध कायदा केला. त्यांनी बहुजन व अस्पृश्यता वर्गात शिक्षण प्रसार घडवून आणण्यास प्राधान्य दिले. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह तसेच वाचनालये सुरू केली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या व पारितोषिके सुरू केली. पुरोहितशाहीविरुद्ध पर्यायी विधीव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राज्यात अस्पृश्यांना मिळणाऱ्या उदार वागणुकीमुळे त्या राज्यात अनेक अस्पृश्यांनी उदरनिर्वाहासाठी वास्तव्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिका व इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी पाठवले. शिक्षण संपल्यानंतर आपल्या संस्थानात नोकरी दिली. मार्च १९१८ साली मुंबई येथे

भरलेल्या अस्पृश्य निवारण परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी होणाऱ्या सर्व प्रयत्नांना सहकार्य केले. अस्पृश्यता निवारण, विधवाविवाह, मिश्र विवाह, प्राथमिक शिक्षण सक्तीचे या संबंधीचे कायदे केल्यामुळे पुरोगामी विचारसरणीचा कर्तृत्ववान राजा म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

**३) शाहू महाराजः** शाहू महाराजांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. महाराजांनी हिंदू धर्मातील ब्राह्मणांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी करवीर येथे क्षात्र जगद्‌गुरूपिठाची निर्मिती करून मराठा व्यक्तीला क्षात्रजगद्‌गुरू म्हणून नेमले. प्रत्येक जातीच्या लोकांसाठी वसतिगृह सुरू केले होते.सन १९०८ मध्ये अस्पृश्यांसाठी 'मिस क्लार्क होस्टेल' सुरू केले. 'माणगाव' येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या पहिल्या परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. दलितांचा नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाठिंबा दिला. बाबासाहेबांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. 'मूकनायक' वर्तमानपत्र उभारणीस सहाय्य केले. याशिवाय अनेक अस्पृश्य समाजातील लोकांना आर्थिक मदत केली. आपल्या संस्थानातील पन्नास टक्के जागा मागासलेल्या जातीसाठी राखीव ठेवल्या. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता विरोधी कायदा अंमलात आणला. महार वतने रद्द करून त्या जमिनी त्यांनी अस्पृश्यांच्या नावे करून दिल्या. वेठबिगारी पद्धतीची कामे करून घेण्यास बंदी घातली. अस्पृश्यांना सर्व ठिकाणी समानतेची वागणूक मिळावी म्हणून आदेश काढला. अस्पृश्यांना व्यवसाय व नोकरी मिळवण्यासाठी सहकार्य केले.

**४) विठ्ठल रामजी शिंदेः** अस्पृश्य वर्गाची स्थिती सुधारावी म्हणून महर्षी वि.रा.शिंदे यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांच्या दलित्तोधाराच्या कार्यास सयाजीराव गायकवाड आणि प्रार्थना समाजाचे सहाय्य लाभले. बडोदा, पुणे, बेळगाव, मुंबईतील अस्पृश्यांच्या शिकत असलेल्या मुलांची पाहणी करून सुधारणा घडवून आणण्यासाठी अहवाल तयार केला. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिस्प्रेड क्लास मिशन' सोसायटी या संस्थेची मुंबई येथे स्थापना केली. या संस्थेचा उद्देश अस्पृश्य समाजात शिक्षणप्रसार करणे, अस्पृश्यांना नोकरीत संधी निर्माण करणे, त्यांच्या अडचणीचे निवारण करणे आणि अस्पृश्य बांधवांना खऱ्या धर्माची शिकवण देणे हा होता. त्यांनी त्या संस्थेमार्फत एलफिस्टन रोडवर पहिली शाळा सुरू केली. या संस्थेने मुंबई इलाख्यात वऱ्हाड प्रांतात शाळा सुरू केल्या. अस्पृश्य मुलांसाठी शाळा, वसतिगृह, शिवण वर्ग, प्रबोधनपर व्याख्याने, किर्तने आयोजित करून अस्पृश्यांच्या प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांची लष्करी भरतीवरील बंदी उठवावी यासाठी प्रयत्न केले. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजुरीसाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांसाठी शिक्षणाच्या सोयी केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे अस्पृश्यांच्या प्रश्नांसंबंधी तत्कालीन समाजात जाणीवजागृती होऊ लागली. मिशनरी पद्धतीने अस्पृश्यता कमी करणे आणि त्यांच्या हक्कांविषयी जाणीव विकसित करणे हा महर्षी शिंदे यांचा प्रयत्न होता.

**ब) डॉ. आंबेडकर पूर्व दलित समाजसुधारकांचे कार्यः**

दलितेत्तर समाजातील लोकांनी केलेल्या कार्याने प्रभावित होऊन काही दलित समाजातील सुधारकांनी १९००ते १९२४ या कालखंडात समाज उद्धाराच्या कार्याला सुरुवात केली. यात खालील समाजसुधारकांचा समावेश होता.

**१) गोपाळबुवा वलंगकर :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात गोपाळबुवा वलंगकर यांनी दलित समाजात समाजजागृतीचे कार्य केले. दलित चळवळीतील प्रथम नेता व समाजसुधारक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. त्यांनी १८९० मध्ये 'अनार्य दोष परिहार' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत अस्पृश्यामध्ये सामाजिक कार्य सुरू केले. किर्तनाच्या माध्यमातून अस्पृश्यामध्ये जनजागृती केली. सुधारक आणि दीनबंधू वर्तमानपत्रात लेख लिहून आपले विचार मांडले. 'विटाळ विध्वंसन' हे पुस्तक लिहून जातिभेद व अस्पृश्यतेसंबंधी अनेक प्रश्न उपस्थित केले. सैन्यामध्ये अस्पृश्य समाजातील लोकांच्या भरतीवर ब्रिटिशांनी बंदी घातली होती. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून दीर्घकाळ संघर्ष केला. दलितांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे.

**२) शिवराम जानबा कांबळे:**

शिवराम जानबा कांबळे यांनी पुणे शहरात अस्पृश्य उद्धाराची चळवळ चालवली. अस्पृश्यांना शिक्षणाची सोय व्हावी, सैन्य, पोलीस दल आणि सरकारी नोकरीत संधी मिळावी म्हणून चळवळ उभारली. १९०४ मध्ये 'श्री. शंकर प्रसादिक सोमवंशीय हितचिंतक' संस्थेची स्थापना केली. 'श्री सच्चिदानंद वाचन गृह' सुरू केले. 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरू केले. 'महार विद्यार्थी संस्था' स्थापन केली. शिक्षणाची गरज असलेल्या अस्पृश्य विद्यार्थ्यांना मदत मिळावी हा या संस्थेचा उद्देश होता. तसेच मुरळी प्रथेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला.

**३) किसन फागुजी बंदसोडे :**

किसन फागुजी बंदसोडे यांनी वऱ्हाड प्रांतात अस्पृश्य उद्धारासाठी कार्य केले. बंदसोडे यांनी चोखामेळा कन्याशाळा सुरू केली. अनेक विद्यार्थी वसतीगृहे काढली. सामाजिक परिषदा भरवणे, गावोगावी फिरून आत्मोधाराची भावना जागृत करणे इ. कार्य केले. त्यांनी विपुल लेखन करून मराठी मुलुखातील महार समाजात स्वाभिमान जागवण्याचे काम दलित चळवळीच्या माध्यमातून केले. त्यांनी अनेक सामाजिक संस्था, संघटना, शाळा तसेच वसतिगृह निर्माण करून समाजजागृतीचा प्रयत्न केला.

**दलित चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळे त्यांना बालपणापासून अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. १९१७ साली इंग्लंड मधून शिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांनी बडोदा संस्थानात नोकरी सुरू केली. त्यांना अस्पृश्य जातीमुळे नोकरीच्या ठिकाणी इतरांकडून अपमानास्पद वागणूक मिळाली. त्यामुळे त्यांचे मन पेटून उठले. त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन अस्पृश्य बांधवांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्यास, आपल्या जाती बांधवांना हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्यात आणि त्यांच्यात स्वाभिमान जागृती करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. दलितांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनाने 'मूकनायक' हे मासिक सुरू केले. त्यानंतर 'जनता व प्रबुध्द भारत' ही वर्तमानपत्रे सुरू केली. त्यांनी Caste in India, Thoughts on Pakistan, Untouchables,

Buddha and His Dhamma, Who Were Shudras, States and Minorities इ. ग्रंथ लिहून दलित प्रश्नांना वैचारिक चौकट प्राप्त करून दिली. दलितांमध्ये आत्मभान व स्वाभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांनी दिलेल्या योगदानाचा विचार करता त्यांचा 'महामानव' म्हणून गौरव केला जातो. दलित चळवळीतील त्यांचे योगदान पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) बहिष्कृत हितकारणी सभा:** अस्पृश्यांचा आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारणी सभेची' स्थापना केली. या संस्थेचे ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हे ब्रीदवाक्य होते. या संस्थेमार्फत अस्पृश्य समाजात समाजसुधारणा, जनजागृती आणि शिक्षण प्रसारावर भर देण्यात आला. दलित समाजातील तरुण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रशाळा व वाचनालये या संस्थेने चालवली. दलित समाजात जागृती घडवून समाजाची सामाजिक तसेच आर्थिक परिस्थिती सुधारणे हा या संस्थेचा उद्देश होता.

**२) समता सैनिक दल:** १९२६ मध्ये बाबासाहेबांनी दलित शोषितांची एक गैर राजकीय व सांस्कृतिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. त्यामुळे दलित तरुणांना शिक्षण, अनुशासन व आत्मनिर्भरता या शक्तीचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली. 'शीलावर आधारित शक्ती' असे बोधवाक्य देऊन समता दलाच्या माध्यमातून दलित तरुणांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक सामर्थ्य उंचवण्यास प्रारंभ केला. युवकांचे ऐक्य, कल्याण आणि उत्कर्षासाठी ही संस्था कार्य करत होती.

**३) महाडचा सत्याग्रह:** महाड गावातील तळे नगरपालिकेने ठराव करून सर्व जातीधर्मांच्या लोकांसाठी खुले केले होते. परंतु सवर्णांच्या भीतीने अस्पृश्य लोक तलावावर पाणी भरण्यासाठी जात नसत. या अन्यायाविरुद्ध बाबासाहेबांनी महाडचा लढा उभारला. अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटित करून २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करून घेतले. महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे हे आपल्या कृतीने पटवून दिले. अस्पृश्य आपले हक्क स्वबळावर मिळवतील असा इशारा या चळवळीच्या माध्यमातून दिला.

**४) मनुस्मृतीचे दहन:** मनुस्मृती हिंदू धर्माचा एक धर्मग्रंथ होता. या ग्रंथाने जातीव्यवस्था व अस्पृश्यता संबंधीच्या निर्बंधाचे समर्थन करून हिंदू समाजपद्धती व जातीसंस्थेला बळकटी प्राप्त करून दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमता व उच्चनीचतेचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाविरुद्ध जनमत तयार करून २५ सप्टेंबर १९२७ ला मनुस्मृतीचे जाहीर दहन करून या अन्यायकारक ग्रंथाला कायमची मूठमाती दिली. या घटनेमुळे अस्पृश्य वर्गाचे मनोबल वाढण्यास मदत झाली.

**५) काळाराम मंदिर सत्याग्रह:** हिंदू धर्मातील उच्चवर्गीयांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कापासून वंचित ठेवले होते. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क देखील नाकारला होता. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्याचे ठरवले. अस्पृश्यांच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही. देवळे जरी स्पृश्य हिंदूनी बांधली असली तरी ती हिंदू धर्माची असून सर्व हिंदू धर्मीयाकरिता बांधली आहेत, म्हणून मंदिर प्रवेशासाठी नाशिक येथील काळाराम मंदिराची निवड करून

हजारो दलित बांधवासह २ मार्च १९३० रोजी सत्याग्रह केला. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह सुरू झाले.

**६) राजकीय कार्य:** बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी सायमन कमिशन समोर अस्पृश्यांच्या राखीव जागांची मागणी केली. लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या राजकीय सहभागासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण महात्मा गांधीजीनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या निर्णयाचा विरोध करून येरवडा कारागृहात उपोषण सुरू केले. उपोषणामुळे देशभर तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा तणाव कमी करण्यासाठी भारतातील नेत्यांनी महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात तडजोड घडवून आणली. त्यानुसार पुणे करार होऊन अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देण्याऐवजी राखीव मतदारसंघ देण्यात आले. अस्पृश्याबरोबर शेतकरी व कामगार वर्गांच्या सामाजिक क्रांतीला राजकीय व आर्थिक आधार देण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या माध्यमातून खोती निर्मूलन, महार वतने नष्ट करणारे विधेयक इ. विधायक कार्य केले. अनुसूचित जातीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी, त्यांना विशेष सवलती व संरक्षण प्राप्त करून देण्यासाठी तसेच त्यांची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी १९४२ साली 'शेड्युल कास्ट फेडरेशन' पक्षाची स्थापना केली. या पक्षाने अस्पृश्यांचे हित व हक्क सुरक्षित राहावेत याकरिता आग्रह धरला.

**७) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी केलेल्या परिश्रमामुळे त्यांना 'राज्यघटनेचे शिल्पकार' मानले जाते. राज्यघटनेतील प्रत्येक कलम मंजूर करताना त्यांनी व्यक्त केलेली मते व घटनेचा आराखडा तयार करताना घेतलेले श्रम यातून त्यांची विद्वत्ता दिसून येते. आज जो संपूर्ण भारत एकसंघ दिसत आहे, त्याचे संपूर्ण श्रेय हे भारतीय राज्यघटनेला जाते. डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना देशातील लोकांना अर्पण केलेली आहे.

**८) हिंदू कोड बिल:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री बनले. हिंदू समाजाला लागू असलेला हिंदू कायदा ब्रिटिशांनी तयार केला होता. या कायद्यात सुधारणा करण्यासाठी ब्रिटिशांनी १९४१ मध्ये हिंदू कोड बिल समिती निर्माण केली. सर्व हिंदू कायद्यांचे संहितीकरण करून सर्व हिंदूना एकच कायदा लागू करावा व त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्यात यावेत हे समितीचे मुख्य कार्य होते. या समितीने १९४३ मध्ये वारसाहक्क आणि विवाहविषयक अशी दोन विधयके मध्यवर्ती कायदे मंडळात मांडली. पण ती मंजूर झाली नाहीत. स्वातंत्र्यानंतर कायदामंत्री म्हणून हिंदू कोड बिल मंजुरीची जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली. त्यांनी हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करून लोकसभेत मांडला. मात्र हे बिल मंजूर झाले नाही. त्यामुळे त्यांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला. सर्व भारतीय महिलांच्या हक्कासाठी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निषेध व्यक्त केला.

**९) धर्मांतर व रिपब्लिकन पक्ष:** हिंदू धर्मात राहून बाबासाहेबांनी अस्पृश्यांना हक्क मिळवून देण्याचे प्रयत्न केले. सवर्ण हिंदूच्या कर्मठ वृत्तीमुळे हिंदू धर्मात राहून न्याय मिळणार नाही म्हणून 'येवला' या

ठिकाणी ''मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला आलेला असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही'' अशी घोषणा केली. हिंदू धर्माने अस्पृश्यांना न्याय न दिल्याने १४ ऑक्टोबर १९५६ ला विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर लाखो दलित बांधवांसह त्यांनी नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. हिंदू धर्माचा त्याग केला.

अशाप्रकारे दलित चळवळीच्या महानायकाच्या स्वरूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महान कार्य केले आहे. त्यांनी केलेल्या कार्यातून दलित वर्गांत जाणीवजागृती निर्माण झाली. दलितांना सामाजिक न्याय, प्रतिष्ठा आणि सन्मान प्राप्त झाला.

**डॉ. आंबेडकर यांच्या युगानंतरची दलित चळवळ**

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित समाजातील प्रभावी नेतृत्व संपले. त्यांचा वारस कोण हा प्रश्न उपस्थित झाला. सविता आंबेडकर, भैय्यासाहेब आंबेडकर आणि मुकुंदराव आंबेडकर यांचा विचार झाला. परंतु नेतेमंडळींनी आंबेडकर कुटुंबीयांचे नेतृत्व मान्य केले नाही. या समाजातील नेत्यांनी सामूहिक नेतृत्व स्वीकारले. यामुळेच डॉ. आंबेडकरांनंतर दलित चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक कार्यकर्त्यांनी योगदान दिलेले दिसते. यामध्ये प्रामुख्याने दादासाहेब गायकवाड, बी.सी. कांबळे, रा.सु गवई, बी.जी खोब्रागडे, दादासाहेब रूपवते ही प्रमुख नावे सांगता येतील.

**१. रिपब्लिकन पक्षाची स्थापना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अमेरिकेच्या रिपब्लिकन पक्षाच्या धर्तीवर काँग्रेस पक्षाला समर्थ पर्याय देण्याच्या हेतूने रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरवले होते. परंतु त्याच्या महापरिनिर्वाणामुळे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. नागपूर येथे दीक्षाभूमीवर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी शे.का.फे. बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. या पक्षाने भारतातील सर्व दुर्बल घटक, अल्पभूधारक, भूमिहीन मजुर तसेच अल्पसंख्यांकांना संघटित करून त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याची घोषणा केली. दलितांच्या हक्काचे रक्षण आणि बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. परंतु पक्ष स्थापनेनंतर अल्पकाळात आपापसातील हेवेदावे, सत्तेची अभिलाषा, वैचारिक मतभेद यामुळे रिपब्लिकन पक्षात फूट पडली. रिपब्लिकन पक्षाचे लहान लहान गटात रूपांतर झाले. या पक्षाच्या माध्यमातून प्रकाश आंबेडकर, रा.सू. गवई, योगेंद्र कवाडे तसेच रामदास आठवले यांचे नेतृत्व उदयास आले.

**२. दलित साहित्य चळवळ:**

डॉ. आंबेडकरांनी आपल्या वाङ्मय आणि ग्रंथ लेखनातून अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते जागतिक पातळीपर्यंत पोहचवली. त्यांची ही परंपरा पुढे दलित साहित्यिकांनी आत्मचरित्रपर लेखनातून चालू ठेवली. शिक्षणातून पुढे आलेल्या तरुणांनी आपल्या भावना शब्दात मांडायला सुरुवात केली. दलित लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रस्थापित विषमतेविरुद्ध एल्गार पुकारला. आपल्या मनातील

चीड व संताप सर्वांसमोर मांडला. मी माणूस आहे म्हणून मला माणसाचे सर्व हक्क मिळाले पाहिजेत हा दलित लेखनातील प्रमुख सूर होता. सत्यशोधक आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, दया पवार, केशव मेश्राम, लक्ष्मण गायकवाड, शरणकुमार लिबाळे, नामदेव ढसाळ इ. अनेकांनी कथा-कादंबरी, आत्मकथन तसेच वर्तमानपत्रातून दलितांचे दुःख मांडले. या लिखाणातून दलितांचे वास्तविक जीवन व चळवळीचे हुबेहूब चित्र रेखाटण्यात आले. दलित चळवळीमध्ये डॉ. आंबेडकरांच्यानंतर वैचारिक बांधणीचे कार्य दलित साहित्याने केलेले दिसते.

### ३. भूमिहीनांचा सत्याग्रहः

भूमिहीनांना शेती करण्यासाठी पडीक जमिनी दिल्या पाहिजेत या मागणीसाठी १९५३ पासून शे.का.फे. (शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन) पक्षाने सत्याग्रह सुरू केला होता. ७ मार्च १९६० रोजी महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासमोर भूमिहीनांचे विविध प्रश्न व मागण्या मांडल्या. बौद्धांना सवलती मिळाव्यात, महागाईला आळा घालावा, झोपडपट्टी सुधारणा करावी आणि लोकसभेच्या केंद्रीय सभागृहात बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावावे अशा विविध मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्षाने वेळोवेळी सत्याग्रह केला. आपले प्रश्न सोडवण्यासाठी दलित समाजाचे संघटन करून शासनाचे लक्ष वेधले. भूमिहिनांना न्याय मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने सत्याग्रहाच्या माध्यमातून सरकारवर दबाव टाकला.

### ४. दलित पँथरः-

दलितांच्या प्रश्नावर खंबीरपणे लढण्यासाठी दलित समाजातील तरुण नामदेव ढसाळ, राजा ढाले, भाई संगारे, गंगाधर गाडे, टी. एम. कांबळे यांनी एकत्र येऊन ९ जुलै १९७२ रोजी दलित पँथर संघटनेची स्थापना केली. परिवर्तनवादी उसळत्या रक्ताची संघटना म्हणून ही संघटना ओळखली जाऊ लागली. या संघटनेने हिंदूंच्या पुनरुज्जीवनवादी शक्तींना स्पष्टपणे विरोध करून सर्वांगीण क्रांतीसाठी जहाल कार्यक्रम आणि भाषेचा अवलंब केला. ''माणूस म्हणून जगणे हा आमचा हक्क आहे, त्यासाठी आम्ही चित्त्याचा पवित्रा घेऊन हक्कासाठी लढू'' हे ब्रीद मानणाऱ्या विद्रोही चळवळीतील साहित्यिक आणि कार्यकर्त्यांनी दलित पँथरची स्थापना केली. त्यात नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वी. पवार, रामदास सोरटे, लतिफ खाटीक, अविनाश महातेकर, प्रल्हाद चंदवनकर, प्रीतम कुमार शेगावकर, अरुण कांबळे या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी पँथरची चळवळ वाढवली. दलित पॅंथरने दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बेडधकपणे आवाज उठविला.

### ५. नामांतराची चळवळ:

डॉ.आंबेडकरांनी मराठवाडा ही कर्मभूमी मानली होती. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठवाड्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी मिलिंद महाविद्यालय स्थापन केले होते. त्यांच्या या कार्यामुळेच मराठवाड्यात शैक्षणिक चळवळीचे बीजारोपण झाले. त्या कार्याचा उचित गौरव करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव द्यावे अशी मागणी दलित पँथरने केली. ही मागणी लक्षात घेऊन विद्यापीठ कार्यकारणीने विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करावे असा ठराव संमत केला. २७ जुलै १९७७ रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात नामांतराचा ठराव मंजूर झाला. यातूनच

मराठवाड्यात दलित आणि सवर्ण यांच्यात संघर्ष निर्माण होऊन दंगली सुरू झाल्या. त्यामुळे नामांतराला स्थगिती मिळाली. दलित पँथरने नामांतराच्या निमित्ताने अनेक मोर्चे काढून आपली भूमिका जनतेसमोर मांडली. हा लढा दलित अस्मितेचा लढा बनला. या लढ्यात १९७७ साली पँथरने काढलेला मोर्चा, १९७८ मध्ये दिल्ली येथे काढलेला मोर्चा आणि १९७९ मध्ये औरंगाबाद येथे झालेला नामांतर सत्याग्रहातील चळवळी नामांतर काळातील महत्त्वपूर्ण चळवळी मांनल्या जातात. या चळवळीमुळे दलित समाजात भावनिक ऐक्य आणि एकात्मता निर्माण झाली. सवर्ण, नामांतर विरोधी संघटना तसेच दलित यांच्यात मराठवाड्यात मोठा संघर्ष सुरू झाला. या संघर्षात पहिला बळी मातंग समाजातील पोचिराम कांबळे यांचा गेला. मराठा समाजातील विलास ढाणे यानेही आपले बलिदान दिले. नांदेडच्या गौतम वाघमारे ह्या पँथरच्या कार्यकर्त्याने आत्मदहन केल्यामुळे हा प्रश्न चिघळला. अखेर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी विरोधी पक्ष, विविध नामांतर विरोधी संघटना आणि दलित संघटना यांच्याशी विचारविनिमय करून १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्याऐवजी नामविस्तार करून विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव दिले.

**६. दलित मुक्ती सेना:**

प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नामांतराचा लढा आणि दलित प्रश्न सोडवणुकीसाठी 'दलित मुक्ती सेना' नावाने दलित तरुणांची जहाल संघटना स्थापन केली. त्यांच्या आक्रमक आणि विद्रोही वक्तृत्वामुळे अनेक दलित तरुण संघटनेकडे आकर्षित झाले. त्यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च काढला. या लाँगमार्चमध्ये विविध पुरोगामी संघटना तसेच दलित तरुणांनी सहभाग घेतला. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सरकारने जिल्हाबंदीचे आदेश लागू केले.

**७. मंडल आयोग लढा:**

राखीव जागांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोरारजी देसाई यांनी १९७८ मध्ये न्यायमूर्ती बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग निर्माण केला. या आयोगाने सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक निकषांच्या आधारावर भारतातील ३७४३ जाती इतर मागास जाती म्हणून जाहीर केल्या. या जातींना नोकरी, शिक्षण तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये २७ टक्के राखीव जागा ठेवण्यात याव्यात ही शिफारस केली. हा अहवाल येताच गुजरात आणि बिहार राज्यात आंदोलने सुरू झाली. दलित संघटनांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी म्हणून मोर्चे तसेच आंदोलने केली. पंतप्रधान पी. व्ही.सिंगानी मंडल आयोग लागू करण्याची घोषणा केल्यामुळे देशात दंगली सुरू झाल्या. निवडून आल्यानंतर पी.व्ही. नरसिंहराव सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी केली. त्यानंतर देशभर हा आयोग लागू करण्यात आला.

**८. बामसेफ आणि बसपा:**

कांशीराम यांनी फुले आणि आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन उत्तर प्रदेशमध्ये दलित चळवळ सुरू केली. 'बामसेफ' ही शासकीय नोकरीत असलेल्या दलित कर्मचाऱ्यांची संघटना स्थापन केली. त्यांनी 'बहुजन समाज पार्टीची' स्थापना केली. सर्व देशातील दलितांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. जातीवादी,

तसेच मनुवादी प्रवृत्तीवर जोरदार हल्ला चढवला. उत्तरप्रदेशात या पक्षाला भरघोस पाठिंबा मिळाला. या पक्षाच्या 'मायावती' चार वेळा उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्री झाल्या. बसपाच्या निमित्ताने दलित समाजाच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात उंचावल्या. तत्त्वहींन राजकीय आघाड्या, उत्तरप्रदेश व्यतिरिक्त इतरत्र प्रभावाचा अभाव, नेतृत्वाकडून अवलंबिली गेलेली व्यक्तिपूजक वृत्ती, सत्ता, राजकारण व अर्थकारणाला महत्त्व, तसेच तत्वप्रणालीतील गोंधळ इ. मुळे हा पक्ष दलित समाजाला अपेक्षित नेतृत्व देऊ शकला नाही. सध्याच्या काळात उत्तरप्रदेश सारख्या राज्यात बसपाचा प्रभाव ओसरत असलेला दिसून येतो.

**९. दलित महासंघ:**

दलित महासंघाचा जन्म जुलै १९९२ साली प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरातील ऐतिहासिक बिंदू चौकात झाला. फुले, शाहू, आंबेडकर तसेच आण्णाभाऊ साठे यांच्या विचाराची स्पष्ट दिशा स्विकारून 'दलित महासंघ' या चळवळीला सुरुवात झाली. शोषणमुक्त समाज क्रांतीच्याच मार्गाने निर्माण होऊ शकतो. या भूमिकेतून दलित महासंघ शिस्तबद्ध, गतिमान आणि लढावू पद्धतीने चळवळ करीत आहे. दलित महासंघ हे लढाऊ आक्रमक संघटन आहे. ही संघटना संपूर्ण महाष्ट्रभर कार्य करीत आहे. दलित महासंघाचे अंतिम उद्दिष्ट 'समता' प्रस्थापित करणे आहे. आजपर्यंत दलित महासंघाने आरक्षण, आण्णाभाऊ साठे स्मारक प्रश्न, मंदिर प्रवेश, नामांतर आंदोलन अशी विविध आंदोलने केलेली आहेत. समाजातील विविध घटकांसाठी दलित महासंघाने भरीव आंदोलने केली असून महाराष्ट्रभर संघाच्या शाखांचा विस्तार केला आहे. वर्तमानकाळात दलित चळवळीत कोल्हापूरात अनेक सामाजिक संघटना विविध विषयांवर कार्यरत आहेत. त्यामध्ये रिपब्लिकन पार्टी आफ इंडियाचे आठवले गट, कवाडे गट, गवई गट, मातंग सेवा संघ, बहुजन रयत परिषद, सी.पी.आय., सी.पी.एम., दलित पँथर, ब्लँक पँथर, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, समतावादी सांस्कृतिक चळवळ, भटका समाज मुक्ती आंदोलन, लोक जनशक्ती पार्टी, डि. पी. आय., शे.का.प., दलित सेना, बहुजन रयत पार्टी, श्रमिक मुक्ती दल, सेक्यूलर मूव्हमेंट, नॅशनल ब्लँक पँथर, बहुजन ऐक्य चळवळ, नाग आर्मी सोशल अँन्ड मार्शल मिशन इत्यादी अनेक संघटना सामाजिक चळवळीचे काम करताना दिसून येतात. परंतु यातील बहुतांशी संघटना राजकिय स्वरुपाच्या देखील आहेत.

**दलित चळवळीचे परिणाम :** दलित चळवळ ही भारतातील एक महत्त्वपूर्ण चळवळ आहे. प्रत्येक चळवळीचा अभ्यास करताना तिच्या यशापयशाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय त्या चळवळीबाबत भविष्यकथन करणे योग्य होणार नाही. या चळवळीने अनेक नेते समाजाला दिले. दलित चळवळीमुळे समाजात आत्मभान निर्माण झाले. हा गावकुसाबाहेर राहणारा समाज सर्व प्रकारच्या संधी आणि सवलतीपासून वंचित होता. या समाजाला चळवळीतून आत्मभान निर्माण झाल्यामुळे त्यांच्यात जागृती येऊ लागली. तो आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्यास तयार झाला. दलित चळवळीने केलेल्या नामांतर तसेच भुमिहीन सत्याग्रह इ. विविध चळवळीमुळे दलित समाजात अस्मितेची भावना निर्माण होऊन समाजात ऐक्य विकसित झाले. दलित चळवळीतून दलित साहित्याची निर्मिती झाली. दलित समाजात अनेक साहित्यिक जन्माला आले. दलित चळवळीमुळे महाराष्ट्रातील इतर समाज संघटनांना प्रेरणा मिळाली. विशेषतः दलित

चळवळीने फक्त दलितांच्या प्रश्नापुरत्या चळवळी केल्या नाहीत. मंडल आयोग लागू करावा म्हणून संघर्ष केला. याचा परिणाम इतर वंचित जातीमध्ये देखील जागृती निर्माण झाली. डॉ. आंबेडकर व फुले यांच्या विचारापासून प्रेरणा घेऊन इतर मागासवर्गीय जाती आणि आदिवासीमध्ये चळवळी विकसित झाल्या. दलित समाजाचे आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडून आले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मंत्राने प्रेरित होऊन आपली शैक्षणिक प्रगती केली. नोकऱ्या मिळवल्या त्यामुळे दलित समाजाची आर्थिक परिस्थिती बदलली. आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित समाजातील लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे सांस्कृतिक परिवर्तनाला चालना मिळाली. बौद्ध धर्म जातीव्यवस्था किंवा कर्मकांड यांना स्थान देत नसल्यामुळे समाजात एकात्मता आणि समतेला पूरक वातावरण निर्माण झाले. चळवळीमुळे दलित समाजाला राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात आरक्षण मिळाले. आरक्षण आणि शिक्षणामुळे अनेक उच्च पदावर दलित समाजातील लोक कार्यरत असल्याचे दिसून येते. राजकीय क्षेत्रात दलित समाज फार मोठी शक्ती म्हणून उदयाला आलेला दिसतो. या शक्तीचा विचार केल्याशिवाय कोणत्याही राजकीय पक्षाला पुढे जाता येणार नाही. म्हणून दलित समाजामध्ये राजकीय जागृती, शैक्षणिक जागृती, सांस्कृतिक परिवर्तन, आर्थिक परिस्थितीत बदल, एकात्मता, समतेचे आकर्षण तसेच प्रगतीचा ध्यास इ. गोष्टी दलित चळवळीमुळे प्राप्त झालेल्या दिसतात.

दलित चळवळीमुळे दलित समाजात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. ते खालील मुद्यांच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

१. दलित चळवळीने दलित समाजाला त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली.

२. दलितांना जागृत व संघटित करण्याबरोबर सुसंस्कार आणि वैचारिक चौकट विकसित करून दलितांचे संस्कृतीकरण करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते.

३. दलित चळवळीने दलित प्रश्नांच्या अनुषंगाने मोर्चे, आंदोलने, घेराव, आत्मदहन, सत्याग्रह करून दलित प्रश्नांना वाचा फोडली.

४. दलित चळवळीने मानवी हक्क व सामाजिक न्यायापासून वंचित दलित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

५. या चळवळीमुळे दलित समाजात आत्मभान व प्रेरणा विकसित होण्यास हातभार लागला.

६. दलित चळवळीमुळे दलितांची सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक गुलामगिरी नष्ट होण्यास मदत झाली. त्यातून दलितांमध्ये राजकीय नेतृत्व निर्मिती, आरक्षण, नोकरीच्या संधी तसेच आर्थिक परिस्थितीत चांगले परिणाम घडून आले.

७. दलित चळवळीमुळे दलितांच्या सर्वांगीण विकासाला संधी मिळाल्यामुळे दलित साहित्य, दलित रंगभूमी, दलित कलाकार, दलित नेतृत्व तयार होण्यास मदत झाली.

८. दलित चळवळीच्या माध्यमातून दलितांच्या प्रश्नांना सार्वजनिक आवाज मिळाला. इतर समाजही त्यांच्याकडे प्रतिष्ठेने पाहू लागला.

९. दलित समाजामध्ये फुले, शाहू, आंबेडकर, आण्णाभाऊ साठे, संत कबीर, पेरियार, नारायणगुरु ह्या महापुरुषांच्या विचारांचे बीजारोपण होण्यास मदत झाली.

महाराष्ट्रातील दलित चळवळ ही मोठ्या प्रमाणात विकसित झाली. त्याचे सारे श्रेय हे फुले, शाहू, आंबेडकर यांना जाते. यांनी महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणेचे जे बीजारोपण केले त्याचे फलित म्हणजे आजचा पुरोगामी महाराष्ट्र होय. वरील विविध मुद्यांच्या सहाय्याने दलित चळवळींच्या अनुषंगाने मांडणी करण्यात आली आहे.

## ४.४ सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण महाराष्ट्रातील विविध चळवळींचा आढावा घेतलेला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि या चळवळी समोरील आव्हाने, शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकरी चळवळ कशा पद्धतीने विकसित होत गेली, स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळ, तसेच स्वातंत्र्यानंतरची शेतकरी चळवळ याचा सविस्तरपणे आढावा घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील महिला चळवळीवरती देखील प्रस्तुत प्रकरणांमध्ये भाष्य करण्यात आलेले आहे. महिलांच्या समस्या आणि महाराष्ट्रातील महिला चळवळीची दिशा इ.बाबत विवेचन केलेले आहे. महाराष्ट्राला सहकार चळवळीची मातृभूमी म्हटले जाते. देशाला सहकार देण्याचे काम महाराष्ट्राने केलेले आहे. या सहकार चळवळीची दिशा आणि तिच्या समोरील आव्हाने यांचा देखील आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्राला फुले, शाहू, आंबेडकर यांचा पुरोगामी वारसा लाभलेला आहे. येथील वंचित, उपेक्षित आणि दलित समाजाला त्यांच्या कार्यामुळे दिशा प्राप्त झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीची दलित चळवळ, शाहू महाराज यांनी दलितांसाठी केलेले कार्य, सयाजीराव गायकवाड, महात्मा फुले, वि. रा. शिंदे यांनी केलेले कार्य यांचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर भूमीहीन लोकांचा सत्याग्रह, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, दलित पँथरची स्थापना, त्यांची चळवळ तसेच दलित महासंघाची स्थापना याबाबत सविस्तरपणे आढावा घेतलेला आहे. शेवटी दलित चळवळीचे परिणाम मुद्द्यांच्या सहाय्याने प्रस्तुत प्रकरणांमध्ये सविस्तरपणे मांडण्यात आलेले आहेत.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### ४.५.१ सविस्तर उत्तरे लिहा.

१. महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनावरती विस्तृत चर्चा करा.

२. स्त्री आंदोलनावरती भाष्य करा.

३. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे विश्लेषण करा.

४. महाराष्ट्रातील दलित आंदोलनाची सविस्तर चर्चा करा.

**४.५.२ टिपा लिहा.**

१) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या

२) सहकार चळवळीचे वैशिष्ट्ये

३) शेतकरी संघटना

४) महाराष्ट्रातील महिला संघटनेचा इतिहास

५) महिला समस्या

**४.५.३ एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे आराधस्तंभ कोण आहेत?

२) संयुक्त राष्ट्र संघाने कोणते वर्ष महिला वर्ष म्हणून साजरे केले?

३) जागतिक महिला दिन केव्हा साजरा केला जातो?

४) महाराष्ट्र शासनाने कोणते वर्ष आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष म्हणून साजरे केले?

५) कोणते आंदोलन शेतकऱ्यांचे पहिले आंदोलन मानले जाते?

६) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यासंदर्भात कोणता ग्रंथ लिहिला आहे?

७) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष कोण आहेत?

८) शेतकरी संघटनेचे प्रणेते कोण?

९) शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केव्हा झाली?

१०) १९९३ मध्ये कोल्हापुरात रूपा शहा यांनी कोणत्या संघटनेची स्थापना केली?

११) इंदुमती पाटणकर यांनी सप्टेंबर १९८६ मध्ये कोणती संघटना स्थापना केली?

१२) दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कोण आहेत?

१३) मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातील पहिला शहीद कोण?

१४) दलित पँथरची स्थापना केव्हा झाली?

१५) 'डिस्प्रेड क्लास मिशन सोसायटी' या संस्थेची स्थापना कोणी केली?

१६) बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केव्हा झाली?

१७) मनुस्मृतीचे जाहीर दहन केव्हा करण्यात आले?

१८) 'विटाळ विध्वंसन' हे पुस्तक कोणी लिहिले आहे?

**४.५.३ ची उत्तरे खालील प्रमाणे**

१) महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे आधारस्तंभ आहेत.

२) १९७५

३) ८ मार्च

४) महाराष्ट्र शासनाने २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष म्हणून साजरे केले.

५) शिरूरमधील करडे गावी झालेले आंदोलन हे पहिले शेतकरी आंदोलन मानले जाते.

६) शेतकऱ्यांचा आसूड

७) राजू शेट्टी

८) शरद जोशी

९) १९४८

१०) दिलासा

११) स्त्री मुक्ती संघर्ष

१२) प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे

१३) पोचीराम कांबळे

१४) ९ जुलै १९७२

१५) महर्षी वि.रा.शिंदे

१६) २० जुलै १९२४ रोजी

१७) २५ सप्टेंबर १९२७

१८) गोपाळ बुवा वलंगकर

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ:

1) Karve, I. : 'Maharashtra, Land and Its People', Directorate of Publications, Government of Maharashtra, Bombay, 1968.

2) Karve, I. Marathi Lokanchi Sanskriti, Deshmukh Pub, Mumbai.

3) Karve, I. : ‘Maharashtra, Land and Its People’, Directorate of Publications, Government of Maharashtra, Bombay, 1968.

4) Karve, I. Marathi Lokanchi Sanskriti, Deshmukh Pub, Mumbai.

5) Khekale, N ‘Pressure Politics in Maharashtra’, Himalaya Publishing House, Bombay. 1999.

6) Lele, J: ‘Caste, Class and Mobilization in Maharashtra’ in Frankel Pub. 1990.

7) Lele, Jayant: Elite Pluralism and Class Rule- Political Development in Maharashtra, Popular Prakashan, Bombay, 1982.

8) Gare, Govind: Maharashtratil Adivasi, Government of Maharashtra Human Development Report, Maharashtra, Government of Maharashtra Pub. Mumbai, 2002.

9) Jogdand, P. G: Dalit Movement in Maharashtra, Kanak Publications, New Delhi, 1991.

१०) शहा घनश्याम, (२०१७) भारतातील सामाजिक चळवळ, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

११) खंडागळे चंद्रकांत, (२०१९) भारतातील सामाजिक चळवळ, सांगली

१२) महापुरे अमोल, (२०१५) ‘कोल्हापूर जिल्ह्यातील दलित चळवळ विशेष संदर्भ दलित महासंघ’ अप्रकाशित संशोधन लेख.

१३) डॉ. सय्यद तबस्सूम सुलताना यांचा लेख, (मॅक्स रिपोर्ट मॅक्स ब्लॉग्ज,) ‘ग्रामीण महिलांच्या मुलभूत समस्या आणि उपाय’.

१४) इयत्ता ११वीचे सहकार विषयाचे पाठ्यपुस्तक.

१५) https://www.misaonline.in/women%२७s-organisations-in-maharashtra (गिरिजा गोडबोले, महाराष्ट्रातील महिला संघटना, मिसा, (ऑनलाईन))

❑❑❑